८३.५४५०

गोड शेवट

साने गुरुजी



गोड शेवट

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

गोड शेवट : साने गुरुजी

प्रकाशक
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

अक्षरजुळणी
रविंद्र सावंत

मुखपृष्ठ
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

आवृत्ती
१५ ऑगस्ट, २०११

किंमत
रुपये २६०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

गोड शेवट

अनुक्रमणिका

१. कर्जबाजारी रामराव ७

२. मित्रांची जोडी १२

३. कोजागिरी २६

४. आपण दोघे भिकारी होऊन हिंडू ४१

५. दयाराम भारतींना हद्दपारीची शिक्षा ५२

६. राष्ट्रीय मेळा ५९

७. जगन्नाथचे लग्न ७०

८. येथे नको, दूर जाऊ ८२

९. गुणा, कोठे गेला गुणा? ९६

१०. आगगाडीत भेटलेला देव १०५

११. दुःखी जगन्नाथ ११७

१२. इंदूर १२८

१३. इंदिरा १४८

१४. जगन्नाथ १६४

१५. इंदू १८६

१६. अनुदार आहे देव १९९

१७. एरंडोलला घरी २१८

१८. प्रेमयात्रा २२८

१९. चंद्रभागेत पवित्र हो २४६

२०. शेवटी सारे गोड होते २५४

कर्जबाजारी रामराव

एरंडोल हे गाव खानदेशात सुप्रसिद्ध आहे. अति-प्राचीन असे हे गाव आहे. महाराष्ट्रात इतकी जुनी गावे क्वचितच असतील. प्राचीन काळी १५०० वर्षांपूर्वी दिग्विजयाच्या समुद्रगुप्ताने 'महाराष्टात' की एरंडपल्ली जिंकले. असे आपल्या विजयस्तंभावरील दिग्विजयाच्या यादीत लिहिले आहे. एरंडोलला पांडवांचा वाडा अद्याप दाखवतात. आज त्यात मशीद आहे. ज्या एकचक्रानगरीत पांडव भिक्षेकऱ्यांच्या रूपाने एका ब्राह्मणाकडे राहत, ती नगरी एरंडोलच्या जवळच होती असे सांगतात आणि एरंडोलपासून चार-पाच मैलांवर पद्मालय म्हणून निसर्गसुंदर स्थान आहे. तेथे जंगलात बकासुर राहात असे. तेथेच भीमाने बकासुराला मारले. तेथे पांढरे ठिपके असलेले दगड आहेत. लोक म्हणतात की, हा त्या गाड्यांतील दही भात आहे. तेथे दगडात खळगे आहेत. ती भीमाची व बकासुराची पावले आहेत असे म्हणतात. असे हे प्राचीन शहर आहे. मध्यकाळातही एरंडोल भरभराटीत होते.

एरंडोलला कागदीपुरा आहे. येथील कागद नागपूरपासून कोल्हापूरपर्यंत जात असे. येथे कितीतरी कागदाचे कारखाने होते; परंतु परदेशी यांत्रिक कागद येऊ लागला व येथील हा भरभराटलेला भाग ओस पडला; परंतु महात्मा गांधीजींची

ग्रामोद्योगाची चळवळ येऊन येथील लोकांस पुन्हा कागदीपुरा गजबजू लागला आहे. कागदाला मागणी येत आहे व गरीब मुसलमान बंधूभगिनी काँग्रेसला व महात्माजींच्या ग्रामोद्योगास दुवा देत आहेत.

एरंडोलच्या भोवती जुना तट आहे. गावातील पाणी वगैरे वाहून जाण्याची पूर्वी फार सुंदर व्यवस्था होती. गावाला लागून सुंदर नदी आहे. तिचे नाव अंजनी. नदीला पूर्वी बारा महिने पाणी असे. पूर्वी पाऊस जास्त पडे. आता पाऊस कमी झाला. लोक म्हणतात की, पाप झाले म्हणून नदीचे पाणी कमी होऊ लागले. कोणी कोणी दंतकथा सांगतात की, एकदा एका ऋषीने आपली छाटी तीरावर वाळत घातली होती; परंतु एकाएकी पूर आला व छाटी वाहून गेली. ऋषी रागावला.त्याने नदीला शाप दिला, ''तू फार उन्मत आहेस. तुझे पाणी कमी होईल.'' त्या वेळेपासून पाणी पळाले; परंतु कोणी विचारवंत म्हणतात, ''लहानशा लंगोटीसाठी सर्व जगाचे पाणी बंद करणारा हा क्रोधी ऋषी त्याची का वाणी खरी होईल? या दंतकथेत अर्थ नाही. जंगले कमी होऊ लागली, त्यामुळे पाऊस कमी पडू लागला म्हणून नदीचे पाणी उन्हाळ्यात कमी राहू लागले. अलीकडे पाऊस पुन्हा अधिक पडू लागला आहे. नदीला पाणी राहू लागले. स्वच्छ सुंदर पाणी असल्याने बायकांची धुण्यासाठी गर्दी असते. दूरवरच्या बाजूस लोक स्नानास जातात मुले डुंबत असतात. गाईगुरे येत असतात. गावाला नदी असली म्हणजे गावात चैतन्य असते.

एरंडोलला जुन्या इमारती आहेत. जुन्या सुंदर मशिदी आहेत. मोठ मोठे जुने वाडे आहेत. एके काळचे शहराचे वैभव त्यावरून दिसून येते; परंतु आज ते भाग्य कोठे आहे? जुन्या वैभवाची पडकी माती फक्त आज आहे. त्यावेळचे देशमुख, देशपांडे आज गरीब झाले आहेत. एकेकाळी ज्यांच्याकडे हत्ती झुलत, त्यांना आज खाण्याची पंचाईत पडू लागली आहे. लक्ष्मी ही चंचल आहे. मनुष्याला गर्व वाटू नये म्हणून का ती एके ठिकाणी राहत नाही? परंतु लक्ष्मी चंचल नसून मनुष्यच चंचल आहे. लक्ष्मी नेहमी गुणांजवळ राहते. ज्या देशात उद्योग अधिक, संघटना अधिक, सहकार्य अधिक, बुध्दी अधिक. निश्चय अधिक, बंधुभाव अधिक त्या देशात संपत्ती राहाते. तेथे लक्ष्मी राहते. आळस व विलास आले की, लक्ष्मी पलायन करू लागते.

एरंडोलच्या आसपास कितीतरी आमराया. एरंडोलचे आंबे फार प्रसिध्द. रसाळ, गोड चवदार आंबे. एरंडोल कागदासाठी प्रसिध्द होते, आंब्यासाठी होते; परंतु न्यायासाठी सर्वात अधिक प्रसिध्द होते. एरंडोली न्याय ही म्हणच पडली आहे. एरंडोलचे लोक समतोल शांत व निश्चयी म्हणून प्रसिध्द होते. विचारपूर्वक आचार करणारे अशी ख्याती होती; परंतु एरंडोलची पूर्वीची ही ख्याती आता तितकी राहिली नव्हती.

एरंडोलची जुनी खानदानी घराणी साफ बसली होती. ती कसेतरी दिवस काढीत होती. नवीन श्रीमंतवर्ग जन्माला आला होता, पूर्वीच्या श्रीमंत घराण्यात जे कारभारी गुमास्ते म्हणून वावरत होते, तेच आज सावकार होऊन बसले होते व ज्या मालकांकडे ते नोकर होते; ते मालक आज लाचार होऊन त्यांच्याकडे कर्ज मागायला येत असत. ज्या मोठमोठ्या वाड्यांतून पूर्वी मेजवान्या झडत, संगीताचे जलसे होत, त्या वाड्यातून आता केवळ उपासमार होती. जेथे गडीमाणसे हिंडत, जेथे गाड्याघोडी असत, तेथे आज केवळ दारिद्र्य दिसून येत होते.

एरंडोल पंढरीशेट शिंपी म्हणून एक असेच नवीन सावकार होते. ते पिढीजात सावकार नव्हते. असेच उपरे सावकार. त्यांनी कोठेतरी डल्ला मारला होता. असे म्हणतात. कोणी म्हणतात की, एक मोठा दरोडेखोर डाका घालून त्यांच्याकडे लपला होता. सारी संपत्ती त्यांच्याकडे ठेवून तो गेला; परंतु तो परत आलाच नाही. ती जी संपत्ती मिळाली तीवर पंढरीशेटचे घराणे वर आले. खानदेशात बहुतेक ठिकाणी ही डाक्यांची संपत्ती आहे. चोपडे शहरात अजून खूप संपत्ती आहे म्हणतात; परंतु ही आली कोठून? खानदेशात एक जुनी म्हण आहे, "धरणगाव में धन बडा, पारोळे में बाकी साकी: चोपडे में जावे पानी पीनेकू तो बतावे तापी." चोरीची संपत्ती घरात. त्यामुळे चोपड्याच्या श्रीमंतांना कोणी घरात येऊ नये असे जणू वाटे. न जाणो उघडकीस काही यायचे. खानदेशभर अशा या डाक्यातील संपत्तीच्या गोष्टी आहेत. त्यातून गावोगावचे सरकार व धनिक वर आले. पंढरीशेट श्रीमंत होते; परंतु त्यांच्या घरात खानदानीपणा नव्हता. एक प्रकारची उदार व दिलदार वृत्ती नव्हती. इतकी श्रीमंती होती तरी घरी नीट भाजी खाणार नाहीत. दरिद्र्याप्रमाणे राहतील. दूध व ताकही विकतील. खेड्यापाड्यांवरून कुळे आली तर त्यांना गुळपाणी देणार नाहीत, त्यांच्या खाण्यापिण्याची चौकशी करणार

नाहीत. पंढरीशेटजीस कोणीही 'बरे' म्हणत नसे. त्यांना कर्जदाराची कधी दया येत नसे. 'पैसा म्हणजे माझा प्राण' असे ते म्हणत.

याच एरंडोल शहरात रामराव म्हणून एक घरंदाज गृहस्थ होते. ते श्रीमंत होते; परंतु आज त्यांना वाईट दिवस आले होते. त्यांना खूपच कर्ज झाले होते. त्यांना आता नवीन कर्ज द्यावयास कोणी तयार नसे; परंतु कर्जाशिवाय तर त्यांचे पदोपदी अडे. कोणाकडे तोंड वेंगाडायचे?

रामराव यांना एकच मुलगा होता. त्याचे नाव गुणा. गुणावर त्यांचे फार प्रेम होते. तो त्यांची आशा. तोच जणू त्यांची इस्टेट. बाहेर त्यांना आता फार मान मिळत नसे. कधी कधी अपमानही होत; परंतु घरी येऊन गुणाला पाहिले की, सारे अपमान ते विसरून जात. गुणा खरोखर गुणांचा होता. दिसे सुंदर, हसे सुंदर. त्याच्या भुवया फारच सुंदर होत्या. कान लांब होते. जणू देवाची मूर्ती असा तो दिसे आणि आता गुणाची मुंज करावयाची होती. जवळ तर दिडकी नाही; परंतु नाव तर मोठे. थाटाने मुंज नको का करायला? परंतु कर्ज देणार कोण? कोणाकडे जावयाचे? शेवटी रामराव पंढरीशेटकडे गेले. पंढरीशेट म्हणाले, '' हे पाहा रामराव, आता तुम्हाला पैसे देण्यात अर्थ नाही. कोणीही शहाणा सावकार तुम्हाला आता पैही देणार नाही.''

''तुम्ही काही करा; परंतु माझी अब्रू सांभाळा. गुणाची मुंज केलीच पाहिजे. आणखी किती आता वाट पाहावयाची? परंतु नुसती लंगोटी थोडीच लावायची? मोठं नाव पडलं ना? थोडा फार खर्च करायला हवा.''

''परंतु असे कसे पैसे द्यावयाचे?''

''पंढरीशेट, माझ्याजवळ आता काय राहिलं आहे? सारी शेती गहाण पडली. घरात दागदागीना राहिला नाही. मी तुमचे पैसे परत करीन. कर्ज फेडल्याशिवाय मी मरणार नाही.''

''अहो, कसं फेडणार कर्ज? शब्दांनी का फेडता येते? तुमचं राहातं घर आहे. ते देता लिहून? काही तरी आधार हवा. आधाराशिवाय मी कसे देऊ पैसे? देता घर लिहून? बोला.''

''वडिलोपार्जित वाडा गहाण ठेवायला वाईट वाटतं''

''परंतु त्याशिवाय पैसे मिळणार नाहीत.''

रामराव निराश होऊन घरी गेले. त्यांनी आणखी काही ठिकाणी प्रयत्न केला. परंतु पैसे कोठेही मिळत ना. शेवटी रामरावांनी आपले राहते घर गहाण

ठेवले. ते लिहून दिले. अर्थात त्यांना त्या घरात राहावयास परवानगी होती. घर लिहून देताना त्यांच्या डोळ्यांत पाणी आले.

"पंढरीशेट. तुम्ही शेवटी मला रडवलंत!"

"रामराव, हा व्यवहार आहे. तुम्ही जे पैसे नेणार त्याची फेड होणं शक्य आहे का? तुम्हाला तरी तसे वाटते का? तुमच्याजवळ काहीही उरलेलं नाही असं तुम्हीच म्हणता. फुकट पैसे देण्याइतका मी उदार नाही."

रामराव पैसे घेऊन गेले. गुणाची त्यांनी जरा थाटाने मुंज केली. गुणा मोठा होऊ लागला. तो इंग्रजी शाळेत जाऊ लागला. तो हुशार होता. मुलगा पुढे नांव काढील असे सारे म्हणत; परंतु रामरावांना वाईट वाटे. आपल्या मुलाला शिकवण्याला त्यांच्याजवळ पैसे कोठे होते? तुमच्या गुणाला खूप शिकवा तो हुशार आहे, असे कोणी म्हटले म्हणजे त्यांना वाईट वाटे .

ते म्हणत, "नसता हुशार तर बरं झालं असते. त्याची हुशारी वाया जाणार. त्याची बुध्दी फुकट जाणार. दरिद्री व कर्जबाजारी पित्याच्या पोटी कशाला आला?"

" तो शिष्यवृत्ती मिळवील व अभ्यास करील. तुम्हाला काळजी नको." लोक म्हणत.

" परंतु आपणास मदत करता येत नाही याचं वाईट वाटणारच मला." रामराव दुःखाने उत्तर देत.

✦✦

मित्रांची जोडी

गुणा मोठा होत होता. गुणाचा एक गुण रामरावांच्या लक्षात आला. गुणाला वाद्ये वाजवण्याचा नाद लागला. पंढरीशेटचा लहान मुलगा जगन्नाथ हा गुणाचा मित्र. दोघे एका वर्गात होते. जगन्नाथ व गुणा यांचे एकमेकांवर फार प्रेम. ते जवळजवळ बसत. बरोबर फिरायला जात. बरोबर नदीत डुंबत.ते एकमेकांस कधी विसंबत नसत.

जगन्नाथचा गळा फार गोड होता. देवाने त्याला गोड आवाजाची देणगी दिली होती. पंढरीशेटचा हा शेवटचा मुलगा. तो आई–बाबांचा फार लाडका होता. फार प्रेमाने त्याला वाढवण्यात आले. तो दिसेही सुरेख. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारची कोमलता होती आणि डोळे जणू प्रेमसरोवर होते. केस काळे कुळकुळीत होते आणि कधी सणावाराचे दिवशी जेव्हा तो सुंदर पोशाख करी, अलंकार घाली. तेव्हा तर त्याची मूर्ती फारच मनोहर दिसे.

''तुमच्या जगन्नाथला मधुर कंठ आहे. त्याला गाणे शिकवा ना,'' एक मित्र पंढरीशेटना म्हणाले.

''गाण्यानं मुलं बिघडतात. उद्या मोठे झाल्यावर बैठकी करतील. सारे पैसे उधळतील. कशाला हवा गोड आवाज? उद्या कठोर आवाजाची जरुरी लागेल.

कुळं खंड देत नाहीत, पैसे परत करीत नाहीत. त्यांच्यावर जरा ओरडता आलं पाहिजे. रागाने सांगता आलं पाहिजे. गोड आवाज, काय करायचा तो?'' पंढरीशेट म्हणाले.

''असं नका हो म्हणू. गायनाची कला म्हणजे दैवी कला. सर्व दुःखाचा विसर पाडणारी कला. तुम्हाला अनुकूलता आहे, म्हणून सांगितलं,'' तो मित्र म्हणाला.

पंढरीशेटनी ऐकले नाही;परंतु पुढे जगन्नाथच वडिलांच्या पाठीस लागला आणि आईकडूनही त्याने वशिला लावला. शेवटी, एक गवई जगन्नाथास शिकवू लागला. गोड आवाजाला शिक्षणाची जोड मिळाली. जगन्नाथ सुंदर गाऊ लागला.

हा जगन्नाथ गुणाचा आंता मित्र झाला होता. गुणा जगन्नाथकडे जाई. गाणे ऐके. गवई शिकवत असता गुणाही बसे. तेथे हळूहळू सारी संगीत वाद्ये जमू लागली. तबला, तंबोरे आले, पेटी आली, सतार-सारंगी आली. जणू गांधर्व विद्यालय सुरू झाले.

गुणाला गाता येत नसे;परंतु त्याचे हृदय संगीताने वेडे होई. ते स्वर त्याच्या कानांत घुमत. त्यांची बोटे नाचत. जगन्नाथच्या खोलीत तो हळूच सतार हाती घेई. तारा छेडी, पडदे दाबी. आपल्याला हे सारे येईल असे त्याला वाटू लागले. तंतूवाद्याची त्याला मोहिनी पडली. आपण तंतूवाद्य शिकावे असे त्याला वाटू लागले.

एकदा एरंडोलमध्ये एक प्रख्यात सतार वाजवणारा आला. त्याचे अनेक ठिकाणी कार्यक्रम झाले. गुणा त्या सर्व कार्यक्रमास जाई. तो वेडा झाला. त्याच्या आत्म्याला संगीताची भूक लागली.

एके दिवशी तो आपल्या पित्याला म्हणाला, ''बाबा मला शिकवा ना संगीत. मला सतार-सारंगी शिकवा. त्याशिवाय मला चैन पडणार नाही. शिकवाल का बाबा?''

''बाळ,कोण शिकवणार?''

''बाबा, तो नजीरखां आला आहे ना, तो इथे वर्ग काढणार आहे. पुरेसे विद्यार्थी मिळाले पाहिजेत. मी घालू का त्या वर्गात नाव?''

''सांगेन हो उद्या.''

गुणा शाळेत गेला होता. घरी रामराव पत्नीला म्हणाले, ''गुणा गायनवादन शिकू म्हणतो. त्याला संगीताच वेड लागलंय असं दिसतं. घालू का त्याला संगीताच्या वर्गाला? महिन्याला दहा रुपये द्यावयाचे.''

''पण पैसे कोठे आहेत? अब्रूचे धिंडवडे व्हायची वेळ आली आणि आता कशाला ही गाणी वाजवणी? अशानेच तर हे दिवस आले;परंतु शेवटी मी काय सांगणार? येतील ते दिवस मुकाट्याने काढायचे एवढं आम्हाला माहीत. हल्ली मी बाहेर कुठे जात नाही, कुठे जायचं? देवदर्शनांस जाण्याचीही लाज वाटते. हे फाटकं लुगडं नेसून जायला नाही धीर होत. माझं तुम्ही ऐका. आणखी कर्ज नको. नाहीतर या घरातूनही जायची वेळ येईल. तुमची होतील गाणी; परंतु डोळ्यांना येईल पाणी. गुणाला काय, म्हणतो काहीतरी.''

रामरावांना वाईट वाटले. ते वरती दिवाणखान्यात एकटेच फिरत होते. त्या दिवाणखान्यात एके काळी हंड्या-झुंबरे होती. पूर्वीच्या काळात तेथे कितीतरी प्रसिद्ध गवई गाऊन गेले होते. वाजवणारे वाजवून गेले होते. तेथील त्या खांबातून संगीत घुमत असेल, तेथील अणुरेणू संगीताने भरलेला असेल. पूर्वजांच्या साऱ्या आठवणी रामरांवाना आल्या. आपल्या गुणामध्ये या घरात भरलेला संगीताचा आत्मा का प्रकट होत आहे? लोक सांगत, की पूर्वी एरंडोलमध्ये जर कोणी गवई आला तर प्रथम या वाड्यात त्याचे जलसा होत असे; परंतु रामराव गरीब झाले होते. आता त्यांना गवई, वाजवणारे यांचा सत्कार करता येत नसे; परंतु गुणाच्या गुणांचे काय करावयाचे? त्या गुणांची का माती होऊ द्यायची? आपणांस हळूहळू वाईट दिवस येणार हे दिसतच आहे. अशा वेळेस एखादी कला जवळ असली तर बरी आणि दु:ख-शोकाचा विसर पाडणारी संगीताहून थोर कला कोणती?गुणाला शिकवू या सतार-सारंगी मग जरी झाडाखाली राहाण्याची वेळ आली तरी गुणा सारंगी वाजवील व दु:खाचा विसर पाडील. गुणाला मला इस्टेट ठेवता येणार नाही. साऱ्या घरादाराचे, शेतीवाडीचे लिलाव होतील; परंतु गुणाला एक स्वर्गीय कला शिकवून ठेवू दे. ती कला त्यांच्या जवळून कोण नेईल? ती गहाण टाकता येणार नाही. तिचा लिलाव करता येणार नाही. ती स्वत:ला रिझवील, जगाला रिझवील.

असे विचार रामरावांच्या मनात येत होते. शेवटी त्यांनी गुणाला त्या वर्गात घातले. गुणाला आनंद झाला. जगन्नाथने त्याला सतार-सारंगी दिली. गुणा सुखी

झाला. त्याच्या बोटातील अद्‌भुत कला प्रकट होऊ लागली. नजीरखा गुणावर खूश झाला. ''बेटा सारे शिष्य सोडून गेले तरी तुला मी शिकवीन. तुझ्यासाठी इथे राहीन,'' असे तो म्हणे.

जगन्नाथ व गुणा म्हणजे जणू स्वर्गातून उतरलेली गंधर्वांची जोडी. गावात संगीताचे कार्यक्रम झाले तर तेथे जगन्नाथला गाणे म्हणायचा आग्रह करीत. गुणाला वाजवण्याचा आग्रह होई आणि कधी कधी जगन्नाथ गाई व गुणा साथ करी. अपार रंग चढे. त्यांच्या गायनावादनातून अपूर्व मधुरता प्रकट होई. जणू मनाची कोमलता, हृदयातील मैत्री सरळ स्वभाव प्रकट होई..

शाळा केव्हा सुटेल व केव्हा घरी जाऊ असे या दोघा मित्रांस होई. गुणा जगन्नाथकडे जाई, दोघे संगीतसागरात डुंबत. सायंकाळ केव्हा होई हे दोघांस कळत नसे. त्यांच्या जीवनातही संगीत उचंबळत होते. ते जणू दोन देहांतील एक मन झाले, दोन देहांतील एक आत्मा बनले. एकमेकांस एकमेकांशिवाय चैन पडत नसे. उजाडताच गुणा जगन्नाथकडे येई. त्याच्याजवळ दोन शब्द बोलून घरी जाई. जगन्नाथ त्याला कढत दूध देई.

''रोज रोज कशाला उजाडत येतोस?'' एके दिवशी गुणाला कोणीतरी म्हणाले.

''माझ्या मित्राला भेटायला,'' तो म्हणाला.

''दूध मिळतं प्यायला म्हणून येत असशील. तुझ्या घरी आहे काय? बापानं सारं घालवलं.''

''तरी मुलाला गाणं-वाजवणं शिकवतोय. सावकाराच व्याज मात्र देता येत नाही. साऱ्या लबाड्या.''

''जा निघ येथून. जगन्नाथ मळ्यात गेला आहे.''

अशी ती बोलणी ऐकून गुणाला वाईट वाटले. तो का दुधासाठी येत असे? त्या दुधाची का त्याला तहान होती? तो मित्रप्रेमाचा भुकेला होता. इतर लोकांना उजाडत चहा लागतो. कोणाला दूध लागते. गुणाला मित्राचे दर्शन पाहिजे असे; परंतु ते शब्द ऐकून त्याचे हृदय दुखवले गेले. गुणा सकाळी येईनासा झाला.

''का रे गुणा, तू अलीकडे सकाळी येत नाहीस?''

''मी सायंकाळी येत जाईन; परंतु सकाळी नको. सकाळी वेळ होत नाही.''

''पूर्वी वेळ होत असे. आता का होत नाही? तुझं प्रेम कमी झालं. पूर्वी माझ्यावाचून तुला चैन पडत नसे; परंतु अलीकडे तू जरा दुरावत चाललास, महाग होत चाललास.''

''जगन्नाथ, आपण दोघं मित्र होणं बरं नाही. मी गरीब, तू श्रीमंत. गरिबाने श्रीमंताचा मित्र होणं बरं नाही. लोक त्यात नाना अर्थ पाहतात. त्या मैत्रीत मिंधेपणाचा वास जगाला येतो. श्रीमंत मित्रांपासून खूप फायदा आहे म्हणून हा गरीब त्यांच्याकडे जातो असं लोक म्हणतात.''

''गुणा, आजच हे विचार तुझ्या मनात कुठून आले? माझं का काही चुकलं? मला काही मिळालं, की मी तुझ्यासाठी ठेवतो. माझ्या घरी का तुला कोणी बोलल? खरं सांग.''

''काय सांगू?''

''तुझ्या मनातलं दुःख सांग.''

गुणाने त्या दिवशी ती हकिकत सांगितली. जगन्नाथचे डोळे भरून आले. तो म्हणाला, ''आजपासून मीही घरी दूध घेणार नाही. माझ्या मित्राला जर माझ्या घरी दूध मिळत नसेल तर मी कशाला घेऊ?''

परंतु गुणाला हा निश्चय ऐकून अधिकच वाईट वाटले. 'तू असं करू नकोस.' म्हणून त्याने परोपरीने सांगितले.

खरोखरच जगन्नाथ घरी दूध घेईनासा झाला. त्याची आई त्याला आग्रह करी. तो 'नको' म्हणे.

''अरे, पण का घेत नाहीस दूध? तुला बरं वाटत नाही का? तुला का काही होतंय?'' आईने विचारले.

''मला काही होत नाही.''

''मग घे हे दूध.''

''नको, खरंच नको.''

''तुझा गुणा रे का अलीकडे येत नाही? तो येत नाही म्हणून का तू दूध घेत नाहीस.''

''त्या दिवशी दादा गुणाला बोलला. 'दूध प्यायला इथे येतोस,' असं त्याला म्हणाला, म्हणून तो येत नाही. आई, दादाने असं बोलावं? गुणाला स्वाभिमान

आहे. तो माझ्यासाठी येत असे. उजाडत मित्राला भेटायला येत असे; परंतु त्या दिवसापासून तो येईनासा झाला आणि मलाही दूध पिऊ नये असं वाटतं.''

जगन्नाथच्या आईने गुणाला बोलावणे पाठवले. तो आला.

''काय आई?''

''बसा दोघं इथे. पोटभर दूध प्या. गुणा, येत जा हो तू. तू आला नाहीस तर जगन्नाथ रडतो. तुला कोणी बोललं तरी मनावर घेऊ नकोस. तू माझ्याकडे पाहा व ये. तुझ्या मित्रासाठी ये हो,'' असे आई म्हणाली. दोघे मित्र दूध पिऊन वर गेले. जगन्नाथ गाऊ लागला व गुणा वाजवू लागला. रस्त्यातून येणारे-जाणारे खाली उभे राहू लागले. मित्रप्रेमाचे दिव्य संगीत वर स्रवत होते; जगन्नाथचा दादा एकदम तेथे आला.

''पुरे रे तुमचं रडगाणं. काही काळवेळ आहे की नाही. तिकडे जमा-खर्च जमत नाही आणि तुमची इथे कटकट. बंद करा आवाज,'' दादा गर्जला.

''वाजव रे गुणा. दादाचं ऐकू नको,'' जगन्नाथ म्हणाला.

''मी फेकून देईन ती सारंगी.''

''फेक रे, कशी फेकतोस ते पाहू. मी प्राण देईन; परंतु ती फेकू देणार नाही.''

''जगन्नाथ, पुरचं करू आपण. मी जातो.''

''गुणा, जाऊ नकोस. तू वाजव मी गातो. आग लागू दे त्या जमाखर्चांना. सारंगी म्हणे फेकीन. मी त्या जमा-खर्चाच्या वह्या फेकीन, अंजनी नदीच्या डोहात बुडवीन. गोड आवाजाची सारंगी म्हणे नको. आणि म्हणे शेतकऱ्यांना रडवणाऱ्या त्या वह्या, त्या म्हणे हृदयाशी धराव्या.''

''वह्या बुडवून खाल काय?''

''खाऊ झाडांचा पाला, पिऊ अंजनीचं पाणी.''

''दिसेल पुढे काय कराल ते.''

दादा निघून गेला आणि जगन्नाथने पुन्हा गाणे सुरू केले व गुणा साथ करू लागला. दादा पुन्हा आला नाही. थोड्या वेळाने संगीत थांबले. गुणा घरी गेला.

परंतु दसऱ्याच्या दिवशीचा प्रकार तर याहून वाईट झाला. दसरा सणाचा दिवस. जगन्नाथच्या घरी घोडे शृंगारले होते. त्यांच्या गळ्यांत सुंदर झेंडूच्या माळा होत्या. पाठीवर चांदीचे दागिने घालण्यात आले होते. घोडे आनंदाने फुरफुरत होते. सकाळी गावातून ते वाद्यांच्या तालावर नाचत थै थै करीत मिरवून आले होते.

जगन्नाथही आज नटला होता. सुंदर रेशमी कपडे अंगावर होते. जरीचे धोतर नेसला होता. गळ्यात गोफ व कंठी त्याने घातली होती. कानांत सुंदर कुडक्या घातल्या होत्या. बोटांतून अंगठ्या होत्या. फार सुरेख दिसत होता. सुंदर सजून आपल्या मित्राची तो वाट पाहात होता.

बराच वेळ झाला; परंतु गुणा आला नाही. खिडकीतून जगन्नाथ सारखे बाहेर पाहात होता; परंतु गुणाचे दर्शन झाले नाही. का बरे गुणा आला नाही. आज सणाचा दिवस, मंगल दिवस! का बरे माझा गुणा आला नाही?

जगन्नाथ अस्वस्थ झाला. तो आईकडे गेला व म्हणाला, ''आई, मी गुणाकडे जाऊन येतो.''

''बाळ, आज अंगावर दागिने आहेत. एखादा बलूची नेईल हो धरून. परवा गावात कोणाला तरी असंच धरून नेलं. दागिने काढून सोडून दिलं,'' आई म्हणाली.

''मग हे काढून ठेवू का? तुझा आग्रह म्हणून मी घालतो.''

''अरे घालावे हो सणावारी. आज नाही घालायचे तर कधी घालायचे? आज आनंदाचा दिवस.''

''आई, सगळ्यांना का दागिने असतात? आपल्या मळ्यातील जनीच्या मुलांच्या अंगावर कपडेसुद्धा नसतील.''

'' बाळ, देवाने ज्याला वैभव दिलं आहे त्याने ते भोगावं.''

'' देवाने त्यांना का ग दिलं नाही ?आपल्यालाच का दिलं?''

'' मला नाही रे माहीत. काही तरी विचारशील. तरी बरं, अजून मॅट्रिक दूर आहे.''

''आई मॅट्रिक झालो म्हणजे का मी फार शहाणा होईन?''

'' आजच आहेस तू फार शहाणा. जा, ये जाऊन त्या गुणाकडे. लवकर ये. उन्हातून कुठे जाऊ नको. हे आश्विन-कार्तिकी ऊन बाधतं हो.''

जगन्नाथ गुणाकडे निघाला. गुणा एकटाच घरी बसला होता, तो सारंगी वाजवत होता, तीत तल्लीन झाला होता. पाठीमागून हळूच जगन्नाथ आला. त्याने गुणाचे डोळे धरले.

''जगन्नाथ, सोड डोळे. मी ओळखले तुझेच हात. श्रीमंती हात, फुलांसारखे हात; परंतु अंगठ्या असल्यामुळे बोचणारे, खुपणारे हात. सोड ना जगन्नाथ. या अंगठ्या का डोळ्यांत खुपसतोस?''

जगन्नाथने हात सोडले. तो म्हणाला, ''गुणा, ती सारंगी आधी खाली ठेव. माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. आज तू का नाही आलास माझ्याकडे? आज दसरा. आज तर तू आधी आला पाहिजे होतास. उजाडताच मित्राला प्रेमाचं सोनं द्यावयास,''

''जगन्नाथ, तू तर सोन्यानं नटला आहेस, आणखी सोनं काय करायचं? शब्दांचं सोनं?

''मला हे सोनं खरचं नको वाटतं; परंतु आईसाठी सारं कराव लागतं. तू का आला नाहीस सांग.''

''आई म्हणाली, आज जाऊ नकोस.''

''का बरं? तुझ्या आईला मी आवडत नाही.''

''तसं नाही रे; परंतु म्हणाली नको म्हणून.''

''गुणा, तू असंच करतोस. सणावाराच्या दिवशीच नेमकं भूत का आठवतं?

''जगन्नाथ, माझ्या अंगावर बघ. नीट सदरासुध्दा नाही. तुझ्याकडे आलो तर तुझ्या घरची मंडळी हसतील. तुझे कपडे बघ, आणि माझ्या या चिंध्या. आई म्हणाली, 'बाळ. आपण गरीब आहोत. गरिबाने घरात बसावं व फाटलेली अब्रू सांभाळावी.' आईला रडू आलं. सणावारी मुलाला नवीन सदरा करता आला नाही म्हणून तिला वाईट वाटलं. मीही दुःखी झालो. इथे येऊन वाजवीत बसलो. बाबांनी ही कला मिळवण्याची व्यवस्था केली. सारं दुःख विसरण्याची कला.''

''तुझ्या अंगात सदराही नाही, मग तुला सारंगी शिकवण्यासाठी शिक्षक रे कशाला?''

''बाबांनी म ला सांगितलं, तुला नवीन कपडे पाहिजे असतील तर वाजवायला शिकणं बंद. मी त्यांना म्हटलं,मला एकच सदरा पुरे. घरी उघडा राहीन. शाळेत जाताना सदरा घालीन; परंतु मला वादन शिकू दे.''

'' गुणा, तू माझ्याकडे चल. माझा सदरा तुझ्या अंगात घालतो.चल.''

'' असं कसं करायचं?''

'' मी तुझा मित्र नाही का?''

'' तू वेडा आहेस.''

'' असू दे. चल माझ्याबरोबर नाही तर मी इथे रडत बसेन.''

शेवटी जगन्नाथ गुणाला घेऊन गेला. तो आपल्या खोलीत गुणाला घेऊन गेला. त्याने गुणाच्या अंगात एक रेशमी सदरा घातला. त्याने आपले एक सुंदर धोतर त्याला नेसायला दिले. आपल्या बोटांतील एक अंगठी त्याने त्याच्या बोटात घातली आणि गळ्यातील कंठी त्याच्या गळ्यात घातली. त्याच्या केसांना सुवासिक तेल त्याने लावले. त्याचा त्याने भांग पाडला, गुणा जणू सौंदर्यमूर्ती दिसू लागला.

''गुणा, आता आपण सारखे दिसतो नाही? माझ्या गळ्यात गोफ, तुझ्या गळ्यात कंठी. दोघांच्या बोटात अंगठ्या. दोघांच्या अंगात रेशमी सदरे. नेसू जरीची धोतरे, आपण दोघे आता छान दिसतो नाही? तू छान दिसतोस का मी? आपण त्या दिवाणखान्यातील मोठ्या आरशात पाहू ये. चल.'' आणि दोघे मित्र दिवाणखान्यात गेले, जाऊन आरशात पाहू लागले. एकमेकांकडे बघत व मंदमधुर हसत.

'' गुणा, माझ्यापेक्षा तूच चांगला दिसतोस.''

''जगन्नाथ, तूच अधिक सुरेख दिसतोस.''

''आपण दोघे सुंदर आहोत.''

''हो, दोघे छान आहोत.''

इतक्यात जगन्नाथंचा दादा तेथे आला.

'' काय रे करता? वा, आज गुणाही सजून आला आहे वाटतं? गळ्यांत कंठी, नेसूला जरीचं धोतर! अरे वा, थाट आहे की. अद्याप घरात डागदागिने आहेत वाटतं? परंतु सावकाराला द्यायला मात्र काही नाही ना? काय रे गुणा, फसवे आहेत वाटतं तुझे वडील? घरात काही नाही असं तर सांगतात.''

'' ही कंठी काही माझी नाही.''

'' मग उसनी आणलीस वाटतं? गुणा, उसनी ऐट काय कामाची?''

'' उसनी नाही आणली. हे सारं जगन्नाथचं आहे. त्याने गंमत केली. बळेबळेच त्याने माझ्या गळ्यात ही कंठी घातली; बोटात अंगठी घातली; हा रेशमी सदरा त्याचाच व हे धोतरही त्याचंच. मी नको नको म्हणत होतो; परंतु तो ऐकेना. म्हणे मी तुझा मित्र ना? मग घाल हे सारं, मी काय करणार? उगीच माझ्या वडिलांना नांव नका ठेवू. बाबा खोटं कधी बोलत नाहीत. आमच्या घरात

खरंच असे दागिने नाहीत. घ्या हे सारे, मला ऐट मुळीच नको. उसनी तर नकोच नको," असे म्हणून गुणा गळ्यातून कंठी काढू लागला.

" गुणा, काढू नको गळ्यातून. नाहीतर बघ. मी तुझ्याजवळ कधी बोलणार नाही. ती कंठी माझी आहे. दादाची थोडीच आहे? माझी वस्तू मी तुला दिली. तू माझा म्हणून दिली." गुणा काढू पाहात होता. जगन्नाथ काढू देईना.

शेवटी दादा संतापला व म्हणाला,"काढू दे त्याला कंठी घालून तो घरी जाईल वाटतं! म्हणे मी त्याला दिली! काढ रे गुणा."

" गुणा ,काढू नको. हे सारं मी खरोखर तुला दिलं आहे."

"अरे दिलं म्हणजे काय? कायमचं का दिलं? म्हणे त्याला दिलं! उद्या एखाद्या भिकाऱ्यालाही देशील अंगावरून काढून. बावळट कुठला." दादा रागावून बोलला.

"दादा, गुणा भिकारी वाटतं?"

"भिकारी नाही तर काय? भुक्कड तर झाले आहेत."

" दादा, गुणा माझा मित्र आहे. तो भुक्कड असेल तर मलाही होऊ दे. मी श्रीमंत असेन तर त्यालाही होऊ दे. तो माझा मित्र आहे. तो व मी निराळे नाही. याची गरिबी ती माझी व माझी श्रीमंती ती त्याची. गुणा, हे सारं मी तुला दिलं आहे. हे माझं आहे."

"म्हणे माझं आहे! कधी मिळवून आणलंस, कुठे तलवार मारलीस?"

"तुम्ही तरी कुठे गेले होतात तलवार मारायला? बाबा कुठे गेले होते? सारा गाव म्हणतो की, डाक्याची संपत्ती आहे म्हणून आणि गरिबांना छळून तुम्ही आणखी वाढवलीत. गुणा, घे, हे सारं घे. तू ते काढणार असशील तर मीही हे फेकीन. माझा मित्र भिकारी, तर मलाही भिकारी होऊ दे. काय करायची ही श्रीमंती?"

" गाढवा, सणावारी असं अशुभ बोलावं का?अलीकडे फार बोलायला शिकला आहेस. बोलशील असं पुन्हा, बोलशील?" असे म्हणून दादाने जगन्नाथच्या दोन-तीन थोबाडीत दिल्या. ते कोवळे गाल लाल झाले.

"मार, ठार मार. नकोच मला हे दागिने, नको हा गोफ." असे म्हणून जगन्नाथने गोफ भिरकावला. तो फेकणार; परंतु दादाने दोन्ही हात पकडले व त्याला मारू लागला. जगन्नाथ रडू लागला. गुणाही रडू लागला.

“त्याला मारू नका, मला मारा. माझ्यामुळं हे सारं झालं. त्याला नका हो मारू.” गुणा गयावया करून सांगत होता.

इतक्यात खालून पंढरीशेट, जगन्नाथची आई वगैरे सारी आली. दादा दूर झाला. आईने जगन्नाथला जवळ घेतले. तो मुसमुसत होता. त्याला राहून राहून रडू येत होते. गालावर बोटे उठली होती.

“ किती रे मारलसं त्याला? मी कधी चापटसुद्धा मारली नाही,” आई म्हणाली.

“ म्हणूनच असा फाजीलपणा करतो. तू त्याला लाडावून ठेवला आहेस.”

“ अरे पण सणावारी का मारावं, बोलावं? आज दसऱ्याचा दिवस. आम्ही अजून जिवंत आहोत तर त्याला असे छळता. मग आमच्या पाठीमागे त्याचं काय कराल?”

“आई तुला तो चांगला दिसतो. चांगला वाटतो; परंतु त्याला काडीची अक्कल नाही. तो उद्या घरातील सारं वाटून देईल. सर्वांना भिकेला लावील. त्या दिवशी म्हणाला की, काडी लावीन त्या जमा-खर्चाच्या वह्यांना आणी आज गळ्यातील गोफ, बोटातील अंगठ्या भिरकावून द्यायला लागला. हा गोफ बाहेर जायचा;परंतु खिडकीच्या फळीला अडकू न आत पडला. आणी मी दोन्ही हात धरून ठेवले. म्हणून या अंगठ्या राहिल्या आणी म्हणे गुणाला हे माझे दागीने मी दिले. उद्या लहान इंदू मनी, त्याच्या अंगावरचेही दागिने काढून हा द्यायचा कोणाला! वाटेल ते करतो, वाटेल ते बोलतो. म्हणे मला भिकारी व्हायचं आहे. आज विजयादशमीस असं बोलावं का?”

“आई ही कंठी, हा गोफ, या अंगठ्या, माझं म्हणून ना तुम्ही माझ्या अंगावर घातलं? होय ना?”

“ होय हो तुझेच आहेत ते दागिने.”

“मग माझे आहेत म्हणून मी गुणाला दिले. पुढच्या सणावारी उरतील तेवढेच मला घालायला द्या. जे माझं असेल ते आम्ही दोघं घेतो. गुणा व मी माझ्या खाऊतील खाऊ गुणाला देतो. गुणाला दिल्याशिवाय मी काही खात नाही.”

“अरे वेड्या, खाऊ व दागिने सारखेच? खाऊची गोष्ट निराळी, दागिन्यांची निराळी. हे दागिने तुझे आहेत. ही कंठी का आणा दोन आण्यांची आहे? अडीचशे रुपयांची आहे असे दागिने का कोणी कोणाला देतात?”

"आई, मित्रासाठी प्राणही देतात."

"अरे, ते गोष्टीतून असतं."

"गोष्टी का खोट्या असतात? आणि माझे दागिने गुणाच्या अंगावर असले म्हणून काय बिघडलं? त्याच्या अंगावर का सोन्याची माती होते? ते का झिजतात? माझ्याच गळ्यात सगळं ओझ वागवण्यात काय अर्थ आहे? आई, गुणा माझा मित्र. तो आला नाही तर मला कसंसच होत. त्याची आई त्याला आज बाहेर पडू देत नव्हती. का तर नीट सदरा नाही घालायला, एखादा दागिना नाही म्हणून. त्याची आई म्हणे, जाऊ नको जगन्नाथकडे आज. तुला सारे हसतील. आई, माझ्या मित्राला का कुणी हसावं? तो माझ्यासारखा दिसावा म्हणून दिला हा शर्ट, हे धोतर, हे दागिने. बघ आम्ही दोघे सारखे दिसतो की नाही ते? खरे खरे मित्र. हसतेस काय आई? आई, मी चांगला दिसतो की गुणा ?"

"तूच चांगला दिसतोस. तुला शोभतं सारं."

" आणि गुणाला का शोभत नाही? तो गरीब म्हणून असं वाटतं? गुणाचं माझ्याहून गोड दिसतो. आई, आम्ही दोघे या आरशात पाहत होतो. तोच आले दादाराव व लागले मारायला. आजपासून मी दागिन्यांना शिवणार नाही. नकोतच नकोतच ते मला."

" जगन्नाथ, मी आता जातो. माझा सदरा घालून व माझं धोतर नेसून जातो."

" गुणा, बघ हो. तू असा घरी जा. आहेस आता तसा. मी तुला पोहोचवायला येतो. लोक म्हणतील, रामलक्ष्मण जणू चालले. चल मी तुला पोचवायला येतो."

" गुणा, आजच्या दिवस असू दे हो सारे. नको काढू ती कंठी, नको सोडू ते धोतर. नाही तर जगन्नाथ नीट जेवणार खाणार नाही. पुन्हा जेवायच्या वेळेस रडारड. असू दे."

" आई, आजच्याच दिवस का ? कायमचेच गुणाला हे घेऊ दे. दिवाळीच्या दिवशीही तो घालील, नाही ?"

"दिवाळीच्या दिवशी गुणा पुन्हा येईल व त्या दिवशी पुन्हा त्याला दे हो. असं वेड्यासारखं करू नये. पुढे मोठा झालास म्हणजे कर हो वाटेल ते. व्हा वेगळे व करा आपापल्या इस्टेटीचं काय करायचं ते."

“ मी जातो जगन्नाथ.”

“ थांब रे, चल माझ्या खोलीत.”

इतर मंडळी खाली गेली. दोघे मित्र खोलीत गेले. गुणाने जगन्नाथाच्या गालावरून हात फिरविले. त्याला रडू आले.

“ माझ्यामुळे हे सारं झालं. तुझे गाल, फुलासारखे गाल, त्यांच्यावर मार. मागे आपण पन्हाळ्याला जात होतो. एक फुलपाखरू येऊन तुझ्या गालावर बसलं होतं. आठवतं ? तू झाडाखाली डोळे मिटून पडला होतास. मी शेजारी वाजवत होतो; आणी ते फुलपाखरू तुझ्या गालावर. जणू फुलच आहे असं त्याला वाटलं, नाही ? आणी त्या गालांवर मार ? दुष्ट आहे तुझा दादा. जगन्नाथ, तू असं नको करीत जाऊ. आपली मैत्री मनात असू दे. मी आता जातो. हे सारं इथेच राहू दे. घरी आई व बाबा त्यांना वाईट वाटेल. म्हणतील आपला मुलगा आशाळभूत आहे, म्हणतील याला स्वाभिमान नाही. मी ऐटीचा, दागिन्यांचा लोभी आहे, असं त्यांना वाटेल व असं स्वत:ला देता येत नाही म्हणून त्यांना मेल्यासारखं होईल. इतर लोकही हसतील. म्हणतील उसनी ऐट.”

“गुणा, मी तुझ्याबरोबर येतो. मी तुझ्या आईला सांगेन. आज आपण संध्याकाळी बरोबर जावू शिलांगणास. दोघे सारखे दिसू. तू हे सारं काढणार असशील तर मी बाहेर पडणार नाही बघ.”

गुणाचे मित्रापुढे चालत नसे. जगन्नाथ मित्राला पोहोचवायला निघाला. गुणाची आई वाट पाहत होती. जाणारे-येणारे गुणाकडे बघत. शाळेतली मुले हसत. गुणाचे घर आले. रामराव घरी नव्हते.

“गुणा, हे रे काय? कुठून आलास नटून?” आईने विचारले.

“मित्राच्या घरून; मित्राच्य हातांनी, ” तो म्हणाला.

“आई, आम्ही दोघांनी आज सारखा पोशाख करायचा, सारखे दागिने घालायचे असं ठरवलं आणि कोण चांगला दिसतो ते तुम्हांला विचारायला आलो. आई, कोण दिसतो अधिक चांगला?”

“तूच दिसतोस हो जगन्नाथ.”

“गुणा नाही दिसत? मला तर गुणा अधिक चांगला दिसतो. तुम्ही तर कोणी खरं सांगतच नाही. मोठी माणसं खोटी.”

''जगन्नाथ, गुणाच्या अंगावर दागिने नसते, तर तो अधिक चांगला दिसला असता. जो तो आपल्या खऱ्या परिस्थितीत शोभतो. मोराच्या दोन पिसांनी कावळा का सुंदर दिसेल? उलट अधिक बावळट दिसेल. नाही?''

''आई, तुम्ही असं का बोलता? आम्हा मित्रांचं प्रेम तुम्हाला कोणालाच कसं समजत नाही?''

जगन्नाथचे डोळे भरून आले. गुणाची आई गहिवरली.

''जगन्नाथ, तुझं मन मोठं आहे; परंतु जग खोटं आहे. गुणालाही हे दागिने चांगले शोभतात हो. चांगला दिसतो हो तो.''

''माझ्यापेक्षा नाही दिसत चांगला?''

''माझ्या आईच्या डोळ्यांना तो तुझ्याहूनही चांगला दिसत आहे. दोघांवरून दृष्ट काढायला हवी. असंच प्रेम मोठेपणी दाखवा हो. लहानपणचे खेळ पुढे विसरू नका. जगन्नाथ, गुणाचं कुणी नाही. आम्ही अशी दरिद्री. तूच त्याचा पुढे आधार हो.'' असे म्हणून मातेने डोळ्यांना पदर लावला.

''आम्ही मोठेपणीही मित्र राहू. एकमेकांना अंतर देणार नाही,'' जगन्नाथ म्हणाला. दोघे मित्र वर गेले.

''जगन्नाथ, गाणं म्हण; मी वाजवतो.''

''म्हणू गाणं? म्हणतो.''

जगन्नाथ गाणे गाऊ लागला. गुणा सारंगी वाजवू लागला. त्या दिवाणखान्यात संगीताच्या लाटा उसळत होत्या आणि मित्र-प्रेमाच्या लाटा त्यात मिसळल्या होत्या. रामरावही येऊन बसले. आईही चूल सोडून वर आली. गाणे संपले वाद्य थांबले.

''गुणा, जगन्नाथ, पुढे जीवनात असंच संगीत निर्माण करा. असेच एकरूप व्हा. एकमेकांस अंतर देऊ नका. गुणाला पुढे कोण ही माझी चिंता आज दूर झाली. गुणाला दोन मित्र आहेत. एक जगन्नाथ व एक सारंगी. त्याला आता काही कमी पडणार नाही. नेहमी विजयादशमी, सदैव आनंद.'' रामराव म्हणाले.

✦✦

कोजागिरी

साने गुरुजी

गुणा व जगन्नाथ दिवसेंदिवस तनाने, मनाने वाढत होते. ते केवळ संगीतवादनात रंगले नव्हते, जीवनातही ते डोकावू लागले होते. आता ते इंग्रजी सहाव्या इयत्तेत होते. त्यांची बुद्धी विचार करू लागली होती. नवीन-नवीन विचार त्यांच्या कानांवर येत होते. एरंडोलमध्ये राष्ट्रीय वृत्ती बळावत होती. काही देशप्रेमी लोक तेथे राष्ट्रीय चळवळ करू लागले होते. गरिबांत हिंडू-फिरू लागले होते. काहींनी कागदीपुऱ्यांतील मुसलमानबंधूंचा कागदाचा धंदा पुन्हा कसा वाढेल या गोष्टीला वाहून घेतले. काहींनी खादीचा धंदा शेतकऱ्यांत नेण्यासाठी कमरा कसल्या. काहींनी साक्षरता प्रसारक मंडळ स्थापून त्याद्वारा चळवळ आरंभिली. कोणी शेतकऱ्यांची संघटना करण्याचे ठरविले. एरंडोलमध्ये निरनिराळ्या निमित्ताने निरनिराळे बाहेरचेही कार्यकर्ते येत. चर्चा होत. व्याख्याने होत. या सर्वांचा परिणाम आमच्या मित्रद्वयांवर झाल्याशिवाय राहिला नाही. त्यांची मने संस्कारक्षम होती. कोमल होती. भावनामय होती. कलेचा भक्त तोच होऊ शकतो, की ज्याचे हृदय इतरांपेक्षा अधिक भावनोत्कट असते.

एरंडोल तालुक्यात बाहेरचा एक सेवक आला होता. त्याचे एक काम होते. तो सर्व तालुक्यात हिंडत असे. हातात झाडू असे, खिशात टकळी असे, एक पिशवी जवळ असे. गावोगाव जावे, गाव झाडावा, एखाद्या झाडाखाली बसावे. टकळी चालवावी. गुराखी येत. त्यांना टकळी शिवावी. मुले येत, त्यांना गाणी शिकवावी. रात्री तो अभंगरूप कीर्तन करी. लोक येत. कीर्तनात अस्पृश्यता दूर करा, भांडणे कमी करा, कोर्टकचेऱ्या कमी करा, साक्षर व्हा, उद्योगी व्हा, स्वच्छतेचे उपासक बना वगैरे तो सांगे, गोष्टी सांगे. मधून-मधून गाणी म्हणे. कोणी तरी त्याला जेवायला बोलवी. न बोलावे तर तो तसाच राही. मूठभर पालाच खाई. चिंचेचा पाला, निंबाचा पाला तो एकत्र करून खायचा.

दुसऱ्या दिवशी एरंडोलला या अवलियाचे भाषण झाले होते. ते भाषण गुणा व जगन्नाथ यांना फार आवडले होते. सुंदर विचारप्रवर्तक भाषण. सीमोल्लंघनाचा सुंदर अर्थ.

''पुढे चला, पुढे चला. रूढी तोडून पुढे चला. बिळात बसू नका. दुनियेत काय काय चाललं आहे ते पाहा. जो असा पुढे जातो, हृदय अधिक मोठं करीत जातो. बुद्धी अधिक मोठी करीत जातो, त्याला विजय मिळतो आणि विजयादशमीलाच बुद्धांचाही जन्म. मनावर विजय मिळवणं याहून थोर विजय कोणता? मनोजयी होईल तोच विश्वजयी होईल. जगाची ज्याला सेवा करायची आहे त्याने स्वत:ला जिंकलं पाहिजे. स्वत:चा स्वार्थ, स्वत:च्या सुखेच्छा, क्षुद्र मानापमानाच्या कल्पना, अहंकार, या सर्वांना त्याने जिंकून घेतलं पाहिजे. जगाचं दु:ख त्यालाच दिसेल, जो स्वत:च्या ऐष-आरामांतून जरा बाहेर येईल. नाहीतर दुष्काळ पडला तर दिवाणखानी राजा सांगतो आहे, दूधभात खा. त्याला काही माहीत जनतेजवळ काय आहे, काय नाही? आपल्या सभोवतालची जनता कोण पाहील? जो तिच्याकडे जाईल तो. जो स्वत:च्या चिंतेत चूर झाला, तो बंधूंपासून दूर गेला. त्याच्या कानांत इतरांचे शोक-सूर जाणार नाहीत. त्याच्या डोळ्यांना शेजारचे दु:खपूर दिसणार नाहीत. अशाला कोणता विजय, कोणती बंधुसेवा?''

कितीतरी तो अवलिया त्या दिवशी बोलला.

''ज्याचं हृदय प्रेमाने भरलेलं आहे, त्याने पान दिलं तरी ते सोनं आहे आणि अहंकारी माणसाने सोनं दिलं तरी ते माती आहे. विजयादशमीस आपण पानांचं

सोनं वाटतो! या सोन्याचा का कधी दुष्काळ पडेल! पिवळं सोनं कमी होईल; परंतु हे हिरवं सोनं भरपूर आहे. हृदयाची श्रीमंती असेल तर सारं सोनंच आहे. ज्याने स्वत:ला जिंकलं, त्याने दिलेलं पान, कुबेराच्या संपत्तीहून श्रेष्ठ आहे, अधिक वजनदार आहे.

''ज्या समाजात एकमेकांवर प्रेम करणारे लोक आहेत, मी व माझं याची सीमारेषा ओलांडून पलीकडचं पाहणारे लोक आहेत, दुसऱ्याच्या सुख-दु:खांशी स्वत:चाही संसार जोडणारे लोक आहेत, अशा समाजात सोन्याला तोटा नाही. अशा समाजात सोनं एकाच्याच घरी राहणार नाही. धान्य एकाच्याच कोठारात असणार नाही. जो तो स्वत:जवळ असेल ते सर्वांना देईल. सारेच आपले, असं प्रत्येकजण म्हणेल. दुष्काळावर, दैन्यावर, दारिद्र्यावर, कलीवर हा खरा महान विजय. असा विजय पाहिले असेल तर करा मोठी मनं, करा अस्पृश्यता दूर, वापरा खादी, घ्या मुसलमानांना जवळ, द्या जवळ असेल ते श्रमणारांस. आपापल्या हवेल्यांत, जमा-खर्चाच्या वह्यांत आत्मा गुदमरवू नका. जाऊ दे आत्मा सीमा ओलांडून सर्वांना मिठी मारायला.'' किती उद्‌बोधक ते भाषण!

''गुणा, आपण त्या दयाराम भारतींची ओळख करून घ्यायला हवी.''

''मलाही वाटतं. त्यांच्याकडे जीव ओढतो.''

''त्यांचे नावही किती गोड. खरेच ते दयाराम आहेत.''

''आणि भारतीशी एकरूप झालेले आहेत. 'माझे आई-बाप देवाघरी गेले व मी भारताचा झालो. सीमोल्लंघन केलं. दयाराम भारती नाव घेतलं,' असं नाही का त्यांनी सांगितलं?''

''परंतु नावाप्रमाणे ते राहू इच्छितात. नाही तर नावं अमुकानंद, तमुकानंद अशी घेतात व मनांत तर रडत असतात. नाव म्हणजे जणू स्मरण. जीवनातील ध्येयाचं स्मरण.''

''माझं नाव गुणा. मी गुणांचा झालो पाहिजे. दुर्गुणांचा त्याग केला पाहिजे.''

''आणि मी जगन्नाथ! जगाचा मी नाथ झालं पाहिजे. अनाथांचा नाथ. आसपासच्या गरिबांचा तरी नाथ. गुणा, काय होईल आपल्या हातून? काही तरी आपण पुढे करू हो.''

“तू परवा कोजागिरी साजरी करू म्हणत आहेस ना? त्या रात्री आपण दयाराम भारतींना बोलवू. ते काही सांगतील. त्यांच्याशी आपण बोलत बसू. चालेल का?”

“खरंच. चांगली आहे कल्पना. ते प्रवचन करतील, नंतर तू वाजव, मी गाईन. मजा येईल.”

कोजागिरीचा दिवस आला. शरदऋतूतील प्रसन्न दिवस. शेतेभाते पिकलेले असतात. सोन्यासारखे पीक आलेले असते. गुरेढोरे धष्टपुष्ट असतात. भरपूर चारा असतो. नद्यांचे पाणी प्रसन्न असते. आकाश निर्मळ असते. अशा वेळेस हा सुंदर दिवस कल्पिलेला आहे. रात्री दुधासारखे स्वच्छ चांदणे पडलेले असते. जणू आकाशातून दुधाच्या अनंत धारा पृथ्वीला स्नान घालीत असतात आणि पृथ्वीवरही यावेळेस दुधाची रेलचेल असते. आनंदाचा दिवस. सुखासमाधानाचा दिवस. केलेल्या श्रमाचे फळ पाहून कृतार्थ होण्याचा दिवस. शरदऋतूतच कृष्णाची मुरली वाजे व साऱ्या जगाला वेड लावी.

जगन्नाथने सारी तयारी केली होती. बाहेर गच्चीत सुंदर बैठक घालण्यात आली होती. दयाराम भारतींसाठी सुंदर आसन मांडलेले होते. स्वच्छ चांदणे पडले होते. गुणा आला. इतर समवयस्क मित्र आले. ते बहुतेक शाळेतील विद्यार्थीच होते.

आणि दयाराम भारती आले. त्यांना जागरण फार सहन होत नसे. त्यांची प्रकृतीही जरा बरी नव्हती; परंतु ते आले होते. सारे विद्यार्थी वाटोळे बसले. दयाराम भारती म्हणाले, “तरुण मित्रांना, तुम्ही सारे विद्यार्थी आहात. शिकत आहात. मुलगा जेव्हा प्रथम शाळेत जातो, तेव्हा जर आपण त्याला विचारलं, बाळ, का शाळेत जातोस? तर त्याला नीट उत्तर देता येणार नाही; परंतु तुम्ही आता बाळ नाही. तुम्हांला आता उत्तर देता आलं पाहिजे. का बरं शिकतो आपण? आपण मनुष्य होण्यासाठी शिकत असतो. मनुष्य होणं म्हणजे काय? विचार करायला शिकणं, स्वतःचा व आजूबाजूच्या जगाचा. असा विचार करू शकलो म्हणजे जागृती येते. आजूबाजूचे प्रश्न दिसतात. आजूबाजूचे अन्याय दिसतात. दुःखं दिसतात. सेवेची आवड निर्माण होते. इतरांना हातभार लावावा असं वाटू लागतं. तो हातभार लावता यावा म्हणून शिकावं, म्हणून स्वतःचा

विकास करून घ्यावा, म्हणून आपणात पात्रता आणावी, असं वाटतं आणि हा स्वत:चा विकास दुसऱ्याच्या विकासासाठी शेवटी अर्पण करायचा असतो.

''शिक्षणाने आपण कोणत्या तरी ध्येयाला वाहून घेण्याचं ठरवितो. कोणीही स्वत:साठी जगत नसतो, हे तत्त्व ज्या मानाने जीवनात येईल, त्या तत्त्वाचा जसजसा जीवनात साक्षात्कार होत जाईल, त्या मानाने आपलं जीवन सुंदर होईल, थोर होईल. त्या मानाने आपल्या जीवनाची सफलता होईल.

''शिक्षण तुम्हांला जागृत करतं. तुमच्या भावना जागृत करतं. तुमची बुद्धी जागृत करतं. कोजागिरीचा हाच अर्थ. कोजागिरी म्हणते 'को जागर्ति?' कोण आहे जागा, कोण आहे जागा? जो जागा असेल तो भाग्यवान. भाग्य जागृताला मिळते, झोपलेल्याला नाही. तुम्ही जागे व्हा. आजूबाजूच्या स्थितीचा विचार करा. आज शेतंभातं पिकली आहेत. कपाशी पांढरी फुलली आहे. ज्वारी डोलत आहे; परंतु हे शेतकऱ्याला राहील का? त्याला त्याच्या श्रमाचं फळ मिळेल का? आज कोजागिरी, तुम्ही दूध प्याल, गाणं कराल; परंतु गाईगुरं चारणारे तुमचे गडी, तुमचे गुराखी त्यांना मिळेल का घोट? हा विचार आहे का तुमच्या मनांत? ही जागृती आहे का? तुमची बुद्धी या गोष्टीचा करते का विचार? तुमच्या हृदयांत येतात या भावना? अद्याप आपण निजलेले आहोत. आपणांस इतरांचा, दुसऱ्यांच्या सुख दु:खांचा विचार नाही. श्रमणारे लोक कंगाल झाले त्याची फिकीर नाही.

''तुम्ही तरुण मुलं. तुम्ही विचार करा. आसपासचं जग सुधारू, सर्वत्र सुख पिकवू असं म्हणा. जगात कोणते प्रयोग होत आहेत? कोणते नवीन विचार येत आहेत? समाजवाद काय? गांधीवाद काय? दोहोंचा अधिक संयोग करता येईल का? खेड्यांतील महत्त्वाचे उद्योग राखून इतर उद्योग राष्ट्राच्या मालकीचे करावे, की कसे प्रश्न सोडवावे? सहकार्याने एकत्र शेतीचे प्रयोग करावे, गो-पालन शास्त्रीय करावे, किती प्रश्न! या पद्यालयाच्या जवळ जर मधुसंवर्धन विद्येचे प्रयोग झाले तर? शास्त्रीय रीतीने माशा पाळणं कोणी शिकवू यावं. पसरवावी विद्या. अरे, आज तुम्ही दूध पिणार! आहे कुठे दूध? या देशात दुधाचे सागर होते. चाळीस चाळीस शेर दूध देणाऱ्या गाई होत्या. समुद्रासारख्या भरलेल्या त्यांच्या कासा; परंतु आज गाई कसायाकडे जात आहेत. तुम्ही शास्त्रीय ज्ञान आणा. गाई सुधारा. दुधदुभतं भरपूर करा. लोक बलवान होतील.

''सारा देश मरणोन्मुख झाला आहे. तुम्ही तरुणांनी एकेक ध्येय घेऊन उठावं. जीवन एकेका गोष्टीला द्यावं. कोणी खादीचं काम शिकून या, कोणी सहकारी चळवळीचा अभ्यास करून या, कोणी हरिजनसेवेस जीवन द्या, कोणी शेतकऱ्यांची सावकारांपासून मान वाचवण्यासाठी उभे राहा, कोणी मधुविद्या शिकून या, नाना उद्योग, नाना हालचाली. कोणी डॉक्टर होऊन या. रोग नष्ट करा. स्वच्छता आणा, गो-पालन शिकून या, राष्ट्राच्या गरजा समजून घ्या. त्या दूर करण्यासाठी जीवनाचा उपयोग करण्याचं ठरवा.

''आपली जीवनं वाया दवडायला आज अवसर नाही. प्रत्येकाच्या श्रमाची जरुरी आहे. प्रत्येकाच्या सेवेची जरुरी आहे. ज्या राष्ट्रातील प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनाचा कसून उपयोग राष्ट्राच्या कामासाठी करीत असते, त्या राष्ट्राचा विकास होतो. ती राष्ट्रे जागी समजावीत. जिवंत समजावीत. बाकीची मृत, हत-पतित, निद्रित समजावी. आयुष्याचा एक क्षणही व्यर्थ दवडण्याचा आपणांस हक्क नाही. घेतलेल्या श्वासोच्छ्वासाचा, प्यायलेल्या पोटभर पाण्याचा, खाल्लेल्या अन्नाचा, मिळविलेल्या प्रेमाचा, सर्वांचा हिशेब द्या. काय केलंत सांगा. ज्याला स्वत:ला मनुष्य म्हणवून घ्यायचं आहे त्याने भूभार होऊन राहता कामा नये. त्याने निष्फळ व निरर्थक जीवन कंठिता कामा नये.

''तुम्ही जागे व्हा जग जागं होत आहे. कामगार जागे होत आहेत, शेतकरी जागे होत आहेत तुम्ही पांढरपेशे जागे न व्हाल, महान प्रश्नांना हात न घालाल, विराट श्रमजीवी जनतेशी एकरूप न व्हाल तर मराल. सारी बांडगुळं अत:पर काटली जातील, छाटली जातील. जगाच्या प्रगतीचा गाडा आजवर त्यांनी अडवला. कोट्यवधी बहुजन समाजाच्या विकासाचा मार्ग त्यांनी अडवला; परंतु जगन्नाथाचा अजस्त्र रथ आता घडघडत आल्याशिवाय राहत नाही. स्वत:ची प्रगती करून घेतल्याशिवाय राहत नाही. तुम्हीही त्या रथाला ओढायला लागा. अडवाल, मार्गात पडून राहाल, तर तुमचा चुरा उडेल, ध्यानात धरा, जागे व्हा.'' असे म्हणून दयाराम भारती एकदम एक गाणे म्हणू लागले. सहजस्फूर्त गाणे. हृदयाच्या एकतानतेतून, उचंबळलेल्या भावनांतून बाहेर पडलेले गाणे!

मांडील आता ठाण माझा कामगार
घेऊन सत्ता दिव्य नव जग निर्मिणार ।। ध्रु० ।।

ही ऐतखाऊ मालदारी बांडगुळे
प्रगती जगाची ज्यामुळे ही पांगुळे
गाडा जगाचा ज्यामुळे अडखळे
ते अडथळे मार्गात जे जे मोडणार । ।मांडील०।।
बंदूक अथवा बाँब भिववी ना तया
प्राणांचिही ती अल्प ना पर्वा तया
श्रमजीविसत्ता या जगी स्थापूनिया
जखडीत जी जी बंधने ती तोडणार ।। मांडील०।।
श्रमजिविसत्ता स्थापण्या सारे उठा
हातांत घ्या हा लाल उज्ज्वल बावटा
भूते विरोधी दूर सारी दामटा
संसार सर्वां मानवांचे शोभणार ।। मांडील०।।

"असा शहरांतील कामगार जागा होत आहे. इकडे किसान जागा होत आहे. तुम्ही मरायचं नसेल तर जागे होऊन या. जागृत श्रमीजनशक्तींशी मिळा व पृथ्वीवर आनंदाचा स्वर्ग फुलवा." किती तरी वेळ दयाराम भारती बोलत होते, त्यांना जणू भानच नव्हते. ते मुलांना अमृत पाजीत होते, त्यांना जागृत करत होते, माणुसकीचे चांदणे त्यांच्या हृदयांत फुलवत होते. त्यांचे प्रवचन संपले.

"तुम्ही आणखी थोडा वेळ थांबता?" गुणाने विचारले.

"गुणा सारंगी वाजवील," जगन्नाथ म्हणाला.

"आणि जगन्नाथ गाणं म्हणेल," गुणाने सांगितले.

"बसतो मी. आजा मला बरं वाटत आहे. आज तुमच्यासमोर मी माझं हृदय ओतलं, हलकं झालं आता, जणू कळा थांबल्या, म्हणा गाणं, वाजवा सारंगी, उद्या मानवी जीवनात तुम्ही संगीत आणणार आहात ना? आज स्वत:च्या जीवनात भरून घ्या."

आणि संगीत सुरू झाले. गोविंदा तबलजी पुढे सरसावला. गुणाने हातांत सारंगी घेतली. वसंताने पेटी सुरू केली. जगन्नाथ आलाप घेऊ लागला. साऱ्या सुरांचे व स्वरांचे मधुर संमेलन! मेळ जमला. मुले डोलू लागली. संगीत! संगीत म्हणजे दिव्यता आहे. कवीची कला संगीतापुढे तुच्छ आहे. काव्याचा अर्थ

समजल्यावर त्याची मजा आहे! परंतु संगीतात अर्थहीन ध्वनीही परमार्थाची प्राप्ती करून देतात. हे ध्वनी आत्म्याला अनंताचे दशर्न करवितात. येथे अर्थाकडे लक्षही नसते. नादब्रह्मात वृत्ती विलीन होतात. रणशिंगे, रणभेरी नौबती यांचे संगीत सुरू झाले तर घोडे फुरफुरू लागतात, थै थै नाचतात; वीरांचे बाहू स्फुरण पावतात व घे घे मार करीत ते रणांगणात गर्दीत घुसतात व जन्ममरणाला विसरून जातात, मरण, मरणात रंगतात! संगीत! आणि तो मुरलीचा मंजुळ मधुर ध्वनी कानी पडताच डोळे मिटतात व भावनांचे अश्रू गालांवर येतात! आणि टाळ-मृदंगांचा भजननाद कानी येताच भीमातीरवासी विठोबाची मूर्ती डोळ्यांसमोर येते, पुंडलिकाचे वाळवंट आठवते, शिर लवते व वृत्ती विरून जाते, निरहंकार होते! सतार, सारंगी ऐका व हृदयाचे पडदे कसे खोलतात पाहा. तिकडे पडला दाबला जातो आणि इकडे हृदयातील एकेक पडला वर जातो, उघडतो. गतकालातील अनंत स्मृती प्रेमप्रसंग, सारे सारे हृदयात पुंज़ीभूत होऊन उभे राहत. भूत, भविष्य, वर्तमान साऱ्यांचे त्याक्षणी संमेलन असते. स्मृतींच्या व आशांच्या तरंगांवर जीव नाचत असतो!

जगन्नाथ ते एक गाणे आळवून आळवून म्हणंत होता. गुणाची सारंगी हृदयाला पाझर फोडीत होती, हृदयाचा भाता जगू खालीवर ओढीत होती. भावनामय गाणे. सहृदय गाणे. हरिजनांच्या सेवेचे गाणे. म्हण, जगन्नाथ म्हण. वाजव, गुणा वाजव. डोला, मुलांनो डोला!

निज बांधावा तुम्ही नांदवा ।।ध्रु०।।
देवाच्या मूर्ती
परि आज रडती
आता त्यांना तुम्ही हासवा ।।निज०।।
करू थोर हृदया
तम नेऊ विलया
प्रेमैक्याला मनि वाढवा ।।निज०।।
हरिजन बंधू
जाऊन वंदू
संतप्त मना तुम्ही शांतवा ।।निज०।।

गाणे वाजवणे बंद झाले आणि दुग्धप्राशनाचा रसाळ व मधुर कार्यक्रम सुरू झाला. दयाराम भारतींना दूध देण्यात आले. सारे मित्र दूध प्यायले. हसत-खेळत, आग्रह होत दूध पिण्याचा कार्यक्रम चालला.

''आता यानंतर तर गाण्याला अधिक रंग चढेल,'' एक मित्र म्हणाला.

''परंतु मी आता जातो,'' दयाराम भारती म्हणाले.

''आणि आपण जाऊ फिरायला. येता सारे? माझ्या मळ्यात जाऊ. चांदणं पाहा कसं पडलं आहे. मग आल्यावर हे उरलेलं दूध पुन्हा पिऊ. येता का रे?'' जगन्नाथाने विचारले.

''चला. चांदण्यातील सहल. चांदण्याला लुटू.''

''चंद्रप्रकाशात सारं रमणीय दिसतं. मळलेला कपडाही पांढरा दिसतो. चंद्रप्रकाश दोषांवर जणू पांघरूण घालतो. सूर्यप्रकाश दोष उघडे करतो. चंद्राचं आसक्तिमय, मोहमय प्रेम. सूर्याचं तमोहीन, धगधगीत अनासक्त प्रेम'' दयाराम म्हणाले.

''तुम्ही नाही का येत आमच्याबरोबर?''गुणाने विचारले.

''नको, मी जातो,'' असे म्हणून दयाराम उठले. जगन्नाथ व गुणा त्यांना दरवाजापर्यंत पोहोचवून आले. ते गेल्यावर सारी मुले बाहेर पडली. नदीकाठी मळा होता. सुंदर मळा, शेकडो प्रकारची फुलझाडे त्यात होती, मोसंब्याची बाग होती, मोठी विहीर होती, जगन्नाथकडची गुरेढोरे तेथेच असत. तेथूनच रोज दूध घरी येई. मळ्यात एक माणूसही नेहमी राहत असे. त्याची झोपडी तेथे असे. झोपडीतच त्याचा संसार. त्याचे नाव सोनजी होते. त्याची बायको, चार मुले सारी त्या झोपडीत राहत असत.

सोनजीची बायको बरेच दिवस आजारी होती. तिला मधून मधून जरा बरे वाटे. बरे वाटताच ती काम करू लागे; परंतु पुन्हा आजारी पडे. सोनजी कंटाळला होता आणि चार पोरे घरात. त्याला साऱ्यांचे करावे लागे. पुन्हा मळा सांभाळायचा, दुधे काढायची, मालकाकडे पोहोचवायची, मोट धरायची. तो दमून जाई, थकून जाई. दिवसभर काम व घरात ही दुखणी. त्याला विश्रांती नसे. ना मनाला, ना शरीराला.

आज कोजागिरी पौर्णिमा होती. बाहेर स्वच्छ शुभ्र चांदणे; परंतु सोनजीच्या मनात निराशेची रात्र होती. काळीकुट्ट रात्र. संपूर्ण अमावस्या. गावात आज

गाणे वाजवणे, दूध पिणे चालले होते; परंतु सोनजीच्या झोपडीत दैन्याचे रडगाणे होते. त्याची बायको आज जरा जास्तच आजारी होती. तो तिच्याजवळ बसला होता. पोरे झोपली होती. फाटकी गोधडी त्यांच्या अंगावर होती. आई-बापांच्या उबेने ती झोपली होती. सोनजी एकाएकी उठला. काय त्याच्या मनात आले? तो एकदम उठून बाहरे पडला. तो विहिरीकडे गेला. विहिरीजवळ तो उभा होता. का होता उभा? तटस्थ उभा होता. ना हालचाल ना काही. ती मुले मळ्यात आली. विहिरीवर त्यांना कोणीतरी दिसले! कोण ते? भूत तर नाही? सारे जरा भ्याले. आपण सोनजीस हाका मारू व त्याला दाखवू, असे ते म्हणाले. सोनजीच्या झोपडीजवळ सारे मित्र आले. झोपडीत जनी कण्हत होती, विव्हळत होती. तिच्या अंगात ताप होता. तिचे डोकेही दुखत होते.

''जने, सोनजी कुठे आहे? आणि तुला काय होतंय?'' जगन्नाथने विचारले.

''काय करू भाऊ, ताप येतो रोज, किती दिवस झाले आणि रातदिन अक्षै कपाळ दुखतं बघा. ते इथंच होते इतका वेळ. कुठेतरी उठून गेले,'' ती म्हणाली.

''मग तो सोनजीच असेल. विहिरीवर का उभा? चला, आपण हळूच जाऊ.'' गुणा म्हणाला.

ते हळूहळू न बोलता जात होत; परंतु सोनजीच घराकडे, झोपडीकडे येत होता. त्याला ही मुले पाहून आश्चर्य वाटले.

''सोनजी, इतक्या रात्री त्या विहिरीवर का उभा होतास? काय पाहात होतास?''

''पाहात होतो तिच्यात मला जागा मिळेल का?''

''का जीव देणार होतास?''

''असा आला विचार. कधी येत नाही, तो आला; परंतु फिरलो मागे. मुलं आहेत ती काय करतील? आणि ती आजारी; उद्या काय वाटेल तिला?''

''सोनजी, जनी तुला सारखी हाका मारीत आहे. तिच्याजवळ बसायचं सोडून हे काहीतरीच काय मनात आणलंस?''

''तिच्याजवळ बसून काय करू? मुंडकं का कपाळावर बांधू? फार कपाळदुखी बघा. आज तापही हद्दीपलीकडे आला आहे. काय करू मी?

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

माझ्या का हातांत औषध आहे? ठेवला कपाळावर हात की झालं बरं. तो वैद्य म्हणे, रोज गायीचं दूध देत जा. त्याला सांगायला काय? कुठून रोज दूध आणायचं व प्यायचं? तुमच्याजवळ मागायलाही जीव भितो. मागे केव्हा एकदा जनीने मागितलं तर तुमचे दादा एकदम अंगावर आले व म्हणाले, "तुम्हाला गं कशाला दूध?' खरंच आम्हांला कशाला? परंतु देव ही दुखणी तरी आम्हाकडे का पाठवतो? श्रीमंतांना द्यावी त्याने दुखणी. त्यांना आराम असतो. काम थोडंच असतं? जनीच्या अंगात ताप होता तरी त्या दिवशी पावसात तिला काम करावं लागलं. कसा हटणार ताप? श्रीमंत मनुष्य गादीवर पडून राहील, औषधं घेईल, दूध पिईल, मोसंबी खाईल. त्याला का काही कमी आहे? डॉक्टर येईल, रोज सुई टोचेल; परंतु ही दुखणी आमच्या झोपडीतही देव पाठवतो. जीव जिकिरीला येतो हो दादांनो! काय तुम्हांला सांगू? मनात आज दुष्ट विचार आले. वाटे की मुलांनाच एकेकाला आधी फेकावं विहिरीत, मग हिचं गाठोडं फेकावं व मग शेवटी स्वतः घ्यावी उडी; परंतु मुलाला हात लावला आणि विचार बदलला. हाताने त्याला थोपटलं, पांघरूण घातलं. शेवटी मीच उठलो. आलो इथे; परंतु धैर्य नाही झालं. वाटलं पोरं उद्या कुणाच्या तोंडाकडे बघतील, कुणाजवळ भाकर मागील? पाणी आलं डोळ्यांत. परत फिरलो शेवटी. काय सांगायचं नि कसं करायचं. गरिबांची दैना आहे."

मुले ऐकत होती. तिकडे झाडावर एकदम चिर्र आवाज झाला. घारीचा का आवाज? चिर्र आवाज. कोणा पाखराचा आवाज?

"सोनजी, तू माझ्याजवळ का नाही कधी दूध मागितलंस? तुझी बायको आजारी आहे हे मला माहीतही नव्हतं."

"तुम्ही मळ्यात फार येत नाही. तुम्हांला कसं कळणार? तुमची शाळा, तुमचं गाणं वाजवणं. तुम्हांला कुठे आहे वेळ? आणि तुम्ही काही दिलं तरी तुमच्या घरात ते समजणारच. बोलाचाली होतील. आम्हांला म्हणतील, की मुलाला फसवून सोनजी दूध वगैरे घेतो. तुम्हांला तर ते सारे भोळा सांब म्हणतात. तुमचे दादा तर एकदा आम्हांला म्हणाले, 'त्या जगन्नाथजवळ काही कधी मागू नको. तो वेडा आहे. घरातलं वाटेल ते देईल.' तुमच्याजवळ

सांगासवरायला जीव भितो. माझी बायको आजारी हे का तुमच्या दादांना माहीत नाही? परंतु परवा तिला पावसात काम करायला त्यांनी लावलं. 'तुम्ही माजलीत, इथे सुखाने राहायला सोकावलीत,' किती तरी बोलले. जनी रडत उठली. पावसात काम करू लागली. आम्हा गरिबांचा आजार, त्याची का काळजी करायची असते? तुमची गाय, म्हैस आजारी पडली तरी अधिक जपता. त्या दिवशी आपल्या मोत्याचं दुसऱ्या एका कुत्र्याशी भांडण झालं. मोत्याला लागलं होतं. तर त्याला गाडीतून दवाखान्यात नेऊन मलमपट्टी लावून आणलंत; परंतु आम्हांला कशाला हवं औषध? श्रीमंतांकडे गाईगुरं व्हावं, कुत्रं-मांजर व्हावं, पोपट-मैना व्हावं; परंतु त्यांच्याकडे नोकर होणं नको. जगन्नाथभाऊ, तुमच्या घरच्या मांजरांना रोज अर्धाशेर दूध मिळत असेल; परंतु जनीसाठी घोटभरही आम्हांला मिळत नाही. जाऊ द्या. किती सांगायचं? बसायला घोंगडी आणू का?''

''आहे का घोंगडी?''

''जनीच्या अंगावरची आणतो जरा काढून. ताप भरला आहे. हिव थांबलं आहे. आता घोंगडीची जरूर नाही.''

''नको हो सोनजी,'' गुणा म्हणाला. ''आम्ही तुला आता जाऊन दूध आणून देतो कढत दूध जनीला दे. आज कोजागिरी आहे, जनी पिईल, बरं वाटेल तिला.''

''आम्हांला कुठली कोजागिरी पौर्णिमा! आमची नेहमी होळी पौर्णिमा. सारी बोंबाबोंब येईल दिवस तो काढायचा. ना कधी विश्रांती, ना आनंद, ना सणवार, ना काही.''

''सोनजी, आईला सांगून मी उद्यापासून दूध देववीन हो आणि जनीला दवाखान्यात घेऊन जाईन. आपल्या छकड्यातून नेईन.''

ती मुले मजेसाठी फिरायला आली होती; परंतु गंभीर होऊन माघारी चालली बगीच्यातील फुले पाहायला आली होती; परंतु सोनजीचे अश्रू पाहून मागे वळली. त्यांना त्या विहिरीजवळ बसायला आता धीर होत नव्हता. ते मुके होऊनच परतले. त्यांना का जागृती आली? मघा दयाराम भारतींनी सांगितले होते, की डोळे उघडून सर्वत्र पाहा.

आसपासच्या समाजाची स्थिती पाहा. जागे व्हा! ते जागे होऊन परत जात होते. सोनजीला दुधाचा एक थेंब घेता येत नाही. मळ्यातील एक मोसंबे घेता येत नाही आणि जगन्नाथच्या घरी कोणी आले तर त्यांना केशर लावून दूध देण्यात येई. मसाला घालून दूध देण्यात येई. सोनजी आपल्या मळ्यात खपतो, मळ्यात राहतो. तो आपल्याच कुटुंबातील असे आपणांस का वाटू नये? आपण दूध प्यायलो. सोनजीची का नाही आठवण झाली? गरीब हे श्रीमंतांच्या आठवणीत कसे येतील? गरिबांचे जीवन ही स्मरणीय वस्तू आहे? विचारणीय वस्तू आहे? माणसापेक्षाही आपणांस आपली कुत्री, मांजरे, पोपट, मैना अधिक प्रिय आहेत! कितीतरी विचार जगन्नाथच्या मनात उसळले.

''जगन्नाथ, त्या छगन शेटजींकडे पोपट आहे ना, त्याला मुंबईहून डाळिंबांचं पार्सल येतं,'' बाबू म्हणाला.

''आणि गिरीधारीलालांकडे कुत्रा आहे, त्याची काय मिजास?'' बन्सी म्हणाला.

''अरे काठेवाडात एक संस्थानिक आहे. त्याने कुत्र्यांसाठी बंगले बांधले आहेत. कुत्र्यांना गाद्या लोळायला. त्यांना उजाडत खीर खायला,'' आनंदा म्हणाला.

''काठेवाडात कशाला? आपणाकडे तेच प्रकार आहेत.''

''अमळनेरला का कुठे एका श्रीमंताच्या लग्नात लोकांना जेवताना सोडा वॉटरचे पाणी देत होते. म्हणजे म्हणाले पचन लगेच पोट हलकं. मग आणखी आग्रह,'' श्यामने सांगितले.

''कुणी कुत्राकुत्रींची थाटाने लग्नं लावतात. त्यांची वरात काढतात.''

''पुण्याला कुणा श्रीमंताने बाहुला-बाहुलीच्या लग्नात पाच हजार रुपये खर्च केले म्हणे,'' रमण म्हणाला.

''परंतु, गरिबांचे संसार हे असे.''

''त्यांना ना दवा, ना दूध.''

''त्यांना ना अन्न, ना वस्त्र.''

''त्यांना ना सुख, ना विश्रांती.''

''ना सण, ना वार.''

''त्यांना सदैव चिंता.''

''त्यांना सदैव वाण.''

''रोज उपासमार.''

''रोज मरण.''

''अरेरे! काय ही दशा.'' असे म्हणत ती मुले जात होती. जगन्नाथच्या गच्चीवर ती सारी आली. दूध प्यावेसे कोणाला वाटत नव्हते; परंतु प्यायले व सारे घरोघर गेले. जागे होऊन झोपी गेले. जगन्नाथ व गुणा दूध घेऊन खरोखरच पुन्हा मळ्यांत गेले.

''मला वाटलं तुम्ही थट्टा केलीत,'' सोनजी म्हणाला.

''सानेजी, दुःखाची का थट्टा करू? घे हो हे दूध. जनीला कढत कढत दे.''

''तुम्ही पुन्हा कशाला आलेत? बाहरे गारवा आहे.''

''प्रेमाची ऊब मिळाली होती. सोनजी जातो हां.''

''देव तुम्हांला उदंड आयुष्य देवो. गरिबांचे वाली व्हा.''

जगन्नाथ, आपली अंजनी म्हणजे काही मोठी गंगा-यमुना नव्हे; परंतु जगासाठी वाहून राहिली आहे. असेल जवळ ते देत आहे. उन्हाळ्यात काही जवळ नाही राहिलं तर स्वतःचं हृदय ओतून देते. झरे खणावे आणि नदीचं हृदय न्यावं.''

''गुणा, आपण लहान आहोत, तरीही आपणांस काही करता येईल. गरिबांची थोडी वास्तपुस्त घेता येईल. नाही?''

''जगन्नाथ, मी गरीब, मी काय करू शकणार?''

''तू गरीब व मी का श्रीमंत आहे मीही गरीबच आहे. बाबांची श्रीमंती मला नको. पापी श्रीमंती. लोकांना रडवणारी संपत्ती. आम्ही लुटारू व डाकू आहोत. आम्हांला सातदा फाशी द्यावं. रोज माझ्या घरी मी गोष्टी पाहात असतो. शेतकरी येतात. गरीब येतात. रडतात, हात जोडतात. गुमास्ते त्यांच्या अंगावर ओरडतात. त्यांना वाटेल ते बोलतात. नको गुणा हे पाप. मला गरीब होऊ दे. मी मोठा झालो तर माझ्या वाट्यास येईल ते सारं देईन. गरिबांचे संसार सुखी करण्यासाठी देईन.''

''जगन्नाथ, तुला गरीब होऊन कसं चालेल? तुझं आता लग्न होईल. होय ना?''

''तुला कुणी सांगितलं?''

“तुझ्याच आईने. म्हणाली जगन्नाथच्या लग्नात ये हो. एव्हापासून आमंत्रण देऊन ठेवते.”

“गुणा, मी काय करू? एवढ्यात लग्न? परंतु आई रडते. म्हणते ‘माझ्यादेखत होऊ दे. मी का आता फार वाचणार आहे?” काय करावं समजत नाही.”

दोघे मित्र घरी आले. जगन्नाथच्या खोलीतच गुणा झोपला. आपल्या गादीवर त्याने गुणाला झोपविले व स्वत: दुसरे एक अंथरूण घालून त्यावर निजला. दोघे मित्र कितीतरी वेळ बोलत होते. पहाट व्हायची वेळ आली. जगाला जागृती होण्याची वेळ!

परंतु गुणा व जगन्नाथ खरोखरचे जागे झाले होते आणि आता जागे होऊन पहाटे झोपले होते. ते झोपले तरी जागे होते. जग जागे होणार होते; परंतु खरोखर जगाच्या डोळ्यांवर झापडच राहणार होती! खरी जाग केव्हा येईल?

✦✦

आपण दोघे भिकारी होऊन हिंडू

पंढरीशेटजींची शेती सर्व एरंडोल तालुक्यात पसरली होती. शेजारच्या अमळनेर तालुक्यातही शिरली होती. जिकडे जाल तिकडे त्यांची शेती, त्यांची जमीन. एरंडोल तालुक्यात प्राचीन काळी तो बकासुर झाला. तो सर्वांना छळी. सर्वांना गिळी. बकासुर एकदाच नाही झाला. सर्व काळी असे बकासुर आहेत. आजही खानदेशात असे बकासुर आहेत. हिंदुस्थानात आहेत, जगभर आहेत. शेतकऱ्यांची शेती गिळंकृत करणारे बकासुर! हा गाव म्हणे अमुक शेटचा, हा गाव तमुक शेटचा! शेटजी गादीवर लोळत असतो. त्याची जमीन कशी? परंतु असाच उलटा न्याय आहे. ज्याचा घाम शेतात पडतो, त्याची जमीन कधी बरे होईल?

शेतकऱ्यांची शेतेच नाही तर घरेदारेही पंढरीशेटजींच्या हाती आली. शेतकरी शहरांत निघून गेले. घरेदारेही सोडून मजूर होऊन निघून गेले. ती त्यांची घरे तशीच दीनवाणी सुसकारे सोडीत होती. त्या घरांन कुलपे होती. त्यांत आता उंदीर नाचत खेळत. घुशी वस्ती करीत. कोणत्याही खेड्यात जा. पंढरीशेटजींस कोणी बरे म्हणत नसे; परंतु त्यांच्यापेक्षाही त्यांचे दोन वडील मुलगे अधिकच पिळवणूक करणारे निघाले. बापसे बेटे सवाई. पंढरीशेट आता वयस्क झाले

होते. दोघे वडील मुलगे कारभार पाहत होते. या वडील मुलांच्या तोंडी मृदू शब्द कसा तो कधी नसे. पैशाचा धूर त्यांच्या डोळ्यांत चढला होता. त्यांचे सारे लक्ष एका गोष्टीवर असे. कधी कोणाच्या शेताचा लिलाव करता येईल, कधी कोणाचे घर घेता येईल. हेच त्यांना वेड. बगळा माशांवर टपलेला त्याप्रमाणे हे शेतकऱ्यांच्या जमिनींवर टपलेले.

त्यांना घरी नेहमी दीनवाणे शेतकरी बसलेले असावयाचे. दया करा, पोराबाळांना राहू दे थोडी जमीन, नका त्यांना देशोधडीला लावू, असे डोळ्यांत पाणी आणून विनवायचे; परंतु त्या सावकारी पाषाणास पाझर फुटत नसे. मोठमोठ्या जमा-खर्चाच्या वह्या घेऊन बसलेले कारभारी हसत. डोळ्यांची आरशी वर करून डोळे मिचकावीत. पेटीजवळ बसणारा मुख्य दिवाणजी फारच दुष्ट होता. पेटीजवळ बसून, लोडाजवळ बसून, त्याचे पोट लोटासारखे झाले होते. त्याला जमा-खर्चाची वही लिहायला दुसरे काही लागत नसे. पोटावर वही ठेवून तो लिही. पोटच जणू टेबल, पोटच जणू डेस्क! त्याच्या त्या अगडबंब पोटात माया नव्हती, प्रेम नव्हते! केवळ दुष्टपणा भरलेला होता. हिशेबाच्या कामात त्याच्यासारखा हुशार माणूस नसेल असे म्हणत.

त्या दिवशी रविवार होता. जगन्नाथ घरीच होता. खाली बैठीच्या खोलीत दोन शेतकरी येऊन बसले होते. दिवाणजी व इतर कारभारी हिशेब करीत होते. शेतकरी दाराजवळ बसले होते. वाहाणा, जोडे ठेवतात त्या ठिकाणी.

''तुमच्याकडे नऊशे रुपये निघतात.''

''नऊशे कसे निघतील? कपाशीच्या गाड्या धरल्यात का? आणि एकदा पन्नास दिले होते ते?''

''ही वही खोटं नाही सांगणार. जे आलं असेल ते लिहिलेलं आहे. तुम्ही वेळच्या वेळी व्याज देत नाही. रक्कम फुगत जाते. मग तुम्ही जागे होता. आता मुदत चार महिन्यांची राहिली. मुदतीच्या आत काम आटोपलं पाहिजे. हा व्यवहार आहे. व्यवहार तो व्यवहार,'' दिवाणजी म्हणाले.

''काय करू रावसाहेब, मागच्या वर्षी पीक नीट आलं नाही. या वर्षी भाव नाही. घरात पोरगा आज आठ महिने आजारी आहे. नका करू फिर्याद, नका नेऊ घरदार. काही तडजोड करा. हळूहळू देऊ पैसे.''

''हळूहळू केव्हा द्याल? ते काही नाही. आम्हांला आता सवड नाही. न्यायाला दयामाया नाही.''

''नका दादा असं करू. तुम्हीच आमचे मायबाप. तुम्ही धनी. सांभाळून घ्या. घरात बायको बाळंतीण. सध्या खायला दाणेही नाहीत हो घरात. काय सांगावं तुम्हांला!''

''खायला नाही घरात मग पोरांचे पाळणे कशाला?''

''ते का आपल्या हातचं आहे दादा?''

''तू जा आता. निघ. फालतू बोलायला वेळ नाही. उगीच कटकट. पै द्यायला नको. उठा, निघा.'' वरून जगन्नाथ एकदम खाली आला. त्याच्याने राहावेना. जो शेतकरी शेते पिकवतो, त्याच्या मुलांना का दाणे नसावे? पोरे कशाला, असे आम्ही बांडगुळांनी त्यांना का विचारावे का हिणवावे?

''अहो, त्यांना असं काय बोलता? ती माणसं आहेत.'' जगन्नाथ संतापून म्हणाला.

''कसली माणसं? डुकरं बर. कर्जबाजारी, घरी खायला नाही. तरी डुकरांसारखी पोरं पैदा करतात,'' दिवाणजी बोलले.

''डुकरं तुम्ही आम्ही आहोत. काही श्रम न करता खाणारे व पोरं निर्मिणारे. शेतकरी घाम गाळतो. त्यालाच पोरं निर्माण करण्याचा अधिकार आहे. तो धान्य निर्माण करतो, वाटेल ते बोलता, तुम्हांला लाज नाही वाटत?'' जगन्नाथ जणू जमदग्नी झाला.

''तुम्ही वर जा येसफेस करायला. तुम्हाला व्यवहार कळत नाही. उगीच डोकं पिकवू नका,'' दिवाणजी उपहासाने म्हणाले.

''तुम्हांलाच कळत नाही. साधी माणुसकीही कळत नाही.''

''माणुसकीने इस्टेटी मिळत नसतात.''

इतक्यात जगन्नाथचा दादा तेथे आला.

''जगन्नाथ, तू वर जा. इथे येण्याचं तुझं काम नाही,'' तो म्हणाला.

''येणार, तू कोण मला बंदी करणार? मी का गुलाम आहे तुझा?''

''वर जा बऱ्या बोलाने. नाही तर ओढीत नेईन.''

''जाणार नाही. काय करायचं असेल ते कर.''

तिरशिंगराव दादा संतापला. तो जगन्नाथची बकोटी धरून ओढू लागला. जगन्नाथही ओढाताण करू लागला. ते शेतकरी दीनवाणेपणाने 'जाऊ दे रावसाहेब, सोडा,'' असे म्हणू लागले. ''तुम्ही चालते व्हा इथून. अजून इथे?'' दिवाणजी गर्जले.

''नका रे जाऊ. बसा तुम्ही. माझ्या वरच्या खोलीत बसा. तुम्हांला चहा देतो, दूध देतो. पानसुपारी देतो,'' जगन्नाथ म्हणाला.

''निघता की नाही?'' पुन्हा दिवाणी शेतकऱ्यांवर ओरडले. ते बिचारे निघून गेले. जगन्नाथ त्यांच्याकडे जाऊ पाहात होता. दादाने जोराने त्याच्या पाठीत एक तडाखा मारला, जगन्नाथ उसळला. त्यानेही दादाच्या थोबाडीत एकदम मारली.

''मला मारतोस, मला मारतोस? माजलास तू, मला मारतोस?'' असे ओरडून दादा मारू लागला. घरातील मंडळी धावून आली. आई आली, वडील आले.

''अरे, आहे काय हा तमाशा? तू अलीकडे त्याच्यावर का सूड धरला आहेस? त्याला मारतोस काय? तुम्ही वेगळे तरी व्हा सारे. पाडा हिस्से,'' आई म्हणाली.

''आई, याला काडीची अक्कल नाही. याने वर तबला बडवाव, आ आ करावं. व्यवहार कळेल तर शपथ, सर्वांना हा भिकेला लावील.''

''तुम्हीच सर्वांना भिकेला लावलं आहे, शेकडो शेतकऱ्यांना भिकेस लावलं आहे.''

''तू आम्हांला लाव.''

''लावीनच.''

''पुरे रे, आम्ही दोघं अजून जिवंत आहोत तो तुम्ही मारामारी करता. आम्ही गेल्यावर काय कराल?'' आई म्हणाली.

''जगन्नाथ, जा तू वर,'' पंढरीशेट म्हणाले. जगन्नाथवर गेला. तो फारच खिन्न होता. आपल्या खोलीत पडून राहिला. आज मधल्यावेळी तो खायलाही खाली गेला नाही. आईला राहावले नाही. ती त्याच्या खोलीत आली. त्याच्याजवळ बसली. त्याच्या केसांवरून हात फिरवीत होती.

''चल खाली, थोडं खा,'' ती म्हणाली.

"मला नको खायला. मी फक्त दोनदा जेवायचं ठरवलं आहे. इतर काही नको. मला गरीब होऊ दे. हळूहळू गरिबांसारखं राहायला लागू दे."

"वेडा आहेस. तुझं आता लग्न झालं म्हणजे तुम्ही सारे वेगळे व्हा. आम्ही तुझ्याजवळ राहू भांडण नको, तंटा नको हो. चल, ऊठ. माझं ऐक. अलीकडे नीट खात नाहीस पीत नाहीस, अशाने रे कसं होईल? ऊठ."

"आई, मला लग्न नाही हो करायचं."

"काहीतरीच. लग्न कधीचं ठरलेलं आहे, त्यांना का फसवायचं? आमच्या तोंडाला का काळं फासणार? काहीतरी जगाच्या विपरीत तुझं बोलणं. चांगला संसार कर. आम्ही आहोत तो एकदा तुझा संसार नीट सुरू झालेला पाहिला म्हणजे झालं. मग डोळे मिटले तरी हरकत नाही. बरं, ते जाऊ दे, येतोस ना खायला?"

"गुणा आला म्हणजे आम्ही खाऊ."

" केव्हा येणार आहे गुणा"

" येईलच तो. तू आम्हाला वरच दे लाडू पाठवून. "

" गुणा आला म्हणजे तूच खालून घेऊन ये. वहिनीजवळ माग, मी नसले तर."

"तू कुठे जातेस?"

" जाते जरा बसायला कुठे तरी."

आई गेली. जगन्नाथ आपल्या अंथरूणावर पडून होता. खरेच का माझे लग्न करणार ? एव्हापासून लग्न! नाही केले तर? मी हट्ट धरला तर? आई, बाबा रागावतील, रडतील. काय करावे ? कोठे निघून गेलो तर ? कोठे जावे निघून ? दयाराम म्हणत, हिंदुस्थानातील आश्रम पाहून ये. ठिकठिकाणी ग्रामसेवेची कामे चालली आहेत ती पाहून ये, नवीन संघटना पाहून ये. जावू का हिंदुस्थानभर हिंडायला? दक्षिण हिंदुस्थानत जावू का? दाक्षिणात्य संगीतही शिकावे. त्या संगीताची माहिती करून घ्यावी. यावे हिंडून. हिंदुस्थान पाहून. अनुभव घेऊन. जीवन समृध्द करून. अशा विचारतंद्रीत जगन्नाथ होता. गुणा हळूच येऊन बसला होता. त्याला कळलेही नाही. तो जेव्हा कुशीवर वळला तेव्हा त्याला गुणा दिसला.

"हे रे काय गुणा? बोललाही नाहीस."

‘‘म्हटलं तुझी समाधी कशाला भंगवावी!’’

‘‘खरंच मी समाधीत होतो.’’

‘‘कोणते विचार चालले होते’’

‘‘गोड गोड विचार.’’

‘‘मलाही कळू दे.’’

‘‘हा जगन्नाथ हिंदुस्थानभर हिंडायला जाणार आहे.’’

‘‘एकटाच की दोघं?’’

‘‘दोघं कोण?’’

‘‘अरे, तुझं आता लवकर लग्न आहे.’’

‘‘काही तरीच.’’

‘‘सारा गांव बोलत आहे. सोनारांकडे नवीन दागिने घडत आहेत.’’

‘‘गुणा, काय करावं?

‘‘लग्नाला उभं राहावं.’’

‘‘माझ्या मनात येतं. की हे लग्न टाळावं. घरातून पळून जावं हिंदुस्थानभर हिंडावं. दक्षिणेकडे जावं. तिकडचं संगीत शिकावं. यावं सात-आठ वर्षांनी घरी परत.’’

‘‘परंतु लग्न लाव व मग जा निघून.’’

‘‘तू येशील माझ्याबरोबर? गुणा, कधी कधी वाटतं की गरीब व्हावं, भिकारी व्हावं. हिंदुस्थानचे यात्रेकरू व्हावं. बैरागी असतात. सारा हिंदुस्थान त्यांनी पाहिलेला असतो. त्यांचे अपमान होतात. आगगाडीतून त्यांना खाली उतरवितात; परंतु शांतपणे ते हिंडतात, हिंदुस्थानच्या यात्रा करतात, मातृभूमीचे संपूर्ण दर्शन घेतात. येशील तू? आपण भिकारी बनू. तू सारंगी वाजव. मी गाणी म्हणेन. नवीन देशभक्तीची गाणी, बंधुभावाची गाणी, खऱ्या धर्माची गाणी, गरिबांची गाणी, मजा येईल. भारतीय संसार पाहू.

‘‘पूर्वी आपल्या देशात भिकाऱ्यांनीच विचारप्रसार केला. फकिरांनी धर्मप्रसार केला. हिंदी भिकारी चार दाणे मागतात; परंतु विचारांचे दाणे भीक घालणाऱ्याला देतात. शरीराची भाकर मागून ते विचारांची भाकर देतात. भिकाऱ्यांचे हिंदुस्थानवर अपार उपकार आहेत. त्यांनी सारी भारतीय संस्कृती एकरूप केली. तुकारामांचे

अभंग, मनाचे श्लोक, कबीराचे दोहे, मीराबाईची पदं, गोपीचंदाची गाणी हिंदुस्थानभर कुणी नेली ? हे विचारैक्य कुणी निर्मिलं ? जेव्हा वर्तमानपत्रं नव्हती, छापखाने नव्हते अशा काळात भिकारी ही संस्कृतिप्रचाराची जिवंत साधनं होती.''

'' पहाटे येणारे वासुदेव भूगोल शिकवत, पोवाडे म्हणणारे शाहीर इतिहास शिकवीत. हे सारे लोक केवळ फुकट खाणारे नव्हते. भिक्षा हा जणू त्यांचा धंदा. भिक्षा मागत व ज्ञान देत. जगन्नाथ, आपणसुध्दा असंच व्हायचं? नवीन विचारांचा प्रसार करणारे?''

''हो गुणा, असे भिकारी होऊ. नवराष्ट्रधर्म फैलावू. फकिरांनी हिंदुस्थानभर मुसलमानी धर्म फैलावला. आपण नवराष्ट्रधर्माचे नवीन फकीर. खरंच व्हायचं का असे फकीर ? मी राष्ट्रीय गाणी शिकेन. दयाराम भारतींजवळून खुपशी गाणी उतरून घेऊ. जिथं जावू तिथं आपल्याभोवती लोक गोळा होतील. अरे, आपण इथे गात वाजवीत बसलो तर रस्त्यावर लोक गोळा होतात. तू नाही पाहिलंस? आपल्याला काही कमी पडणार नाही.''

''बाबा मला एक गोष्ट सांगत होते. एका कुठल्या तरी सभेत महाराष्ट्रातील एका तरुणाने छानसं पदं म्हटलं त्याचा आवाज फार गोड होता. गोड असून पहाडी होता. त्या सभेत लोकमान्य टिळक होते. त्यांनी त्या मुलाची पाठ थोपटली. ते म्हणाले, 'बाळ, तुला काही कमी पडणार नाही. नुसते मनाचे श्लोक म्हणत जाशील तरी सोनं मिळवशील.' खरचं आपण होऊ भारतमातेचे भिकारी, भारतमातेची यात्रा करणारे तरुण यात्रेकरू. तुला आवाजाची अपूर्व देणगी आहे. ती हिंदुस्थानभर नेऊ.''

''आणि तुझ्या बोटातील कला! कशी आहेत तुझी लांब बोटं. शरीरातील कलेला जणू फुटलेले कोंब! तुझ्या बोटांतील जादुगरी माझ्या बोटांत जेव्हा मी अंगठी घालतो, तेव्हा तुझी बोटं मला आठवतात. मुदी घालायला गुणाचीच बोटं लायक असं मनात येतं.''

'' तुला देवाने कंठ दिला.''

'' मला गायन, तुला वादन. आपणा दोघांत का संपूर्ण संगीत देवाने ठेवून दिलं? दोघे मित्र बना. दोघे मिळून कला पूर्ण करा, असं का तो सांगत आहे? दोन देहांत एक मन, एक आत्मा, एक कला. खरं ना? आणि मग एक दिवस भिकारी परत घरी येतील.''

''ओळखतील का रे आपणांस? तुझी पत्नी तुला ओळखील का? भगवान बुध्द असेच पुन्हा घरी आले. दारान हाती भिक्षापात्र घेऊन उभे राहिले आणी त्यांची पत्नी यशोधरा बाहेर येऊन त्यांच्या पायी लागली.''

''तू काही तरी बोलतोस.''

''काही तरी काय? जगन्नाथ, लग्न करूनच बाहेर पड.''

''आणी तू?''

'' माझं थोडचं ठरलेलं आहे लग्न. आमच्यात आधीपासून ठरवीत नाहीत. सारं आयत्या वेळेस. मी मोकळा आहे.

''परंतु तुझी आई रडेल. तू एकुलता एक. तुझ्यावर किती प्रेम, किती लोभ!''

''आणि तुझ्यावर तुझ्या आईचं नाही वाटतं प्रेम?''

''परंतु मी का एकुलता आहे? दोन मोठे भाऊ आहेत. त्यांची लग्नं झाली आहेत. आई त्यांची मुलं खेळवीत असते. नातू झाले म्हणजे मुलावरचं प्रेम कमी होतं.''

''ज्याला मुलं झाली त्याच्यावरचं प्रेम कमी होत असेल; परंतु ज्याचा अद्याप संसार मांडला गेला नाही, जो लहान आहे, त्याच्यावर प्रेम असतचं. उलट इतर मुलांवरचंही त्यांच्या वाटणीस येतं. तो अधिकच आवडता होतो.''

इतक्यात जगन्नाथची आई लाडू घेऊन वर आली.

''तुला सांगितलं होतं ना रे लाडू मागून घे म्हणून. अगदी हो जगन्नाथ तू हट्टी.''

''आई आहे तोपर्यत हट्टी. पुढे कोण चालवणार आहे हट्ट? आई बस ना.''

''गुणा, तुझ्याशिवाय हा लाडू खाईना. म्हणे तो आला म्हणजे मग खाऊ आणी बसलेत तुम्ही दोघे बोलत.''

'' आई, आमच्या कसल्या चालल्या होत्या गोष्टी?

'' गाणी वाजवण्याच्या, होय ना?

'' हो परंतु कुठे करायचं गाणं वाजवणं?

''कुठे म्हणजे ?''

''आम्ही रस्त्यांतून भिकारी होऊन गाणी गात हिंडणार आहोत. गुणा सारंगी वाजवील. मी गाणी गाईन आणि एके दिवशी पुन्हा तुझ्या दारात येऊ. तू भिक्षा

घालशील. एखादा सदरा मागू. 'पांघरायला द्या काही आई', असं दीनवाणं म्हणू. तुला येईल का दया ? आई, तू ओळखशील का गं एकदम मला? आणि तू बाहेर भिक्षा घालायला आलीस व मी जर एकदम तुझे पाय धरले तर तू घाबरशील, ओरडशील. मी मग हळूच म्हणेन 'आई' आणि तू मला हृदयाशी धरशील, अश्रूंचे स्नान घालशील. मजा होईल. नाही आई? अशा हो आमच्या संगीत गोष्टी चालल्या होत्या."

"जगन्नाथ, तू का वेडा होणार? काय वेड्यासारखं बोलतोस? त्या दयारामने तुम्हाला बिघडवलं. त्याच्याकडे जाऊ नका. श्रीमंतांच्या मुलांना तो भिकारी करील."

परंतु शेतकऱ्यांच्या मुलांना पोटभर खायला देईल. आई ते दयाराम भारती म्हणजे थोर अवलिया आहेत. त्यांना नको नाव ठेवूस. तू त्या इतर शेकडो महाराजांच्या पाया पडतेस, पैसे देतेस, त्यांच्या पूजा करतेस; परंतु ते सारे महाराज पै किमतीचे, नुसते शेणगोळे. काडीचा त्यांचा उपयोग नाही. त्यापेक्षा हे दयाराम किती थोर."

"जगन्नाथ, अशी साधुसंतांना नावं नको ठेवू बाळ. अशाने भलं नाही हो होत."

"खऱ्या साधुसंतांना कोण ठेवील नावं? खरा साधू तो, जो रंजल्या-गांजलेल्यास जवळ करतो. अन्यायाच्या विरुध्द उभा राहतो, हे तर अन्यायाला आशीर्वाद देतात. लुटारू श्रीमंतांना धन्यवाद देतात."

"असंच काहीतरी बोलत असशील व मग दादा संतापून मारायला धावत असेल,"

" खरं बोलायला कुणाची भीती?"

"गुणा, तुझ्या मित्राला काही शिकव तरी थोडं. आज दादांच्या अंगावर याने हात टाकला हो. हे बरं का ?"

" किती दिवस गं त्याची दादागिरी सोसायची?"

आई, जगन्नाथचं तुम्ही लग्न करून टाका. म्हणजे तो सुतासारखा सरळ होईल. रेशमासारखा मऊ होईल. लग्नाची वेसण घाला. बैल मग नीट गाडी ओढू लागेल. मग इकडे-तिकडे जाणार नाही. भिकारी बनणार नाही. संसारात रमेल. संपत्ती राखील."

''माझ्या मनात तेच आहे. लग्न द्यावं करून व याला वेगळं काढावं. आमच्यादेखत होऊ दे सारं. नाही तर पुढे भाऊ याला फसवतील. काही देणार नाहीत. थोडीफार शेतीवाडी देतील; परंतु दागदागिने, भांडीकुंडी देणार नाहीत. याचा नीट संसार मांडून मग मी डोळे मिटीन.''

''आई, माझं लग्न कराल तर खरोखर मी फकीर होऊन पळेन हो. दुसऱ्याच्या मुलीच्या गळ्याला फास लावाल.''

''काही पळत नाहीस. जाशील रूसून दोन दिवस. तिसऱ्या दिवशी परत येशील. आई रडत असेल असं मनात येऊन परत येशील.''

''भिकारी पुन्हा दारात येईल व घरात शिरेल. संन्याशाचा संसार सुरू होईल.'' गुणा हसून म्हणाला.

''गुणा, खरचं जाईन हो. चिडवू नका मला.''

''तू खरचं निघालास तर मीही येईन, दोन फकीर.''

''तुम्ही दोघे वेडे आहात. नादी व छंदी.''

''आई, जगन्नाथचं लग्न लवकर करा.''

''हवचं करायला.''

''मी त्या लग्नात सारंगी वाजवीन,''

''आणि मी गाणं म्हणेन.''

''स्वत:च्या लग्नात का स्वत:च गाणं म्हणायचं? अगदी हो तू अडाणी, कधी तुला जगन्नाथ समजू लागणार?''

''आई, माझं लग्न म्हणजे माझ्या आयुष्यातील आनंदाचा प्रसंग? त्या प्रसंगी नको गाऊ तर कधी गाऊ? ''

''मी जाते उठून. तुझ्याजवळ बोलण्यात अर्थ नाही.'' असे म्हणून आई उठून गेली. ते लाडू तेथेच होते. त्यांच्याभोवती मुंग्या जमू लागल्या होत्या व माशा बसत होत्या.

''या बघ मुंग्या, आपण चर्चा करीत होतो; परंतु मुंग्या मुकाट्याने साखर खात होत्या. माशा मेजवानी झोडीत होत्या. गुणा, प्रत्यक्ष आनंद आपणांस नाही का मिळणार ? भिकारी होण्याची का फक्त चर्चाच? प्रत्यक्ष भिकारी होऊन हिंडू का केव्हा?''

''जगन्नाथ, संसारात राहून भिकारी हो. संसारातील एकनाथ हो, दामाजी हो, तुकाराम हो. भिकारी व्हायला घर सोडलंच पाहिजे असं नाही. घरातील सारं दरिद्री जनतेस द्यावं म्हणजे निराळे भिकारी होण्याची जरुरी नाही. झाडांची फळं जगासाठी, नदीच पाणी जगासाठी, सूर्याचा प्रकाश सर्वांसाठी. तसं तुझ होवो. तुझी संपत्ती सर्वांसाठी.''

''ती सर्वांचीच आहे. श्रमणाऱ्यांचे आहे, ती श्रमणाऱ्यांना मी देईन. त्यांना उद्योगधंदा देणाऱ्या उदार संस्थांस देईन. ग्रामोद्योगास देईन. खादीस देईन. गो-पालनांस देईन. भिकारी झालेल्या शेतकऱ्याचा संसार सुखाचा व्हावा म्हणून मी भिकारी बनेन. आणी गुणा तू ?''

''मी भिकारी आहेच. मला व्हायचं थोडचं आहे?''

''दोन भिक़ारी मित्र. बाहेर गरीब; परंतु मनाने श्रीमंत. खरं ना?''

✦✦

दयाराम भारतींना हद्दपारीची शिक्षा

शेतकऱ्यांत दिवसेंदिवस असंतोष माजत होता. सरकार व सावकार यांचे अन्याय अत:पर सहन करावयाचे नाहीत असे शेतकरी म्हणू लागले. गावोगावी किसानांचे संघ स्थापन होऊ लागले. शेतकरी संघटना करू लागले. शेतकरी कवायती करू लागले. खेडोपाडी त्यांची पथके तयार होऊ लागली. 'उठाव झेंडा बंडाचा' हे गाणे सर्वत्र घुमू लागले. निर्भयता येऊ लागली. बकासुर दूर करावयास बलभीम उभा राहू लागला.

त्या वर्षी अपरंपार पाऊस पडला. चांगले येणारे पीक वाहून गेले. नद्यांना भयानक पूर आले. ते पूर शेताभातावर पसरले. काही काही शेतांतून चार-चार हात वाळू येऊन पसरली.

सर्वत्र निराशा पसरली; परंतु सरकार व सावकार यांना दयामाया नव्हती. शेते फुकट गेली, तरीही आणेवारी सहा आण्यांच्या वरच! पूर येण्यापूर्वी आणेवारी झाली होती. मागून पूर आले. शेतांतील पीक वाहून गेले; परंतु कागदावरचे लिहिलेले सुरक्षित होते. ते कोण पुसून काढणार? गरिबांचे अश्रू त्याला पुसून टाकू शकत नाहीत.

दयाराम भारती गावोगावी सभा घेत होते, 'एक पैही तहशील भरू नका, सावकाराला काही देऊ नका. आणी जप्ती आली तर सारे विरोध करायला उभे राहा,' असे ते सांगू लागले. शेतकरी निश्चय करू लागले. सरकारी तगादे सुरू झाले. पैशासाठी छळ सुरू झाले. पाटलांना ताकिदी झाल्या, की आधी तुम्ही तहशील भरा. तुम्ही उदाहरण घालून द्या, म्हणजे मग इतरही भरतील; परंतु पाटील तरी कोठून भरणार ?

"रावसाहेब, मी कुठून भरू तहशील?" एक पाटील अधिकाऱ्यांस म्हणाला.

"गुरंढोरं विका, बायको विका," अधिकाऱ्याने उत्तर दिले.

गरिबाला अब्रू ही वस्तू नाही. गरिबाची बायको, गरिबांची मुले म्हणजे कचरा, बाजारातील भाजी. पाटील काही बोलला नाही. दीडशे वर्षांच्या गुलामगिरीने सारे अपमान गिळायला राष्ट्र शिकले होते आणि खरेच त्या पाटलांने आपली गुरेढोरे विकली. गुरे विकूनही तहशील पुरा करता येईना,तेव्हा तो सावकाराकडे गेला. सावकार पैसे देईना, काय करायचे? शेवटी दुसऱ्या एका सावकाराने शंभराचे दोनशे लिहून घेऊन हाती पंच्याहत्तर ठेवले. पाटलाने शेतसारा भरला.

आणि पाटील व तलाठी आता उठले. शेतकऱ्यांस छळू लागले. एका गावी, एक शेतकरी होता. त्याच्याजवळ खरोखरचं काही नव्हते. तो काही देईना. एकदा तो आठवड्याच्या बाजाराला एरंडोलला आला होता. तो रुपयाचे धान्य विकत घेत होता. तोच त्याच्या गावचा तलाठी तेथे उभा.

"काय रे, दाणे विकत घ्यायला पैसे आहेत. सरकारचं देणं द्यायला मात्र पैसे नाहीत ना ?"

"अहो घरातील सर्वांनी आठ दिवस चरख्यावर कातलं. ते सूत दिलं इथे खादी भांडारात व रुपया मिळाला. पोरं चार दिवस उपाशी आहेत."

"रुपया मिळाला तो आधी सरकारला का दिला नाहीस? तुम्ही सरकारहून मोठे झालात वाटतं?"

"सरकारहून मोठे कसे होऊ दादा? त्याच्या राज्यावर देव कधी मावळत नाही."

"तुझ्या घरावर जप्ती आणायला हवी. ते चरखे तुम्हांला शिरजोर करीत आहेत. मला फसवलंस का रे?"

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

तो तलाठी गेला. त्या शेतकऱ्यांस वाईट वाटले. असे कसे हे सरकार? उपाशी मरणाऱ्या लोकांची काडीइतकी पर्वा न करणारे सरकार! मामलेदार पगार घेतोच आहे. कलेक्टर घेतोच आहे. यांना हे पगार घेववतात कसे ? लोकांसाठी हे काय करीत आहेत? आणि खादीवाले, कॉंग्रेसवाले, ग्रामोद्योगवाले धंदा देत आहेत, चरखे पुरवीत आहेत. थोडा आधार व आशा देत आहेत, ते चरखे का यांनी जप्त करावे ? त्यां कामात मदत करण्याऐवजी,त्या कामाला उत्तेजन देण्याऐवजी त्यात का हे विघ्न आणणार? अरे रे! असे कसे हे लोक?

तो शेतकरी घरी गेला. त्याने दाणे नेले होते. मुलांना भाकर झाली. सर्वांना आनंद झाला. चरखा भगवानाला त्यांनी नमस्कार केला. त्याची बायको चरख्याला नमस्कार करून रोज़ कातायला लागत असे. अन्नदाता परमेश्वर तो होता.

एके दिवशी तो शेतकरी, त्याची बायको व मुले कातीत बसली होती आणि पोलीस आले,. तलाठी आले, पाटील आले, अधिकारी आले. तरी शेतकरी उठला नाही. तो कातीतच राहिला.

''ओढा रे ते चरखे. हरामखोर उठतही नाही. खायला मिळत नाही तरी मगरूर.'' मोठा अधिकारी ओरडला.

''हे चरखे खायला देतात, म्हणून मगरूरी,'' दुसरा कोणी म्हणाला.

''ओढा ते चरखे. बघता काय?'' हुकूम झाला.

तो शेतकरी, त्याची बायको, ती मुले आडवी झाली. ती विरोध करू लागली.

'' रावसाहेब, नका नेऊ हे चरखे. दुसरं काही न्या.''

''दुसरं काय आहे घरात?''

'' मडकी आहेत; गाडगी आहेत. सूप-केरसुणी आहे; जातं आहे. पाटा-वरवंटा आहे. काय असायचं घरात?''

''इकडे गाय आहे रावसाहेब. हीच न्यावी धरून,'' तलाठी म्हणाला.

''छान आहे गाय. करा ही जप्त,'' पाटील म्हणाले.

''रावसाहेब, गाय गाभण आहे. नका नेऊ. तिचे हाल होतील. गायत्रीचे शाप नका घेऊ.''

''सरकारला कोणाचेही शिव्याशाप बाधत नाहीत. सोडा ती गाय.''

तो शेतकरी धावला. तो गाय सोडू देईना. पोलिसांनी त्याला ओढले. अधिकाऱ्याने छडी मारली.गाय सोडण्यात आली. ती शिंगे उगारून त्या दुष्टांना फाडायला धावली; परंतु तिच्या तोंडावर पोलिसांचे दंडे बसले! अरेरे! गायीला हाणीत मारीत ते निघाले. त्या शेतकऱ्याला कैद करून चावडीवर बसवण्यात आले.

आणि ती गाय? ती माराने विव्हळ झाली. ती वाटेतच जखमी होऊन मरून पडली! ती गाय म्हणजे भारताची दीन मूर्ती होती. गायींसारखा हा भारत आज दीनवाणा झाला आहे. मरत आहे. त्या गाईची कथा सर्वत्र गेली. लोक हळहळले; परंतु उठले का? प्रतिकार करावयास उभे होते का? त्या गाईला मारीत मारीत नेण्यात येत असता लोक काय करीत होते ? ते का नाही धावून गेले? ते का हसत होते ? परंतु सुपातील हसणारेही भरडलेच जायचे असतात हे का त्यांना माहीत नव्हते?

हिंदू धर्माच्या गप्पा मारणारे का मेले होते? मुसलमान गाय विकत घेऊन धर्मासाठी म्हणून मारतात; परंतू येथे तर सरकार गाय मारीत आहे. कशासाठी? तर दुष्काळात शेतसारा देता येत नाही म्हणून. या गाईला मारणारे कोण होते? पाटील कोण होता, तलाठी कोण होता, मामलेदार कोण होता? परंतु सरकारविरुद्ध कोणी बोलावे?

दयाराम भारतींनी सारा तालुका उठविला. शेतकऱ्यांच्या गटपरिषदा घेऊन त्यांना हे अन्याय जळजळीत वाणीने त्यांनी सांगितले. 'माणसे बना व अन्यायाविरुद्ध उठा' असे सांगितले. आधी प्रचार करून नंतर सर्व तालुक्यांतील शेतकऱ्यांची एक विराट सभा त्यांनी घेतली आणि सभेनंतर तो प्रचंड लोंढा मामलेदार कचेरीसमोर ते घेऊन गेले. मामलेदार घाबरला. तो खुर्ची सोडून बाहेर आला.

''काय आहे म्हणणं?'' त्याने विचारले.

''आपल्याला कान आहोत का नाहीत?'' लोकांनी विचारले.

''जरा लांब करा त्यांचे कान,'' संतापून कोणी बोलले; परंतु दयारामांनी हात वर केला व सारे शांत झाले.

त्यांनी लोकांची स्थिती सांगितली. जुलूम-जप्तीचे प्रकार सांगितले आणि शेवटी म्हणाले, ''लोकांत त्राण नाही. सुकलेला संसार आहे. ठिणगी पडेल तर

भडका होईल; परंतु सरकारची सहानुभूती मिळेल तर हिरवं हिरवं दिसेल. पाहा, ठरवा काय ते.''

''मी विचार करीन. तुम्ही आता जा.'' असे म्हणून मामलेदाराने प्रणाम केला.

शेतकरी हर्षले. त्यांचा तो विजय होता. लोक चालले पुन्हा गावोगाव. ते काय बोलत होते?

''आज मामलेदार बाहेर आला.''

''इतक्या वर्षांत असं कधी झालं नाही.''

''संघटनेचा हा विजय आहे.''

''आणि त्याने नमस्कार केला. शेतकऱ्यांस नमस्कार.''

शेतकऱ्यांत एक प्रकारचे नवचैतन्य आले. संघटनेचे सामर्थ्य कळले. निर्भयता आली. निर्भयता उत्पन्न होणे, मेलेले मन जिवंत होणे, ही महत्त्वाची वस्तू आहे.

शेतकऱ्यांत असा उत्साह उसळत होता. काही होईल असे वाटत होते; परंतु गायीला सोडून न्यायला विरोध करणाऱ्या त्या शेतकऱ्यांवर खटला करण्यात आला. सरकारी कामात अडवणूक हा त्याचा भयंकर गुन्हा! लोकांना धडा घालून देण्याची जरुरी होती. त्या शेतकऱ्याला चार महिन्यांची सक्तमजुरी मिळाली! किती न्यायी सरकार!

दयाराम संतापाने लाल झाले. त्यांनी त्या शेतकऱ्यांच्या गावी मोठी सभा केली. 'तुम्ही माणसं का मढी?' असा त्यांनी प्रश्न केला.

''त्या शेतकऱ्यास हातकड्या घालून नेण्यात आलं. तुम्ही का अडवलं नाही? 'नाही याला नेऊ देणार' असं सांगायला तुम्ही एकज़ात नाही उभे राहिला? 'आम्हांला सर्वांनाच न्या अटक करून' म्हणून का नाही सांगितलंत? असे कसे तुम्ही खानदेशी कापसासारखे मऊ भुसभुशीत? खानदेशी मातीसारखे जरा टणक बना. खानदेशी मातीचे किल्ले केले तर दगडाहूनही बळकट होतात. जर तुम्ही मनांत आणलं तर शूर व्हाल. कोण तुम्हांला हात लावील, तुमच्या गायींना हात लावील, तुमचे पवित्र चरखे जप्त करील?''

आणि ते एकदम गाणे गाऊ लागले.

मर्द बनो, मर्द बनो

अब भारतवासी मर्द बनो।।
लुट गया है तेरा सारा
आंखों में है आंसू धारा
जानवरों को नही है चारा
अब मेरी एक ही बात सुनो।।अब भारत।।
घर में तो नही एक हि दाणा
क्यों फिरता हैं तूं दिनवाना
झट संघटन में सामिल होना
करना अपना राज्य सुनो।। अब भारत।।

परंतु दयारामांचा हा प्रचार सरकारला सहन होईना. त्यांना अटक करून एकदम जळगावला नेण्यात आले. या बातमीने खानदेशभर सर्वत्र हरताळ पडला आणि एरंडोलच्या विद्यार्थ्यांनीही हरताळ पाडला. जगन्नाथ, गुणा, बन्सी, बाबू वगैरे मुलांनी खूप प्रचार केला. शाळेतून सारी मुले बाहेर पडली व 'साम्राज्यशाही नष्ट होवो, दयाराम भारती झिन्दाबाद, किसान झिन्दाबाद' वगैरे गर्जना करीत ती मुले गावभर हिंडली. मामलेदार कचेरीजवळ सरकारचा त्यांनी धिक्कार केला. दर रविवारी खेड्यापाड्यांतून आपण टोळ्या करून गाणी गात हिंडावयाचे असा त्यांनी ठराव केला.

इंग्रजी शाळेत काही मुलांना दंड होणार असे वाटत होते; परंतु प्रकरण तेवढ्यावरच थांबले. जगन्नाथच्या घरी मात्र वादळ झाले.

"जगन्नाथ, तू कशाला या फंदात पडलास! मामलेदार-कचेरीसमोर तू मोठमोठ्याने ओरडत होतास. मामलेदारसाहेबांनी मला मुद्दाम घरी बोलावून सांगितलं. अरे, आपलं रोज उठून सरकारात काम, अशाने कसं होईल?" दादा म्हणाला.

"कसं होईल ते तुमचं तुम्ही पाहा. जाऊच नका सरकारात. शेतकऱ्यांची तडजोडी करा. शेतकऱ्यांचा छळ कमी होईल. तुम्हीही सरकारासारखेच शेतकऱ्यांचे दावेदार. दयाराम म्हणत ते खोटं नाही."

"बाबा रे, तुझ्या पायी आमचा सत्यानाश होईल. तू आपला वेगळा नीघ. होशील आता सज्ञान. करा मग वाटेल ती देशसेवा. घ्या आगीत उडी."

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

दयारामांना हद्दपार करण्यात आले. त्यांनी खानदेशात पाऊल ठेवू नये असा त्यांच्यावर हुकूम बजावण्यात आला. जगन्नाथ व गुणा यांना वाईट वाटले. पुन्हा कधी बरे भेटतील दयाराम? ते दुसरीकडे जातील. तेथे रान उठवतील; परंतु आपणांस केव्हा बरे पुन्हा त्यांचे दर्शन होईल? असे मनांत घेऊन दोघे मित्र दुःखी झाले.

✦✦

राष्ट्रीय मेळा

दयाराम भारती गेले. त्यांची वाणी अद्याप सर्वत्र घुमत होती. त्यांच्या तेजस्वी शब्दांची सर्वांना सारखी आठवण येत होती. त्यांनी शेतकऱ्यांत चैतन्य निर्मिले. विद्यार्थ्यांत सेवाभाव निर्मिला. एक प्रकारचे राष्ट्रीय वातावरण त्यांनी सर्वत्र निर्माण केले; परंतु त्यांनी लावलेल्या रोपट्याला पाणी कोण घालणार? सतत प्रचार हवा. संत ज्याप्रमाणे रामनाम सर्वत्र घोषविले झाले, त्याप्रमाणे आपणही नवकल्पनांचा सर्वत्र घोष करीत गेले पाहिजे. सारे वातावरण दुमदुमले पाहिजे.

हिंदुस्थानात अद्याप प्रचार नाही. चीनमध्ये तरुणांच्या शेकडो टोळ्या चीनभर फिरत होत्या. मेळे करीत फिरत होत्या. एक प्रकारच्या छोट्या छोट्या नाटक मंडळ्याच म्हणाना. दिवसा मुले अभ्यास करीत. रात्री बहुजन समाजासमोर नाटके करीत. निरनिराळी नाटके. निरनिराळे प्रसंग. भाव समाजरचनेची दर्शने, शेतकऱ्यांची सद्य:स्थिती, जमीनदारांचे जुलूम, कारखान्यांतील कामगारांची दुर्दशा, स्त्रियांची स्थिती, जपानी साम्राज्यवाद्यांचे अत्याचार, नवजागृत चीनचे दर्शन, भविष्यकालीन समाज, साऱ्या गोष्टी जनतेसमोर ते दाखवीत. मधूनमधून गाणी असत. नृत्यही असे. याचा जनमनावर खूपच परिणाम होई.

आपल्याकडे असे मेळे सर्वत्र फिरत राहिले पाहिजेत. यात्रांतून, उत्सवांतून त्यांचे कार्यक्रम ठेवले पाहिजेत. खेड्यापाड्यांतून त्यांनी गेले पाहिजे. दिवसा मंडळीने गावसफाई करावी, गावातून मिरवणूक काढावी, गाणी गावी व खेळ करावे. रात्री नाट्यप्रवेश करावे. हिंदू-मुस्लिम ऐक्य, हरिजनसेवा, शेतकऱ्यांची दुर्दशा, साक्षरता, स्वच्छता, कज्जेदलाली स्त्रियांची स्थिती, परकीय सत्तेचे परिणाम, स्वराज्य म्हणजे काय, खरा धर्म कशात आहे, सहकार्य असे अनेक विषय आहेत. अशा प्रश्नांवर प्रकाश पाडीत गावोगाव गेले पाहिजे. हे मेळे म्हणजे जगू फिरती विचारमंदिरे. विचार पेरीत, विचार देत हे मेळे जातील. त्यांना काही कमी पडणार नाही. तमाशे बोलावून लोक देतात की नाही त्यांना पैसे? तसे या मेळ्यांनाही देतील. करमणूक होईल. त्याबरोबर विचारप्रसारही होईल. जिल्ह्याजिल्ह्याला असे राष्ट्रीय मेळे पाहिजेत. असा सारखा प्रचार झाला तर वातावरण किती झपाट्याने तयार होईल पाहा.

एके दिवशी गुणा व जगन्नाथ यांच्या मनांत ही कल्पना आली. उन्हाळ्याची सुटी येणार होती. सुटीत काय करायचे याची ते चर्चा करीत होते. गाणी गात खेड्यापाड्यातून हिंडावे असे त्यांना वाटत होते; परंतु त्यापेक्षा मेळ्यांचा कार्यक्रम सुंदर होईल असे त्यांना वाटले. इतरही मित्र यावयास तयार होते. एके दिवशी सारे मित्र अंजनीच्या वाळवंटात बसले होते. मनोरथ रचीत होते.

''पडदे हवेत ना पण?'' गुणाने शंका काढली.

''अरे, सुटसुटीत पडदे. दिवाणखान्यात रिंग्जचे सरकवण्याचे पडदे असतात तसे अवजड पडदे थोडेच न्यायचे! या मोठमोठ्या बत्त्या, ते वासे थोडेच बांधायचे आहेत? आणि कप्प्या लावून जोराने खेचण्याचं काम थोडंच आहे? आपलं काम सुटसुटीत पाहिजे. झटपट सारं झालं पाहिजे. साधं खादीचं कापड घेऊ व त्यावर निरनिराळे देखावे रंगवून घेऊ आणि त्या कड्या अडकवू. कापड पटकन ओडायचं!'' बन्सी म्हणाला.

''कोण देईल चित्रं काढून?''

''अरे, आपल्या शाळेत चित्रकार का थोडे आहेत? रामा आहे, मुकुंदा आहे, मोरू आहे, बाळकृष्णा आहे, शिवराम आहे, गजानन आहे, पाटील आहे, सोनार आहे. रंग व ब्रश हवेत,'' नारायण म्हणाला.

''खर्च सारा मी देईन. खादी, रंग, ब्रश, कड्या, जो जो खर्च लागेल तो माझा,'' जगन्नाथ म्हणाला.

''परंतु मुख्य गोष्ट राहिलीच,'' गोविंदा म्हणाला.

''ती कोणती?''

''संवाद लिहून कोण देणार?''

''आपल्या शाळेत ते नवीन पटवर्धन मास्तर आले आहेत ते देतील लिहून. कसं छान शिकवतात आणि त्यांची दृष्टीही उदार आहे. खरी राष्ट्रीय दृष्टी.''

''हो. आपण त्यांनाच विचारू.''

आणि त्या शिक्षकांनी खरोखरच त्यांना निरनिराळे नाट्यप्रवेश लिहून दिले. काही काही नाट्यप्रवेश फारच सुंदर होते. मुलांना ते फार आवडले. शाळेची परीक्षा झाली. आता दोन–चार दिवसांत निकाल लागून मग उन्हाळ्याची सुटी सुरू होणार होती. मुले ते नाट्यप्रवेश बसवू लागली. पडदे रंगविण्याचेही काम सुरू झाले.

गुणाचे घर मोठे होते. तो प्रचंड वाडा होता. जुना वाडा, वैभवहीन वाडा त्या वाड्यातच हे सारे प्रयोग सुरू झाले. जगन्नाथच्या घरी त्याचा दादा होता, तो कदाचित या सर्व गोष्टींस विरोध करता. पडदे फेकून देता; परंतु गुणाचे वडील तसे नव्हते. ते सहृदय होते. ते स्वतः संवाद पाहायला हजर राहत. मुलांना सूचना देत. काही काही संवाद प्रत्यक्ष वस्तुस्थितीवरचे होते. अधिकारी एका शेतकऱ्याची गाय मारीत मारीत नेतात व त्या शेतकऱ्यालाच पुन्हा तो अडथळा करतो म्हणून शिक्षा होते. या प्रसंगावर तो एक संवाद होता. तो फारच करुण होता. साक्षरतेवरचे संवादही फार बहारदार होते.

बाजार भरला आहे. बाजारात माळी भाजी घेऊन विकायला बसले आहेत. एक शिपाई येतो व त्यांच्या भाजीतून खुशाल वांगी वगैरे उचलतो. ते बिचारे बोलत नाहीत; परंतु एक माळीदादा खिशातून वही वाढतो व त्या पोलिसास नाव विचारतो. पोलिस घाबरतो. तो म्हणतो, ''नाव नको टिपू. ही तुझी वांगी ठेवून देतो.'' माळीदादा म्हणतो, ''सर्वांची वांगी ठेव आणि पुन्हा तुम्ही किंवा इतर कुणी असा त्रास द्यायला याल तर खबरदार.'' तो पोलिस घेतलेली भाजी परत देतो व निमूटपणे निघून जातो; मग ते इतर माळी त्या माळ्याभोवती जमा होतात व

विचारतात, ''काय रे सांगितलंस तू त्याला?'' माळी म्हणाला, ''नाव टिपतो म्हटलं तसा पळाला. तुम्ही सारे लिहा-वाचायला शिका. रामाचं नाव घेताच भुतं पळतात, त्याप्रमाणे नाव टिपतो म्हणताच पोलिस पळतात. आपण अडाणी राहता कामा नये.'' अशा प्रकारचे ते परिणामकारक आणि भ्रामक कल्पना नष्ट करणारे संवाद होते. एक शेतकरी असतो. त्याच्या घरी मुले आजारी. त्याला खूप कर्ज. तो त्रस्त होतो. त्याला वाटते शनीची पीडा असेल. तो कोणा भटजीला विचारतो. ग्रहासाठी दान कर म्हणून तो त्याला सांगतो; परंतु स्वयंसेवक येतात. ते त्याला निराळाच प्रकाश देतात. त्यांच्यात पुढीलप्रमाणे संवाद होतो.

शेतकरी : काय करू दादा, अगदी वेडा होऊन गेलो बघा. सारी ओढाताण.

स्वयंसवक : शेतकऱ्याची सर्वत्रच ही दशा आहे.

शेतकरी : मुलं आजारी.

स्वयंसेवक : त्यांना पोटभर खायला आहे का? थंडीत पांघरुण होतं का? कधी दूध भेटतं का त्यांना?

शेतकरी : ही काय थट्टा करता गरिबाची! शेतकऱ्याची मुलं का दूध पितात?

स्वयंसेवक : अरे मुलाबाळांना नीट खायला देता येत नाही म्हणून ती आजारी आहेत. शेतसारा कमी असता, सावकारांचा ससेमिरा नसता, तर तू पिकविलेलं तुला राहिलं असतं. तुझी मुलं आनंदी व गुबगुबीत दिसली असती. तूही आनंदात असतास. खरं की नाही.

शेतकरी : हो, खरं आहे; परंतु नशिबी नाही.

स्वयंसेवक : नशीब तुमच्या हाती आहे. आकाशातील शनिदेवाच्या हाती नाही. तो शनी एक निर्जीव वस्तू आहे. जळता गोल. तो काय करणार आहे? सावकाराने त्रास दिला, सरकारने त्रास दिला, तर तो शनी का येणार आहे? खरी अडचण सरकार सावकारांची आहे. ही साडेसाती दूर करायची असेल तर संघटित व्हा. सरकार-सावकाराला सांगा, 'आधी मला पोटभर खाऊ दे. मी पिकविलं. माझा हक्क आधी मग तुम्ही.'

शेतकरी : खरं आहे दादा तुमचं म्हणणं. हेच शनी आहेत आणि आम्हाला त्या शनीसाठी दानं करायला लावतात. सारं थोतांड; फसवणूक.

स्वयंसवक : हे शेंदरी शनी आता भिरकावून द्या. शनीसमोर दिडकी टाकायला नको. दिडकी कुठे टाकायचीच असेल तर तुमची कष्टदशा जावी म्हणून खटपट करणाऱ्या काँग्रेसला द्या. काँग्रेस आपले दैवत. गरिबांचं राज्य करू पाहणारी ही संस्था. तिच्या पाठीमागे चला. तिचा महिमा वाढवा.

असे हे संवाद मोठे उद्‌बोधक झाले. मधूनमधून गाणी गाणी होती. मुलं रंगू लागली. केव्हा एकदा प्रचाराला जाऊ असे त्यांना झाले. पडदे तयार होऊ लागले. पडद्यांवर शेतकऱ्याच्या दुर्दशेची, चरखा अन्न देत आहे, त्या चरख्याला शेतकरी कसा जीव की प्राण करतो त्याची, उपाशी मुले आहेत त्याची, हरिजनांना पाणीही मिळत नाही, मंदिरात कुत्रे बसले आहे-परंतु हरिजनास मज्जाव, अशा प्रसंगांची ती चित्रे होती. पडदे पाहूनच जणू मनाला मुके पणाने विचार मिळावे, जागृती मिळावी.

सारी तयारी झाली. लवकरच एके ठिकाणी यात्रा होती. हा मेळा तेथे न्यावयाचा असे ठरले. मुले गेली. त्यांनी खोके वगैरे घेऊन तात्पुरते स्टेज तयार केले. लहान खांब व बांबू उभारून पडदे पटकन बांधले, तयारी झाली, रात्री ते नाट्यप्रवेश होते, जाहिराती वाटण्यात आल्या होत्या, गाणी म्हणत यात्रेतून दवंडी देण्यात आली आणि लोक रात्र केव्हा होते त्याची वाट पाहत होते.

सायंकाळ झाली. दिवस मावळला. यात्रेत शेकडो गॅसच्या बत्त्या चमकल्या आणि त्या मेळ्याचाही तिरंगी झेंडा त्या प्रकाशात उंच फडकताना दिसत होता. तेथे गर्दी जमू लागली. काही मुले व्यवस्था ठेवीत होती. एकीकडे बायकांनी बसावे अशी व्यवस्था होती आणि पहिला पोवाडा सुरू झाला. शेतकऱ्यांच्या दशेचे वर्णन करणारा पोवाडा. आवाज ऐकून भराभर गर्दी जमू लागली. सारे प्रवाह इकडे येऊ लागले.

पोवाडा संपला व प्रवेश सुरू झाले. निरनिराळे नाट्यप्रवेश. साक्षरतेचे प्रवेश, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरचे प्रवेश, हरिजनांसंबंधीचे प्रवेश, असे करून दाखविण्यात आले. मधूनमधून लोक टाळ्या वाजवीत. ''बरोबर, भाऊ बरोबर. आणि हाऊ सावकारच शनी शे.'' असे बाया एकदम बोलत. हरिजनांची स्थिती पाहून, त्या आजारी मुलाला पाणी मिळत नाही हे पाहून स्त्रियांना हुंदके येत आहेत पाहा. त्या 'अरेरे' म्हणत आहेत आणि जगन्नाथ गाणे म्हणतो आहे ते ऐका.

हरिजन अपुले तळमळती
जेवि जळाविण मासे मरती
हरिजन तैसे तडफडती।। हरिजन०।।
पाणि न देणे, प्रेम न देणे
धर्म अशाला हे म्हणती।। हरिजन०।।
बंधुभाव ना तीळभर उरला
काय म्हणेल प्रभू वरती।। हरिजन०।।
प्रेम करा रे बंधुंवरती
हीच तुम्हांला मम विनती।। हरिजन०।।

कराल ना सारे प्रेम? घ्याल ना हरिजनाला जवळ? आणाल ना खरा धर्म? माणुसकीचा, प्रेमाचा, देवाला आवडणारा खरा धर्म आणणार असाल तर करा सारे वर हात!''

नाट्यप्रवेशातील ती आज्ञा ऐकताच साऱ्या प्रेक्षक स्त्री-पुरुषांचे हात वर येतात. महात्मा गांधी की जय, गर्जना होते. शेतकऱ्यांच्या प्रवेशाच्या वेळेसही हे ''अन्याय दूर व्हायला हवे असतील तर गावोगाव किसान संघ हवेत. किसान स्वयंसेवक हवेत. कराल ना असे किसान संघ स्थापन? करणार असाल तर हात वर करा,'' असे म्हणताच हजारो हात वर येतात. इन्किलाबची गर्जना होते. किसान कामगार राज्याचा जय असो असे घोष दुमदुमतात.

मधूनमधून मोटेचा आवाज, पक्ष्यांचे आवाज, गाढवाचा आवाज- अशा नकला करतात. मध्येच एखादा पोवाडा म्हणतात. मध्येच टिपऱ्यांचा खेळ आणि ते मग गंभीर प्रवेश. अशा रीतीने विनोद व गांभीर्य यांचे मिश्रण ती मुले करतात व सारे प्रेक्षक तल्लीन होतात.

सारी यात्रा या मुलांसमोर जमते आणि शेवटी त्यांचा नायक, तो व्यवस्थापक येऊन म्हणतो, ''आमच्याजवळ असे दुसरेही प्रवेश आहेत. आम्ही या सुटीत सर्वत्र हिंडू इच्छितो. ज्याला आम्हाला बोलवायचं असेल त्याने कळवावं. निरनिराळ्या गावी येऊन हे खेळ आम्ही करून दाखवू. तुमच्यात जागृती व्हावी हा हेतू. तुम्ही तमाशे बोलावता. आता आम्हांला बोलावीत जा. तमाशाला जे देता ते आम्हाला द्या. आम्हांला जर काही दिलंत तर ते किसान कामगार चळवळीलाच सारं देण्यात

येईल. दयाराम भारतींसारखे तळमळीचे कार्यकर्ते देशात काम करीत आहेत. त्यांना कोण करणार मदत? पत्रकं काढायची, प्रवास, रोजचं निदान एक वेळचं जेवण, याला नको का थोडा पैसा? जर तुम्ही आम्हांला थोडं दिलंत, तरी ते आम्ही घेऊ. तुम्हीही गरीब आहोत; परंतु तुमच्याजवळच पुन्हा मागायचं. गरीब असलो तरी शेतात दाणे पेरतो. हेतू हा की पुढे भरपूर पीक यावं. त्याचप्रमाणे गरीब बसेलत तरी मेळा बोलावून थोडी मदत द्या. ती मदत पुढे तुमचे संसार सुंदर करील. किसान कामगार चळवळ वाढेल. खरं स्वराज्य येईल.''

मुलांचा हा प्रयोग कल्पनेच्या बाहेर यशस्वी झाला. यात्रेत गावोगावचे लोक आले होते. त्यांनी या मेळ्याची वार्ता आपापल्या गावी नेली आणि खरोखरच मेळ्याला आमंत्रणे येऊ लागली. आज हा गाव, उद्या तो गाव. मुले उत्साही होती. दिवसा गाव स्वच्छ करीत.

स्वच्छ करू स्वच्छ करू
हा गाव आपुला स्वच्छ करू ।।
रोगराई ती दवडू दूर
आरोग्याला आणू पूर.
आनंदाने गाव भरू ।।हा गाव० ।।
जाळून टाकू सारी घाण
घाणीजवळी न टिके प्राण
सगळीकडची घाण हरू ।।हा गाव० ।।
घाण करू जरि आपण दूर
देवाला तरि होऊ प्यार
संसार सुखाने सर्व तरू ।।हा गाव० ।।
झाडू म्हणजे देवचि माना
लाज न माना हाती घेण्या
खऱ्या हिताचा मार्ग धरू ।।हा गाव० ।।
चला उठा रे लहान मोठे
गावसफाई करू या नेटे
आदर्श आपुला गाव ठरू ।।हा गाव० ।।

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

असे गाणे म्हणत ते झाडू घेऊन हिंडत. मोऱ्या उपशीत. गावहाळाजवळ सफाई करीत. कोठे फिनेल टाकीत. एके ठिकाणी एक म्हातारबाई येऊन म्हणाली, "माझ्या घरात टाक रे ते तुझं थोडं पाणी. फार डास बघ दादा" आणि मुलगा फिनेल टाकून आला.

पंढरीशेटचा मुलगा हातात झाडू घेऊन झाडीत आहे याचे लोकांना आश्चर्य वाटे. ज्याची गावोगाव होती, ज्याची लाखांची इस्टेट, त्याचा मुलगा हातात झाडू घेऊन फिरत होता. मोऱ्या उपशीत होता. लोकांना कौतुक वाटे. तेही झाडायला निघत आणि गाव निर्मळ होई. गावकरी यां मुलांना जेवायला देत. दुपारी मुले चरखे, टकळ्या घेऊन कातीत. बाया व पुरुष पाहावयास येत आणि मुले गाणी म्हणत–

चरखा फिरवा
तुम्ही घास सुखाचा मिळवा।।चरखा०।।
घरीच तुमच्या असे कपाशी
का होता मग तुम्हीं आळशी
हाती बंधू घ्या चरख्यासी
दैन्याला हरवा।।तुम्हि०।।
चरखा दवडिल उपासमार
चरखा गरिबांचा आधार
सूत दुधाची जणु ही धार
निश्चय हा ठरवा।।तुम्हि०।।
चरख्याचे सप्ताह करावे
गावापुरते सूत निघावे
गावातचि तद्वस्त्र विणावे
निश्चय हा ठरावा ।।तुम्हि०।।
क्षण एकहि ना दवडा फुकट
दारिद्र्याची दवडा कटकट
निवारील हा चरखा संकट
ध्यानी मनी ठेवा।।तुम्हि०।।

आणि टकळीचेही एक सुंदर गाणे होते.

ही टकली
फुलविल तोंडे जी सुकली ।।ही०।।
गरगर फिरते भिंग्रीवाणी
सूत भराभर काढुन आणी
स्वातंत्र्याची गाते गाणी
पारतंत्र्याचे वेढे ही उकली।।फुल०।।
लहान परि करि काम महान
संसारातील पुरविल वाण
असे सुखाची केवळ खाण
संधी सोन्याची आणिल जी चुकली ।।फुल०।।
फिरून आणिल आबादानी
फिरून आणिल दाणापाणी
हिच्याविणे तुम्हि राहा न कोणी
आणिल संपत्ति पुनरपि जी हुकली ।।फुल०।।
आळस दवडा झापड उडवा
येता-जाता टकली फिरवा
गांधिबाप्पाचा कित्ता गिरवा
सुधी होतील सुखाला जी मुकली ।।फुल०।।

ही गाणी मुले टिपून घेत. कोणी कातायला शिकत. मधूनमधून शेतकरी येत. त्यांच्याशी चर्चा होई, त्यांना माहिती देत. आता गांधीबाप्पा कोठे आहेत, जवाहरलाल काय करतात, असे त्यांचे प्रश्न असत. मुले माहिती देत आणि मग रात्री ते नाट्यप्रवेश. साऱ्या गावात उत्साह येई.

सावकाराच्या प्रवेशात पंढरीशेटचा मुलगा काम करी. ''शेतकऱ्यांनो, आधी पोटभर जेवा, मग सावकाराला उरलं तर द्या. आधी तुमचा हक्क. ज्याच्या हाताला घट्ट पडले आहेत त्याचा हक्क. म्हणून आपण पाहतो, की या हाताला घट्टे पडलेले आहेत की नाही, याला खायचा अधिकार आहे की नाही? श्रमणाऱ्याचा प्रथम अधिकार, मग बांडगुळांना.'' असे तो म्हणे व टाळ्यांचा कडकडाट होई.

मुले एका गावाहून दुसऱ्या गावाला निघाली म्हणजे सारा गाव त्यांना पोहोचवायला जाई. अशा रीतीने जगन्नाथ, गुणा, बन्सी, नारायण, सारा तालुका हलवू लागले; परंतु या गोष्टी सरकारच्या कानी गेल्या. मेळे करण्याची मनाई झाली. आता काय करायचे?

"चला जाऊ सारे तुरुंगात," जगन्नाथ म्हणाला.

"परंतु घरी रागावतील,"बन्सी म्हणाला.

"आणि शाळा बुडेल ती?" गुणा म्हणाला.

"परत आल्यावर शाळेत जाऊ." नारायण म्हणाला.

"घेतील का पण?" रामने शंका घेतली.

"मला वाटतं सध्या बंदच करू या. पुढे दिवाळीच्या सुटी फिरून जाऊ," वसंताचे मत पडले.

"त्या वेळेसही बंदी आली तर?" जगन्नाथने उदासीनपणे विचारले.

"आपण मोठे होऊ तेव्हा हिंडू. तू व मी भिकाऱ्यासारखं हिंडायचं ठरवलंच आहे ना? परंतु सध्या नको. घरातील रागावतील. आई-बाबा रडतील. आपला प्रयोग यशस्वी झाला. आपण मोठे झाल्यावर सर्व महाराष्ट्रभर जाऊ. सर्वत्र चैतन्य खेळवू. रुढी नष्ट करू. खरा धर्म आणू. भीती गाडून टाकू. संघटना निर्मू. पण जरा मोठं झालं पाहिजे. जगन्नाथ, तू मोठा हो लवकर म्हणजे मग तू वेगळा होशील. स्वतंत्रपणे सारं करायला मोकळा होशील. खरं ना?" गुणा बोलत होता.

"परंतु त्याचं लग्न आहेना?"

"केव्हा?"

"पुढल्या वर्षी."

"पुढल्या वर्षी म्हणजे दिवाळीनंतर सहा महिन्यांनी."

"जगन्नाथ होईल संसारी. मग का या कामांत तो पडेल? त्याला लाज वाटेल. तो सावकारी करील. तो का मग सावकारी नष्ट करा असे सांगणारे मेळे काढील? तो का अशा नाटकांतून कामं करील?"

"मी माझ्या जीवनाचंच नाटक करीन. प्रत्यक्ष संसारातच कर्जरोखे फाडून टाकीन. जे नाटकांत करतो ते कृतीत दाखवीन. या संवादाचा, या मेळ्यांचा लोकांवर काय परिणाम झाला असेल ते लोकांना माहीत, सरकारला माहीत; परंतु

माझ्या मनावर त्यांचा चिरस्थायी परिणाम झाला आहे. मी सारं प्रत्यक्ष करून दाखवीन.''

''बरं पाहू.''

''बरं बघा.''

शेवटी मेळा थांबला, सुटीही संपली, शाळा सूरू झाली; परंतु गुणा व जगन्नाथ यांच्या मनांत पुढे विचार होते. संवादांतील गाणी व शब्द त्यांच्या कानांत गुणगुणत होते. भविष्याकडे बोट दाखवीत होते.

✦✦

जगन्नाथचे लग्न

दसरा दिवाळी गेली. तुळशीचे लग्न लागले आणि माणसांची लग्ने व्हायला मोकळीक मिळाली. जगन्नाथच्या लग्नाची तयारी सुरू झाली. ते वास्तविक मागील वर्षीच व्हायचे; परंतु काही कारणामुळे राहिले. दागदागिने घरात होतेच. मागील वर्षीच नवीन करून ठेवण्यात आले होते. एक मनुष्य येवल्यास गेला. तेथून पैठणी, पीतांबर वगैरे कापड समक्ष पाहून घेऊन आला.

शिरपूरची मुलगी होती. सोयरीक कधीची ठरली होती. मुलीचे आई-बाप नव्हते. भाऊ होते. वडील भाऊ सारे पाही. 'मुलगी मोठी झाली, करून टाका एकदा लग्न', असा त्याचा सारखा आग्रह चालला होता. जगन्नाथ 'नको' म्हणत होता; परंतु आईच्या अश्रूंपुढे तो गप्प बसे.

त्याच्यावर त्याच्या आईचे फार प्रेम. त्या घरात बाकी कोणाला तो आवडत नसे; परंतु आई त्याचे कौतुक करी. प्रेममूर्ती आईचे मन दुखवणे जगन्नाथच्या जिवावर येई.

''आई, खरोखरच लग्न करू नये असं मला वाटतं,'' तो म्हणाला.

‘‘लग्न म्हणजे का वाईट वस्तू आहे बाळ? लग्नाशिवाय का कुणी राहतो? आज ना उद्या करायचंच ना? लग्न म्हणजे शुभ व मंगल वस्तू. एखाद्याचं लग्न लावणं म्हणजे मोठी धार्मिक गोष्ट मानतात,’’ आई म्हणाली.

‘‘आई, मी म्हणतो तसं कराल लग्न?’’

‘‘म्हणजे कसं?’’

‘‘साधं लग्न, वरात नको, काही नको. मिरवणुकी नकोत. रास न्हाणी नकोत. मला नाही त्या गोष्टी आवडत.’’

‘‘अरे, आमच्यासाठी कर. थोडं काही इतरांसाठी करावं. सारं का स्वत:चंच चालवायचं? स्वत:चाच का सारा हट्ट? आणि वरात असली म्हणून काय बिघडतं?’’

‘‘आम्हांला का आता खांद्यावर घेऊन नाचणार? मी का कुकुलं बाळ आहे आई?’’

‘‘मग किती रे मोठा झालास? अजून वीस वर्षांचाही नाहीस. अठरा वर्षं नुसती झाली. लहान नाही तर काय? अरे, ‘झाल’ असते. वधूवरांस खांद्यांवरून नाचवतात. ती दोघं एकमेकांवर गुलाल उधळतात. गंमत असते. वधूवर जणू परस्परांस प्रेमाने रंगवितात.’’

‘‘ज्यांनी एकमेकांस कधी पाहिलंही नाही, तिथे कुठंचं प्रेम? काही तरी आहे. आमचं लग्न आणि तुमचं खेळ.’’

‘‘जगन्नाथ, तू माझं सारं ऐक. उगीच हट्ट नको करू.’’

‘‘आई, माझं एक म्हणणं तरी ऐकाल?’’

‘‘कोणतं?’’

‘‘मी सारा खादीचा पोशाख करीन. लग्न म्हणजे मंगल वस्तू. त्या वेळेस तरी गरिबांच्या हातची पवित्र वस्तू जवळ असू दे.’’

‘‘अरे, साऱ्या वस्तू गरीबच करतात. रेशमी कपडे झाले म्हणून ते का श्रीमंत विणतो?’’

‘‘खेड्यापाड्यांतील गरिबांना ज्यामुळे घास मिळतो, ती गोष्ट अधिक पवित्र. खादी बेकारांना काम देते, निराधारांना आधार देते. आई, या बाबतीत मी कोणाचंच ऐकणार नाही. माझ्यासाठी कपडे कराल ते खादीचे करा. मी डोक्यावर पगडी, पागोटं काही घालणार नाही, साधी गांधी टोपी?’’

"ती दोन आण्यांची गांधी टोपी?"

"दोन कोटी रुपयांची गांधी टोपी! ज्या टोपीला गांधीजींचा आशीर्वाद आहे, जिला त्यांचं नाव मिळालं, ती का दोन आण्यांची? सर्व हिंदुस्थानचं भाग्य मला तीत दिसतं. आई, ते काही नाही. गांधी टोपी, तीही स्वच्छ पांढरी, तिच्याशिवाय मी दुसरं काहीही डोक्यास घालणार नाही. अंगावरही सारे खादीचेच कपडे. तुला सांगून ठेवतो."

"बरं बाबा. तुझ्या म्हणण्याप्रमाणे. आम्हांला हसू देत लोक. होऊ दे आमची मान खाली."

"तुमची मान वर होईल. वर्तमानपत्रात तुमचं नाव येईल. लोकांना उदाहरण होईल. थोरामोठ्यांचे आशीर्वाद मिळतील. तुमची मान खाली नाही हो होणार. विलायती कापड आणाल तर मात्र देशाची मान खाली होईल आणि आई, लग्न लागल्यावर मी कुठे तरी निघून जाईन. तुमच्यासाठी म्हणून लग्नाला उभा राहीन आणि मग जाईन निघून."

"काही जात नाहीस निघून. लग्न लागलं म्हणजे अडकलास. काही भीती नको घालू आम्हांला. कुठे रे जाणार आहेस पळून? जाशील दोन दिवस व येशील पुन्हा घरी."

"मी खरं ते सांगतो."

"बरं जा पळून. आता लग्न तर होऊ दे. पुढचं पुढे."

जगन्नाथचे लग्न कसे एकदा निर्विघ्न पार पडते हा प्रश्नच होता. हा हट्ट करील, ऐकणार नाही, असे सर्वांना वाटत होते; परंतु एकदा काही झाले तरी लग्न उरकून घेतलेच पाहिजे असे पंढरीशेट म्हणत आणि सर्वांना ते पटे.

एके दिवशी गुणा व जगन्नाथ बसले होते. त्यांच्या याच गोष्टी चालल्या होत्या.

"गुणा, तू आलं पाहिजेस हो. नाही तर बघ."

"मी नको रे. तिथे कोण माझ्या ओळखीचं? सारे श्रीमंत लोक जमणार. तिथे माझी फजिती होईल."

"काही नाही फजिती, तू नेहमी माझ्याजवळ अस."

"अरे, तू का तिथे मोकळा असशील! बायका तुला घेरतील. भटजी तुला घाबरवतील. सतराशे प्रकार सुरू असायचे. मी कुठे असेन तुझ्याबरोबर?"

"गुणा, असं काय बरं? मला वाईट वाटेल."

"जगन्नाथ, तुझ्या लग्नात का अशा कपड्यांनी येऊ?"

"मी तुला चांगले कपडे देईन. माझ्या लग्नाची भेट मान. प्रेमाची भेट."

"लोक मला हसतील. लग्नात वास्तविक दुसऱ्यांनी भेट द्यायची असते. ती तुला काही तरी द्यायला हवं. काय देऊ मी? काय आहे माझ्याजवळ? जगन्नाथ, तू कशाला झालास माझा मित्र?"

"तुला हसवण्यासाठी, तुझ्या जीवनात आशा व आनंद ओतण्यासाठी. गुणा, तू व मी का परके आहोत? इतर काही म्हणोत. तू माझ्याकडे बघ. माझं प्रेम ओळख आणि मी देईन ते घे. खादीचे सुंदर कपडे मी तुला देईन. आपण दोघं बरोबर जळगावच्या खादी भांडारात जाऊ. तिथे नाना प्रकारचा माल असतो. आपण दोघं ठरवू. तुला मला सारख्याच प्रकारचे."

"मी का नवरदेव आहे?"

"नवरदेवाचा मित्र आहेस. नवरदेवाचा आनंद आहेस."

गुणाला जगन्नाथची इच्छा मोडवत नसे. प्रेमाची इच्छा खरेच मोडवत नाही. त्याला फार कठीण मन करावे लागते. गुणाला कठोर होता येत नसे. त्याला नाही म्हणता येत नसे. नाही म्हणण्याचे धैर्य त्याच्याजवळ नव्हते.

एके दिवशी गुणा व जगन्नाथ जळगावला गेले. खादी भांडारात गेले. नाना प्रकारचा माल पाहू लागले. रेशमी शर्टिंगसुद्धा तेथे होते. दोघांनी रेशमी शर्टिंग घेतले. कोटासाठी स्वच्छ पांढरे कापडे घेतले आणि धोतर जोडा. तेथे एकोणीस रुपयांचा एक बारीक तलम धोतरजोडा होता.

"जगन्नाथ, हा घे तुला."

"आणि तुला?"

"मला इतका महाग कशाला हवा?"

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय सातारा
दाखल नं [illegible] ग्रंथानुक्रमांक [illegible]
किंमत [illegible] पाने [illegible]

"माझ्यासारखं तुला. कोणी तुला हसायला नको."

"तुझं काही तरी म्हणणं."

इतक्यात व्यवस्थापकांनी आणखी एक बारीक धोतरजोडा दाखविला.

"छान आहे हाही," गुणा म्हणाला.

"याची किंमत?" जगन्नाथने विचारले.

''त्याच्यावर मांडलेली आहेच. साडेतेरा रुपये.''

''गुणा, हा मला होईल. तो तू घे.''

''अरे तू नवरदेव. तो तुला व आता तुझा हट्टच आहे म्हणून हा मला.''

''नाही तर आपण एकेक पान वाटून घेऊ. यातील एक पान तुला, एक मला. तसंच त्यातील एक पान तुला व एक मला. म्हणजे झालं की नाही?''

त्यांनी ते तलम धोतर जोडे घेतले. हातरुमाल, टॉवेलही घेतले.

''अरे जगन्नाथ, सुंदर शाल घे अंगावर घ्यायला.''

''खरंच.''

आणि एक गुलाबी रंगाची नयनमनोहर शाल त्यांनी घेतली. भरपूर मनाजोगी खादी खरीदून ते घरी आले.

त्यानंतर एके दिवशी रामराव गुणाच्या आईजवळ घरी बोलत होते.

''याने कशाला घेतली ती खादी?'' ते म्हणाले.

''लग्नाला जाणार आहे. जगन्नाथने घेऊन दिली. तो ऐकेना, मग गुणा काय करणार?'' ती म्हणाली.

''परंतु मला नाही हे आवडत. स्वाभिमान आहे की नाही. सारे लोक हसतील आणि जगन्नाथचे भाऊ वाटेल तिथे अपमान करतील. यांना कपडेही घेण्याचं अवसान नाही असं म्हणतील. चिंध्या वापराव्या; परंतु मिंधेपणा नको.''

''माझंही तेच मत आहे; परंतु गुणाला वाईट वाटेल. त्याच्या मित्राला वाईट वाटेल जगन्नाथचं गुणावर जीव की प्राण असं प्रेम आहे. जिथे प्रेम आहे तिथे थोडाच मिंधेपणा आहे?''

''परंतु जगन्नाथच्या घरी इतर माणसं आहेत. त्यांची तोंडं थोडीच थांबणार आहेत. आणि प्रेम प्रेम म्हणजे दोन दिवस. या जगन्नाथचं उद्या लग्न होऊदे, म्हणजे मग बघ शाळा बंद होईल. संसार करू लागेल. सावकारी करू लागेल आणि मग प्रेम ओसरेल पैशाचं प्रेम सुरू होईल. तुला एक सांगू का गोष्ट?''

''कोणती?''

''अग, जगन्नाथचा तो दादा आपला वाडा घेऊ पाहत आहे. फिर्याद करण्याचे त्यांचे विचार चालले आहेत. वाड्यावर जप्ती आणतील, घराचा ताबा घेतील, लिलाव पुकारतील अशी कानांवर आली खरी हकिकत.''

''त्यांना का थोडी घरं आहेत?''

''गरिबांचा अपमान करण्यातही एक प्रकारचा आनंद असतो. कसे मोठमोठ्यांना मी खाली पाहायला लागलं, त्यांना घरातून बाहेर काढलं, यातही एक प्रकारचा पराक्रम काहींना वाटतो; परंतु आपला वाडा घेण्यात त्यांची एक इच्छा आहे. या वाड्यात धन पुरलेलं आहे असे त्यांना कुणी सांगितलं. त्यामुळे हा वाडा घ्यावा असं त्यांना वाटत आहे; वाडा जुना झाला आहे. पुन्हा बांधायचा, त्या निमित्ताने खणावं, खोदावं लागेल. असले खरोखर 'ठेवणे', तर मिळेल.''

''खरंच का जप्ती आणतील, लिलाव करतील?''

''अशी वंदता आहे. कानी आली आहे.''

''जगन्नाथला आपण सांगू.''

''तो काय करणार? थोबाडीत मारून त्याला गप्प बसवतील. व्यवहार आहे हा म्हणतील.''

''जगन्नाथ स्वत:च्या मित्राची का फजिती पाहील?''

''त्याच्या हाती का अद्याप व्यवहार आहे? आणि तोही जरा मोठा झाला की असंच करील. प्रेमबीम सारं फोल आहे. गप्पा. प्रेमासाठी त्याग करणं कठीण आहे.''

''गुणाला खादीने नटवणारा जगन्नाथ त्याला कमी पडू देणार नाही. तो मित्रासाठी वाटेल ते करील.''

अशी बोलणी चालली होती, तो गुणा आला. आई-बाबांचे गंभीर चेहरे पाहून तो तेथेच थबकला.

त्याचे गुणगुणणे बंद झाले.

''काय गं आई?''

''तू ती खरेदी कशाला आणलीस? असली उसनी ऐट काय कामाची? आणि हे बोटात काय?''

''अंगठी. जगन्नाथ ऐकेना. त्याने माझ्या बोटात घातली. तो रडू लागला; मग मी काय करणार?''

''तू चोरलीस असंही म्हणतील हो.''

''त्याच्या घरी सर्वांना माहीत आहे. सर्वांच्या संमतीनेच झालं.''

''त्याच्या दादानेही संमती दिली?''

''पंढरीशेटनी 'तू काही बोलू नकोस,' असे सांगितलं. त्यामुळे तो चुरमुरे खात बसला.''

''गुणा, तुला असलं मिंधेपण आवडतं? उपाशी राहावं; परंतु सत्त्व सांभाळावं. बाळ, अशाने काही आपली मान वर होत नाही. लोक नावं ठेवतात.''

''परंतु जगन्नाथ ऐकत नाही. त्याचं का मन दुखवू? त्याला रडायला लावू?''

''आणि आम्हाला का खाली मान घालायला लावणार?''

''आई, मी काय करू?''

''जगन्नाथचं तुझ्यावर खरंच प्रेम आहे का?'' रामरावांनी विचारले.

''हो.''

''कशावरून?''

''तो माझ्यासाठी रडतो यावरून. माझ्यासाठी वाटेल ते करायला तयार असतो यावरून. त्याला जराही दुजेपणा सहन होत नाही. दोघांनी एकरूप व्हावं असं त्याला वाटतं. अशा प्रेमाला कसं दूखवू बाबा?''

''गुणा, आपल्या या वाड्याची पुढे मागे जप्ती होणार. लिलाव होणार आहे. जगन्नाथचाच दादा आणील जप्ती. तुझा मित्र त्या वेळेस काय करील?''

''इथे येऊन प्राण देईल; परंतु जप्ती होऊ देणार नाही.''

''तुला असं वाटतं?''

''असं अभिवचन आणू? जगन्नाथजवळून शब्द आणू?''

''पोरांच्या शब्दाला काय किंमत?''

''ज्याचं आता लग्न होणार, तो काही पोर नाही राहणार. लग्न झाल्यावर त्याच्या शब्दासही किंमत येईल. लग्नामुळे घरातील त्याचा दर्जा एकदम वाढेल. तो इतर भावांच्या बरोबरीचा होईल. जगन्नाथ आपणांला वाचवील. तो असला अभद्र प्रकार होऊ देणार नाही. बाबा, माझ्यावर खरंच हो त्याचं प्रेम आहे. जे मला देता येणार नाही, ते त्याला नकोसं वाटतं; परंतु तुम्हांला वाईट वाटत असेल तर मी हे सारं परत करतो. तो व मी आपापल्या घरी रडत बसू. करू सारं परत? ही अंगठी, हे कपडे?''

"राहू देत. नको रडू. तुझ्या मित्राचं लग्न होणार त्या लग्नात विघ्न नको. आनंदात दु:ख नको. सुखात अश्रू नकोत. देव करो व तुमचे प्रेम टिको! खऱ्या प्रेमाचा आदर्श जगात दिसो!"

गुणा वरती माडीवर गेला. ते सारे खादी कपडे जवळ घेऊन तो रडला. किती प्रेम आहे जगन्नाथचे माझ्यावर असे त्याच्या मनात आले; परंतु याला जग मिंधेपणा म्हणते. माझे कर्तव्य काय? हे कपडे घेणे का पाप? ही अंगठी बोटात घालणे का पाप? मी अंगठी दिली नेऊन दिले कपडे परत नेऊन, तर जगन्नाथ रडेल. लग्नात तो हसणार नाही. जन्मभर त्याला रुखरुख राहील. हे प्रसंग का नेहमी येतात? आयुष्यात एकदा येणारा मंगल प्रसंग. त्यावेळेस का मित्राला रडवू, त्याला दु:खी करू? त्याने ते कपडे हृदयाशी धरले. जणू मित्राचे निर्मळ प्रेम, मित्राचा प्रेमळ विशुद्ध आत्माच तो हृदयाशी धरीत होता. त्यावर प्रेमाश्रूंचा अभिषेक करीत होता. त्याच्या भावना उचंबळल्या होत्या. कोमल, प्रेमळ भावना. प्रेमाच्या भावना सर्व जीवनाला अंतर्बाह्य वेढून टाकतात. त्यांची शक्ती अपार असते. रोमारोमाला त्या व्यापून असतात. गुणा सद्गदित होऊन उठला.

त्याने हाती सारंगी घेतली. तो तारा छेडू लागला. कंपायमान हृदय तारांच्या कंपाने बोलू लागले. अति-मधुर व कोमल असे राग त्याने आळविले. तो प्रेमाच्या स्वर्गात होता. भूतलावर नव्हता. सभोवती प्रेमाचा बाग बहरला आहे. वसंत फुलला आहे. कारंजी थुईथुई उडत आहे, कमळे फुलली आहेत, पाखरे गोड आवाज काढीत आहेत, सारे सुंदर आहे, सुंदर आहे, असे जणू त्याला वाटत होते. डोळे मिटून तो वाजवीत होता. हृदयात डोकावून वाजवीत होता.

भावना ओसरली. हृदयावरचा भार कमी झाला. त्याने हळूच नेत्रकमले उघडली, तो समोर जगन्नाथ दिसला.

दोघे एकमेकांकडे पाहात राहिले. दोघांनी डोळे मिटले. दोघांनी पुन्हा उघडले. दोघांचे डोळे भरून आले.

"तू घेऊन हळूच बसलास."

"देवासमोर बसलो. प्रेममय देव."

"जगन्नाथ, माझ्यावर तुझं खरोखरच प्रेम आहे."

"तुला आज का बरं शंका आली? ती शंका येऊन का रडत होतास? परंतु छे: मनात अशी शंका असती तर असं अपूर्वसंगीत तुझ्या बोटांतून निघते ना. हृदयातील सारी कोमलता तू ओतीत होतास. तुझं मन प्रेमाने भरून गेलं होतं. तुझा चेहरा मी पाहात होतो. किती स्निग्ध व सुंदर दिसत होता!"

"मला नाही हो शंका..मी प्रेमाच्या स्वर्गात होतो; परंतु आता खाली आलो. स्वर्गातील गोष्टी का पृथ्वीवर दिसतात?"

"पृथ्वीवर स्वर्ग निर्माणं हे तर प्रेमाचं काम. जिथे प्रेम आहे तिथे स्वर्ग आहे. जिथे प्रेम नाही. तिथे नरक आहे. स्मशान आहे. मला प्रेमहीन जीवनाची कल्पनाच करवत नाही."

"जगन्नाथ, प्रेमाची कसोटी काय?"

"प्रेम म्हणजे प्रिय व्यक्तीचं सतत चिंतन. त्या प्रिय व्यक्तीचं अंत:करणपूर्वक सतत स्मरण. त्या प्रिय व्यक्तीच्या मीलनाची इच्छा. त्या व्यक्तीच्या सुख-दु:खांशी समरस होण्याची आतुरता."

"प्रेम म्हणजे सर्वस्वत्याग."

"हो."

"तू माझ्यासाठी सर्वस्वाचा त्याग करशील?"

"गुणा, त्यागाच्या शाळेत मी कितपत पुढे जाईन ते सांगता येत नाही."

"समज, या घरावर तुझ्या दादाने जप्ती आणली तर!"

"ते शक्य नाही."

"आम्ही तुमचे देणेकरी आहोत. माझी मुंज तुझ्या घरून काढलेल्या कर्जाने झाली. गळ्याला कर्जाची दोरी व कमरेत मुंजीची दोरी. व्याज थकलं. रक्कम जमली. आता पुढे जप्ती, लिलाव या गोष्टी येणारच."

"मी ही गोष्ट होऊ देणार नाही. म्हणून तू रडत होतास? या घरातून जावं लागेल, म्हणून तू दु:खी झाला होतास?"

"मनात एकच भावना नव्हती. दु:खाच्या, प्रेमाच्या, अगतिकत्त्वाच्या संमिश्र भावना होत्या. आई-बाबा म्हणत होते, की घरातून बाहेर पडावं लागेल. त्यांना अपार वाईट वाटत होतं. मलाही दु:ख झालं."

"चल, मी त्यांना सांगतो, की अशी गोष्ट मी होऊ देणार नाही. चल."

आणि खरेच दोघे मित्र खाली गेले. रावराव पूजेला बसले होते. देवाजवळ होते. दोघे मित्र देवासमोर उभे होते.

''गुणाचे बाबा!'' जगन्नाथने हाक मारली.

''काय रे?'' त्यांनी विचारले.

''तुम्ही देवाजवळ आहात. मीही देवाजवळ उभा राहून सांगतो, मी तुमच्या घराचा लिलाव मी होऊ देणार नाही. तुम्ही निश्चिंत असा.''

''देव तुझं कल्याण करो! तुम्हां दोघांचं प्रेम अमर होवो! हीच देवाला माझी प्रार्थना.''

दोघे मित्र गेले. जगन्नाथ घरी गेला. त्याला पोचवून गुणा घरी आला.

जगन्नाथचे लग्न जवळ आले, तिथी जवळ आली, मोटारी तयार झाल्या, नवरदेवाची मोटार सजली. जगन्नाथजवळ त्याचा गुणाही बसला. त्याच्या बहिणीही त्या मोटारीत होत्या. दोघे मित्र पुढे बसले होते. हातांत हात घेऊन बसले होते. जगन्नाथ दागिने घालायला बिलकूल तयार नव्हता. 'हा रानटीपणा आहे,'' तो म्हणला; परंतु शेवटी त्याचे काही चालले नाही. त्याच्या आईने त्याला सजविले.

''आजच्या वेळेस घाल. पुन्हा तुला कधी सांगणार नाही. तुझ्या अंगावर पुन्हा दागिना घालणार नाही.'' आई म्हणाली.

''मग त्याच्या मुलाच्या अंगावर घाला,'' कोणीतरी हसून म्हणाले.

जगन्नाथ आईसमोर उभा राहिला. तिने त्याच्या गळ्यात गोफ, कंठी घातली. हातांत तोडे घातले. कमरेला सोन्याचा करगोटा धोतरावरून घालण्यात आला. कानांत सुंदर कुंडक्या घातल्या गेल्या. जगन्नाथ म्हणजे तुळशीबागेतील जगू राम, बालाजी मंदिरातील जणू बालाजी दिसू लागला.

मोटारीत जगन्नाथ गुणाचे हात हातांत घेई व आपले तोडे त्याच्या हातांत घाली.

''माझं लग्न होईल तेव्हा घाल हो.''

''कधी होईल तुझं लग्न?''

''बाबा करतील तेव्हा.''

''तुझ्या लग्नात मी येईन. तुला नटवीन.''

''म्हणजे रानटीपणा तूही करणार एकूण? मला तुझ्या प्रेमाने नटव म्हणजे पुरे.''

वाटेत तापी नदीवर त्यांनी फराळ केले.

''गुणा, पोहायला येतोस?'' जगन्नाथने विचारले.

''ही वेळ पोहण्याची नाही?'' तो म्हणाला.

''मग केव्हा येईल गुणा?''

''लग्न झाल्यावर पुढे. केवळ मग संसारात बुडते की मान वर राहते ते दिसेल.''

''गुणा, आपण पुढे खूप काम करू.''

''करू. गरिबांचे संसार सुखी होण्यासाठी झटू.''

सारे वऱ्हाड शिरपूरला आले. लग्नघाई सुरू झाली. खादीच्या टोपीतच नवरदेव वधू-मंडपाकडे चालला. सनातनी लोक रागावले. वधूकडचे लोक संतापले; परंतु जगन्नाथचा निश्चय अभंग होतो. खादीचीच गुलाबी शाल त्याने अंगावर घेतली. शालू शेला त्याने भिरकावला. रागारागाने बोलणी झाली; परंतु नवरदेव शांत गंभीर होता, शेवटी विरोध मावळले, नवरदेव आला, टाळी लागली व माळा गळ्यांत पडल्या.

आणि ते रासन्हाण. जगन्नाथ जाईना; परंतु त्याच्या बहिणींनी त्याला हात धरून नेले, पाटावर बसविले, कानांत वधूने तेल घातले. जगन्नाथ उठून जाऊ लागला. बहिणींनी त्याला पुन्हा बसविले. त्यांनी त्याचा कान वाकडा केला. नववधूने कानांत तेल घातले.

असे प्रकार झाले. रागावत-रुसत झाले; परंतु पंगत झाली त्या दिवशी निराळेच प्रकरण झाले. मंडपाशी भिकाऱ्यांची ही गर्दी. उष्टे मागण्यासाठी गर्दी! जगन्नाथ वरून पाहत होता. तो एकदम रागाने खाली गेला.

''खबरदार त्यांना उष्टं वाढाल तर. माणसं म्हणजे का कुत्री? ते मागतात म्हणून का आपण उष्टं द्यावं? त्यांना घरातील द्या. हे पानांतलं गायीगुरांना घाला,'' तो म्हणाला.

''अहो, हे पानांत इतकं फुकटं गेलं आहे ते काय करायचं?''

''वाढलंत कशाला?''

''शहाणेच दिसता!''

''हो. मी शहाणा आहे व तुम्हांला हा मूर्खपणा करू देणार नाही. न्या त्या उष्ट्या अन्नाच्या बादल्या माघारी; यांना घरातील ताजं अन्न आणून द्या.''

“बरं. तुम्ही म्हणता तसं करू. चला वर.”

त्याचा हात धरून त्याला वर नेण्यात आले. त्या बादल्या मागे नेल्या. दुसऱ्या आल्या. परंतु खरोखरच दुसऱ्या होत्या का त्या? का ती फसवणूक होती? देव जाणे.

जावईबोवांच्या विक्षिप्तपणाविषयी मंडपात सर्वत्र चर्चा. स्त्री-पुरुषांत चर्चा. पुढे संसार कसा करतील का कर्णाचे अवतार बनतील? काही नाही हो, हे पुढे टिकत नाही. बायकोची वेसण पडली म्हणजे सारे चाळे थांबतात. आज ही सोंगे-ढोंगे. अशी बोलणी चालली.

शेवटचा दिवस आला. आज 'झाल' होती. जगन्नाथ खिन्न झाला होता. ती चर्चा त्याच्या कानांवर येत. मुद्दाम त्याच्या कानी पडाव्या म्हणूनच मोठ्याने कोणी कोणी बोलत. त्यांच्या तोंडावरचे हास्य गेले, आनंद मावळला.

'जगन्नाथ, खांद्यावर बसायला हवं. तुला नाचवतील, तिला नाचवतील. गुलाल ऐकमेकांवर.”

“मी काही एक करणार नाही. मी खांद्यावर बसणार नाही, घोड्यावर बसणार नाही. आम्ही पायी येऊ. नको गुलाल, नको धुळवड.”

“काय बोलतोस हे?”

“खरं ते सांगतो. मी पायी येणार.”

अनेकांनी समजूत घालण्याचे प्रयत्न केले; परंतु जगन्नाथ ऐकेना. शेवटी मोटारीतून नवरानवरी मिरवायचे ठरले. तडजोड झाली. मोटार सजली. फुलांच्या माळांनी मंगल मोटार सजली. तीत वधू-वर बसली. वर निघाली. सोहळा झाला. नाव ठेवले गेले. कोणते नाव? इंदिरा.

++

येथे नको, दूर जाऊ

शेवटी रामरावांवर फिर्याद झाली. कोर्टात सुरू झाले काम. या फिर्यादीचा शेवट कशात होणार ते त्यांना माहीत होते. हुकूमनामा होईल., घरावर जप्ती येईल. पुढे लिलाव होईल. अब्रू जाईल. रावरावांना चैन पडेना. त्यांच्या पत्नीसही फार वाईट वाटले.

''आई, वाईट नको वाटून घेऊ. जगन्नाथ लिलाव होऊ देणार नाही. त्याने तसं वचन दिलं आहे.''

''बाळ, त्याच्या शद्वाला कोण देईल किंमत? ते काही नाही हो; डोळ्यांनी आता सारं पाहावं लागेल. कानांनी सारं ऐकावं लागेल, नशीब आपलं, आपलं कर्म खोटं. दुसऱ्यास काय बोल? आपण देणेकरी झालो. अंथरूण पाहून पाय पसरले नाहीत. मोठ्या नावावर गेलो. त्याचा परिणाम. असो. देवाची इच्छा. तुला काही नाही म्हणून वाईट वाटतं. निदान घर राहतं तरी पुष्कळ होतं. आमचं काय आता. आमचं सारं झालं. मरायचं फक्त राहिलं आहे.''

''आई, असं नको बोलू. मला मग रडू येतं. मला इतर काही नको; परंतु तुम्ही तरी असा. तुझा प्रेमळ हात पाठीवर फिरायला असू दे. बाबांचा आशीर्वाद

रोज मिळू दे. तुम्ही दोघे आहोत तोपर्यंत मला सारं आहे. तुमचं कृपाछत्र म्हणजे माझी संपत्ती.''

''गुणा, असं तू बोललास बाळ म्हणजे भडभडून येतं हो. किती रे तू गुणांचा.''

असे म्हणून ती माऊली रडू लागली. तिने मुलाला जवळ घेतले. त्याच्या डोक्यावरून, पाठीवरून हात फिरवला.

त्या दिवशी जगन्नाथ व गुणा अंजनीवर फिरायला गेले. एका दगडावर दोघे बसले होते. पायाशी पाणी नाचत होते. समोर बगळ्याने एकदम मासा धरला.

''कशी पटकन झडप घालतो नाही?'' गुणा म्हणाला.

''दिसतो ढवळा मनात काळा,'' जगन्नाथ म्हणाला.

''आकाशात काळे काळे पावसाळी ढग आले असावेत, जरा सायंकाळ होत आली असावी आणि मग हे बगळे उडतात. त्या आकाशाच्या काळ्या पार्श्वभूमीवर यांचं उडणं, पांढरे शुभ्र पंख पसरून जाणं फार सुंदर दिसतं. मी कितीदा तरी पाहिला आहे तो देखावा. जणू काळ्या फळ्यावर पांढरी रेघ काढीत आहोत तसं ते त्यांचं उडणं वाढतं.''

''गुणा?''

''काय जगन्नाथ?''

''आम्ही श्रीमंत या बगळ्यासारखेच. सावकार या बगळ्यासारखाच. गरिबांचे संसार पटकन गिळतो. एकदम त्यांच्यावर झडप घालतो.''

''परंतु सारे श्रीमंत का तसे असतात?''

''अरे, तसं न करतील तर ते श्रीमंत होणारच नाहीत. लुबाडल्याशिवाय का श्रीमंती येईल? श्रीमंत मनुष्य संपत्ती निर्माण करीत नाही. दुसऱ्यांच्या खिशांतील स्वतःच्या खिशांत घेतो. शेतकरी व कारखान्यांतील कामगार हेच संपत्ती निर्माण करतात. आम्ही. ऐतखाऊ डुकरं.''

''जगन्नाथ, तू निराळ्या प्रकारचा हो.''

''परंतु मोठा होईन तेव्हा. स्वतंत्र होईन तेव्हा.''

''केव्हा होशील मोठा, केव्हा होशील स्वतंत्र?''

''आई-बाबा आहे तो थोडंच वहायचं स्वतंत्र?''

‘‘परंतु तुझी आईच तर म्हणत होती, की लग्न झालं, की करू स्वतंत्र याचा संसार.’’

‘‘आज ना उद्या केव्हा तरी होईनच मोकळा. दादाच्या पापासून अलग होईन. जुनं पाप धुऊन टाकीन.’’

‘‘जगन्नाथ, माझ्या घरावरही जप्ती येईल का? फियार्द आली आहे.’’

‘‘फिर्याद झाली?’’

‘‘हो. आई रडत असते. बाबा चिंतित असतात.’’

‘‘परंतु मी जप्ती होऊ देणार नाही.’’

‘‘कोणता उपाय?’’

‘‘त्यांना सांगेन फिर्याद काढून घ्या. तुमच्याकडचं देणं माझ्या वाट्याला द्या असं सांगेन. मग ते बुडो, तगो.’’

‘‘ते हसतील. ऐकणार नाहीत.’’

‘‘मी उपवास करीन. धरणं धरीन. गुणा, तू निश्चिंत राहा. मी तुझ्या घराचा लिलाव होऊ देणार नाही. गावात दवंडी पिटू देणार नाही.’’

‘‘बघ तुला जमेल ते; परंतु तू लहान आहेस जगन्नाथ. जरा मोठा असतास तर!’’

दोघे मित्र घरी गेले. जगन्नाथ आपल्या गच्चीवर फेऱ्या घालीत होता. गच्चीत आरामखुर्चीत पंढरीशेट बसले होते. शांतपणे एक शाल घेऊन पडून राहिले होते.

एकदम जगन्नाथ त्यांच्याजवळ गेला. त्यांच्या पायांजवळ बसला. त्याने त्यांचे पाय धरले.

‘‘काय रे जगन्नाथ?’’

‘‘बाबा, तुमच्याजवळ एक मागणार आहे.’’

‘‘काय हवं बाळ? सायकल का घड्याळ?’’

‘‘तसलं काही नको.’’

‘‘मग काय हवं?’’

‘‘माझ्या मित्राची अब्रू.’’

‘‘म्हणजे?’’

''बाबा, गुणा माझा मित्र आहे. त्याच्याशिवाय मला चैन पडत नाही. त्याचं दुःख ते माझं. आज तो माझ्याजवळ रडला. त्यांच्यावर फिर्याद करण्यात आली आहे. दादाने त्याच्या वडिलांवर फिर्याद केली आहे. घराशिवाय त्यांच्याजवळ काय आहे? त्या घरावर जप्ती न्याल, लिलाव पुकाराल. गुणाचे आई-बाबा दुःखाने मरतील. बाबा ही फिर्याद काढून घ्या.''

''आणि पैसे?''

''आपणाला का खायला वाण आहे? दुसऱ्यांचे प्राण पिळून का पैसे घ्यायचे?''

''अशाने जगन्नाथ कसं होईल? तुझे भाऊ अशा व्यवहारास कशी मान्यता देतील? ते आता कर्ते सवरते झाले. असा नको हट्ट धरू?''

''बाबा, आज ना उद्या आम्ही वेगळे होऊच ना?''

''मग?''

''माझ्या वाट्याला काही सावकारी येईलच ना? रामरावांकडची बुडित सावकारी माझ्या वाट्यास द्या. त्यात काय बिघडलं?''

''तुझे भाऊ या गोष्टीला तयार होणार नाहीत.''

''का?''

''त्यांना तो वाडा पाहिजे आहे.''

''परंतु का?''

''अरे, त्यात धन आहे. पुरलेले 'ठेवले' आहे, असं लोक म्हणतात. म्हणून तुझा दादा अधीर झाला आहे.''

''बाबा, धन असतं तर रामरावांनीच नसतं उकरून पाहिलं?''

''जाऊ दे रे. जगन्नाथ, तू या भानगडीत पडू नकोस. मनाला लावून घेऊ नकोस.''

''नाही, असं नाही. मी इतर भानगडीत पडणार नाही; परंतु ही भानगड माझ्या मित्राच्या घरची आहे. गुणाचं दुःख मला पाहावणार नाही. तुम्ही फिर्याद काढून घ्या. नाहीतर मी अन्न वर्ज्य करीन. मी उपवास सुरू करीन.''

''काही तरीच तुझं.''

''मी मनातील सांगितलं. तुमचे पाय धरून सांगितलं.''

''बरं बघेन मी.''

आणि पंढरीशेट वडील-मुलांजवळ बोलले. ते कोणीही ऐकायला तयार होत ना.

''करू दे उपवास. म्हणे उपवास करीन. मोठा गांधीच की नाही उपवास करायला. करील दोन दिवस व जेवील तिसऱ्या दिवशी. असं जर पदोपदी तो अडवू लागला तर कसं व्हायचं? ही रोजची पीडा होऊन बसेल,'' असे ते दोघे भाऊ म्हणाले.

''परंतु सध्याच फिर्याद नाही करीत; काढून घेतो काही दिवस; असं सांगू त्याला,'' पंढरीशेट म्हणाले.

जगन्नाथला त्याप्रमाणे सांगण्यात आले; परंतु वास्तविक तसे नव्हते. जगन्नाथ विश्वास ठेवून होता. गुणा व तो शाळेत जात होते. एकत्र खेळत होते, बोलत होते; परंतु ही बोलणी हसणी-खेळी लवकर खलास होणार आहेत, ही त्यांना कल्पनाही नव्हती. आंबे मोहरलेले असावेत; परंतु अकाल गारांची वृष्टी व्हावी, आंबे झडून जावे, त्याप्रमाणे एखाद्या वेळेस मानवी मनाचे होते.

रामरावांनी एरंडोल सोडून जाण्याचे ठरविले. आज ना उद्या हे घर जाणार, जप्ती येणार, लिलाव होणार हे ठरल्यासारखेच होते. त्या गोष्टी स्वच्छ दिसत होत्या. गुणाशी बोलायला त्यांना अद्याप धीर होत नव्हता; परंतु एके दिवशी ते त्याच्याजवळ बोलले त्यावर गुणा म्हणाला, ''बाबा, आपण कुठे जाणार?''

''जाऊ. पृथ्वीच्या पाठीवर कुठेही राहू.''

''रहायचं कुठे?''

''राहू कुठे तरी. तू म्हणाला होतास ना एकदा, की मी सारंगी वाजवून भिक्षा मागून आणीन व श्रावणाने आईबाबांना खांद्यावरून हिंडवलं त्याप्रमाणे तुम्हांला सांभाळीन. ते शब्द खरे व्हावेत अशी देवाची इच्छा आहे. राहू एखाद्या मोठ्या शहरात लहान खोली घेऊन. तू जात जा सारंगी वाजवीत. मिळेल भिक्षा ती आणीत जा.''

''बाबा, काय सांगू मी? मी लहान आहे.''

''लहान नाहीस. आता तू मोठा आहेस. आमचा अन्नदाता आता तू, आमचा

पालनकर्ता तू. तुला सारंगी दिली आहे. ती तुझं साधन. तूच आमची आशा. आमचा आधार. तूच आमची अब्रू, आमची प्रतिष्ठा.''

''बाबा, तुम्ही सांगाल तिथे मी येईन. तुमच्याबरोबर राहण्यात माझा स्वर्ग आहे. मी तुम्हांला सुखवीन, हसवीन. जर सारंगी वाजवून मला भिक्षा मिळाली तर मी गोळा करून आणीन. इथे राहणं जिवावर येत असेल तर चला आपण दूर जाऊ. ओळखीच्या लोकांपासून दूर.''

''जाऊ, लवकरच जाऊ.''

रामरावांच्या घरावर जप्ती येणार असे गावात लोक म्हणू लागले. जगन्नाथच्या कानांवर कुणकुण आली. एके दिवशी रात्री त्याला झोप येईना. काय करावे? एकाएकी त्याने निश्चय केला. समोरच्या खिडकीतून चंद्र दिसत होता. जणू आपल्या मित्राचा मुखचंद्रच दिसत आहे असे त्याला वाटले. तो खिडकीतून पाहू लागला. अत्यंत शांत निःस्तब्ध असा तो चंद्र होता. उद्यापासून उपवास करायचे त्याने ठरविले. त्याला आनंद झाला. मित्रप्रेमाची परीक्षा तो देणार होता.

सकाळी त्याने दूध घेतले नाही. तो जेवायला गेला नाही. तसाच शाळेत गेला. शाळेमध्ये गडी बोलवायला आला. त्याने त्याला तसेच परत पाठविले. तो भुकेला होता. तरी आनंदी दिसत होता. मित्रप्रेमाच्या आनंदावर मनाला पोषण मिळत होते.

शाळा सुटून तो घरी आला. आपल्या खोलीत जाऊन बसला. त्याची आई आली.

''जगन्नाथ, तू काय आरंभल आहेस?''

''उपवास आरंभला आहे.''

''कशासाठी? परीक्षा तर आता नाही ना?''

''आताच आहे.''

''आता रे कुठली परीक्षा?''

''आई, मित्रप्रेमाची परीक्षा.''

''गुणा का आजारी आहे? तो आला नाही दोन-चार दिवसांत.''

''तो कशाला येईल? कप्पाबांच्या घरी कशाला येईल?''

''असं काय बोलतोस?''

“आई, गुणाच्या घराची दादा जप्ती करणार, लिलाव करणार! माझ्या मित्राची, त्याच्या आईबाबांची अब्रू घेणार, त्यांना रडवणार. मी काय करू? मला उपवास करू दे. दादाला सद्‌बुद्धी दे अशी देवाला प्रार्थना करु दे.”

“किती दिवस करणार उपवास?“

“दादाला सद्‌बुद्धी येईपर्यत.”

“आम्हांला म्हातारपणी तुम्ही रडवणार आहात?”

“गरिबांना रडवू नको असं दादाला सांगा.”

“नाही का तू काही खाणार?’

“नाही,”

“मग मीही जेवणार नाही.”

“छान होईल. आपल्या दोघांच्या उपवासाने तरी दादाचं मन जरा दयाळू होवो.”

माता गेली व रडत बसली. तीही काही खाईना. घरात चमत्कारीक वातावरण निर्माण झाले. “आई, हे काय तुम्ही सर्वांनी आरंभिले आहे?”

“तू गुणाच्या घरावर जप्ती नेऊ नको.”

“अशाने कसं होणार आई?”

“गुणा जगन्नाथचा मित्र आहे.”

“मित्र असेल तर जेवायला बोलाव; परंतु हे कुठलं मित्रप्रेम जगाच्या विपरीत?”

“तो जेवत नाही. तो जेवला नाही तर मी कशी जेवू?”

“अग पण कोण जप्ती नेत आहे?”

“जगन्नाथ म्हणतो की सारा गांव बोलतो आहे.”

“तसं काही होणार नाही.”

“मग तू जगन्नाथला तसं सांग.”

रात्री पंढरीशेट, जगन्नाथची आई, ते भाऊ, सारी बसली होती. दादा म्हणाला, “जगन्नाथ, त्या घराचा लिलाव होणार नाही.”

“मग काय कराल?”

“खरेदीसारखं करून घेऊ. त्याच्याकडेच ठेवू”

“म्हणजे ते त्याचं नाही ना राहणार? मी कितीदा सांगितले की हे कर्ज माझ्या वाट्याला द्या. ते बुडो, तगो, काही होवो.”

“तू वाटे-हिस्सेचे बोलू लागलास.”

“केव्हा तरी होणारच आहेत ते आणि तुमची कसाबकरणी मला थोडीच पसंत पडणार आहे?”

“तू कर्णाचा अवतार हो.”

“देवाची इच्छा असेल तर होईन.”

“तू जेव.”

“घर नाही ना जप्त करणार?”

“नाही.”

“आईच्या पायांची शपथ घे.”

“सांगितले ना नाही करणार म्हणून!”

“जगन्नाथ, विश्वास ठेव,” आई म्हणाली, जगन्नाथ जेवला. आई त्याच्याबरोबर जेवली; परंतु त्या दिवसापासून घरात जरा अशांतीच निर्माण झाली. अबोले जन्माला आले. घरात जणू सारे मौनी बनले होते.

* * *

रामराव गुणाला म्हणाले, “आज मध्यरात्री आपण जायचं इथून.”

“परंतु जगन्नाथ म्हणतो, की जप्ती येणार नाही, लिलाव होणार नाही.”

“सावकारी पाश गुंतागुंतीचा असतो. दुसऱ्या सावकारांकडून ते फिर्यादी देतील. लिलाव पुकारतील व लिलावात स्वतः विकत घेतील. नकोच इथे राहाणं. करोत आपल्या पाठीमागे वाटेल ते. आपण आज जाऊ. तुझ्या मित्राला भेटून ये; परंतु सांगू नको. आपण जणू अज्ञातवासात जाऊ. ईश्वराची इच्छा असेल तर परत येऊ हो बाळ.”

रामराव गेले. त्यांनी तयारी चालविली होती. काही थोडे पैसे त्यांनी भांडीकुंडी विकून गोळा केले होते. आवराआवरी चालू होती. मध्यरात्री एक बैलगाडी हळूच येणार होती. निमूटपणे ते जाणार होते.

गुणा जगन्नाथच्या घरी गेला. जगन्नाथ खोलीत होता.

“जगन्नाथ, भूक लागली आहे. काही खायला दे.”

''काय देऊ? लाडू आणू? तू आपण होऊन आज मागितलंस. कधी मागायचा नाहीस. काय आणू?''

''अशी वस्तू आण की जी मला कायमची पुरेल.''

''असं काय आहे?''

''तुझं प्रेम.''

''ते तर मी कधीच तुला दिलं आहे. त्या दिवशी रात्री मी उभा होतो. खिडकीतून शांत चंद्र डोकावत होता. वाटे, तू समोर येऊन उभा आहेस, तुझा आत्मा आला आहे भेटायला. गुणा, तुझ्या प्रेमासाठी काय करू? तुझ्या प्रेमासाठी मी भिकारी होईन. घरदार सोडीन. वेळ आली तर हे प्राणही देईन.''

''जगन्नाथ, आज मी सारंगी वाजवतो.''

''वाजव, बऱ्याच दिवसांत तू तारा छेडल्या नाहीस.''

''आणि तूही गा.''

''नको, आज गाणं नको. आज फक्त तू वाजव.''

आणि गुणाने सारंगी घेतली. किती अप्रतिम वाजवली त्याने? दोघे मित्र डोळे मिटून बसले होते. मध्येच जगन्नाथ गुणाच्या मुखमंडलाकडे पाही. मध्येच गुणा डोळे उघडी व जगन्नाथचा भावनांनी रंगलेला मुखचंद्र बघे. सारंगी थांबली. दोघा मित्रांनी एकमेकांना मिठी मारली. गुणा रडू लागला. तो भावनांनी कापत होता. सारंगी थांबली; परंतु हृदयसारंगी थरथरत होती. मुके संगीत तीतून बाहेर पडत होते.

''गुणा! गुणा!''

''जगन्नाथ!''

''काय रे झालं गुणा?''

''आज पूर्वीच्या सर्व स्मृती उसळल्या, उचंबळल्या. तू मला दागिन्यांनी नटवलं होतसं, तो दसरा आठवला. मी आलो नाही म्हणून तू दूध पीत नसत. मी कधी आलो तर तू स्वत:ची गादी मला द्यावयाचास व स्वत: दुसरं काही घेऊन झोपावयाचास! किती तुझं प्रेम! आणि मी तुला काय दिलं? तुझ्या प्रेमावर मी पोसलेला आहे. ते प्रेम मला पुढेही पोशील.''

"होय हो. माझं प्रेम तुझ्यासाठी आहे आणि तुझं माझ्यासाठी. तू माझं ऐकतोस. स्वाभिमान दूर ठेवतोस. जणू माझ्या प्रेमासमोर तू स्वत:ला रिकामं करतोस. सदरा घाल म्हटलं, घालतोस. अंगठी घाल म्हणालो तर घालतोस. कुणी हसो, बोलो, तू माझ्या समाधानासाठी सारं करतोस. तुला तुझे आईबाबा एकदा रागे भरले, माझ्या लग्नाच्या वेळेस; परंतु तू मनावर घेतलं नाहीस. मी दिलेली खादी घेतलीस. गुणा, माझ्याहून तुझं प्रेम थोर आहे. तुझ्या प्रेमाने स्वाभिमानही सोडला. जणू माझी इच्छा तू स्वत:ची केलीस! तुझ्यासारखा कोण मला मिळणार आहे? तू माझं रत्न, माझी संपत्ती. माझ्या भावांनी इस्टेटी मिळविल्या. मी एक खरा मित्र जोडला."

दोघांच्या भावना ओसरल्या. कितीतरी वेळ दोघे बोलत होते. तेथे भिंतीवर जगन्नाथचा एक फोटो होता. फार सुंदर होता तो फोटो.

"जगन्नाथ, हा फोटो मी नेऊ?"

"तुझ्याकडे तर माझे दुसरे कितीतरी आहेत फोटो."

"परंतु हा मला आवडतो. तुझ्याजवळ मागेन म्हणत होतो. नेऊ का मी?"

"ने की."

जाताना गुणाने तो फोटो घेतला.

"गुणा, उद्या सकाळी लवकर ये. आपण मळ्यात जाऊ."

"बघेन,"

"येच, मी वाट बघेन."

दारात दोघे उभे होते. गुणाचा पाय खोलीच्या बाहेर पडेना. आपल्या मित्राचे हे शेवटचे दर्शन आहे ही गोष्ट जगन्नाथला माहीत नव्हती; परंतु गुणाला माहीत होती.

"गुणा, उभा का? मग बस. आज आमच्याकडे जेव."

"नको, जातो. आई वाट पाहील. जाऊ?"

"सकाळी ये हो लवकर."

गुणा बोलला नाही. जिन्यातून तो उतरला. दरवाजापर्यंत जगन्नाथ आला.

"जाऊ?"

"आज असं का विचारतोस? कुठे जाणार आहेस?"

"कुठे म्हणजे घरी. अजून घर आहे."

"ते कायमचं राहील."

"तुझ हृदयमंदिर तर कायमचं आहेच. ते माझं खरं घर. ते कोणी विकणार नाही. विकत घेणार नाही. अभंग चिरसुंदर प्रेममंदिर."

"माझं हृदय, माझं मन, म्हणजे तुझं मानससरोवर. इथे तुझा जीवहंस येऊ दे सदैव पंख फडफडवीत, इथे प्रेमकमळांचा चारा मिळेल. प्रेममकरंद चाखायला मिळेल हो गुणा."

"तुझ्याकडे आज सारखं पाहात राहावंसं वाटत."

"आणि मी कोणते चरण गुणगुणत असतो आहे माहीत?"

"कोणते रे?"

मधू-मधुर गुणाची मूर्ती डोळ्यांसमोर
हृदय मुदित जेवि मेघ पाहून मोर
हृदय मम सुखाचे अंबुदे जेवि मोर
हृदय मुदित नाचे अंबुदे जेवि मोर ।।

"खरचं गोड आहेत चरण. मी 'गुणाची' या ठिकाणी 'जगूची' असे शब्द घालीन. जातो हां जगू."

"सकाळी ये हां गुणा."

गुणा गेला. ते चरण गुणगुणत गेला. तो घरी आला. रामराव व गुणाची आई बोलत होती. मंद दिवा तेथे होता आणी एकदम गुणा आला.

"आला, गुणा आला, आपली आशा आली, अंधारातील प्रकाश आला." रामराव म्हणाले.

"आज दिवा असा काय?" त्याने विचारले.

"त्याची वात चढतच नाही. नीट पेटतच नाही आज," आई म्हणाली.

"उद्यापासून कोण मला लावील असं त्याच्या मनात आहे. म्हणून त्याला वाईट वाटत आहे. त्याची प्राणज्योत मंद होत चालली आहे."

" घरातील निर्जीव वस्तूंना वाईट वाटेल; परंतु गावातील सजीव वस्तूंना वाईट वाटेल का? हे घर सुस्कारे सोडील; परंतु गावात कोणी सोडील का सुसकारे? गुणा, बस बाळ," रामराव म्हणाले.

" बाबा, जगन्नाथ रडेल. तो फार दु:खी होईल. आपण कुठे जायचं बाबा?"

" दूर दूर जाऊ. कुठे तरी जाऊ. इथे नको."

" मी जगन्नाथला रात्री पत्र लिहीणार आहे. आपण गेल्यावर त्याला मिळेल; परंतु कुठे गेलो म्हणून त्यात लिहू? त्याला काहीच न कळवलं तर त्याला काय वाटेल?"

"परंतु बाळ, आपलं थोडचं ठरलं आहे की अमक्या गावी जायचं असं. जळगावला जाऊ. तेथे कोणतं तरी तिकीट काढू. जाऊ नाशिक, पंढरपूर कुठे तरी; परंतु तू काही लिहू नकोस. जातो जगाच्या पाठीवर, जातो अज्ञातवासात, असं लिही. आपण कुठे आहोत हे कुणाला कळू नये असं मला वाटतं."

"नाही हो कळवणार जगूला. आम्ही एकमेकांच्या मनांत कायमचेच आहोत."

"गुणा हो कळवणार जगूला. आम्ही एकमेकांच्या मनांत कायमचेच आहोत,"

"गुणा जेवून वर गेला. त्या घरातील शेवटची जेवणे झाली. जरुरीची भांडी बरोबर घ्यायची होती. जरुरीचे सामान एका बाजूला काढण्यात आले. बाकी सारे एका खोलीत ठेवण्यात आले. आईबाबा खाली आवराआवर करीत होते, गुणा वर मित्राला पत्र लिहीत होता. ते लिहीत असताना त्याच्या डोळ्यांतून अपार अश्रू येत होते. तो आज जाणार होता. आपला मित्र आपल्या जीवनात किती खोल गेला आहे ते त्याला अधिकच तीव्रतेने, स्पष्टपणे कळून आले. पापण्यांच्या तुळशीपत्रांनी डोळ्यांतील पाणी शिंपडून ते पत्र पवित्र करण्यात आले होते. हृदयगंगेचे पावन पाणी!

ते पत्र त्याने पाकीटात घातले. त्यावर पत्ता लिहीला. तो पटकन बाहेर गेला. पोस्टाच्या पेटीजवळ गेला. ते पत्र घेऊन तेथे तो उभा होता. वियोगाचे पत्र! चिरवियोगाचे पत्र! परंतु आपले मनोमय चिरमीलनच आहे हे दाखविण्यासाठी तर ते वियोगपत्र होते. ते पत्र त्याला पेटीत टाकवेना. जगन्नाथच्या हृदयाला प्रहार करणारे, रडवणारे पत्र आयुष्यातील हे जगन्नाथला लिहीलेले पहिलेच पत्र! आजपर्यंत ते दोघे येथेच होते. सदैव बरोबर. कधी पत्र लिहिण्याची जरूर भासली नाही. आजचे हे पहिले पत्र. आणि कदाचित शेवटचेही. बाबांची इच्छा अज्ञात राहण्याची.

काय वाटेल हे पत्र वाचून जगन्नाथला? हा मित्रद्रोह नाही का? स्नेहाची, प्रेमाची फसवणूक नाही का? परंतु वडिलांची इच्छा आहे. घुटमळत शेवटी ते पत्र त्याने पेटीत टाकले.

तो अंजनीच्या तीरावर गेला. एकटाच गेला. कधी कधी असा एकटाच तो अंजनीच्या काठी जाई. दु:खी असताना जाई. आपले अश्रू अंजनीच्या पाण्यात मिसळण्यासाठी जाई; परंतु असा रात्री एकटा कधी आला नव्हता. रात्री आलाच तर बरोबर जगन्नाथ असायचा आज तो एकटा होता. आज चांदणे नव्हते. आज अंधार होता. पाण्यात तारे चमचम करीत होते. गुणाने ओंज़ळीत अंजनीचे पाणी घेतले. तो ते पाणी प्याला. पुन्हा ही गुणगुणणारी अंजनी त्याला कधी दिसणार होती? अंजनीच्या किती आठवणी! जगन्नाथ व तो तिच्या पाण्यात लहानपणी डुंबत. एकमेकांच्या अंगावर पाणी उडवीत.जणू हृदयातील प्रेमाच्या कारंज्याचे तुषारच ते एकमेकांवर फेकीत. जणू प्रेमाची फुले ते उधळीत आणि एकदा त्याला दगड लागला होता पाण्यातील, तर जगन्नाथने टरकन धोतर फाडून पट्टी बांधली. सारे गुणाला आठवत होते. त्या स्मृती पुन्हा सजीव, ताज्या करून तो उठला. त्याने हात जोडले, अंजनीला प्रणाम केला, ती सर्वांची माता होती. 'लोकमाता!'

वारा येत होता. जगन्नाथच्या मळ्यावरून येणारा वारा. तेथील फुलांचा सुगंध आणणारा वारा! असा वारा आता पुन्हा कधी मला भेटेल, पुन्हा कधी माझ्या अंगावरून खेळेल, माझे अश्रू पुशील?

शेवटी गुणा उठला. बरीच रात्र झाली होती. तो घरी आला. त्याचे कपडे वगैरे सारे बांधण्यात आले. सारंगी घेण्यात आली. सारी तयारी झाली होती. घरातील देव बरोबर होते. देव बरोबर असला म्हणजे आणखी काय हवे?

मध्यरात्र होऊन गेली, आणि एक गाडी आली. हळूच सामान त्यात ठेवण्यात आले. भांडी जरा वाजली. घरातील दिवा विझवून तो बरोबरच घेण्यात आला. कुलूप लागले. ते लावताना रामराव रडले. डोळ्यांतून पाणी पडले. तिघे गाडीत बसली. निघाली गाडी गावाबाहेर गाडी आली. रामराव, त्यांची पत्नी व गुणा तिघांनी गावाला, मातृभूमीला प्रणाम केला. साश्रू प्रणाम केला. तिघे गाडीत बसली. गाडी निघाली.

गाडीत कोणी बोलत नव्हते.

त्यांच्या मनांतील विचार, भावना, कोण जाणू शकेल? गुणा गावाकडे तोंड करून बसला होता. त्याला का त्या बाजूला जगन्नाथ दिसत होता?

थोड्या वेळाने त्याने रामरावांस पुन्हा विचारले.

''बाबा, खरंच आपण कुठे जाणार?''

''जाऊ, दूर दूर जाऊ. इथे नको आता. दूर दूर''

''दूर दूर म्हणजे कुठे?

''देव नेईल तिथे. मी दुसरं काही ठरवलं नाही. दूर जायचं. कुठे ते मलाही माहीत नाही. ते देवाला माहीत असेल. तो बुद्धी देईल तिथे जाऊ. दूर दूर जाऊ. इथे नको.''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

गुणा, कोठे गेला गुणा?

रात्री जगन्नाथला नीट झोप लागली नाही. कितीदा तरी त्याच्या मनात आले की गुणाकडे जावे. त्याच्याजवळ बसून आज पोटभर गावे; परंतु आता कुठे जायचे रात्री? तो खिडकीजवळ उभा राही. त्या एका रात्री चंद्र त्या खिडकीतून डोकावत होता. आज अंधार होता. आकाशातील तारे थरथरत होते. माझा गुणा का रडत आहे? हे का त्याचे अश्रू? त्याने खिडकीतून हात पुढे केले. जणू गुणांचे अश्रू पुसण्यासाठी; परंतु ते अश्रू आता दूर होते. अनंत आकाशात होते. त्याला हसू आले आणि खरोखरच गुणाचे अश्रू आता दूर होते, दूर जात होते. ते पुसायला त्याचे हात पोचते ना.

पहाटे पहाटे त्याला लागली. किती तरी उशिराने तो उठला. अजून उठला का नाही म्हणून आई पहायलाही आली. परंतु शांत झोपला आहे असे पाहून त्याच्या अंगावरचे पांघरून सारखे करून व खिडकी बंद करून प्रेमळ माता गेली.

जगन्नाथ उठला. त्याने खिडकी उघडली. प्रकाशाचा झोत आला. जणू मित्रप्रेमाचा प्रकाश आला. गुणा येऊन गेला असेल असे त्याला वाटले. ही खिडकी उघडी होती. गुणा बंद करून गेला वाटतं! मला न उठवता गेला! हळूच आला हळूच गेला. कोमल प्रेमळ गुणा.

तो खाली गेला. त्याने प्रात:र्विधी केले.

"आई, गुणा का आला होता?"

"कधी? नाही रे"

"मग वर खिडकी कोणी लावली? मी निजताना तर उघडी होती. कोणी लावली? मला वाटलं गुणा येऊन गेला."

"मी आले होते हो. तुला आपला जिथे तिथे गुणा दिसतो. आमचंही थोडं प्रेम आहे हो तुझ्यावर. आई येऊन गेली असेल, पांघरून घालून गेली असेल, असं रे का नाही तुझ्या मनात आलं? आमची का नाही तुला आठवण येत?"

"तुम्ही घरात आहात. गुणा जरा दूर तिकडे राहातो. माणूस दूर असतं त्याची आठवण येते."

"आणखी कोण दूर आहे?'

"आणखी कोण?'

"अरे शिरपूरला हो."

"अजून तिची आठवण येत नाही. ओळखच नाही."

"होईल ओळख; मग गुणाची आठवण कमी होईल. आमची तर झालीच आहे कमी. जाणाऱ्यांची, लवकर मरणाऱ्यांची कशाला आठवण? नवीन कळ्या गोड दिसतात, ताजी फुलं छान दिसतात."

"आई, गुणा ताज्या फुलांप्रमाणेच घवघवीत दिसतो!" असे म्हणून तो चरण गुणगुण लागला.

"ताज्या फुलापरि दिसे मुखडा गुणाचा
माझा गुणा मधुमना पुतळा गुणांचा"

ते चरण गुणगुणत तो जाऊ लागला.

"अरे, दूध पी व मग जा."

"गुणा येणार आहे. तो व मी बरोबर पिऊ आणि मग जाऊ."

बराच वेळ झाला. गुणा आला नाही. तो खाली काही तरी बोलणे चालंलेले त्याच्या कानी आले. तो ऐकू लागला.

"अहो, घराला कुलूप आहे."

“गाव सोडून गेले की काय?”

“अब्रू जायची वेळ आली. कशाला राहतील?”

“वाड्याचा लिलाव होणारच होता. तो काही टळत नव्हता.”

“परंतु आपल्याकडेच येणार वाडा.”

“अहो, त्या वाड्यात असतं धन तर रामराव कशाला जाते? त्यांनी नसतं का खणून पाहिलं? उगीच फसाल झालं.”

“पण हे गेले कुठे?”

“जीवबीव तर नाही ना देणार?”

“अहो, तिघे का जीव देतील?”

“अहो, त्या मद्रासकडे का कुठे एका कुटुंबातील सात जणं मेले. मुलांनाही त्यांनी जगात ठेवलं नाही, काय वाईट स्थिती?”

जगन्नाथ एकदम खाली आला. तो भावनांनी कापत होता.

“खरंच का गुणा गेला? त्याचे आई-बाप गेले?”

“त्यांच्या घराला कुलूप आहे खरं. मग कुठे गेले असतील देव जाणे.”

“फिरायला नसतील तिघं गेली?”

“आजपर्यंत कधी फिरायला गेली नाहीत.”

“पद्मालयाला तर नसतील गेली?”

“अहो, आम्हांला तरी काय माहीत?”

“दादा, माझ्या मित्राला तू दवडलंस. तू फसवलंस मला. आईच्या पायाची शपथ घेतली होतीस.”

“मी कुठे घेतली होती शपथ? आणि देवासमक्ष खरं सांगेन असं कोर्टकचेरीत नेहमी म्हणावंच लागतं. ती रूढी आहे. विद्येशपथ, आईशपथ, असं म्हणतात.”

“म्हणजे ते म्हणणं का खोटं?”

“तुला व्यवहार कळायला सात जन्म लागतील.”

“आग लाव त्या व्यवहाराला.”

“जा भुरी फासून पद्मालयाला राहायला.”

“दादा, काय केलंस हे?”

''अरे, मी नव्हतो करणार. आपण का एकच सावकार आहोत? दुसऱ्यांनी फिर्यादी केल्या. हुकूमनामा झाला. घरदार, शेतीवाडी साऱ्यांचा लिलाव होईल. आणेवारीप्रमाणे प्रत्येक सावकाराला भाग मिळेल. आपण काय करायचं?''

''दादा, तो वाडा आपणच लिलावात घेऊ व गुणा परत आला की त्याला तो देऊ गुणा परत येईल. केव्हा तरी येईल. जगन्नाथपासून दूर राहून तो कसा जगेल? हा वाडा त्याचा आहे. जसाच्या तसा ठेवू.''

''वाडा म्हणे विकत घेऊ लिलावात, आणि त्यांना देऊ! आणखी नको का काही द्यायला?''

''आणखी नको.''

जगन्नाथ घराबाहेर पडला. गुणाच्या घराजवळ आला. तो घराला कुलूप! अरेरे! तो तेथे घुटमळत होता. गुणा बाहेर येईल, त्याच्या माडीत जाऊ, तो सारंगी वाजवील असे त्याला वाटत होते; परंतु तेथील संगीत थांबले. जगन्नाथला रडू आले. त्या वाड्याच्या पायरीवर तो बसला. जणू देवाच्या दारी बसला. देवाच्या बंद दारी.

पद्मालयाला तर नसेल ना गेला गुणा? आई–बाबांनाही घेऊन गेला असेल; परंतु मजजवळ बोलला असता, वनभोजनाला जाता तर. का त्याच्या आई–बापांचा काही नवस वगैरे होता? पाहून येऊ. त्याने सायकल घेतली. रस्ता चांगला नव्हता; परंतु फिकीर नव्हती. वरून ऊन तापवीत होते. आतून मित्राच्या वियोगाचा वणवा जाळीत होता. जगन्नाथ उन्हातून पद्मालयाला गेला. त्याचे तोंड लाल झाले. पद्मालयाला कोणी नव्हते. समोरचे तळे शांत होते. लाल कमळे फुलेली होती. त्यांचे मुके कळे पाण्यावर येऊन हात जोडून सूर्यनारायणाला प्रार्थित होते. तो तेथे मुकेपणे बसला. त्या तळ्याच्या काठी बसला. त्या तळ्यात तो व गुणा कितीदा तरी पोहले होते. पाण्यात बुडून एकमेकांना शिवण्याचा खेळ खेळले होते. एकदा एक कमळ तोडून आणून आपण ते गुणाला कसे दिले होते ते त्याला आठवले; परंतु आज घामाघूम झालेला होता तरी त्या तळ्यात तो जाऊ इच्छीत नव्हता. ते पाणी आज त्याला शीतल वाटले नसते. त्या पाण्याने अंग पोळले असते; जळले असते. तो उठला. जवळच्या जंगलात शिरला. गुणा, गुणा अशा हाका मारू लागला. मोरांनी केकारवाने उत्तर

दिले; परंतु किती वेळ असा भटकणार? पुन्हा सायकलवरून तो घरी आला. आपल्या खोलीत रडत बसला. काय करायची ही संपत्ती?

आग लागो तया सुखा
जेणे विठ्ठल नये मुखा
मज होत का विपत्ती
पांडुरंग राहो चित्ती

हे चरण एकदा दयाराम भारतींनी व्याख्यानात म्हटलेले त्याला आठवले. संपत्तीमुळे देशसेवा करता येत नसेल, सरकारची हांजी हांजी करावी लागत असेल, मामलेदार, फौजदार यांना खूश ठेवावे लागत असेल, घरावर स्वातंत्र्याचा झेंडा लावता येत नसेल, तर ती संपत्ती काय चाटायची? जी संपत्ती भूमातेची पूजा करू देत नाही, भूमातेपासून दूर नेते, भूमातेची आठवण होऊ देत नाही, ती संपत्ती की विपत्ती? ते भाग्य की दुर्भाग्य? ते वैभव की विष? अशा संपत्तीपेक्षा दारिद्र्य बरे, ज्या दारिद्र्यात भूमातेची पूजा करता येईल, तिचा झेंडा खांद्यावर घेता येईल, तिचे गान ओठांनी म्हणता येईल. दयारामांचे ते शब्द, ते भाषण आज त्याला आठवले. स्वतःच्या संपत्तीची त्याला खंत वाटली. या श्रीमंतीमुळेच दादा मागे तुला म्हणे की तू मिरवणुकी काढू नकोस, मामलेदार रागावतील. या संपत्तीमुळेच तो मला मेळ्याबरोबर जायला व त्यात काम करायला विरोध करीत असे. आग लागो या संपत्तीला! हिने देश दुरावतो आणि मित्र दुरावतो.

गेला, गुणा गेला, कोठे गेला असेल! काल कसे म्हणे, ''तुला पाहात राहावंसं वाटतं.'' काल त्याचे पाय येथून निघत ना; परंतु मजजवळ बोलला नाही. का नाही बोलला? मीही त्याच्याबरोबर गेलो असतो. आम्ही दोघे भिकारी झालो असतो, प्रेमाचे यात्रेकरू. कोठे गेला गुणा?

''बाळ चल. दोन घास खा. येईल हो गुणा.''

''आई, गुणा जिवंत असेल का?''

''असेल हो. असं वेडंविद्रं नको मनात आणू. शेवटी सारं गोड होईल. कडू आंबे पिकतील, मुक्या कळ्या फुलतील. जातील हे दिवस. तुझा मित्र येईल. अमावास्या जाईल, पुन्हा चांदणं येईल. चल, ऊठ. माझ्यासाठी चल. मी नाही का रे तुझी कोणी? चल, सारे खोळंबले आहेत.''

जगन्नाथ उठला. तो पाटावर जाऊन बसला. सारे जेवू लागले. जगन्नाथच्या ताटात टपटप पाणी गळत होते.

"काय रे झालं?" दादाने विचारले.

"तुला जणू माहीत नाही," जगन्नाथ तिरस्काराने म्हणाला.

"त्याला भाजी तिखट लागत असेल. ते दयाराम भारती फिकं खात. म्हणत तिखट व मसाले कशाला? जगन्नाथ त्यांचा शिष्य. अळमिळीत, मिळमिळीत खाणं आहे."

"परंतु ते दयाराम भारती तिखट खात नसले तरी मिळमिळीत नव्हते. त्यांचं बोलणं तिखटं. मिरची त्यांच्या बोलण्यापुढे फारच फिकी."

"अहो, मिरची न खाणारे शांत होण्याऐवजी आणखीच रागीट होतात. सरकार सावकारांना ते शिव्या देतात. पदोपदी त्यांना राग येतो, पदोपदी चीड."

अशी चालली होती बोलणी; परंतु जगन्नाथ बोलला नाही. "जेंवू द्या त्याला दोन घास. नका चिडवू." आई म्हणाली. जगन्नाथ उठून गेला. पटकन हाततोंड धुऊन वर गेला. खोली लावून अंथरुणावर पडला. गुणाच्या शतस्मृतींनी तो ओथंबून आला होता. त्या गादीवर गुणा झोपलेला होता. त्या उशीवर गुणाने डोके ठेकलेले होते. पुन्हा गुणा कधी येईल? कधी देईन त्याला स्वच्छ असे हे अंथरूण? कधी त्याच्यासाठी गादी घालीन, वर स्वच्छ चादर घालीन, उशाला सुंदर उशी देईन? कधी मी त्याची अशी प्रेमपूजा करीन? कोठे गेला गुणा? तो काय खाईल, कोठे झोपेल, काय पांघरील, काय अंथरील? परंतु तो असेल का, जिवंत असेल का? हो असेल. नाही तर मी जिवंत राहिलो नसतो. माझे प्राणही उडून जाते.

इतक्यात त्याच्या नावाने पोस्टमनने हाक मारली. तो उठला. त्याच्या नावाने क्वचितच कधी पत्र येत असे. धावतच तो खाली गेला. पत्र दादाच्या हातात होते. दादा फोडणार होता. झडप घालून ते जगन्नाथने घेतले. दादाकडे कठोर दृष्टीने त्याने पाहिले. जगन्नाथने हस्ताक्षर ओळखले. ते चिरपरिचित अक्षर होते. गोड गोड अक्षर. त्या अक्षरातच मेळ्याचे संवाद लिहिलेले होते. गुणाची बोटेच, ती कलावंत बोटेच असे मोत्यांसारखे लिहीत असत.

ते पत्र घेऊन जगन्नाथ आपल्या खोलीत गेला. ते पत्र गुणाचे होते. आणखी कुणाचे नव्हते. कुणाचे असणार? परंतु पत्रात काय असेल? जगन्नाथला भीती

वाटत होती. पत्रात काय असेल? सुखरूप असेल का गुणा? की दुसरे काही असेल? कोठे गेला ते लिहिले असेल का? त्याला घेऊन येईन परत; परंतु दूर दूर फार दूर गेला असेल तर, जगापासून दूर गेला असेल तर? मग का मीही जगापासून दूर जाऊ? आणि आई-बाबा? आणि मी आता एकटा नाही. दुसऱ्याही एका जिवाचे सुख-दु:ख माझ्याशी बांधले गेले आहे. डोक्यावर शिरपूरचीही जबाबदारी आहे.

जगन्नाथने पाकीट फोडले. आत सुंदर पत्र होते. गुणाचे पत्र. प्रेमाने थबकलेले पत्र भावनांनी रंगलेले पत्र. ते पत्र नव्हते. ते हृदय होते. स्नेहमय उदार हृदय. पितृभक्ती व मित्रप्रेम त्यांच्या झगड्यात तडफडणारे दु:खी हृदय.

''जगन्नाथ, मी कुठेही असलो तरी तुला स्मरेन. तू माझ्याजवळ आत-बाहेर आहेस. तुझा रेशमी सदरा माझ्याजवळ आहे. तो अंगात घालीन. वाटेल की तू जवळ आहेस. जीवन वेढून राहिला आहेस. बाबांचं म्हणणं अज्ञातवासात राहावं. मी कबूल केलं आहे; परंतु या अज्ञातवासातही तुझ्या प्रेमाचा सुवास भरून राहील. तू दु:ख करू नको. तू मला शोधू नको. एके दिवशी आपण पुन्हा सारे भेटू. पुन्हा पद्मालयाच्या तळ्यात पोहू. जंगलात फिरू. मोरांची पिसं गोळा करू. एकमेकांच्या कानांत ती अडकवू. येईन, पुन्हा येईन. वेळ येईल तेव्हा. आई-बाबा सांगतील तेव्हा. ईश्वराची इच्छा असेल तेव्हा; परंतु पुन्हा भेटू व परस्पर अपार प्रेम लुटू. कदाचित या वियोगाने आपण अधिकच जवळ येऊ. अधिकच परस्परांचे होऊ. अधिकच परस्परांच्या जीवनात मुरू, भरून उरू हो गड्या!

''रडू नको. रुसू नको. हस रे माझ्या गड्या.''

''आपण मोठे होऊ तेव्हा भेटू; मग पुष्कळ काम करू. तूही तेव्हा मोठा झालेला असशील. स्वतंत्र असशील. तुझे पंख मग कोणी छाटणार नाही. तू उड्डाण करू शकशील. तू तुझी संपत्ती सेवेत ओत. मी माझं जीवन ओतीन. दयाराम भारती माझ्या मनात आहेत. तू आहेस; व गरीब जनताही मनात आहे.

''तुला किती लिहू, किती आठवू? शब्दांत नाही रे सारं सांगता येत. भावना प्रकटवायला शब्द पुरे नाही पडत. हे पत्र म्हणजे खूण समज. त्यातील अनंत अर्थ आपोआप वाच. मी एरंडोल सोडलं. काय आहे बरोबर? माझी सारंगी आणि व तुझ्या आठवणींनी, तुझ्या प्रेमाने तुडुंब भरलेलं हृदय आहे. काठोकाठ भरलेलं

हृदयाचं भांडं आहे. ते मी पीत जाईन. हे भांडं कधी रिकामं होणार नाही. हे अमृत मला सदैव तारील, धीर देईल हो जगू!''

किती तरी गोष्टी त्या पत्रात होत्या. त्या जगन्नाथलाच वाचू दे. त्या शब्दांचा, त्या शब्दांतील भावनांचा वास त्यालाच येऊ दे, त्यातील रस त्यालाच पोटभर पिऊ दे. कितीदा तरी त्याने ते पत्र वाचले. कितीदा त्याने ते हृदयाशी धरले. अश्रूंनी भिजविले. बोटांनी हृदय पोखरून आत ठेवू पाहिले. ते पत्र जवळ धरून तो अंथरूणात पडला व झोपला.

तो खिन्न होता, दु:खी-कष्टी होता. सायंकाळी तो मळ्यात गेला. त्या विहिरीजवळ आज तो बसला होता. सोनजीने सोनचाफ्याची फुले आणून दिली; गुलाबाची फुले दिली.

''का असा दु:खी भाऊ? तू नको दु:खी होऊ, तू हसलास तर आम्ही हसू. तू एक या घरात आहेस, अनाथांचा वाली. खरा जगन्नाथ. हस रे भाऊ,'' सोनजी म्हणाला.

जगन्नाथ हसला. त्या फुलांचा त्याने वास घेतला. तो उठला. सोनजीच्या एका मुलीच्या कानात त्याने फूल घातले. हसला. ती लहान मुलगी लाजली. पळाली.

''आई, ते बघ,'' ती म्हणाली.

''त्यांना नमस्कार करू. ते देवबाप्पा आहेत,'' जनीआई म्हणाली.

जगन्नाथ गेला. अंजनी नदीच्या तीरावर बसला. आज तो एकटा होता. फिरायला आलेले कोणीकोणी त्याच्याकडे पाहात होते. एकटा जगन्नाथ पाहून त्यांना वाईट वाटत होते. अंजनीच्या तरंगांवर जगन्नाथने काही फुले सोडली. मित्राला वाहिली. तो घरी आला व खोलीत गेला. दिवा लावलेला होता. त्याने गुणाच्या फोटोला ती फुले वाहिली. दोन उदबत्त्या लावल्या. गुणाला उदबत्ती फार आवडायची. जगन्नाथकडे आला की तो उदबत्ती लावायचा. जणू हृदयातील मैत्रीच्या कस्तुरीचा सुगंध बाहेर दरवळावा असे त्याला वाटे.

त्याने हातात कंदील घेतला आणि गुणाच्या फोटोकडे तो पाहात राहिला. प्रेममय देव! त्याने आता कंदील कमी केला. त्याला तो प्रकाश नको वाटला. प्रेमाच्या प्रकाशात तो आपल्या मित्राला पाहात होता. तो सर्वत्र त्याला दिसत

होता. खोलीत व खोलीच्या बाहेरही. त्याने खिडकीकडे पाहिले. वाटे तेथून गुणा हसत आहे. लबाड गुणा.

आईने हाक मारली. ती वरच आली.

''अरे, अंधारात काय करतोस? कंदील नाही का लावलास?''

''तो रॉकेलचा कंदील. तो नको. आज दुसरा दिवा मी लावला आहे.''

''बॅटरी ना?''

''हो प्रेमाची बॅटरी. वाटेल तेव्हा तिचा प्रकाश पाडता येतो, डोळे न दिपवणारा, गोड गोड प्रकाश.''

आईसाठी जगन्नाथ दोन घास खाऊन आला. तो वर आला. गुणासमोर बसला. गुणाला आवडणारे गाणे त्याने म्हटले. अहाहा! किती मधुर मधुर आवाजात त्याने म्हटले तो आवाज नव्हता, आवाजाचे रूप घेतलेले प्रेम होते, भावना होत्या. गाणे संपले आणि गुणाचे पत्र जगन्नाथने हाती घेतले. ते अंधारात प्रेमप्रकाशात त्याने वाचले. बोटांनी वाचले. ते पत्र हृदयाशी धरून तो अंथरूणावर पडला. स्वप्नसृष्टीत तो रमून गेला. स्वप्नातही ते पत्र तो हृदयाशी धरीत होता.

सकाळ झाली. जगन्नाथ अंथरूणातच होता. समोरच्या भिंतीवरचे गुणाचे फोटो पाहात होता; परंतु एकदम त्याने तोंडावरून पांघरूण घेतले. तो दुःखी होता. ''गुणा, कुठे असेल माझा गुणा', असे स्वःशीच बोलत होता.

आई हाक मारायला आली.

''ऊठ, जगन्नाथ.''

त्याने तोंडावरून पांघरूण काढले नाही, ''गुणा, कुठे असेल गुणा,'' एवढेच शब्द पांघरुणातून बाहेर येत होते.

''येईल हो गुणा. तुझे प्रेम त्याला आणील. ऊठ.''

जगन्नाथ उठला. तो रडवेला झाला होता. तो आईला सद्‌गदित होऊन म्हणाला.

''आई, खरंच, कुठे ग असेल गुणा?''

✦✦

आगगाडीत भेटलेला देव

पहाटेच्या वेळेसच स्टेशनवर रामराव, त्यांची पत्नी व गुणा येऊन पोहोचली. गाडी परत गेली. गाडीवानास काही बोलू नको असे रामरावांनी सांगितले. गाडीवानाच्याही डोळ्यांत पाणी आले. रामरावांकडे त्याचे घरोब्याचे संबंध होते. पूर्वीपासून ऋणानुबंध होते. गाडीवानाने परत गाडी हाकली. इकडे तिघे स्टेशनवर बसली. कोणीही ओळखीचे भेटू नये असे रामरावांना वाटत हाते. हीच एक त्यांची प्रार्थना सुरू होती.

गुणा प्लॅटफॉर्मवर हिंडत होता. आकाशातील थोड्याशा उरलेल्या तेजस्वी व निर्मळ ताऱ्यांकडे तो पाहात होता. त्याला जगन्नाथची आठवण येत होती. सकाळी लवकर ये म्हणून त्याने पुन्हा पुन्हा सांगितले होते; परंतु केवढी निराशा त्या प्रेमळ हृदयाशी होईल. घराला कुलूप लागलेले पाहून तो काय म्हणेल? आणि माझे पत्र मिळेल. मिळेल का पण? का त्याच्या दादाच्या हातात पडेल? दुष्ट आहे तो! त्याने फाडून टाकले तर? जगन्नाथला काहीच कळणार नाही. काय म्हणेल तो! परंतु बाबांची इच्छा आहे काही कळू नये, काही कळवू नये. त्यांची इच्छा प्रणाम.

आता उजाडले. त्यांनी तोंडे धुतली. उजाडत गाडी होती. थोड्या वेळाने गाडी आली. स्टेशनवर आज हे तीनच जाणारे. तिघे एका डब्यात बसली. गाडी सुरू झाली. जळगावपर्यंत तिकिटे काढली होती. जळगावला पुढे कुठली तरी काढायची. खानदेश सोडून दूर दूर त्यांना जायचे होते. प्रिय, सुपीक समृद्ध खानदेश! काळ्या काळ्या मातीचा खानदेश! मेहरुणच्या बोरांचा गोड खानदेश! सुंदर कपाशी पिकवणारा खानदेश! काळी काळी माती, आणि तिच्यात पिकणारा पांढरा पांढरा कापूस!

आणि ती उंच ज्वारी! एका कणसातून अधोलीभर दाणे देणारी ज्वारी! आणि ती धान्याची सुकुमार शेते. हिरव्या मृदू गालिचावर बारीक शुभ्र फुलांचा गालिचा जणू. धान्याचा हंगाम असला म्हणजे खानदेशातील खेड्यांतून कसा घमघमाट सुटलेला असतो! परंतु अशी शेते आता पुन्हा कोठे पाहायला मिळणार? खानदेशात काय होत नाही? सारे होते. हजारो पल्ले शेंग होते. उडीद होतो, तूर होते, गहू होतो, ममुराबादचा गहू दिल्लीचा बादशाह नेत असे. इतका तो प्रसिद्ध. येथे संत्री होतात, मोसंबी होतात. येथील पेरू फारच गोड. अंजीर व द्राक्षेही लोक करू लागले. गावोगाव दाट आमराया आणि रसाळ केळी! खानदेशी केळी दिल्लीपर्यंत जाता व महाराष्ट्राचा रसाळपणा गाजवतात.

खानदेश निसर्गदृष्ट्याच सुंदर व समृद्ध आहे असे नाही. तापी, गिरणा, पांझरा, पूर्णा वगैरे नद्यांनी खानदेशच्या भूमीलाच समृद्ध केले असे नाही, येथे बुद्धी व हृदय यांचाही विकास झाला. जगाला ललामभूत अशी अजिंठ्याची लेणी खानदेशनेच दिली. अजिंठ्याची चित्रकला अनुपम आहे! किती सहजता व उत्कटता तेथील चित्रांत आहे! किती नाजूक छतावरचे नकाशे, डिझाइन्स! आणि प्रख्यात ज्योतिषी भास्कराचार्य या खानदेशचेच. येथे कला फुलल्या, विद्या फुलली. फुलामुलांचे बालकवी झाले! आणि संतांचे पावित्र्य फुलले. ते प्रसिद्ध संत श्रीसखाराममहाराज! झोपडीला काडी लावून दरवर्षी वारीला निघायचे व म्हणायचे मागची चिंता नको! भजन चालू असताना साप आला तरी प्रेमाने भजन चालू ठेवणारे! ज्यांच्या जयजयकाराने सारा खानदेश निनादून जातो!

आणि तो शेंदुरणीचा कडू तेली! भजनात मस्त होऊन जाताना निंबाची फांदी ज्याच्या डोक्यावर जोराने लागली; परंतु ती कडू फांदीच गोड

होऊन गेली! संताला मारणारे होत तारणारे होतील! संताजवळ विष न्याल ते अमृत होईल!

आणि गिरणेच्याच काठी कण्व ऋषींचा आश्रम होता आणि खानदेशातील सातपुड्यावरच त्या थोर आर्य ऋषींचे, अगस्ती ऋषींचे स्थान! खानदेशात राम, लक्ष्मण, सीता राहिली, पांडव राहिले. खानदेशांत चांगदेव नांदला, मुक्ताबाईने मोक्षसुख मिळविले प्यारा प्यारा खानदेश!

येथे मन्सारामसारखे वीर झाले. देवी अहिल्याबाईचे खानदेशात राज्य. शिरपूरजवळील एका खेड्यात पाणी नव्हते म्हणून तेथे अहिल्यादेवी मुक्काम करून राहिली, पाणी लागेपर्यंत राहिली; आणि मुसळासारखा झरा लागला. जणू देवी अहिल्येची हृदयातील अनंत करुणा व धर्मताच तेथे प्रकट झाली! ज्या तव्यावर अहिल्याबाई भाकरी भाजी तो तवा तेथे साक्ष देत आहे!

खानदेशातील इतिहास अनंत आहे. खानदेश म्हणजे अनेक क्रांतीचे स्थान येथे शेकडो पडक्या राजधान्या आहेत. कोठे नाणी सापडतात, कोठे मूर्ती सापडते. खानदेशचा इतिहास अद्याप जमवावयाचा आहे. ठायी ठायी तो पडलेला आहे. झुलत्या मनोऱ्यांतून, हत्तीच्या पोटांतून तो बोलून राहिला आहे. भडगावचा लाडकूबाईचा भव्य वाडा शनिवारवाड्याहून भव्य होता असे इतिहासवेत्ते तात्यासाहेब केळकर म्हणाले! बांडे, देशमुख, कदम, पवार, शेकडो सरदार येथे चमकले. मल्हारीचा जो मल्हारराव झाला तो खानदेशाचाच. तळोद्याजवळ मामाच्या शेतात काठी घेऊन बाजीरावाच्या घोड्यास त्याने अडविले! तेथेच ते झाड ज्याच्या खाली मल्हारी झोपला असता, त्याच्या तोंडावर सापाने फणा धरली! किती या खानदेशच्या कथा, रोमांचकारी कथा! आणि महर्षी सेनापती बापटांना अज्ञातवासात खानदेशने सांभाळले!

खानदेश म्हणजे हिंदुस्थानचे मिलनस्थान. येथे हिंदी, गुजराथी, मराठी भाषा मिसळल्या. येथे रजपूत आले. काठेवाडतून लोक आले. शेकडो जाती-जमाती या खानदेशात. सारे गुण्यागोविंदाने नांदू लागले.

खानदेशातील संपत्तीला सीमा नव्हती. पहिले बाजीराव नंदुरबारवर स्वारी करणार तर व्यापारी म्हणाले, ''स्वारी कशाला? काय पाहिजे ते कळवा.''

बाजीरावाने एक लाख रुपये मागितले. व्यापाऱ्यांनी एका शिक्क्याचे रुपये खटाऱ्यांतून भरले व बाजीरावांकडे पाठवले. चिठ्ठी लिहिली की,

''एक लाख मोजून घ्या, बाकी परत करा!''

हत्ती विकायला आले तर अधोल्यांनी पैसे मोजीत व हत्तींची किंमत देत.

गुणाच्या डोळ्यांसमोर हा सारा इतिहास उभा राहिला. पूर्वीचा इतिहास! तेजस्वी इतिहास! पुन्हा नाही का मी खानदेशात येणार? पद्मालयाच्या तळ्यात डुंबणार? झाशीच्या राणीचे पारोळे पाहाणार- ज्या पारोळ्याच्या विणकरांची कला सर्वत्र गाजली होती! इकडून पाहावे तो एक छटा, तिकडून पाहावे तर दुसरी छटा! अशी अपूर्व विणाई! नाही का ही ठिकाणे तो पुन्हा पाहणार!

नवीन इतिहास निर्मायला तो नाही का खानदेशात येणार? खानदेश नवीन इतिहास निर्मित आहे! महाराष्ट्रात प्रथम खानदेशातच महात्माजींच्या पद्धतीचे आश्रम सुरू झाले. प्रथम खानदेशातच खादी निर्माण होऊ लागली. खांद्यावर खादी घेऊन तरुण त्यागी सेवक खानदेशातून हिंडू लागले. झाडू घेऊन खेडी साफ करू लागले. खानदेशातीलच स्वयंसेवक १९३० मध्ये आधी महाराष्ट्रभर गेले. घणसोळीला गेले. रत्नागिरीकडे गेले. हिंदू-मुस्लिम ऐक्याची मूर्ती ते प्रेमसिंधू मीर शुक्रल्ला, रत्नागिरी जिल्ह्याला वेड लावते झाले. त्यांची आठवण तिकडे अद्याप सुवास देत आहे! खानदेशातून जितकी लहान मुले तुरुंगात गेली, तितकी कोणत्या जिल्ह्यातून गेली असतील? तो बारा वर्षांचा मधू मदाने धुळे तुरुंगात होता! कशी तो उत्तरे देई, किती तेजस्वी! तो सुभान, तो प्रल्हाद, तो शिवराम, तो जयराम! गव्हर्नरला काळी निशाणे दाखविणारे ते, राम, बन्सी वगैरे बालवीर! गव्हर्नरला काळी निशाणे दाखविण्यासाठी तो शरीराने तीन फूट उंच; परंतु मनाने हिमालयाच्या हिमतीचा नांदेडचा शिवराम नाशिकला पायी गेला. आणि यावल येथे त्याला साम्राज्य सरकारने फटके मारले! खानदेशातील मुलांनी 'वंदे मातरम्' व 'महात्मा गांधी की जय' असा घोष करीत फटके खाल्ले! आणि खानदेशातील भगिनी! काँग्रेसच्या प्रचारासाठी त्यांनी घरेदारे सोडली. काँग्रेसचा प्रचार म्हणजे जणू पवित्र यात्रा. पायांत काही न घालता त्या उन्हातून हिंडत, थंडीतून हिंडत! ओठांवर देशभक्तीची गाणी, खांद्यावर राष्ट्रपताका! मासिक झेंडावंदनासाठी

भगिनी गीताबाईसारख्या शेतकरी स्त्रिया चिखलातून, पावसातून सहा सहा कोस जात! आणि मुळशीच्या सत्याग्रहात खानदेशातील स्त्रिया गेल्या होत्या!

देशभक्तीची, त्यागाची ज्योत पेटवणारे ते अण्णासाहेब दास्ताने, ते बाळूभाई, ते ठकार! मानाची नोकरी सोडून देशाला जीवन देणारे व तरुणांना वेड लावणारे त्यागमूर्ती धनाजी नाना! ते सेवापरायण सुकाभाऊ व छातीवर लाठीमार घेणारे सीतारामभाऊ व रक्त रंगणारे वीर मल्हारी! तुरुंगात असताना प्रिय पत्नी मरण पावली व त्यानंतर वैराग्याने राहणारे सत्यमूर्ती शंकरभाऊ व त्यांच्या उदाहरणाने पेटलेले सीताराम, पंढरी वगैरे मारवाडी युवक! "मारवाडी सावकारांची पापं धुवायला आमच्यासारख्यांनी पुष्कळ वर्षं बलिदान केलं पाहिजे, तेव्हा कोठे थोडं प्रायश्चित घेतल्यासारखं होईल," हे शंकरभाईंचे बोल. आणि एके काळी सावकारांना दरारा बसवणारे; परंतु आता केवळ अहिंसामय बनलेले निर्भय, कष्टाळू, निःस्पृह व त्यागी हरिभाऊ चव्हाण! तुरुंगात त्यांनी भंगीकाम मिळावे म्हणून सत्याग्रह केला.

तुरुंगातील फत्तरगाडीवाल्यास, मे महिन्यातील उन्हात, तीन तीन फेऱ्या करायला लावीत, त्या बंद पाडणारे; फत्तरगाडीच्या लोकांस पायात चपला द्या असे सांगणारे, नाही तर उपवास करतो म्हणणारे, असे ते हरिभाऊ! सण असला तरी गोड पोळी नको म्हणणारा गोविंदा आणि सेवेशिवाय ज्यांना सुख नाही ते सखारामभाऊ! आणि ते नवलभाऊ! त्यागी व ज्ञानाची लालसा असलेले! निःस्पृह व कष्टाळू! आणि गुजरमंडळीत ज्योत पेटवणारे ते स्वर्गीय बभूता गुलाल व त्यांचे काम पुढे चालवणारे त्यांचे पुत्र मंगेशभाई, शंकरभाई वगैरे तरुण! कामगारांत नवजीवन ओतणारे भाई नथुभाऊ, आंबोडेकर, वसंतराव भागवत वगैरे त्यागमूर्ती! साक्षरतेचे वेड लागलेले गंधे! प्रकाशमंडळे स्थापणारे बालमूर्ती मोहाडीकर व त्यांचे सहकारी! आणि दारू पिणारे; परंतु गांधीजींची दांडी यात्रा पाहून विरक्त झालेले, गांधीटोपी मिळावी म्हणून पायी चाळीस कोस जाणारे ते सत्याग्रही व निष्ठावंत नथुसिंग. किती ज्ञात, अज्ञात स्त्रीपुरुष खानदेशात कामे करीत आहेत! ठिकठिकाणी युवक मंडळे, तरुण संघ, प्रकाश मंडळे, अभ्यास मंडळे व विद्यार्थीसंघ निघत आहेत. खादी सेवा संघ, हरिजनसेवा संघ, कामगार युनियन्स, किसान संघ निघत आहे. खानदेश नवा इतिहास निर्मित आहे.

महात्माजींच्या शेगावभोवती आज सारे राजकारण व विधायक काम केंद्रिभूत झाले आहे. तेथे पूज्य विनोबाजींना जास्तीत जास्त कार्यकर्ते कोठून मिळाले? खानदेशने दिले खानदेशचे सुकाभाऊ, खानदेशचे सखारामभाऊ! खानदेशचे चावदसभाऊ! खानदेशचा विणकर कार्याचा प्रमुख देवीदास, खानदेशचा चर्मालयातील तज्ज्ञ प्रेमळ भिका. खानदेशचा पंढरी, विरक्त व निरहंकारी! पूर्वीचा इतिहास व नवीन इतिहास! खानदेशात चैतन्यज्योत आहे; परंतु मी नाही का या कामांत भाग घेणार? मी का या परंपरेपासून तुटणार? मी का कोठे तरी दूर जाणार? माझा प्रिय, पूज्य खानदेश!

गुणाच्या डोळ्यांत पाणी आले. खिडकीतून धारा खाली गळत होत्या. जणू खानदेशच्या भूमीला तो भक्तिप्रेमाची अर्घ्य देत हाता. अश्रूंची फुले वाहत होता. त्याने डोळे पुसले. त्याने सारंगी काढली. हृदय भावनांनी भरून आले की कलेचा आश्रय करावा. कलेच्या द्वारा भावना ओताव्या व हृदय हलके करावे! गुणाने सारंगी घेतली. तो वाजवू लागला.

प्रिय हा खानदेश माझा।।
काय उणे त्या, काय कमी त्या
भाग्यशाली राजा ।।प्रिय०।।
म्लान न होई, दीन न होई
सतत हरित ताजा।।प्रिय०।।
सदा अंतरी, एक हा धरी
राष्ट्रभक्तिकाजा।।प्रिय०।।

गुणा गाणे आळवीत होता. मधूनमधून तो हळूच गाण्याचे चरणे गुणगुणे. पाळधी स्टेशन आले. त्याने सारंगी बंद केली. आता पुढे जळगावच येणार. पाळधी सोडून गाडी निघाली. गिरणेचा भव्य पूल लागला. आता गिरणा पुन्हा थोडीच दिसणार होती! सदैव गुणगुणणारी ती गिरणा! जिच्या काठी टरबुजे, खरबुजे, गूळंभेल्या, साखरपेट्या अधिक गोड लागतात, ती ही गिरणा! गिरणेचा पूल संपला व एरंडोल तालुक्याची हद्द संपली. जळगाव आले. सारी मंडळी खाली उतरली. तिघांनी थोडे खाल्ले. पुन्हा गाडी दोन तासांनी होती, मुंबईकडे जाणारी गाडी!

''बाबा, कुठे जायचं?''

"आधी नाशिकला जाऊ."

"तिथे उतरायचं कुठे?"

"उतरू एखाद्या धर्मशाळेत."

रामरावांनी तिकिटे काढली. गाडी आली. गाडीत फारच गर्दी होती. कसेतरी एका डब्यात सारे सामान ठेवून तिघे एकदाची वर चढली; परंतु बसायला जागा नव्हती. तेथे दाराच्या तोडाशी रामराव, गुणा व गुणाची आई उभी होती. गाद्या पसरून काही लोक बसलेले होते; दिवस होता तरीही काही झोपलेले होते. कदाचित रात्री ते असेच उभे असतील. आता जागा मिळाली म्हणून ते झोपले असतील.

गुणाने सारंगी हाती घेतली व तो ती वाजवू लागला. ती सारंगी त्याची मैत्रीण, त्याचा आधार. तारा छेडताच लोक चमकले! मधुर नाद कानांत जाताच लोक पाहू लागले. संगीताने साप डोलतात, हरणे वेडी होतात, गाई ठायींच्या ठायी थबकतात, स्तब्ध राहतात! संगीताने शिळा पाझरतात, नद्यांचे पाणी वाहावयाचे थांबते. मग माणसे नाही का पाझरणार?

गुणा रंगला. त्याला जगन्नाथची आठवण झाली आणि त्याच्या डोळ्यांतून पाणी आले. डोळे मिटून तो वाजवू लागला.

शांत, मधुर, गंभीर दृश्य! जणू भिकारी होऊन तो तेथे उभा होता. तो राग संपला. त्याने प्रेमळपणाने समोर सर्वत्र पाहिले. लोकांच्या चेहऱ्यावर प्रेमळपणा आला होता. उदासीनपणा जाऊन सहानुभूती फुलली होती.

"ये बाळ, इकडे ये," कोणी म्हटले.

"माझ्या आईबापांना बसायला जागा द्या. मी उभा राहीन, मी तरुण आहे; त्यांना बसू दे." तो म्हणाला.

"या, इकडे या सारी. माझ्या गादीवर बसा. या, ये बाळ. तिघे या," एक सज्जन म्हणाला.

"चल आई, चला बाबा," गुणा प्रेमळपणे म्हणाला आणि तिघे तेथे जाऊन बसली. गुणाला कृतज्ञता वाटली. त्याने पुन्हा तारा छेडल्या आणि पुन्हा एक सुंदर राग त्यानं आळविला. लोक वेडे झाले. गुणाकडे आदराने पाहू लागले.

"किती सुंदर वाजवता तुम्ही? कुठे जाता?" त्या उदार गृहस्थाने विचारले.

"आता नाशिकला जात आहोत."

"राहणारे कुठले?"

"खानदेशचे."

"नाशिकला बदली वगैरे झाली वाटतं?"

"नाही. आम्ही काहीं आपत्तीमुळे खानदेश सोडून, घरदार सोडून जात आहोत. कुठे जायचं ते ठरलेलं नाही."

"परंतु नाशिकला काय करणार?"

"कोणाला माहीत? एखादी खोली घेऊ व राहू. मी रोज भिक्षा मागेन. रस्त्यांतून सारंगी वाजवीत हिंडेन. आईबापांना पोशीन. ही सारंगी हीच आमची इस्टेट."

"तुम्ही फार अडचणीत आहात, संकटात आहात."

"हो."

"म्हणून तुम्हांला मघाशी वाईट वाटत होतं, होय ना?"

"म्हणून नाही. मला माझ्या मित्राची आठवण आली. आम्ही आमचं गाव गुपचूप सोडलं. माझ्या मित्रालाही मी कळवलं नाही. बाबा म्हणाले कुणाला सांगू नको. माझा मित्र फार सुंदर गातो. मी त्याची साथ करतो. आम्ही एकमेकांना कधी विसंबत नसू. लहानपणापासून मित्र! आज बारा वर्षं आम्ही एकत्र उठलो-बसलो, खेळलो-हसलो, रडलो-रागावलो, त्याला माझी आठवण येत असेल! तो रडेल, दुःखी होईल, मलाही त्याची आठवण येऊन वाईट वाटलं." आणि सांगता सांगता गुणा सद्‌गदित झाला. तो सद्‌गृहस्थही जरा विरघळला. तो खानदानी दिसत होतो, मोठ्या घराण्यातील दिसत होता. तोंडावर सौजन्य व सत्संस्कार दिसत होते. ज्याला पाहताच आदर वाटेल असा तो होता.

"तुम्ही शाळेत नाही शिकलेत?"

"शाळेत जात होतो; परंतु आता कुठली शाळा? अपुरंच राहिलं शिक्षण; परंतु मला वाईट नाही वाटत! ही एक कला मजजवळ आहे, पुरे आहे तेवढी. आणखी काय पाहिजे?"

"तुम्ही इंदूरला याल?"

"तिथे येऊन काय करायचं?"

''इंदूर रसिकांचं माहेरघर, संगीताचं स्थान. तिकडे याल तर अडचण पडणार नाही. मी इंदूरला राहतो, माझं घरच आहे तिथे. तुम्ही या, तुमची काही व्यवस्था करता येईल. माझ्या मुलीला तुम्ही वाजवायला शिकवा. आजपर्यंत मी पुष्कळ वेळा सतार-सारंगी ऐकली; परंतु तुमच्या बोटांत काही विलक्षण जादू आहे यात शंका नाही. या तुम्ही, तेथे बरेच जहागीरदार, इनामदार, सरदार, दरकदार अद्याप नांदत आहेत. त्यांच्यातून शिकवण्या मिळतील. वीस-पंचवीस रुपये कमीत कमी. राहता येईल लहानशी खोली घेऊन. इंदूरला वाटलं तर तुम्हांला शिकताही येईल. तुमचं कुठपर्यंत शिक्षण झालं?''

''सहावी झाली आहे.''

''वा. मग मॅट्रिक व्हाल. कॉलेजात जा. तुम्हाला शिकण्याची हौसच नाही की हौस आहे?''

''शिकावंस तर मला वाटे. मला डॉक्टर व्हायची इच्छा असे. आजारी, गोरगरीब पाहिले म्हणजे मला वाईट वाटे. मनात येई मी डॉक्टर असतो तर? परंतु ही माझी इच्छा मी कधी कुठे बोललो नाही.''

''तुम्हाला डॉक्टरी काय करायची? तुम्ही सारंगी वाजवाल व रोग्याला हसवाल, उठवाल, बरा कराल. डॉक्टरीची औषधे महाग, ती इंजक्शने महाग. गरिबांना ती थोडीच घेता येतात! आणि तुम्ही तरी मोफत कोठून देणार?''

''मला निराळा डॉक्टर व्हायचं होतं. निसर्गोपचाराचा डॉक्टर. आमच्या तालुक्यात पद्मालय म्हणून निसर्गसुंदर स्थान आहे. मला वाटे की तिथे निसर्गोपचार मंदिर स्थापावं. हवा, पाणी, प्रकाश, माती वगैरेंचे उपचार करावेत. डॉ. कुन्हे यांची पध्दती शिकावी. होमिओपॅथीचाही अभ्यास करावा. किती विचार माझ्या मनात येत; परंतु सारे लपवून ठेवले. कधी कुठे बोललो नाही. आमच्या तालुक्यात ग्रामसेवेची पुष्कळ कामं सुरू आहेत. खादी, कागद वगैरे ग्रामोद्योगांना खूप चालना मिळत आहे. आम्ही खेड्यापाड्यांतून मेळे घेऊन हिंडत असू, विचारप्रसार करीत असू. मला वाटे की आपण पुढे कोणती सेवा करावी? असं डॉक्टर होता येईल का? निसर्गोपचारी डॉक्टर! परंतु आता काय? आता ही सारंगी आहे, तिच्यात मन रंगेल. मी लोकांना ती ऐकवीन. माझ्या आईबापांस ऐकवीन. आनंद पसरीन. खरं ना बाबा?''

होय हो बाळ. तुझ्यासाठी मला काही ठेवता आलं नाही ना घरदार, ना शेतवाडी. तुला शिकवता आलं नाही, तुझे मनोरथ मातीत मिळवावे लागत आहेत. दरिद्री तुझा पिता परंतु एक कला माझ्या मुलाला रावसाहेब मी दिली आहे; ती त्याला शिकवली आहे. जणू ती उपजतच त्याच्या बोटांत होती. गरिबीतही एक वस्ताद ठेवून त्याची मूळची कला मी वाढविली, ती कला बाळाला कमी पडू देणार नाही. ती त्याला जगात मित्र देईल. स्नेही देईल ती त्याला सहानुभूती मिळवून देईल. आधार मिळवून देईल. पिता म्हणाला.

"आता यांनीच नाही का प्रेम दाखवलं? तिथ बसायला जागा दिली." गुणा गोड स्वरांत म्हणाला.

"पुढेही जागा देईन. तुम्ही इंदूरला या सगळी. प्रथम माझ्याकडे उतरा; मग तुम्हाला राहायला जागा पाहू. होईल व्यवस्था. तुम्ही सारंगी शिकवा काहीना; पैसे मिळतील थोडे-फार. कॉलेजात जा पुढे. व्हा डॉक्टर. असे निसर्गोपचाराचे शिक्षण कुठे मिळते?"

"कलकत्त्याकडे आहे एक तशी संस्था, आणि अहमदाबादलाही निघणार होती; परंतु आधी मॅट्रिक व्हावं लागतं, कॉलेजमधंही काही शिक्षण घ्यावं लागतं, असं वाटतं. पाहू पुढे, जसं जमेल तसं."

"या तर खरे, हा घ्या माझा पत्ता, या पत्त्यावर पत्र टाका; स्टेशनवर मी येईन; सारं नीट होईल."

"तुम्ही जणू देवच भेटलात. कुणाला हिमालयात भेटतो, कुणाला पंढरपूरला भेटतो, आम्हाला आगगाडीत भेटला. आम्ही निराश होतो, निराधार होतो; तुम्ही एकदम आशा दिलीत. देवाघरचा वसंतवारा येतो व सुकलेली झाडे फुलतात; त्याप्रमाणे तुम्ही आलेत, आशा देणारा, दया दाखवणारा, प्रेम देणारा, तोच देव असे दयाराम भारती म्हणायचे,"

"हे दयाराम भारती कोण?"

"तुम्ही नाही ऐकलंत नाव त्यांचं? ते कुठले कोण आम्हालाही माहीत नाही; परंतु ते खानदेशात काम करीत, शेतकऱ्यांत हिंडत, त्यांची संघटना करीत, पेटवीत. पेटवीत खेडीपाडी. उठवीत पडलेल्या शेतकऱ्यांस. सरकारने त्यांना हद्दपार केलं आहे, खानदेशात यायला बंदी केली आहे. ते कुठे गेले असतील कोणास

माहीत? त्यांनीच गरिबांचे दु:ख पाहण्याचे डोळे आम्हांला दिले. आमच्या जीवनात त्यांनी क्रांती केली, त्यांनी आम्हांस माणसं बनवलं, आमच्यात ध्येयवादाची ज्योत त्यांनी पेटवली, कधी न विझणारी ज्योत- अमर निर्मळ ज्योत! त्यांनीच आम्हाला नवीन यथार्थ मूल्यमापन शिकवलं, कशाचं महत्त्व ते शिकवलं; एक प्रकारची नवदृष्टी त्यांनी दिली. कसे ते बोलत, कसे ते वागत! किती साधे! पाला खाऊनही राहावयाचे; परंतु साधे शांत दिसले तरी त्यांच्या मनात अंगार पेटला होता; गरिबांबद्दलच्या चिंतेची चिता पेटलेली होती; दयाराम भारती! किती सुंदर व गोड नाव! ते भारताचे होते, स्वत:ला त्यांनी पुसून टाकले होते. भारतासाठी ते जगत होते व भारतासाठी जगण्यातच त्यांचं खरं जीवन होतं. किती त्यांचं वर्णन करू? त्यांचे शब्द कानांत आहेत, त्यांची काळी-सावळी मूर्ती-धगधगीत वैराग्याची मूती, गरिबांसाठी तडफणारी, धडपडणारी. अन्याय बघून ज्वालायमान होणारी, ती करुण उग्र मूर्ती, सौम्य, स्निग्ध, रुद्र मूर्ती- माझ्या मनात आहे. जीवनाचं संगीत त्यांनी आम्हाला शिकवलं. गरिबांच्या जीवनात संगीत उरलं नाही. त्यांची हृदयवीणा तुटली आहे. कोण लावील तारा, कोण काढील तिच्यातून बोल? तुम्ही तरुण क्रांती करा. गरिबांची हाय हाय दूर करून तुटलेल्या तारा जोडा, संगीत निर्मा; असे ते आम्हा तरुणांस म्हणायचे. दयारामांचे अनंत उपकार!''

ते सद्गृहस्थ ऐकत होते.

''तुमची सारंगी गोड व तुमची वाणीही गोड. जणू दयाराम भारतीच माझ्यासमोर आहेत असं मला वाटलं. या तुम्ही इंदूरला. काय असेल तो असो. मला तुमच्याविषयी काही तरी वाटतं. माझ्या जीवनातील अज्ञात तार जणू छेडलीत. एक नवीन दालन जणू उघडलंत. मला सांगता येत नाही. या, तुम्ही खरंच या. इंदूरला या.''

''येऊ. आम्ही इंदूरला येऊ.''

''इंदूर किती दूर?'' रामराव म्हणाले.

''होय, इंदूर दूर नाही. ते आता तुमच्याजवळ आहे,'' तो सद्गृहस्थ म्हणाला.

आणि मनमाड स्टेशन आले. त्यांनी फराळ केला. त्या सद्गृहस्थांनी केळी वगैरे घेतली. गुणाला आग्रह करून करून त्यांनी दिली. त्याला कढत दूध त्यांनी दिले. रामराव व गुणाची आई यांनी चहा घेतला. जणू ती सारी एका कुटुंबातील झाली.

गाडी निघाली. गुणाने पुन्हा एक राग आळवला. सारे तटस्थ झाले. शांत झाले.

"जरा पडा आता," तो गृहस्थ म्हणाला.

आणि गुणा झोपला. त्या गृहस्थाच्या उशीवर डोके ठेवून झोपला. जगन्नाथकडे तो असाच झोपत असे. दुःखी मन झोपले. रामराव व ते सद्गृहस्थ बोलत होते.

"तुमचा मुलगा म्हणजे एक देवाची देणगी आहे तुम्हाला. कसं गोड बोलतो, गोड वाजवतो! किती भावनाप्रधान उदान मन, कशी गरिबांबद्दल विचार करणारी बुद्धी! आणि भावनोत्कट होऊन बोलू लागला म्हणजे तोंड कसं लाल होत जातं. खरंच देवाने तुम्हांला मोठी देणगी दिली आहे."

"परंतु अशा भावनाप्रधान मुलांची भीतीही वाटते. जातील तिथे जातील."

"परंतु त्याच्या सद्भावना आहेत. त्या त्याला तारतील."

"देवाला दया. सारं शेवटी त्याच्या हाती. तुमची आमची त्यानेच गाठ घातली. कुठे होती कल्पना! आम्ही खरोखर कुठे तरी चाललो होतो, दुःखाने वेडी होऊन चाललो होतो; परंतु तुम्ही भेटलेत. गुणा म्हणाला ते खरं, की तुम्ही देव भेटलेत."

"आणि तुमच्या मुलाच्या रूपाने मलाही जणू देव भेटला."

✦✦

दुःखी जगन्नाथ

गुणा गेल्यापासून जगन्नाथचे कशातही लक्ष लागेना, ना खाण्यापिण्यात, ना अभ्यासात ना हिंडण्या फिरण्यात, ना संगीतात. तो आपल्या खोलीत बसे; जणू पंख तुटलेला पक्षी, पिसारा गळून गेलेला मोर!

मॅट्रिकच्या परीक्षेस तो बसला; परंतु नापास झाला. त्याने आता शाळा सोडली. पुढे काय करायचे हा प्रश्न होता. आयुष्याचे काय करायचे? राहून राहून त्याच्या मनात हिंदुस्थानभर हिंडावे असे येई. गुणाची कदाचित भेटेल, कोठेतरी आढळेल गुणाला घेऊन परत येऊ असे त्याला वाटे; परंतु आईबापांना सोडून जाण्याचे त्याला धैर्य होईना. तो खेड्यापाड्यांतून हिंडू लागला, शेतकऱ्यांची स्थिती पाहू लागला, तो गावोगाव जाई, शेतकऱ्यांत बसे, त्यांचं दुःख ऐकी, त्यांचे प्रश्न पाही. सावकाराचा मुलगा; परंतु आपणात येतो, बसतो, आपल्या सुख-दुःखांशी एकरूप होतो, याचे त्यांना कौतुक वाटे. शेतकऱ्यांना कौतुक वाटे; परंतु भावांना राग येई. त्यांची भांडणे होत, कलागती होत.

शेवटी हे सारे भाऊ वेगळे झाले. त्याचे हिस्से पडले. शेतीवाडी, सावकारी, सारी वाटली गेली. जगन्नाथच्या वाट्याला पन्नास हजारांची सावकारी, रोख दहा

हजार रुपये, शिवाय जडजवाहीर, शिवाय शेतीवाडी, काही घरे असे आले होते. गुणाचे घर त्यांनीच लिलावात घेतले होते, त्या घरात धन आहे असे वडीलभावास वाटत असे; परंतु जगन्नाथचा हट्ट की ते घर आपल्यासच मिळावे, म्हणून शेवटी ते त्याला देण्यात आले.

वडिलोपार्जित घरी मोठा भाऊ राहू लागला, जगन्नाथ दुसऱ्या एका घरी राहायला गेला; आईबाप अर्थात त्याच्याजवळ राहिले. लहान मुलाला सोडून ते कोठे राहाणार?

जगन्नाथने गुणाचे सारे घर झाडून काढले. गुणा कधी आला तर घर स्वच्छ असावे. रोज आपला गडी पाठवून ते घर तो झाडून ठेवी. गुणाची जी खोली होती, त्या खोलीत त्याने गुणाचा एक वाढवलेला मोठा सुंदर फोटो लावला. तेथे एक सुंदर बैठक घातलेली असे, त्या फोटोला तो फुलांचा हार घाली. एरंडोलला असला म्हणजे जगन्नाथ गुणाच्या घरी गेल्याशिवाय राहत नसे. कधी कधी रात्री जाई व गुणाच्या फोटोसमोर गाणे म्हणे. वारा ते गाणे गुणाकडे घेऊन जाईल का? वाऱ्याला भावना असतील, तो सहृदय असेल तर नेईल ते गान व गुणाला अर्पील.

शिरपूरहून जगन्नाथची पत्नी आता एरंडोलला आणावी असे जगन्नाथचे आईबाप म्हणू लागले. येण्याऱ्या-जाण्याऱ्यांजवळ ते तसे बोलत. वास्तविक जगन्नाथ फार मोठा नव्हता, वीस वर्षांचा असेल; परंतु जुन्या ठरवलेल्या लग्नात पुष्कळदा हीच अडचण होते, मुलगी लवकर प्रौढ होते; परंतु मुलगा तितका प्रौढ होत नाही. जगन्नाथची पत्नी पंधरा-सोळा वर्षांची होती; परंतु जगन्नाथचे अद्याप वाढण्याचे वय होते, घर सोडून जाण्याचे विचार त्याच्या मनात अधिकच बळावले.

इतक्यात एके दिवशी वर्तमानपत्रात एक बातमी आली. दयाराम भारती हुकूमबंदी मोडून पुन्हा खानदेशात आले, त्यामुळे त्यांना पकडण्यात येऊन त्यांना धुळे जेलमधाये स्थानबद्ध करून ठेवण्यात आले आहे, अशी ती बातमी होती. ती बातमी जगन्नाथने पुन्हा पुन्हा वाचली, दयाराम आले, ते धुळे तुरुंगात आहेत, आपण त्यांना भेटून यावे असे त्याच्या मनात आले. त्यांना काय काय बरोबर न्याचे याचा तो विचार करीत होता. वह्या, पेन्सिली, झरणी, काही पुस्तके नेऊन द्यावी, असे त्याच्या मनात आले. काही फळे न्यावीत, मळ्यातील मोसंबी न्यावी, केळी न्यावी असे त्याला वाटले. त्याची खिन्नता कमी झाली, तो आनंदला.

''आई, मी धुळ्याला जाऊन येणार आहे,'' जगन्नाथ म्हणाला.

''कशाला रे?''

''दयाराम भारतींना भेटायला.''

''ते तुरुंगात ना आहेत?''

''त्यांना भेटायला परवानगी असते. आपणास त्यांच्याजवळ बोलता येतं. काही सामान देता येतं. किती तरी दिवसांत ते भेटले नाहीत. दोन वर्षं होतील. त्यांना पाहून येईन. उद्याच जाईन. भेटण्याची परवानगी आली आहे.''

''जगन्नाथ, मला भीती वाटते. तू तुरुंगात वगैरे नको हो जाऊ. दयाराम भारती तुला काही तरी सांगतील व तूही आम्हास सोडून तुरुंगात जाऊन बसायचास. आमचे एकदा डोळे मिटू देत व मग काही करा.''

''आई, कोण जात आहे तुरुंगात? आणि तुम्ही जाऊ तरी कुठे देता? नुसतं त्यांना भेटून यायचं.''

''आणि तू शिरपूरला कधी जाणार आहेस?''

''कशाला?''

''आपली बायको तूच घेऊन ये. मी रे किती दिवस स्वयंपाक करू?''

''तुझ्या हातचाच मला आवडतो स्वयंपाक.''

''आहे माहीत. बायकोच्या हातचंच हो सर्वांना गोड लागतं.. ती आली नाही, तिच्या हातचं खाल्लं नाहीस तोवर आईच्या हातचं गोड!''

''आणि मी कसा जाऊ तिला आणायला?''

''तूच जा, दुसरं कोण जाणार?''

''दादाला सांग. तो घेऊन येईल.''

''दादा आवडत नाही ना तुला?''

''म्हणजे का आम्ही वैरी आहोत आई? गरिबाला छळलेलं मला नाही आवडत. दुसरं काय?''

''जगन्नाथ, तू खरोखरच का कुठे निघून जाणार आहेस?''

''होय आई, मला कुठे तरी जाऊ दे. इंदिरा माहेरीच राहू दे. हिंदुस्थानची यात्रा करून मला येऊ दे. मग तिला आणू हो आई!''

‘‘अरे, यात्रा करायची का ही वेळ? म्हातारपणी यात्रा कराव्यात. संसार करायची ही वेळ.’’

‘‘आई, यात्रा केल्यानंतर संसारयात्रेस लागावं, म्हणजे संसार परमार्थमय होईल; मग इतर यात्रांना म्हातारपणी जाण्याची जरुरीच उरणार नाही. तारुण्य आहे, शक्ती आहे. तोपर्यंतच पराक्रम करावा, यात्रा कराव्यात, पुण्य मिळवावं. तारुण्यातच वैराग्य शोभतं. म्हातारपणच्या वैराग्याला काय किंमत आई?’’

‘‘तुझ्याजवळ नाही हो मला बोलता येत. आम्ही जुनी माणसं; वेडी, अडाणी.’’

‘‘मग जाऊ ना उद्या धुळ्यास.’’

‘‘जा; परंतु परत ये.’’

‘‘येईन हो परत. मी कुठे दूर जायला निघालो तर तुम्हांला सांगून जाईन; न सांगता जाणार नाही’’

‘‘तुझ्या गुणाचा काही पत्ता कळला का?’’

‘‘मला तो रोज भेटतो.’’

‘‘थट्टा कर.’’

‘‘आई थट्टा नाही. गुणाच्या घरी जातो. त्याच्या खोलीत बसतो. तिथे गुणाचा फोटो आहे. त्या फोटोजवळ मी बोलतो. गुणा हसतो.’’

‘‘सांग ना रे, कळलं का काही?’’

‘‘नाही हो काही कळलं!’’

‘‘कुठे रे गेली असतील?’’

‘‘मी तरी काय सांगू आई?’’

असे म्हणून जगन्नाथ उठून गेला. गुणाविषयी कोण त्याला प्रश्न विचारू लागले म्हणजे तो अस्वस्थ होई. आपल्या मित्राची माहिती आपणासही नसावी याची त्याला जणू लाज वाटे. तो जणू स्वतःच्या मैत्रीचा त्याला अपमान वाटे.

जगन्नाथ दुसऱ्या दिवशी धुळ्याला गेला. दयाराम भारती आपल्या खोलीत होते. आपल्या भेटीस कोणी येईल त्याची त्यांना कल्पनाही नव्हती; परंतु अकस्मात त्यांना बोलावण्यात आले. त्यांना आश्चर्य वाटले. कोण येत आहे त्याची वाट पाहात ते बसले. तो जगन्नाथ दृष्टीस पडला. त्यांनी त्याला ओळखले.

जगन्नाथ आला व त्याने भक्तिपुरस्पर प्रणाम केला. एका खुर्चीवर जगन्नाथ बसला.

''आम्ही वर्तमानपत्रात वाचलं की तुम्हांला इथे आणलं म्हणून. तुम्ही प्रवेशबंदीचा हुकूम मोडलात. होय ना?''

''हो.''

''किती दिवस अटक करून ठेवणार?''

''सरकारच्या इच्छेवर आहे.''

''मी आता काय करू ते तुम्हाला विचारावयास आलो आहे. गुणा माझा मित्र, तो एरंडोल सोडून गेला. तो, त्याचे आईबाप कुठे तरी गेले. सावकारांस कंटाळून गेले. कुठे गेले कोणासच माहीत नाही. माझं अभ्यासात लक्ष लागत नाही. मॅट्रिक नापास झालो. माझं लग्न झालं आहे. आई-बाबा मजजवळ असतात. कुठे तरी एरंडोल सोडून जावं असं माझ्या मनात येतं. पंचवीस वर्षांचा होईपर्यंत संसार नको असं मी मनात ठरवलं आहे. पाच वर्ष हिंदुस्थानभर जावं; परंतु उगीच ध्येयशून्य हिंडण्यात काय अर्थ? काय करू मी, सांगा.''

''मी काय सांगू? तुझ्या वृत्तींना अनुसरून तू वाग. तू मागे एकदा म्हणत होतोस की दक्षिण हिंदुस्थानात जावं. दाक्षिणात्य संगीत शिकावं. जा दक्षिण हिंदुस्थानात. दक्षिणची संस्कृती महाराष्ट्रात आण. आज हिंदुस्थानातील प्रांतांना एकमेकांची ओळख नाही. ही सांस्कृतिक ओळख करून घेणं हेही महत्त्वाचं काम आहे. सारा हिंदुस्थान माझा असं आपणास तेव्हाच म्हणता येईल, जेव्हा सारा हिंदुस्थान आपण जाणू. तू कलावान आहेस. धकाधकीचं राजकारण कदाचित तुझ्या वृत्तीस मानवणार नाही. तू दुसरं काम कर. महाराष्ट्राला दक्षिण हिंदुस्थानचा परिचय घडव. दक्षिणेकडील गगनचुंबी मंदिरांची ओळख महाराष्ट्राला, गगनभेदी पर्वतांना व गडांना करून दे. कावेरीची ओळख कृष्णा, गोदावरींना करून दे. सेतुबंध रामेश्वराची स्मृती पंचवटीच्या रामाला आण. विजयनगरची आठवण पुणे-साताऱ्याला आण. चंदीतंजावरला महाराष्ट्राची पुन्हा आठवण नेऊन दे. जगन्नाथ, दक्षिणेकडील कलांचा आत्मा घेऊन ये. त्याबरोबर विधायक कामं पाहून ये. श्री. राजगोपालाचारी यांचा थोर आश्रम पाहून ये. खादीकेंद्र पाहून ये. मधुसंवर्धन विद्येचे आश्रम पाहून ये. तू श्रीमंत आहेस. तुझी संपत्ती या कामात ओत. विधायक सेवेत

ओत. शेतकऱ्यांची स्थिती सुधार. स्वस्त धान्यं, स्वस्त बी-बियाणं त्यांना मिळेल असं दुकान काढ. शास्त्री गोसंगोपनाची संस्था काढ. भगवान कृष्ण मुरली वाजवीत व गाई चारीत. तू व गुणा गा, सारंगी वाजवा व गायींची स्थिती सुधारा. भारतवर्षांत आज ज्ञान पाहिजे आहे. प्रत्येक क्षेत्रात प्रयोग पाहिजे आहेत. त्या कामाला वाहून घे. मी काय सांगू? माझं काम निराळं. माझं काम आग लावण्याचं. कुणाचं स्थिर, शांत, विधायक काम, तर कुणाचं सारी घाण गोळा करून काडी लावण्याचं काम!''

''मी जाईन दक्षिणेकडे. घरी मन लागत नाही. गुणाचीही आठवण येते. आईला व बाबांना वाईट वाटेल; परंतु कॉलेजात गेलो असतो तर चार-पाच वर्षं दूर राहिलोच असतो ना, अशी त्यांची समजूत घालीन.''

''आणि आज तुम्ही तरुण आहात. जरा मोकळे आहात. संसारात अद्याप फार अडकलेले नाहीत, तोच या हिंडून फिरून, भारताचं दर्शन घेऊन. जरा मोठी दृष्टी घेऊन जीवन विशाल करून.''

''तुम्हाला काही पाहिजे का? मी वह्या आणल्या आहेत. खेडेगावांतील निरनिराळ्या प्रश्नांवर तुम्ही लहान लहान संवाद लिहून ठेवा. आम्हाला प्रचाराला उपयोगी पडतील. तुम्ही छान लिहाल. ही फळं आणली आहेत. माझ्या मळ्यातील.''

''साहेबांना विचारून घेऊ. मला इतर काही नको. काही पुस्तकं मजजवळ आहेत. हिंदुस्थानचा एक नव्या दृष्टीने मी इतिहास लिहिणार आहे. विस्कळित इतिहासातील आत्मा दाखवणार आहे. त्यासंबंधी वाचतो. त्याविषयी विचार करीत असतो, एखादं पुस्तक लागलं, तर तुला लिहीन.''

''तुमच्या नावावर काही पैसे ठेवू का?''

''ठेव थोडे. एखादं पुस्तक मागावायला होतील.''

''मी तुम्हाला पत्र पाठवीत जाईन. तुम्हीही पाठवा. खरं सांगू का, तुमच्यामुळे आमच्या जीवनात प्रकाश आला.

तुम्ही देव दिला दिवा दिला
तुम्ही आम्हा हितपंथ दाविला
मतिला भरले नव्या रसे
उतराई तरि होऊ हो कसे

"तुम्हाला माहीत नसेल. तुमचा आमचा फार परिचय नाही. एकदा फक्त तुम्हाला आमच्याकडे आम्ही मुलांनी बोलावलं होतं. त्या कोजागिरीच्या दिवशी तुम्ही आम्हाला जागं केलंत. आमच्या जीवनांत तुम्ही आलेले आहोत. म्हणून मी भेटायला आलो. तुम्हाला पाहायला आलो."

"मलाही आनंद झाला. चांगले व्हा पुढे. काही तरी आपला उपयोग करा. आपण केवळ स्वत:साठी नाही ही गोष्ट विसरू नका म्हणजे झालं."

प्रणाम करून व आशीर्वाद घेऊन जगन्नाथ गेला. दयाराम भारती आपल्या खोलीत आले. त्यांना आनंद झाला होता. एरंडोल तालुक्यातील आपले हिंडणे, फिरणे वाया नाही गेले एकूण. कोठे तरी बी रुजले, उगवले. काही हृदयांना प्रेरणा मिळाली. त्यांना समाधान वाटले. खोलीच्या समोर लहानशी बाग होती. ते कधी फुले बहुधा तोडीत नसत. आज आनंदी वृत्तीमुळे का कशाने ते देव जाणे; परंतु त्यांनी तेथील एक गुलाबाचे फूल तोडले. त्याचा त्यांनी वास घेतला. किती तरी दिवसांनी त्यांनी त्या दिवशी तो वास घेतला होता. नाकाजवळ फूल नेले होते; परंतु, ते फूल हातात घेऊन त्या गुलाबाच्या झाडाजवळ ते पुन्हा गेले. त्या फांदीवर ते फूल त्यांनी ठेवून दिले. ते चिकटवता थोडेच येणार होते? परंतु त्या काटेरी फांद्यांत त्यांनी ते ठेवून दिले. ते हसले. का हसले? त्यांचे त्यांनाच माहीत?

जगन्नाथ मोटारीतून एरंडोलला येत होता. किती तरी विचार त्याच्या मनात येत होते. संसाराचे विचार, स्वातंत्र्याचे विचार, दरिद्री जनतेचे विचार, भारतीय ऐक्याचे विचार, भारताच्या यात्रेचे विचार; परंतु मध्येच गुणा आठवे. मध्येच शिरपूरचे माणूस आठवे. तोच आईचे डबडबलेले डोळे दिसत. त्याचा काही निश्चय होईना. तो घरी आला. अधिकच अस्वस्थ होऊन आला.

काही दिवस गेले. एके दिवशी पंढरीशेट त्याला म्हणाले,

"जगन्नाथ, आता इंदिरेला आणलं पाहिजे."

"इतक्यात नको बाबा."

"मग कधी?"

"आणखी पाच वर्षांनी."

"हे काय काही तरीच. लोक हसतील."

“बाबा, मी दक्षिण हिंदुस्थानात जाणार आहे. गाण्याची मला आवड आहे. माझा आवाज गोड आहे. देवाची देणगी तुमच्या मुलाला आहे. गायनाच्या कलेचा आणखी अभ्यास मला करू दे. दाक्षिणात्य गायन शिकून येऊ दे. तुम्ही मला जायला परवानगी द्या. नाही म्हणू नका.”

“जगन्नाथ, आम्ही आता म्हातारी झालो. आम्हाला सोडून जाऊ नकोस. गाणं शिकून तुला का कुठे जलसे कराचे आहेत? घरी पुरेसं आहे. तोटा नाही. करमणुकीपुरतं गाणं येत आहे. सुखानं संसार कर. इंदिराही आता मोठी झाली. तिला आणलं पाहिजे. तिची माहेरची काय म्हणतील?”

“बाबा, कला केवळ करमणुकीसाठी का असते! केवळ पैशासाठी का ती शिकायची असते? देवाने जी देणगी दिली तिची वाढ करण्यात आनंद असतो. तुम्हाला मुद्दल वाढलेलं पाहण्यात जसा आनंद होतो. तसा देवाला त्याने दिलेल्या देणग्या मनुष्य वाढवीत आहे, हे पाहून होतो. बाबा, अजून मी लहान आहे. फार जुन झालो नाही. कोवळा आहे आवाज. अद्याप तो कमावता येईल. अजून माझी शिकण्याची वेळ आहे. ही वेळ का पुन्हा येणार आहे? आज़ उत्साह आहे, आशा आहे, उमेद आहे. जाऊ द्या ना बाबा.”

“अरे लहान कसला तू. अजून का तू लहान? तुझ्याएवढे आम्ही होतो तर आम्हांला मुलं झाली होती.”

“माझं तसं होऊ नये म्हणून तर मी जात आहे. इतक्यात पोरांचं लेंढार पाठीमागे लागून नये म्हणून मी जात आहे. तुम्ही जी गोष्ट कौतुकाची म्हणून सांगत आहात ती मला दुःखाची व मानखाली घालण्याची वाटत आहे. जाऊ दे मला. पोराबाळांचा धनी होण्याची इतक्यात मला इच्छा नाही. पंचवीस वर्षांचा होईपर्यंत मी ब्रह्मचारी राहण्याची शपथ घेतली आहे.”

“खेड्यांतून नाटकं करणारी तुम्ही पोरं. तुम्ही कशाला ब्रह्मचर्याच्या गप्पा माराव्यात?”

“बाबा, आम्ही खेड्यांतून मेळे केले, संवाद केले. ती काही लैला-मजनूची नाटकं नव्हती. राजाराणीची नाटकं नव्हती. तुम्हा सावकारांचे अन्याय दाखविणारी ती नाटकं होती. शौर्य, धैर्य निर्माण करू पाहणारी ती नाटकं होती. माणुसकी देऊ पाहणारी नाटकं होती. उगीच काही बोलू नका. संपूर्ण ब्रह्मचर्य नाही शक्य झालं

तरी आम्ही धडपडू; थोडंही सत्कर्म, थोडाही सद्‌धर्म हातून आचरला गेला, तरी त्याचाही जीवनात उपयोग आहे.''

''हे पूर्वीच का नाही सांगितलंस? लग्नाला कशाला उभा राहिलास?''

''तुमची अब्रू सांभाळण्यासाठी. आईचं रडणं थांबविण्यासाठी. मी का पाठीस लागलो होतो तुमच्या की लग्न करा, लग्न करा म्हणून? तुम्ही मला बांधून जणू नेलंत, तिथे उभं केलंत. केवळ का मुलं उत्पन्न करणं एवढंच कर्तव्य? त्या मुलांना मी काय देऊ? कोणते विचार देऊ? तुम्ही मला चार दिडक्या ठेवल्यात. ही पापी सावकारी ठेवलीत. माझ्या मुलांना मी अधिक काही देऊ इच्छितो. त्यांच्यासाठी मला अन्यायाची संपत्ती ठेवायची नाही. माझ्या मुलांना विचारांची संपत्ती देण्याची मला इच्छा आहे; परंतु मजजवळ असेल तर मी देईन ना? आपल्या संततीला सद्‌विचार देता आले पाहिजेत. तुम्ही आम्हाला काय दिलंत बाबा? भरूपर व्याज कसं घ्यावं, खोटे जमा-खर्च कसे लिहावेत, गरिबांच्या अश्रूंना कसं हसावं, त्यांची घरंदारं कशी सहज जप्त करावी हे शिकवलंत. दुसरं काय दिलंत. सांगा ना?''

''ते दयाराम भारती भेटले म्हणून तुमचा मुलगा माकडाचा थोडा मानव झाला. मानवाचा थोडा देव झाला; देव नाही पण मानव तरी झाला. तुम्ही काय दिलंत? माझ्या मुलांना मी अधिक देऊ इच्छितो. विचारांचं धन देऊ इच्छितो. ते विचारधन हिंदुस्थानभर हिंडून मला गोळा करून आणू दे. व्यापारी हिंदुस्थानभरचा माल इथे आणतात व विकतात. मलबारचा नारळ आणतात, कानपूरची डाळ आणतात, रंगूनचा तांदूळ आणतात; परंतु विचार कोण आणील? मी विचारांचा व्यापारी होईन. विचारांची संपत्ती गोळा करीन, भरपूर वाटीन. माझ्या मुलांना देईन. म्हणून मी जाऊ इच्छितो. हिंदुस्थानातील आश्रम पाहीन. ग्रामोद्योग पाहीन. भारताचा संसार सुधारू पाहणारे सारे प्रयोग पाहीन. भारताचा आत्मा पाहून येईन. जुनी नवी संस्कृती पाहून येईन. बाबा, तुम्ही हे दिडक्यांचं धन दिलं; परंतु हे वैचारिक धन मला कोण देणार? ते मलाच हिंडून फिरून मिळवू दे. बाबा, रागावू नका. मला आशीर्वाद द्या. म्हणा की जा जगन्नाथ, खरा माणूस होऊन ये. मनाने, बुद्धीने, हृदयाने खंबीर व गंभीर, विचारी व ध्येयवादी होऊन ये. तुम्ही मला प्रेमाने वाढवलंत. माझा देह प्रेमाने पोसलात. आता माझ्या आत्म्याचं पोषण व्हावं.

मनोबुद्धीचं पोषण व्हावं म्हणून नाही का प्रेम दाखवणार? बाबा, ते खरं प्रेम की जे बांधून नाही ठेवीत. जखडून नाही ठेवीत, विकासाच्या आड नाही येत, पंख नाही कापीत, भावना नाही गुदमरवीत, असं ते मोकळं प्रेम, ते उदार प्रेम मला द्या. मी तुमच्या पाया पडतो.''

असे म्हणून जगन्नाथ पित्याच्या पाया पडला; परंतु पिता म्हणाला, ''जगन्नाथ, आम्हाला काय कळतं? मूर्ख हो आम्ही. आमचा अपमान करावा एवढ्यासाठी का रे तुला वाढविलं. कृतघ्न आहे जग.''

''बाबा, नाही हो तुमचा जगन्नाथ कुठे जात. तो वरच्या खोलीत बसून राहील; तिथे पडेल, रडेल, सडेल, झडेल.'' असे म्हणून जगन्नाथ दु:खाने निघून गेला. आपल्या खोलीत जाऊन बसला. त्याने गुणाच्या फोटोकडे पाहिले. ''आज गुणा असता तर? त्याच्याजवळ मी माझं दु:ख सांगितलं असतं. माझं हृदय तो जाणी, तो ओळखी.''

तो उठला. गुणाच्या त्या घरी गेला. गुणाच्या खोलीत जाऊन त्या सुंदर फोटोसमोर बसला. त्याने एक गाणे म्हटले.

दु:ख मला जे मला ठावे
मला ठावे, मला ठावे ।।दु:ख० ।।
दु:ख मनी जे कोणा समजे
आत जळून मी अहा जावे।।दु:ख० ।।
मदश्रु हे ना कळती कोणा
बसुन स्वत:शी विलापावे ।।दु:ख० ।।
प्रेम मित्रा, तुची त्राता
मज हसवाया झणी यावे ।।दु:ख० ।।

असे तो मित्रासमोर म्हणत होतो. वेदनांतून जन्मलेले सहज गीत!

जगन्नाथ घरात कोणाजवळ बोलेना. तो ना नीट खाई, ना नीट पिई. वैतागल्यासारखा वागे. त्याचे कशात जगू लक्ष लागेना. आईबापांच्या लक्षात ही गोष्ट आली. शेवटी पंढरीशेटनी एके दिवशी जगन्नाथला सांगितले.

''जगन्नाथ, जा हो बाळ तू. तुला जिकडे जायचं असेल तिकडे जा. मी पुष्कळ विचार केला. तुझं म्हणणं खरं आहे. जा. तीन-चार वर्षं हिंडून ये. काय

तुला शिकायचं ते शिकून ये. तुझी बायको आमच्याजवळ राहील. पुढे जाणार असलास तर आजच जा. आम्ही मेल्यावर पत्नीला सोडून गेलास तर तिला तरी कुणाचा आधार? अजून आम्ही जिवंत आहोत. तिचा सांभाळ करू. माहेरी आता तिला थोडीच ठेवायची! इथे आणलं पाहिजे; परंतु तू जा. मी रागावून नाही सांगत. मनापासून सांगत आहे.''

''बाबा, तुमचं प्रेम आहे ना, आशीर्वाद आहे ना?''

''होय आहे. एकच इच्छा आमची की तू सुखी हो. घरात तुला सुख नसेल वाटत, आमच्या संगतीत नसेल वाटत, म्हाताऱ्या आईबापांजवळ राहावं असं नसेल वाटत तर जिथे तुला सुख होईल तिथे जा. कुठूनही तू सुखी हो.''

''बाबा, असं का बोलता? मला का तुमचा कंटाळा आहे? तसं असतं तर तुमचा आशीर्वाद मी का मागितला असता? तुमच्यावरही माझं प्रेम आहे. भक्ती आहे; परंतु मला जरा शिकून सवरून येऊ दे. तुमचं नाव उजळ करण्यासाठीच मी जात आहे. माझ्या हृदयाच्या, मनाच्या भुका आहेत. त्या थोड्या तृप्त करून येऊदे हो बाबा.

''ये हो बाळ. ये. चांगलो हो. सुखी हो.''

''मी तुम्हांला पत्र पाठवीन. तुम्ही हाक मारताच परत येईन.''

''बरं हो. तू आनंदी हो. प्रसन्न हो. माझा जगन्नाथ दुःखी दिसता कामा नये. हीच एक तुझ्या वृद्ध पित्याची इच्छा आहे.''

''तुमच्या प्रेमाने व आशीर्वादाने नाही होणार दुःखी. मी सुखी होईन व दुसऱ्यांचेही संसार सुखी करण्यासाठी झटेन.''

✦✦

इंदूर

इंदूर म्हटले म्हणजे किती तरी जुन्या आठवणी येतात. मराठी इतिहासातील आठवणी. सरदार मल्हारराव यांच्या आठवणी, देवी अहिल्याबाईच्या पवित्र आठवणी. अद्यापही इंदूरमध्ये गेले की महाराष्ट्रीयाला जरा आपलेपणा वाटतो, आपण आपल्या हक्काच्या जागी आहो असे वाटते. संस्थानी थाटमाट अद्याप तेथे आहे; परंतु पूर्वीचे ते स्वतंत्र व पवित्र वैभव आता उसने वैभव, मिंधेपणाचे वैभव! साम्राज्यशाहीच्या गुलामगिरीचे वैभव इंदूरमधील मोठमोठे राजवाडे पाहून प्रसन्न नाही वाटत. कोणत्याही संस्थानात जा. तेथले राजवाडे पाहून एक प्रकारचा उद्वेग व संताप विचारी मनाला आल्याशिवाय राहत नाही. या राजवाड्यांतून काय असते? विलायती सामाने भरलेली असतात. विलायती सामानांची जणू प्रदर्शने. प्रत्येक खोलीत आरसे, पलंग, खुर्च्या, कोच! याशिवाय वस्तू दिसणार नाही. सर्वत्र विलायती विलासांचे प्रदर्शन. त्या सामानाला काडी लावावी असे वाटते. त्याच त्या वस्तू साऱ्या खोल्यांतून ठेवलेल्या. राजांचे राजवाडे असे व श्रीमंताचे बंगलेही त्याच प्रकारचे.

इंदूरला एक कोट्यधीश शेट आहेत. त्यांनी काचेची मंदिरे बांधली आहेत. जैनपंथी मंदिरे. त्या शेटजींच्या गिरण्या आहेत. त्या गिरण्यांतील मजुरास राहायला

नीट झोपडीही नाही. बिळात उंदीर राहतात तसे कामगार राहतात! अहिंसा धर्माच्या या कुबेराने लाखो रुपये खर्चून परदेशी बिलोरी काच आणून हे मंदिर बांधले! हा तर फुटका धर्म आहे. काच खळकन फुटते तसा हा धर्म आहे. असल्या धर्मात त्राण नाही, प्राण नाही. मानवी जीवन सुंदर करू न पाहणारा धर्म तो राक्षसी धर्म.

अहिंसक धर्माचे खरे उपासक भगवान महावीर, जे जगातील हिंसा, जगातील मरण, जगातील हायहाय, दु:ख, जगातील अन्याय दूर करण्यासाठी उभे राहिले; परंतु या अहिंसा धर्माचे अनुयायी सर्व हिंदुस्थानात आज श्रीमंत आहेत.

ही श्रीमंती कोठून आली? कशाने आली? हिंदुस्थानभर दारिद्र्य आहे व जैन मंदिरांतून कोट्यवधी द्रव्य कुजत पडले आहे. देवाच्या दरवाजांना मोठमोठी कुलपे आहेत. अहिंसा धर्माच्या मंदिरांना बंदुका हातात घेऊन शिपाई सांभाळीत आहेत. ते धर्माला नाही सांभाळीत, तर संपत्तीला सांभाळीत आहेत. हिंसेने गोळा केलेली संपत्ती! लोकांची मरणे पाहूनही गोळा केलेली संपत्ती. लोकांना खायला नाही व देवांना सोन्याचे रथ आहेत व त्यांना सांभाळावयास पोलीस उभे आहेत!

साऱ्या जगात असे आसुरी संपत्तीचे, हिंसाधर्माचे नमुने आहेत. इंदुरातही होते. परंतु केवळ पापावर दुनिया चालत नाही, जो पुण्याचा अंश आहे. जो सद्‌भाव आहे, जी उदारता आहे, सहानुभूती आहे, त्याच्या आधारावर जग चालत असते. इंदुरात अशी काही पुण्यस्थळे असतील, उदार व निर्मळ माणसे असतील. त्यांच्यामुळे इंदूर जगत होते, मान वर करून उभे होते. श्रीमंताच्या उंच मनोऱ्यांनी इंदूरची मान उंच नव्हती.त्या शहरात जे कोणी थोर मनाचे लोक होते. उच्च वृत्तीची माणसे होती. त्यांच्यामुळे इंदूरची मान उंच होती.

अशा या इंदूर शहरात आता गुणा जाणार होता. नाशिकहून जाणार होता, आपले आईबाप घेऊन जाणार होता. आगगाडीत भेटले त्या सद्‌गृहस्थांकडे जाणार होता. मनोहरपंत त्यांचे नाव. ते एक पेन्शनर गृहस्थ होते. पन्नास वर्षाचे त्यांचे वय होते. नेमस्त व निर्व्यसनी राहणीमुळे त्यांची शरीरप्रकृती निकोप होती. ते रुबाबदार तेजस्वी दिसत.

त्यांचा वाडा होता. स्वत:चा वाडा, त्या वाड्यात काही बिऱ्हाडे होती. भाड्याचे उत्पन्न येई. मनोहरपंतांच्या पत्नीचे नाव रमाबाई, पाच मुले झाली; परंतु

एकच जगले. इंदू फक्त जगली. इंदू आईबापांचा प्राण होती. ती आता इंग्रजी शाळेत जात होती. आपल्या मुलीने इंग्रजी शाळेत जावे हे रमाबाईना पसंत नव्हते;परंतु मनोहरपंतांनी तिची समजूत घातली व इंदूचे शिकणे सुरू झाले.

इंदू शिवणे, टिपणे शिकली होती. तिला भरतकाम चांगले येई. कितीतरी चित्रे तिने भरली होती. ती पेटी वाजवी. थोडे गातही असे. गायनाच्या वर्गात ती जात असे. मनोहरपंतांना संगीताचा फार नाद. त्यांचा नाद इंदूलाही लागला.

घरी रेडिओ घेण्यात आला होता. शिवाय फोनोग्राफ होता. अत्यंत वेचक व निवडक अशा प्लेटी त्यांच्या घरी होत्या. इंदूला ती सारी गाणी पाठ झालेली होती. तिला इतर काही उद्योग नसला म्हणजे ती त्या प्लेटी लावीत बसे. तोच एक जणू तिचा आनंद दिवाणखानी आनंद.

"इंदू, ते वाजवणारे येणार आहेत. त्यांचं पत्र आलं आहे."

"खरचं का? मी त्यांना भेटेन. त्यांच्याजवळ वाजवायला शिकेन. ते एकटेच येणार आहेत?"

"त्यांचे आईबाप बरोबर आहेत. तू जशी आमची एकुलती एक. तसे त्यांच्या आईबापांचे ते एकुलते एक."

"दोघं सारखी नाहीत का? मला गाणं आवडतं. त्यांना गाताही येतं का बाबा?"

"त्याचा एक मित्र आहे. तो फार छान गातो; परंतु यांना गाता येत नाही. ह्यांची कला बोटांत आहे. अद्भुत कला. किती तन्मय होतात ते वाजवताना. तू बघशील."

"बाबा, ते आपल्याकडेच राहतील का?"

"येतील त्या दिवशी राहतील. त्यांच्यासाठी मी एक जागा पाहून ठेवली आहे. तिथे ते बिऱ्हाड करतील."

"आपल्याकडे राहिले म्हणून काय झालं?"

"आपल्याकडच्या जागा भरलेल्या आहेत."

"तसं नाही मी म्हणत. आपल्याकडेच."

"त्यांना मोकळं नाही वाटणार इंदू. स्वाभिमानी आहेत ती मंडळी. घरदार सोडून निघालेली मंडळी. स्वतंत्रपणे राहण्यातच त्यांना आनंद वाटेल.'

‘‘ते शाळेत जातील, होय ना?’’

‘‘मॅट्रिकच्या वर्गात ते होते.’’

‘‘मला वाजवणं शिकवतील. गणितही शिकवतील.’’

‘‘तुला गणित येणार नाही. मी थोडं का शिकवायचं करून पाहिलं.’’

‘‘परंतु त्यांना येईल शिकवता. एखाद्याला येतं बाबा.’’

‘‘बरं शिक.’’

‘‘तुम्ही हसतासे. मी नाही बोलत.’’

‘‘तू येणार का स्टेशनवर त्यांना घेण्यासाठी?’’

‘‘हो येईन. केव्हा जायचं?’’

‘‘उद्या दहाच्या सुमारास गाडी येईल. तयार राहा नाही तर बसशील प्लेटी लावीत.’’

‘‘उद्या जिवंत प्लेट येणार. ही कशाला लावू?’’

‘‘आल्याबरोबर म्हणशील हो त्यांना वाजवा म्हणून. ते दमलेले असतील. उगीच काही वेड्यासारखं करू नकोस.’’

‘‘नाही हो बाबा. मला समजतं थोडं.’’

‘‘केव्हापासून समजू लागलं.’’

‘‘आजपासून.’’

‘‘पाहुण्यांच्या येण्याच्या बातमीनेच तुला समजू लागलं हा शुभ-शकुनच म्हणावयाचा. ते आल्यावर मोठी पंडितच होशील.’’

‘‘नको का होऊ? अडाणीच का राहू?’’

‘‘पुष्कळ वेळा अडाणी असणंच बरं.’’

‘‘मग मला शाळेतून काढा.’’

‘‘शाळेत शिकूनच अडाणी हो. शाळेत जाऊन का मनुष्य शहाणा होतो असं तुला वाटतं? वेडी.’’

‘‘मी आपली जाते. तुम्ही उलटं सुलटं बोलता.’’

इंदू उठून गेली. ती आपल्या खोलीत गेली. आपली खोली ती नीटनेटकी करू लागली. सामानसुमान तिने नीट लावून ठेवलं. ते आरसपानी संजीऱ्याचे लहान लहान ताजमहाल तिने टेबलावर नीट ठेवले. काही भरतकामे भिंतीवर लावून

ठेवली. एक भरलेले हरण फारच सुंदर दिसत होते आणि दुसऱ्या एका चित्रात दमयंती हंसाजवळ उभी आहे असे चित्र होते. किती नाजूक रंगानी तिने ते भरलेले होते. एका भरतकामात हिंदुस्थान होता व मध्ये महात्मा गांधी होते. टेबलाच्या वर ते तिने लावून ठेवले.

''इंदू,काय गं करतेस?''वडिलांनी येऊन विचारले.

''सामान लावून ठेवीत आहे. पाहुणे उद्या येणार. इंदू बावळट दिसता कामा नये. टापटिपीची दिसली पाहिजे.''

''तुला काही ते पाह्यला नाही येताहेत.''

''काही तरीच तुमचं बोलणं. तुमच्या इंदूला बावळट म्हटलेलं तुम्हाला आवडेल का? सांगा.''

''नाही हो. आपला दिवाणखानाही नीट लावून ठेव. तुझ्या हातांतसुध्दा कला आहे. तुझ्या डोळ्यांत कला आहे. कसं सारं नीटनेटकं करतेस.''

''तुम्ही जा बाबा. मला काही सुचत नाही.''

''आजच सुचतनासं झालं?''

''हो आजच. तुम्ही फिरायला नाही जात?''

''अजून अवकाश आहे. तू नाही का येणार?''

''बघेन मी.''

मनोहरपंत आपल्या दिवाणखान्यात गेले. कोणी मंडळी आली. त्यांच्याशी बोलणे सुरू झाले. येणाऱ्या गुणाबद्दलचं बोलणे होते. रमाबाईनी चहा नेऊन दिला.

''आज इंदू कुठे आहे?''

''ती आज खोली साफसूफ करीत आहे. उद्या पाहुणे येणार म्हणून सारं व्यवस्थित करीत आहे.''

''खरं की काय?''

''अहो, आमचं कधी ऐकेल तर शपथ; परंतु आज आलं तिच्या मनांत.''

''तिऱ्हाइतासमोर तरी फजिती नको असं वाटत असतं.''

मनोहरपंत मंडळींबरोबर बाहेर पडले. इंदूला हाक मारायला ते विसरले का त्यांनी मुद्दामच हाक मारली नाही?''

दुसरा दिवस उजाडला. इंदूची कोण धांदल.

''बाबा, आज चांगलीशी भाजी आणा.''

''कोणती आणू?''

''आणा कोणती तरी आणि मला फूल आणा हो. नाहीतर विसराल.''

''ते काही देशभक्त नाहीत इंदू. त्याना माळ वगैरे नको हो घालायला.''

''पण मला हवीत केसांतं घालायला.''

''खरचं? मला वाटलं की पाहुण्यांसाठी तू म्हणत आहेस.''

''आणि देशभक्तांना आता फुलांचे हार नाही आवडत. सुताचे आवडतात. स्वच्छ सुंदर सुताचे.''

''मग तुझ्या सुताची लडी ने की बरोबर.''

''खरचं नेऊ?''

''काय हरकत आहे?''

''नुसत्या सुताचीच? का ती जरा सजवू?''

''तुला आवडेल तसं कर.?''

''पण नको बाबा. तुम्ही हसाल, ते पाहुणे हसतील.''

''हसतील त्यांचे दात दिसतील.''

''मग करते हो सुताचा हार.''

''पण घालणार कोणाला?''

''खरचं, ती तिघेजण आहेत.''

''गुणाला घाल. आईबाप वृद्ध आहेत, त्यांना कशाला?''

''किती छान त्यांचं नाव. गुणा! तुम्ही ज्या दिवशी ते नांव मला सांगितलंत त्या दिवसापासून ते कानांत गुणगुणत आहे. गुणा! किती सोपं, साधं,सुंदर नांव.''

''इंदू नाव वाईट आहे वाटतं?''

''इंदूही चांगलं आहे.''

मनोहरपंत बाजारात गेले. इंदूने दिवाणखान्यात स्वत: झाडलोट केली. अभ्रे नवीन घातले. लोड तक्के नीट लावून ठेवले. तसबिरींवरून फडका मारला. कृत्रिम फुलांचे फुलदान ठेवून दिले, पानसुपारीचे ताट नीट पुसून ठेवले. सारे कसे शुभ्र, मंगल दिसत होते. पवित्र, प्रसन्न दिसत होते. जणू दिवाणखान्यातील सर्व वस्तूंवर आनदामृताचे सिंचन केले होते. इंदू आपल्या खोलीत सुताचा हार गुंफीत बसली.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

त्याच्या निरनिराळ्या गाठी मारून एक मनोहर हार तिने तयार केला, तिने तो स्वत:च्या गळ्यात घालून पाहिला. ती आरशात पाहात होती. तो मनोहरपंत फुले घेऊन आले.

"हे गं काय? स्वत:च्या गळ्यात का घालतेस?"

"कसा दिसतो तो पाहात आहे."

"तुला चांगला दिसला म्हणजे त्यांना दिसेल वाटतं?"

"हो कारण ते माझ्यासारखेच आहेत. होय ना? त्याचं नांव दोन अक्षरांचं, माझं दोन अक्षरांचं. त्यांना गाणं आवडतं, मला आवडतं. ते आईबापांचे एकुलते, मीही एकुलती. मग मला जे चांगलं दिसेल ते त्यानांही चांगलं दिसेल. आणा ती फुलं. या सुताच्या मध्यभागी एक घालते. गुलाबाचं फुल छान दिसेल."

इंदूने फूल हारात गुंफले. तिने स्वत: केसांत फुले घातली. ती तयार झाली. केव्हा दहा वाजतात याची ती वाट पाहात होती.

"चल इंदू. खाली मोटार आली आहे. विश्वासरावांनी दिली आहे. त्यांना मोटारीतून आणू. इंदूरचा संस्थानी थाट त्यांना दाखवू. दिपवून टाकू त्यांना."

"बाबा, त्यांना थट्टा वाटेल. म्हणतील भिकाऱ्यांना इतका का मान देतात?"

"परंतु ती मंडळी 'मानधन'आहेत. तसं त्यांना वाटणार नाही."

"चला बाबा."

इंदू व मनोहरपंत मोटारीतून स्टेशनवर आली. हांतात हार घेऊन इंदू प्लॅटफॉर्मवर उभी होती. मनोहरपंत प्लॅटफॉर्म तिकिटे घेऊन आले. इंदू गाडीची वाट पाहात होती. आली गाडी. घंटा झाली.

"बाबा तुम्हीच घाला हार. हा घ्या."

"तुझ्याच असू दे गं हातात. जरा धीट हो. साऱ्या मुलाखाची तू लाजरी व बुजरी."

गाडी आली. गुणाचे तोंड बाहेर होते, त्याने खूण केली. इंदूने गुणाला पाहिले, त्यानेही पाहिले. गाडी थांबली. मनोहरपंत व इंदू डब्याजवळ गेली. रामराव व गुणाची आई खाली आली, हमाल सामान काढू लागला. गुणा देऊ लागला.

"तुम्ही या खाली, तो काढील सारं सामान."

गुणाही खाली उतरला.

"बाबा हा हार?"

"घाल ना तूच."

इंदूने गुणाच्या गळ्यात हार घातला. गुणा हसला.

"मी का मोठा आहे कुणी? मी अजून लहान आहे."

"इंदूचा हट्ट. म्हणे गायनातल्या वस्तादांना हार घालतात; मग वादनांतील वस्तादांना का नको?"

"मी काही वस्ताद नाही."

"दिसेल आता."

सारी मंडळी बाहेर आली. मनोहरपंत व इंदू पुढे बसली. पाहुणेमंडळी मागे बसली. मोटार सुरू झाली.

"मोटार कशाला आणलीस?" रामराव म्हणाले.

"मित्राची होती, घेऊन आलो," मनोहरपंत म्हणाले.

मोटार दाराशी थांबली. वरून गडी आला. त्याने सारे सामान वर नेले. गुणाची आई आत गेली. रामराव व गुणा दिवाणखान्यात बसले. सामान एका खोलीत ठेवण्यात आले. रामराव व गुणा हातपाय धुऊन आले.

"चहा घेता ना?" मनोहरपंतानी विचारले.

"गुणा नाही घेत. आम्ही घेतो." रामरावांनी सांगितले.

"खरचं. मनमाडला यांना मी दूधच दिलं होतं."

इंदूने चहा आणला,. दूधही आणले त्याच्याबरोबर थोडे शंकरपाळे व लाडूही होते. दोघांनी ते सारे घेतले. पुढे स्नान वगैरे झाली.

"कपडे असू द्या. रामा धुवील." इंदू म्हणाली.

"मी धुऊन टाकतो,"गुणा म्हणाला.

"आजचा दिवस तरी नका धुऊ. आज तुम्ही पाहुणे आहात."

"बरं."

"गुणा कपडे तसेच ठेवून आला. इंदूने रामाला साबण लावून कपडे स्वच्छ धुवायला सांगितले. जेवायची तयारी झाली. सारी जेवायला बसली.

"मी मागून बसेन." गुणाची आई म्हणाली.

‘‘बसा आताच. भुकेल्या असाल,’’ इंदूची आई म्हणाली. शेवटी आढेवेढे न घेता गुणाची आईही इंदूजवळ जेवायला बसली. बोलत जेवणे होत होती.

‘‘गाडीत गर्दी होती कां?’’ रामरावानां मनोहरपंतांनी विचारले.

‘‘फार गर्दी. काही लग्नाची मंडळी होती. मारवाडी लग्नं.’’

‘‘परंतु यांनी सारंगी वाजविली असेल व गर्दी हटली असेल.’’

‘‘इतकी गर्दी होती की सारंगी फुटायची वेळ आली होती.’’

‘‘हे काय इंदू, तुझं झालं?’’ मनोहरपंतांनी विचारले.

‘‘मला शाळा आहे बाबा. तुमचं काय?’’ ती म्हणाली

‘‘यानांही उद्यापासून शाळा,’’मनोहरपंत म्हणाले.

‘‘परंतु ते मुलांच्या शाळेत जातील. माझ्या शाळेत थोडेच येणार आहेत? जाते हं आई मी’’ असे म्हणून इंदू गेली.

जेवणे वगैरे झाली. दिवाणखान्यात रामराव, गुणा, मनोहरपंत बसले होते. रामरावांनी विडा वगैरे खाल्ला. गुणाने लवंग घेतली. तो दिवाणखाना बघत होता. दिवाणखान्यात सुंदर तसबिरी होत्या. सृष्टीसौंदर्याचे देखावे होते. संगीताची साधनेही होती. तबला, बाजाची पेटी एका बाजूस दिसत होती. एका कपाटात ग्रंथसंग्रह दिसत होता.

‘‘तुम्ही आता दोघं पडा जरा रात्रीचं जागरण आहे तुम्हांला. रामाने अंथरूणं घालून ठेवली आहेत. वरती तिसऱ्या मजल्यावर. तिथे शांत आहे. छान झोप येईल.’’ मनोहरपंत म्हणाले.

‘‘दोघे झोपले. स्वच्छ अंथरूणे होती. पांघरायला स्वच्छ खादीची शाल होती. खाली गुणाची आईही अंग टाकती झाली. विचार करीत करीत गुणा झोपी गेला.

तिसऱ्या प्रहरी चहा वगैरे झाला.

‘‘आम्हाला कुठे तरी जागा पाहिली पाहिजे,’’ रामराव म्हणाले.

‘‘मी पाहून ठेवली आहे जागा,’’ मनोहरपंत म्हणाले.

‘‘तिथे सामान न्यावं लागेल. उद्यापासून त्या जागेतच करू स्वयंपाक.’’

‘‘चला, जागा दाखवतो.’’

रामराव व गुणा मनोहरपंताबरोबर निघाले. नवीन जागा बघावयास बाहेर पडले. फार लांब नव्हते ते घर. जवळच होते. तीन खोल्या होत्या. उजेड भरपूर होता. चांगली होती जागा.

''ही खोली मला,'' गुणा म्हणाला.

''होय हो,'' रामराव म्हणाले.

''बेताची आहे. भाडंही फारस नाही.''

''किती भाडं?''

''आठ रुपये. विजेचा दिवा घेतला तर निराळा चार्ज पडेल.''

''दोन दिवे घ्यावे लागतील,'' गुणा म्हणाला.

''आपण कंदीलच वापरू. आपल्याबरोबर आहेतच.''

''आठ रुपये-फार आहे भाडं नाही बाबा?''

''एरंडोलला आठ रुपयांत सारं घर मिळतं.''

''हे शहर आहे. आणि मला वाटतं की तुम्ही विजेचे दिवे घ्यावे. नीट वापरले तर फार महाग नाही पडत.''

''बघू या.''

''आणी मला तुम्ही देणार आहात ना शिकवण्या मिळवून?''

''रामराव, तुम्हाला संस्कृत येतं वाटतं?''

''कशावरून''

''तुम्ही 'इंदूरं किं दूरं' वगैरे गाडीत म्हणाले होतेत.''

''मी जुन्या काळचा मॅट्रिक आहे. संस्कृतचा मला नाद होता; परंतु आता विसरलो.''

''जुन्या काळचा मॅट्रिक म्हणजे आताचा बी.ए., तुम्ही आमच्या इंदूला सकाळी शिकवीत जा. दुसरीही एक मुलगी येईल. संस्कृत, गणित, इंग्रजी. जे त्यांना लागेल ते शिकवा. म्हणजे एक काम होईल. त्याचे पंधरा रुपये तुम्हाला मिळतील आणि सायंकाळी गुणाने इंदूला सारंगी शिकवावी. एका जहागिरदाराच्या घरीही एकाला शिकवायची आहे; परंतु तिथे सकाळी जावं लागेल. गुणा जर शाळेत जाऊ लागला तर सकाळचा वेळ त्याला स्वत:ला अभ्यासास लागेल.''

‘‘मी अभ्यास पहाटे व रात्रीही करीन. मी सकाळीसुध्दा शिकवायला जाईन. गुणा म्हणाला.

‘‘ठीक तर. ज्यांची मोटार मी आणली होती ना, त्या विश्वासरावाकडेच शिकवायला जायचं. त्यांच्या मेहुण्याला शिकायची आहे सारंगी. सकाळी आठाच्या सुमारास जात जा. विश्वासराव चांगले आहेत गृहस्थ. मोठे रसिक व दिलदार.’’

‘‘जमलं तर सारं. मी उद्यापासून हायस्कूलमध्ये नाव घालीन मॅट्रिकच्या वर्गात. माझा अभ्यास बराचसा झालेला आहे आणि इकडची मॅट्रिक म्हणे जरा सोपी असते. होय ना?असं तुमच्याकडचे विद्यार्थी म्हणतात. तिकडे नापास होणारे इकडे येतात परीक्षेसाठी,’’

नवीन जागा झाडलेली होती. स्वच्छ होती. कुलूप लावून सारी मंडळी परत आली. रामाने एक खटारा आणला. त्यात सारे सामान घालण्यात आले. रामराव, गुणा व त्यांची आई निघाली. बरोबर रामा गडी होता.

नवीन बिऱ्हाडात सामान नेण्यात आले, ते नीट लावण्यात येऊ लागले. खिळे, चुका वगैरे मारण्यात येऊ लागल्या, व्यवस्था होऊ लागली. एका खोलीत स्वयंपाक. एक बैठकीची खोली. एक गुणाला अभ्यासाला. सामान अगदी बेताचेच होते. जरुरीपुरते. त्यामुळे फार अडगळ नव्हती. पसारा नव्हता. स्वयंपाक घरात एका कोनाड्यात देव ठेवण्यात आले. त्यांना रामरावांनी नमस्कार केला. सर्वांनीच नमस्कार केला.

रामा गडी निघून गेला. ही तिघे अजून सामान नीट लावीतच होती. गुणाच्या आईने भांडी खाली नळावर नेली. ती घासली व वर आणली. गुणा आपली खोली लावू लागला. त्याने जगन्नाथचा तो सुंदर फोटो लावला आणी सकाळी इंदूने त्याला जो सुंदर हार घातला होता तो त्याने त्या फोटोला घातला. त्याने आपली सारंगी एका बाजूस ठेवली. इतरही फोटो होते. एक जवाहरलालांचा, एक दयाराम भारती यांचा. तेही त्याने लावले. त्याने पुस्तके एकीकडे ठेवली. एक सतरंजी घालून तीवर तो जरा बसला; परंतु उठला. आईला मदत करायला गेला.

इतक्यात इंदू आली.

‘‘झालं का लावून सामान?’’

‘‘हो. आहे तरी कितीसं? आता खालून पाणी आणते.

“आई, मी देतो पाणी आणून.”

“परंतु आज कशाला पाणी भरता? आजच्या रात्री आमच्याकडे जेवा. मी सांगण्यासाठीच आले आहे. उद्यापासून करा इकडे स्वयंपाक.”

“परंतु झोपायला इकडेच येऊ. रात्री पाणी नाही का लागणार?”

“तिकडेच झोपा ना केवढ थोरलं आमचं घर आहे!”

“परंतु वळकट्या इकडे आणल्या आहेत.”

“आमच्याकडे पुष्कळ आहेत गाद्या. पुष्कळ आहेत पांघरूणं”

“काय ग करायचं?” रामरावांनी पत्नीस विचारले.

“मी काय सांगू?”

“निदान जेवायला तरी याच तिकडे. कुठे झोपायचं ते मग ठरवू. हे देव वाटतं? इंदूरला फुलं खूप स्वस्त असतात. पुढे पुढे गुलाबाची फुलं दिडकीला वीस –वीस मिळतात.”

“दिडकीला वीस?”गुणाने आश्चर्याने म्हटले.

“हो वीस. जास्तच. पंचवीससुध्दा मिळतील. तुमच्या देवांना भरपूर वाहा फुलं. इंदूरला देवांची पूजा तरी छान होईल.”

“सारंच छान होईल,”गुणा म्हणाला.

“आमचं इंदूर चांगलं आहे. इथे किती राजवाडे, बागा; येथला दवाखाना केवढा आहे. दूरदूरचे लोक ऑपरेशनसाठी येतात आणी अहिल्याश्रम म्हणून सुंदर संस्था आहे. तुम्ही सारं पाहाल तुम्हाला इंदूर आवडेल.”

“तरी एरंडोलची आठवण येईल,” गुणा म्हणाला.

“ही वाटते तुमची खोली! हा कुणाचा फोटो?”

“माझ्या मित्राचा. माझी आठवण येऊन तो रडत असेल. त्याला न सांगता मी आलो. मी कुठे गेलो आहे हे त्याला माहीत नाही. बाबांची इच्छा आहे की आम्ही कुठे आहोत ते कोणाला कळू नये. याचं नांव जगन्नाथ.”

“आणि हा हार मी दिलेला ना?”

“हो. या फोटोला छान दिसतो नाही?”

“आणि हा जवाहरलालांचा फोटो. त्यांना कोण नाही ओळखणार? आणि हा कोणाचा?”

“हे दयाराम भारती. हे एक मोठे देशभक्त आहेत.”

“मी नव्हतं ऐकलं त्यांचं नाव.”

“आमच्या तालुक्यातील शेतकऱ्यांत ते हिंडत. त्यांची मला फारशी माहिती नाही. ते अवलियासारखे वागत; परंतु गरिबांवरच्या अन्यायाने त्यांच्या मनाची होळी होई. सरकारने त्यांना हद्दपार केलं आहे. त्यांच्या शिकवणीचा आम्हा दोघा मित्रांवर बराच परिणाम झाला आहे.”

“म्हणून तुम्ही खादी वापरता वाटतं? मीसुध्दा सूत काढते. मला गांधी जयंतीत पहिलं बक्षीस मिळालं होतं. आमच्या घरीही खादी आहे.”

“दिसली खरी. तक्के, लोड खादीचे होते. खादीच्या शाली होत्या. तुमच्या वडिलांच्या अंगावरही खादी होती.”

“परंतु बाबांचं तसं व्रत नाही.”

“आणि तुमचं?“

“माझंही नाही; परंतु मी आपली खादी घेते. ही तुमची सारंगी? आम्हाला आज दाखवाल ना वाजवून?”

“दाखवीन रात्री जेवणानंतर.’

“छान होईल. बाबा सांगत असत आगगाडीतील ती मजा. तुम्हाला जागा नव्हती. तुम्ही सारंगी वाजवलीत; लोक या या करू लागले. मग तुम्ही बाबांच्या गादीवर बसलेत.तिथे झोपलेतसुध्दा मग राजासारखे. होय ना?”

“राजासारखा?”

“बाबा सांगत होते.”

“मी सहज झोपलो. ऐटीने किंवा उद्धटपणाने नाही.”

“असा नाही बाबांच्या म्हणण्याचा अर्थ. जणू राजासारखे तुम्ही दिसत होता.”

“राजबिंडा जणू”

“हो राजबिंडे. तुम्हांला टेबल खुर्ची हवी का? मी देईन पाठवून. तुमच्या खोलीत लावायला आणखी काही हवं?”

“आणखी काय हवं? हरणं, मोर?”

“तुम्ही कुठे पाहिलीत?”

"तुमच्या अभ्यासाच्या खोलीत."

"माझ्या खोलीत गेले होतेत?"

"सहज बाहेरून पाहत होतो."

"आत का नाही गेलेत?"

"काही चोरायची इच्छा व्हायची!"

"तुम्ही चोर आहात?"

"कलावान चोर असतात. जगातलं जे-जे सुंदर दिसेल त्याला संग्रह करावा असं वाटतं."

"तुम्हांला ते हरण आवडलं?"

"हो आवडलं. जणू मृगजळाकडे धावत आहे!"

"मला त्यात बक्षीस मिळालं होतं."

"तुम्हांला सर्वच कामात बक्षिसे मिळतात वाटतं?"

"हो. आळसातसुद्धा बक्षीस मिळतं. आई पाठीवर देते थप्पड."

"परंतु हळूच ना?"

"कशावरून हो?"

"मला माझी आई हळूच मारी; कारण मी एकुलता ना!"

"मीही एकुलती. तुमचं नाव दोन अक्षरी व माझंही. तुम्हांला संगीत आवडतं. मलाही आवडतं. मला आवडलेला हा हार तुम्हालाही आवडला. आपलं दोघांचं सारखं आहे नाही?"

"परंतु मी गरीब आहे."

"आम्ही का श्रीमंत आहोत? फार नाही काही आणि तुम्ही एके काळी श्रीमंत होतातच. मला श्रीमंती नाही आवडत. मला दागदागिने मुळी नाही आवडत. फुलं मात्र आवडतात."

"आमच्या तिकडे पद्मालय आहे. त्याच्या जंगलात फार रानफुलं आणि मोराची पिसं सापडायची. मी व माझा मित्र गोळा करीत असू, एकमेकांच्या कानांत घालीत असू!"

"एखाद्या सुटीत बाबांबरोबर आपण जाऊ सारी."

"परंतु आम्ही अज्ञातवासात आहोत."

''अज्ञातवास संपणार नाही कधी?''

''मी श्रीमंत होईन तेव्हा संपेल. मग मान वर करून एरंडोलला जाईन.''

''मान वर का श्रीमंतीनेच होते?''

''असं नाही; परंतु आमचं घर पुन्हा घेता येईल. त्यात स्वाभिमानाने राहता येईल.''

''मी आता जाते. तुम्हाला बल्ब आणावे लागतील. मालकाला सांगावं लागेल. नाहीतर आमच्याकडचे दोन पाठवते रामाबरोबर. आहेत शिल्लक.''

''परंतु आम्ही कंदीलावरच भागवू.''

''कंदील नको मिणमीण करणारे. हा तुमच्या मित्राचा फोटो विजेच्या दिव्यात छान दिसेल. मी देतेच पाठवून बल्ब. नाहीतर मीच घेऊन येते.''

इंदू पळतच जणू गेली.

''किती मोकळी आहे मुलगी. जणू पूर्वीची जुनी ओळखच आहे. अशा रितीने बोलत होती,'' रामराव म्हणाले.

''जणू आम्ही तिचेच कुणी,'' गुणाची आई म्हणाली. थोड्या वेळाने इंदू बल्ब घेऊन आली.

''तुम्ही कशाला आलात?''

''रामा गेला होता बाहेर. आले पळत मीच.''

''आणा मी लावतो.''

''झटका बसेल हो. तुमच्या एरंडोलला आहेत का दिवे?''

''दिवे आहेत तर!''

''दिवे म्हणजे विजेचे''

''विजेचे नाहीत; परंतु मला माहीत आहे सारं.''

गुणाने बल्ब लावले. स्वयंपाकघर व बैठकीची खोली यांच्यामधील दारात एक लावला व एक स्वतःच्या खोलीत त्याने लावला. जगन्नाथच्या फोटोवर.

''आता इथे टेबल खुर्ची हवी. म्हणजे तुम्हाला वाचायला दिसेल, नाहीतर इतक्या उंचीवरून कसं दिसेल?''

''त्याला जोड घेऊ.''

''खरंच; परंतु टेबल पाठवीनच. त्या टेबलावर फुलदान ठेवावं. मी संजिऱ्याचा एक ताजमहाल आणून देईन. तो इथे ठेवू.''

''आणि तुम्हांला नको?''

''दोन आहेत माझ्या टेबलावर. दोन काय करायचे? एक तुमच्या टेबलावर होईल. तुमचं टेबल छान दिसलं पाहिजे. छान दिसली पाहिजे खोली. कोणी आलं तर त्याला प्रसन्न वाटलं पाहिजे. इथे बसावं असं वाटलं पाहिजे.''

''इथे कोण येणार आहे माझ्याकडे? ना कोणी ओळखीचं, ना मैत्रीचं.''

''मी येईन. मी आहे ना आता ओळखीची? मला नको चांगली दिसायला खोली?''

''हवी दिसायला.''

''चला आता कुलूप लावून. आई मला म्हणाली की त्यांना घेऊन ये येताना.''

''चला.''

रामराव व गुणाची आई इंदूरोबर निघाली; परंतु गुणा कोठे आहे!

''हे काय, गुणा कुठे आहे?'' रामरावांनी विचारले.

''ते पाहा पुढे चालले. त्यांना वाटलं की घर अद्याप पुढेच आहे,'' असे म्हणून इंदू धावली.

''अहो, घर मागे राहिलं. कुठे चाललात? आता चुकले असते. भलत्याच घरात गेले असते.''

''चुकलो असतो तर परत आलो असतो. तुमच्या घरी परत आलो असतो. मी चुकणार नाही असं वाटत होतं. एकदा पाहिलं की मी सहसा चुकत नाही.''

''एरंडोलात नसाल चुकत; परंतु इंदूर काही एरंडोल नाही.''

''इंदूर म्हणजे काही पुणे, मुंबई नाही.''

''इंदुरात चुकलात तर पुणं, मुंबई, कलकत्त्यात तुमचं कसं होईल?''

''तुम्ही आलात चुकलेल्यास घ्यायला तसं कुणी येईल.''

''काय रे गुणा, पुढे गेलास वाटतं?'' रामराव म्हणाले.

''मी पुढे जाणारा आहे. दयाराम भारती म्हणत पुढे चला. आगे कदम उठावो.''

सारी मंडळी वर आली. गुणाची आई आत गेली. मनोहरपंत बाहेर गेले होते. गुणा व रामराव दिवाणखान्यात होते. इंदू आत-बाहेर करीत होती.

“अहो आपण एक विसरलो,” ती म्हणाली.

“काय?”

“सारंगी आणायला विसरलो.”

“तुमची असेल ना.”

“माझी वाजवाल?”

“हं. तीच वाजवीन. दुसऱ्याची सारंगीही वाजवता आली पाहिजे. नाहीतर नेहमी अडायचं.”

“देऊ आणून?”

“द्या.”

आणि इंदूने आपल्या खोलीतून नुकतीच विकत घेतलेली सारंगी आणली. सुंदर दिसत होती.

“नवीनच आहे वाटतं?”

“तुमच्या हातूनच तिचं उद्घाटन करायचं ठरवलं होतं आम्ही.”

गुणाने सारंगी हातांत घेतली. तारा छेडल्या. इंदू नीट सरसावून बसली आणि गुणाने सूर आळविले. ते सूर आळवलेले ऐकूनच इंदू पासझरली. किती गोड, किती छान! ती म्हणे. गुणाने सूर आळवून एक राग सुरू केला. वाजवता वाजवता त्याची तन्मयता झाली. मनोहरपंत फिरून आले होते. तेही शांतपणे येऊन बसले. संगीतसमाधी त्यांनी भंगली नाही. संपला राग. क्षणभर कोणी बोलले नाही. इंदूची आईही दारात उभी होती.

“इंदू, तू त्यांना विश्रांती नाही दिलीस शेवटी. ते का कुठे पळून जाणार होते?”

“संगीत म्हणजेच विश्रांती,” गुणा म्हणाला.

“बाबा, माझ्या सारंगीचा उद्घाटनविधी झाला.”

“आता आज पुरे हो इंदू. संगीत विश्रांती देत असलं तरी त्याने भावनाही उत्कट होतात. त्याचाही मागून शीण वाटतो, थकवा येतो.”

“बाबा, कसं छान वाजवतात नाही?”

“तुला येईल का असं?”

“मला नाही येणार; परंतु यांच्याजवळ शिकेन.”

''इंदू, तू एक गाणं म्हणं व ते साथ करतील.''

''आता आधी जेवायला चला,'' इंदूची आई म्हणाली.

''जेवल्यावर म्हणेन बाबा गाणं,'' इंदू म्हणाली.

सारीजण जेवायला बसली.

''आमची इंदू फार बोलकी आहे. प्रथम जरा बुजते; परंतु ओळख व्हायला तिला वेळ नाही लागत,'' मनोहरपंत म्हणाले.

''खरंच फार मोकळी. त्या बिऱ्हाडी आली. सामान लावू लागली. बल्ब घेऊन आली आमच्यापेक्षा तिचीच अधिक धावपळ,'' रामराव म्हणाले.

''बाबा, त्यांना तिसऱ्या मजल्यावर टेबल-खुर्ची आहे ती द्या ना. अभ्यासाला होईल.''

''ती खूर्ची चांगली नाही.''

''मग माझी द्या. ती मी घेईन.''

''जसं तुला आवडेल तसं कर.''

''त्यांची खोली नीट नको का दिसायला? नाहीतर उद्या शाळेतील त्यांचे मित्र येतील व हसतील. आता शाळेत जाणार ना हे?''

''ते मॅट्रिकच्या वर्गात आहेत इंदू. नाही तर तू!''

''ते माझ्याहून मोठे आहेत.''

''फार नाहीत मोठे.''

''पण थोडे तरी आहेत ना?''

''पुरे गं. किती बोलशील.'' आई म्हणाली.

''बरं आता आळीमेळी.''

जेवणे झाली. इंदू, गुणा, रामराव, मनोहरपंत सारी दिवाणखान्यात आली. गुणाची आई इंदूच्या आईजवळ बोलत होती. त्यांचीही जेवणे झाली. सारे पटकन आटोपून त्याही बाहेर आल्या. रामा घरी गेला.

''इंदू म्हणतेस ना?'' मनोहरपंतांनी विचारले.

''तुम्ही हसणार नाही ना?'' तिने विचारले.

''वेडंवाकडं म्हणालीस तर येईल हसू.''

''आणि नीट म्हणेन तर आणीन आसू.''

“बरं पुरे. म्हण आता. उगीच आढेवेढे घेत बसेल. पटकन म्हणावं.”

“आई, गाणं का पटकन म्हणता येतं?”

“मला नाही हो माहीत. देवळात बायका जमतात, पटकन गाणी म्हणतात.”

“ही गाणी वाटतं तशी आहेत?”

“इंदू, वाद पुरे. म्हण हो आता,” मनोहरपंत म्हणाले. गुणाने हातांत सारंगी घेतली. इंदू गाणे म्हणू लागली. खरेच छान तिने गाणे आणि गुणाची साथ. गुणा तिला सांभाळून घेत होता.

“चांगला आहे हो गळा,” रामराव म्हणाले.

“अहो, गुणा सांभाळून घेत होता तिला,” मनोहरपंत म्हणाले.

“मला नको कुणी सांभाळायला. मीच त्यांना सांभाळीत होते. आवाज चढवीत नव्हते.”

परंतु गुणा खिडकीशी जाऊन उभा राहिला होता. रस्त्याकडे पाहात होतो. काय पाहात होता? इंदू एकदम तेथे गेली व म्हणाली,

“काय पाहतां?”

गुणा बोलला नाही. तिने त्यांच्या तोंडाकडे पाहिले तर अश्रू होते.

“काय झालं गुणा?”

तो बोलेना.

“आई, ते रडताहेत.”

“त्याला त्याच्या मित्राची आठवण झाली असेल. त्याचा मित्र जगन्नाथ सुंदर गातो. गुणा त्याला साथ करतो. दोघांचं एकमेकांवर फार प्रेम . राहून-राहून त्याला मित्राची आठवण येते; परंतु काय करायचं?” रामराव म्हणाले.

“फार प्रेमळ मनाचा तुमचा गुणा.”

“आम्ही आता जातो तिकडेच झोपायला.”

“इथेच झोपा ना?”

“नको. तिकडेच जातो. देव आहेत घरात आता ठेवलेले.”

“बरं तर.”

तिघे जायला निघाली.

“इंदू, जिन्यातला दिवा लाव.”

इंदू पुढे गेली व तिने बटन दाबले. तिघे जिना उतरून गेली. इंदू माघारी आली. बटन बसेच राहिले.

''इंदू, बटन बंद नाही केलंस?''

''मी नाही आता पुन्हा जात. लावायला सांगितलंत, लावलं.''

''अगं, येताना बंद नको का करून यायला?''

''मला नाही राहिली आठवण.''

इंदू पाय आपटीत गेली व बटन बंद करून आली.

''ती सारंगी ठेव व झोप आता.''

इंदू आपल्या खोलीत गेली. तिने ती सारंगी हृदयाशी धरली. नंतर तिने ठेवून दिली. ती झोपली. तिकडे गुणाही झोपला. दोघांच्या मनांत शेकडो विचार येत होते. किती कल्पना, स्वप्ने, तरंग, भावना!

इंदिरा

जगन्नाथ दक्षिण हिंदुस्थानच्या यात्रेस निघणार होता; परंतु त्याच्या वडिलांनी मध्येच एक डाव टाकला. एके दिवशी माहेराहून इंदिरा आली. जगन्नाथदादा तिला घेऊन आला. इंदिरेला आता सारे समजू लागले होते. ती काही आता लहान नव्हती.

इंदिरा आल्यापासून जगन्नाथ अधिकच अस्वस्थ झाला. तो खेड्यापाड्यांतून हिंडण्यातच दिवस घालवू लागला. एरंडोलला असलाच तर तो गुणाच्या घरी जाऊन राही. तेथेच झोपे.

''इंदिरे, तू अगदी बावळट आहेस. जगन्नाथला तू जिंकून घेतलं पाहिजे.''

''मी काय करू?''

''रड त्याच्यासमोर.''

''रडून काय होणार?''

''अश्रूंनी दगडही पाझरेल. इंदिरे, तुझ्यावर सारी जबाबदारी आहे. जगन्नाथला तू सांभाळ. तो जरा कुठे गेला तर बघ.''

इंदिरेला काय करावे ते समजेना.

एके दिवशी इंदिरेने जगन्नाथजवळ बोलण्याचे ठरविले. तो घरातून बाहेर पडणार होतो, इतक्यात इंदिरा येऊन म्हणाली,

''मला बोलायचं आहे थोडं.''

''काय बोलायचं आहे?''

''मनातील दुःख, मनातील वेदना.''

''मला वेळ नाही.''

''शेतकऱ्यांची दुःखं तुम्हाला दिसतात, स्वतःच्या पत्नीची दिसत नाहीत.''

''बरं बोल काय बोलायचं ते. मी ऐकायला तयार आहे.''

''तुमच्या खोलीत चला, इथे का बोलू?''

जगन्नाथ आपल्या खोलीत जाऊन बसला. डोळे मिटून खिन्नपणे बसला. ढोपरावर मान घालून बसला. इंदिरा आली. तिची कांकणे वाजली; परंतु जगन्नाथने वर पाहिले नाही.

''माझं तोंडही पाहायचं नाही अशी प्रतिज्ञा आहे का?''

''इंदिरे, माझी प्रतिज्ञा तुला माहीत आहे. मला का मोह पाडतेस?''

''माझं एवढंच सांगणं की कुठे जाऊ नका. वृद्ध आईबापांस सोडून कुठे जाऊ नका. मी रडत जन्म काढीन; परंतु जन्मदात्यांना तरी रडवू नका.''

''इंदिरे, तुझा पती जरा शहाणा होऊन यावा असं नाही तुला वाटतं? हिंदुस्थानभर जावं असं मला वाटतं. नवीन नवीन विचार मिळवून यावं असं मला वाटतं. मग राहू आनंदाने. करू संसार. मी का तुझा त्याग करू इच्छितो? तुला नवरा अधिक किमतीचा व्हावा एवढीच इच्छा आहे. पशूची पत्नी होण्यापेक्षा जरा विचाराने माणुसकी आलेल्या पतीची पत्नी हो. तुला इतक्यात घरी आणू नये असं माझं मत होतं. बाबांनी फसवले. माझ्या मार्गात विघ्न यावं असा त्यांचा हेतू; परंतु तू विघ्न आणणार का? तू मला जाऊ नको असं सांगितलंस तर मी नाही जाणार. माझं काय करायचं ते तुझ्या हाती आहे. पतीच्या आयुष्याची माती करायची की सोनं करायचं ते तुझ्या हाती आहे. मला माकड करणार का मनुष्य करणार?

''इंदिरे, माझ्या तनातील ओढाताण कशी सांगू? घरीच राहिलो तर आनंद नाही. माझ्या तोंडावर हास्य दिसणार नाही. माझा मित्रही कुठे परागंदा झालेला. तो व त्याचे आईबाप कुठे आहेत कळत नाही. त्यांची काय स्थिती असेल? काय

दशा असेल? मी का सुखात राहू? संसारात दंग होऊ? नाही. मला हे सारं सहन होत नाही. माझा मित्र वनवासी तर मलाही वनवासी होऊ दे. त्या वनवासात हिंडेन. ज्ञान मिळवीन. तुला विचारांचा मेवा घेऊन येईन. जाऊ का मी? बाबांनी मला परवानगी दिली होती. तू दे. मला भिक्षा घाल.''

''काय करू? मी अडाणी आहे. मला काही कळत नाहीं. तुम्ही वनवासात जाऊ इच्छिता. मलाही येऊ दे. रामाबरोबर सीता गेली.''

''इंदिरे, आपण राम-सीता नाही. आपण साधी माणसं. भोगी जीव. वासनाविकारांच्या आहारी जाणारी माणसं. राम-सीता वनात होती. प्रेमाने राहत होती; परंतु वनात बारा वर्ष ती व्रतस्थ राहिली. सीतेला अयोध्येस आल्यानंतर लव-कुश झाले. आपण वनवासात जाऊनही संसार मांडू. भिकाऱ्यांचा संसार. इंदिरे, तू इथे राहा. आई-बाबा म्हातारी आहेत. त्यांची सेवा कर. मला जाऊ दे. काही वर्षांनी परत येईन. चार-पाच वर्षांनी येईन. खरोखर हे माझे शिकण्याचे दिवस. कॉलेजात गेलो असतो तर चार वर्षं शिकत राहिलो असतो.

''रुढीमुळे आपलं लग्न त्यांनी उरकून टाकलं. त्यांनी वेडेपणा केला, म्हणून आपण थोडाच करायचा आहे? तूही घरी वाच. मी तुला चांगली चांगली पुस्तकं पाठवीन. तुला पत्रंही लिहित जाईन. सोपी-सुरेख पत्रं. तूही मला लिहित जा. आपण पत्राने भेटत जाऊ. एकमेकांचे वाढते विचार एकमेकांस कळवीत जाऊ. इंदिरे, रागावू नकोस. मी तुला तुच्छ नाही मानीत. तुझी-माझी गाठ पडली आहे. तुझं सुख दु:ख माझ्याशी व माझं तुझ्याशी जोडलेलं आहे. आपण आपला संसार सुंदर करू, जगाला उपयोगी पडेल असा करू. तुझा पती साधा आहे. मला श्रीमंतीची आवड नाही. ही सारी इस्टेट गरिबांसाठी द्यावी असं वाटतं. असा दरिद्री होऊ पाहणारा पती तुला आवडेल?''

''तुम्ही कसे असा, मला आवडाल. मी माहेरी होते. तुमच्याबद्दल निरनिराळ्या गोष्टी कानांवर येत. कोणी म्हणत तुम्हाला व्यवहार कळत नाही. कोणी म्हणत सारी इस्टेट घालवून बसतील. कोणी म्हणत तुरुंगात जातील. मी सारं ऐकत असे. आपल्या लग्नातील गोष्टीही मी विसरले नाही. भिकाऱ्यांना तुम्ही उष्टं घालू दिलं नाही. त्या उष्ट्याच्या बादल्या मागे नेऊन, पुन्हा त्याच नेणार होते; परंतु मी भांडले. ज्या दिवशी आपलं लग्न लागलं त्या दिवसापासून मी तुमची बाजू घेऊन भांडू

लागले. त्या दिवसापासून मी तुम्हाला ओळखू लागले. तुमच्याविषयी जसजशी टीका होई, तसतसे तुम्ही अधिकच माझे होत होतात. केव्हा तुमच्याजवळ मी येईन असं वाटे. केव्हा तुमचे विचार समजून घेईन असं वाटे.

''शिरपूरला काही भगिनी प्रभात फेरी काढीत. गांधी जयंतीस खादी विकायला जात. मीही त्यांच्याबरोबर जात असे. वाटे, की तुम्हांला ते आवडेल. मी काँग्रेसचे सभासदसुद्धा करीत असे. न कळत तुम्ही मला शिकवीत होता. मला धैर्य देत होता. मला वाटे की एरंडोलला जाऊन आपण अधिक काम करू. हरिजनवस्तीत जाऊ. हळदी-कुंकू करू आपल्या घरी. त्यांना बोलावू. तुम्हांला खरोखर सांगते की तुम्ही मला आवडता. दूर होतेत तरी आवडत होते. तुम्ही दूर होता; परंतु मी तुम्हाला जवळ घेत होते. तुमच्यासारखी होऊ पाहात होते. मला सारं सांगता येत नाही; परंतु तुम्ही कुठे जाणार असाल तर मला ठेवा ना एखाद्या आश्रमात. तिथे मी तयार होईन. माझंही मन शिकेल. नाना गोष्टी मला कळतील. तुम्ही एकटेच का जाता? माझीही व्यवस्था करा. मी एकटीच इथे राहीन तर वेळ तरी कसा दवडू? ठेवाल का मला एखाद्या आश्रमात? वर्ध्याला महिलाश्रम आहे. ठेवाल तिथे? किंवा दुसरं काही शिकवा मला. पुण्याला कुठे ठेवा. माझी व्यवस्था करा. आपण दोघं शिकू. तुम्ही स्वतःचा विचार केलात. माझा केलात का?''

''इंदिरे, तुझा नाही हो विचार केला. मी स्वार्थी आहे. तू माझ्या ध्येयाची दुरून ओळख करून घेत होतीस; परंतु मी माझ्याच विचारात होतो. तुम्ही स्त्रियाच आमच्यापेक्षा अधिक त्यागी हे खरं. तुला आश्रमात ठेवता येईल; परंतु आई व बाबा यांना ते आवडणार नाही. म्हणतील म्हातारपणी आम्हाला कोणीच नाही. दोघांनी जाणं बरं नाही दिसणार.''

''थोडे दिवस तरी मला पाठवा एखाद्या आश्रमात. आधी मला पाठवा. मी आल्यावर मग तुम्ही जा.''

''परंतु आई व बाबा काय म्हणतील?''

''तुम्ही त्यांची समजूत घाला. तुमच्या जाण्याला तरी त्यांची कुठे आहे संमती? परंतु तुम्ही समजूत घातलीत. तशी माझ्याविषयी घाला.''

''बरं बघू.''

''मला पाहून आता दुःखी नका होत जाऊ. मी तुमच्या आड येणार नाही. तुम्हांला विघ्न होणार नाही. मी तुमच्या आनंदासाठी आहे. तुमचं समाधान ते माझं हो.''

''इंदिरे, मी असा माणूसघाण्याप्रमाणे वागलो त्याची क्षमा कर. ते विसरून जा. आपण दोघं चांगली होऊ.''

जगन्नाथ एरंडोलमधील काही काँग्रेस कार्यकर्त्यांच्यामार्फत वर्ध्याकडे पत्रव्यवहार केला. स्वखर्चाने व घरच्या परवानगीने इंदिरेने येऊन राहावे असे लिहून आले. जगन्नाथला आनंद झाला. ''आई, आम्ही दोघं वर्ध्याला जाऊन येऊ का? महात्माजींचं दर्शन घ्यावं असं मनात येतं. येऊ का जाऊन?''

''इंदिरेलाही नेणार आहेस?''

''हो. मी एकटा कसा जाऊ?''

''जा. दोघं जा. मला इतके दिवस काळजी वाटत होती. तू तिच्याजवळ बोलतही नाहीस. घरात क्षणभर थांबत नसतो. कुठे खेड्यापाड्यांतून भटकत असतोस. वाटे पोरीचं काय होणार कुणास कळे. आता जरा हसतोस, आनंदी दिसतोस. चांगलं झालं. दोघं सुखाने संसार करा.''

''मग येऊ का जाऊन?''

''याहो जाऊन. महात्माजींच्या पाया पडून या व संसाराला सुरवात करा. या जाऊन.''

एके दिवशी जगन्नाथ व इंदिरा दोघे निघाली. इंदिरेला फार आनंद झाला होता. पतीबरोबर प्रथमच ती आज बाहेर पडत होती. एकत्र प्रवास करीत होती.

''तुला तिथे आश्रमात ठेवून मी परत येणार. आई म्हणेल फसवलंस म्हणून; परंतु सांगेन की तिथलं वातावरण इंदिरेला आवडलं. ठेवलं आहे थोडे दिवस.''

''परंतु मी येईपर्यंत तुम्ही नाही हो जायचं कुठे.''

''आणि गेलो म्हणून काय झालं? आई-बाबांना एकदाच दुःख होऊ दे. पुन्हापुन्हा नको. मी तुला आश्रमात ठेवून घरी येईन व मीही कुठे निघून जाईन. कदाचित आई व बाबा आपण होऊनच म्हणतील, की तुलाही जायचं असेल तर आत्ताच जा. ती आल्यावर पुन्हा तू जायचं, असला प्रकार नको. बघावं काय काय होतं ते.''

"मी तिथे काय शिकू?"

"जे शिकता येईल ते शिक. मुख्य वातावरणाचा जो परिणाम होईल, जे संस्कार होतील, ते महत्त्वाचे. काय शिकावं याला महत्त्व नाही. शिकून मनावर, बुद्धीवर, हृदयावर संस्कार काय झाले हा प्रश्न आहे."

"तिथे फार कडक नियम असतील नाही?"

"तू त्याप्रमाणे वाग. शाबासकी मिळव. कोणतंही काम करावयास लाजू नकोस. झाडणं असो, दळणं असो; भांडी घासणं असो वा स्वयंपाक करणं असो; पाणी भरणं वा धुणं; सारं आनंदाने कर !"

जगन्नाथ व इंदिरा वर्ध्याला आली. महिलाश्रम वर्धा शहरापासून थोड्या अंतरावर होता. मारवाडी विद्यालयाच्या जवळ होता. शेतामध्येच होता. जगन्नाथ तेथील चालकास भेटला. व्यवस्था झाली. त्या महिलाश्रमात ठिकठिकाणांच्या अनेक कार्यकर्त्यांच्या मुली शिकत होत्या. काही विवाहित स्त्रियाही शिकत होत्या.

येथे पूर्वी सत्याग्रहाश्रम होता. महात्माजी कधी आले तर तेथील इमारतीतील वरच्या मजल्यावरील खोलीत राहत. त्या खोलीत जगन्नाथ गेला. तेथे महात्माजींनी प्रवचने केली होती. तेथे ते राहिले होते.

जगन्नाथने त्या खोलीला प्रणाम केला. सत्याग्रहाश्रम आता नालवाडीस गेला होता. पूज्य विनोबाजी आता नालवाडीस राहत; परंतु महिलाश्रमातील भगिनींसाठी ते रोज येत असत. काही तरी सांगत असत. प्रेमाने सर्वांची चौकशी करीत असत व पुन्हा नालवाडीस हरिजनवस्तीत राहत असत.

आज नालवाडी सर्व विधायक कामांचे केंद्र झाले आहे. त्यावेळेस पसारा नव्हता. आज वर्ध्याच्याभोवती सर्व विधायक कामे शास्त्रीय रीतीने सुरू झाली आहेत. खादीच्या सूर्याभोवती सर्व उद्योग तेथे फिरत आहेत. सर्व हिंदुस्थानातून विद्यार्थी शिकायला येत आहेत. अखिल भारतीय ग्रामोद्योग विद्यालय तेथेच आहे. सर्व हिंदुस्थानचे तेथे आज दर्शन होते. विधायक कार्याला वाहून घेऊन दरिद्रीनारायणाची सेवा करू पाहाणाऱ्या भारतीय तरुणांचा ध्येयनिष्ठ व उत्साही श्रमजीवी मेळावा तेथे दिसून येतो. खादीचे प्रयोग तेथे होत आहेत. टकळीवरच तासात चरख्याइतके सूत कातणारे टकळी-वीर तेथे आहेत. डाव्या-उजव्या

हाताने चरखा चालवणारे आहेत. पायांनी चालवावयाचा चरखा आहे. अद्याप प्रयोग चालले आहेत. हा मगन-रहाट दीडपट काम देतो. यावर दोन्ही हातांनी सूत कातततात. पिंजणाचे प्रयोग चालले आहेत. कापशीचे प्रकार, कोणला चांगला, ते सारे येथे शिकवले जाते. संशोधक बुद्धी राष्ट्राच्या या बुडालेल्या धंद्याकडे लावण्यात आली आहे. मगनवाडी व नालवाडी येथे सर्व प्रकारचे ग्रामोद्योगी शिक्षण आज मिळत आहे. कागद तयार करणे, चर्मालय, सुधारलेली तेलघाणी, सारे तुम्हाला दिसून येईल. शास्त्रीय गो-पालनही दिसून येईल आणि जवळच राष्ट्रीय शिक्षणाचे प्रयोग-वर्धाशिक्षणपद्धतीचे प्रयोग दिसतील. आज हे सारे प्रयोग, हे सारे प्रकार तेथे आहेत; परंतु त्या वेळेस नव्हते. त्या वेळेस पूर्वीचा पाया भरला जात होता. श्रद्धा व निष्ठा यांचा पाया भरला जात होता. आध्यात्मिक भांडवलाचा पाया भरला जात होता. प्रेम व पावित्र्य यांचा पाया भरला जात होता.

जगन्नाथ तेथे दोन दिवस होता. आश्रमात साप, विंचू वगैरेंना कोण मारीत नाही. सापाला पोत्यात वगैरे पकडून बाहेर नेऊन सोडून देतात. विंचवाला धरून शेतात सोडून देतात. जगन्नाथ तेथे असताना एके दिवशी एक विंचू आला, एक लहानशी मुलगी आली, तिने पकडली नांगी व तो शेतात दूर सोडून दिला. निर्भयतेचे वातावरण तेथे आहे. 'सर्वत्र भयवर्जनम्' या व्रताने प्रायोगिक शिक्षण तेथे देण्यात येते.

एके दिवशी जगन्नाथ तेथून गेला. इंदिरेचा निरोप घेऊन गेला.

"चांगली हो, चांगली राहा. सर्वांची शाबासकी मिळव," तो म्हणाला.

"तुम्ही पत्र पाठवीत जा आणि मी येईपर्यंत जाऊ नका. खरंच नका जाऊ."

"ते मी बघेन. बाबाच जा म्हणाले तर?"

"जे योग्य ते करा."

जगन्नाथ गेला. इंदिरेला वाईट वाटले; परंतु समाधानही वाटले. आपल्या इच्छांना मान देणारा आपला पती आहे ही गोष्ट तिला दिसून आली. तिला आनंद झाला. जगन्नाथलाही आनंद वाटत होता. आपल्याला अनुरूप पत्नी मिळाली म्हणून तो सुखावला होता. त्याला कल्पनाही नव्हती, की इंदिरा अशी आपल्या ध्येयाला दुरून पाणी घालीत असेल. आपल्यापेक्षाही ती मोठ्या मनाची आहे, उच्च विचारांची आहे, म्हणून जगन्नाथ आनंदाला.

एरंडोलला तो एकटाच आला.

''इंदिरा रे?''

''तिला तेथील आश्रमातच ठेवलं. महिलाश्रम. तिथे मुली शिकतात. अनेक कार्यकर्त्यांच्या बायका, मुली तिथे आहेत. छान आहे वातावरण. येऊ दे चार गोष्टी शिकून. येऊ दे चांगली होऊन. देशाच्या कामाला योग्य होईल.''

''तुम्ही मांडलं आहे तरी काय?''

''आई, योग्य तेच करीत आहोत. पुढे चांगला संसार करता यावा म्हणून तयारी करीत आहोत.''

''तू ना जाणार होतास?''

''इंदिरा आली म्हणजे मी जाईन. तुमच्याजवळ नको का कोणी?''

''अरे, असाच का जन्म काढणार तुम्ही? जायचं असेल तर आताच तूही का नाही गेलास? आज तू इथे एकटा. पुन्हा ती आली म्हणजे ती एकटी. तुम्हाला दोघांना एकत्र नांदताना पाहाण्याचं आमच्या का नशिबीच नाही? आमच्या डोळ्यांना ते सुख नाही का दिसणार? तुम्हांला असं एकटं बरं नाही वाटत जगन्नाथ. आजच आलास; माझं आता एवढं तरी ऐक. तू आताच कुठे ये जाऊन थोडे दिवस. इंदिरा व तू या काय शिकून यायचं ते; परंतु लवकर दोघे या. दोघांना एकत्र नीट नांदताना पाहून, संसार नीट करताना पाहून मग आमचे डोळे मिटोत!''

''बरं हो आई.''

काही दिवस गेले आणि जगन्नाथ खरोखरच निघून गेला. आईबापांचा निरोप घेऊन गेला. महाराष्ट्र सोडून दक्षिण हिंदुस्थानात जावयाचे त्याने ठरविले. श्रीरंगम्, मदुरा, कांची, त्रिचनापल्ली, कुंभकोण, रामेश्वर सारे पाहावयाचे त्याने ठरविले. तो त्रिचनापल्ली पाहणार होता. अड्यार येथील थिऑसफीची सुंदर संस्था पाहणार होता. म्हैसूर, बंगलोर व मलबार किनारा पाहणार होता. इकडे कृष्णेच्यावर जाऊन आंध्र प्रदेशाचेही दर्शन घेण्याचे त्याच्या मनात होते. मच्छलीपट्टण येथे प्रख्यात चित्रशाळा महाविद्यालय आहे तो पाहणार हाता.

नवे, जुने सारे पाहण्याची त्याला इच्छा होती. पंपा, किष्किंधा, कोठे असतील ती स्थाने, ती अमर स्थाने? जगन्नाथला ती पाहण्याची हूरहूर होती. शंकराचार्यांची, रामानुजाचार्यांची जन्मभूमी पाहण्याची त्याला उत्कट इच्छा होती.

नवीन आश्रम पाहू म्हणत होता. ग्रामोद्योगाची केंद्रे व त्याप्रमाणे प्रचंड विद्युन्निर्मितेगृहेही तो पाहणार होता. तो सोन्याच्या खाणी पाहणार होता व गरीब बायांनी कातलेले शंभर-शंभर नंबरी सूतही पाहणार होता.

जगन्नाथ जा. दक्षिण भारताचे दर्शन घेऊन ये. दक्षिणेकडील मलयगिरीचा चंदन-सुगंध घेऊन ये. दक्षिणेकडील फुलांचा सुवास घेऊन ये. तिकडील सुख-दुःखांच्या गोष्टी आण.

मुलगा व सून दोघे गेली. पंढरीशेट व जगन्नाथची आई दोघे घरात राहिली. एक कारभारी होता. तो सर्व पाहात होता.

''आई, तू माझ्याकडे चल राहायला,'' वडील मुलगा येऊन म्हणाला.

''इथेच बरं आहे. कुठे जा ये आता नको. अजून माझ्याच्याने होतं आहे. भातभाकरी करवते आहे. येतील इंदिरा व जगन्नाथ. आम्हाला सोडून फार दिवस थोडीच राहणार आहेत दूर?''

''आम्ही का तुझी सावत्र आहोत?''

''तसं नाही रे; पण पुन्हा या घराला कुलूप लावून तुमच्याकडे येणं बरं नाही वाटत. घर उघडं राहू दे. केरसुणी फिरू दे. देवांची पूजा होऊ दे. जगन्नाथचं घर बंद नको.''

दोघे म्हातारी नवराबायको राहात होती. जगन्नाथचे प्रथम-प्रथम वरचेवर पत्र येई; परंतु पुढे पुढे वेळेवर पत्र येईनासे झाले. तिकडे इंदिरेला जगन्नाथने, तो दक्षिणदर्शनाला गेल्याचे कळविले. तिला वाईट वाटले. का बरे वाईट वाटले? म्हाताऱ्या सासूसाऱ्यांजवळ कोणी नाही या गोष्टीचे तिला वाईट वाटले.

परंतु इंदिरेला फार दिवस तेथे राहावे लागणार नव्हते; कारण महिलाश्रम बंद करावा असे ठरू लागले. जेवढा फायदा मिळाला तेवढा इंदिराने घेतला. थोरामोठ्यांचे शब्द तिने ऐकले. मोठ्यामोठ्या देशभक्तांची तिला दर्शने घडली. अनेक गोष्टी कळल्या, पुष्कळ माहिती तिला झाली.

एके दिवशी इंदिरा एरंडोलला परत आली. आज ती एकटीच परत आली. गेली होती तेव्हा जगन्नाथ बरोबर होता. आज जगन्नाथ फक्त मनात होता. ती सासू-सासऱ्यांच्या पाया पडली. घरात वावरू लागली. आता सारे काम तिने आपल्या हाती घेतले. सासूसासऱ्यांची ती मनापासून सेवा करू लागली.

परंतु जगन्नाथचे बऱ्याच दिवसांत पत्र आले नाही. पंढरीशेट दुःखी–कष्टी दिसत. जगन्नाथची आई रडे. दोघांचे जगन्नाथवर फार प्रेम होते. जगन्नाथची आई आता इंदिरेला वाटेल ते बोले. ती आपल्या दुःखाला, मनातील उद्वेगाला वाट देई; परंतु इंदिरेला ते वाग्बाण लागत. ती बोलत नसे, सारे सहन करी.

''तू आश्रमात राहातीस ना, जातीस ना, तर तो न जाता. तू कशाला तिथे राहिलीस? तिथे काय होतं? आमचा मुलगा तू दवडलास. आण शोधून त्याला. इतके दिवस आम्ही त्याला जाऊ दिला नाही. डोळ्यांतील पाण्याने थांबवला; परंतु तू त्याला जायला सांगितलं असशील: म्हाताऱ्या आईबापांपासून जा, कशाला राहता, असं सांगितलं असशील. स्वतः गेलीस, त्यालाही दवडलंस.''

''परंतु मी त्यांना घरी राहा असं सांगितलं होतं. मी येईपर्यंत तरी जाऊ नका असं सांगितलं होतं. तुम्ही त्यांना जायला सांगितलंत. त्यांनी पत्रात तसं मला लिहिलं होतं. आई 'आताच जा म्हणते, तू तिकडे आहेस तो जाऊन ये म्हणते,'' म्हणून मी जातो, असं त्यांनी मला कळवलं. माझा काय बरे दोष?''

''मग त्याला का इथे दुःखी–कष्टी एकटा राहू देऊ? म्हटलं तूही जा. तुझी राणी येईपर्यंत तू जा; परंतु तू तिथे राहिलीस का? घरी यायचं ते सोडून तिथे का राहिलीस? तुझा पायगुण काही बरा नाही. वाटलं होतं की तू त्याला बांधून ठेवशील. म्हणून तुला माहेराहून आणलं. त्याला नकळत आणलं; परंतु उठलीस व वर्ध्याला जाऊन राहिलीस. हल्लीच्या तुम्ही मुली! काय काय कराल ते थोडंच! नवरे सोडून का कोणी आश्रमात जाऊन राहतं? जोगीण का बनायचं आहे?''

इंदिरा तोंडास तोंड देत नसे. तिला वाईट वाटे. तिला एखाद्या वेळेस रडूही येई. जगन्नाथही आठवण करून ती समाधान मानी; परंतु त्याचेही पत्र येईनासे झाले. त्यामुळे मात्र तिचा जीव गुदमरू लागला. ती दुःखी, अधिकच दुःखी दिसू लागली. वर्ध्याहून येताना तिने एक सुंदर चरखा आणला होता. जगन्नाथच्या खोलीत ती रिकाम्या वेळी बसे, कातीत बसे. भिंतीवर जगन्नाथचा फोटो होता, त्या फोटोला ती माळ घाली. ती खोली म्हणजे तिचे प्रेममंदिर. जगन्नाथ हिंदुस्थानची यात्रा करीत होता. तीर्थे, क्षेत्रे पाहात होता. पंपा, किष्किंधा, रामेश्वर पाहात होता; परंतु इंदिरेची सारी तीर्थे, क्षेत्रे त्या समोरच्या फोटोत होती. ती घरातील सारे काम करी. दुपारी तिला वेळ मिळे; मग ती या प्रेममंदिरात येई. कातीत बसे. हाताने

सूत काढी, डोळ्यांतून टिपे काढी. त्या सुताने पतीला का ती आणू पाहात होती? त्याला बांधून आणण्यासाठी का तो प्रेमाचा धागा ती काढीत होती?

तिसरे प्रहरी ती खाली जाई. पुन्हा सारे काम करी. रात्री काम आटोपल्यावर ती वर येई. न संपणारी रात्र तिची असे. चरखा तिचा सोबती असे. ती हलक्या आवाजाने गाणे म्हणे, हृदय भरून येऊन गाणे म्हणे. शोकविव्हळ होऊन गाणे म्हणे.

येईल कधी, येईल कधी
जीवनाचा नाथ माझा जगन्नाथ
येईल कधी ।।ध्रु० ।।
प्राण घुटमळे
हृदय जळे
भरती डोळे
गळती जळे
प्राण मी वाहीन त्यांच्या पदीं ।।येईल० ।।
वृक्षा वरी
लता बरी
वृक्षा विणे
सुके जिणे
शोभे फुले त्याच्या स्कंधी ।।येईल० ।।
नदी रडे
चढे पडे
डोंगर कडे
खुशाल कुदे
समुद्राला भेटेल नदी ।। येईल० ।।
किती पाहू वाट
कुठली लागली नाट
आहे परी
आशा अंतरी

वाट पाहीन शतवर्षावधी ।।येईल० ।।

इंदिरेचे असे दिवस जात होते.

एकदा तिचा भाऊ एरंडोलला आला होता. बहिणीची दशा पाहून त्याला वाईट वाटले.

"अंबू, माहेरी येतेस काही दिवस?"

"आईबाप ज्यांचे आहेत त्यांना माहेर."

"असं का बरं म्हणतेस?"

"आजपर्यंत नाही आलास तो?"

"परंतु आज तरी आलो ना? चल काही दिवस. तोपर्यंत कदाचित ते येतील."

इंदिरा माहेरी गेली. दागदागिने अंगावर न घालता गेली. सासूने सांगितले नाही. तिने मागितले नाहीत. तिचे त्या दागिन्यांकडे लक्षही नव्हते; मात्र जगन्नाथचा फोटो बरोबर होता. तो एक अमोल अलंकार तिच्या ट्रंकेत होता. बरोबर चरखा होता. शिरपूरला अंबू आली.तिला अंबू नाव आवडे. तिच्या मनात येत असे की आपण आपल्या पतीला हे नाव सांगु; परंतु तिला ती संधी कधी येणार होती?

माहेरी आली तर तिला आनंद नव्हता. तिचे भाऊ दिवसभर बाहेर असत. त्याच्या उद्योगधंद्यांत असत, शेंगा, कपाशीच्या बाजारानं असत. अंबुजवळ कोण बोलणार तिला अंबू हाक कोण मारणार? भावजया बोलत नसत. अंबू आपले लुगडे आपल्या हातांनी धुवी. घरातीलही काही काम करू लागे; परंतु भावजयांचा जणू तिच्यावर बहिष्कार असे.

"तुम्ही आपल्या नुसत्या जेवत जा. कशाला हात नका लावीत जाऊ. माहेरी काम नको." मोठी भावजय म्हणाली.

"पण मी करीत का नाही काम?"

"तुम्ही करतां; परंतु आम्हालाच ते नको. तुम्ही त्या आश्रमात होतात. वाटेल त्याच्या हातचं खाल्लं असाल. सारा भ्रष्टाकार. तुमच्या सासरी चालत असेल. इथे नको. आपल्या वर खोलीत बसत जा. चरखा फिरवीत जा, जेवायला खाली येत जा."

"बरं हो वैनी. तुमची इच्छा तशी वागेन."

अंबू वरती बसे. फोटोसमोर बसे. फोटोला स्वत:च्या हातच्या सुताचा हार तिने घातला होता, फुलांचा हार तरी कशाला? भावजया बोलायच्च्या एखादा वेळ.

एके दिवशी भावजयांचे पुढील बोल तिच्या कानांवर आले.

"असा कसा; पण तो सोडून गेला?"

"लग्नातच त्याचं लक्षण दिसत होतं. खादीचे कपडे घालून लग्नाला आला. त्या पासोड्या घालून, ती दीडदमडीची टोपी घालून लग्नाला बसला. गेला निघून कुठे तरी.'

"आणि या त्या आश्रमात जाऊन बसल्या."

"त्यानेच पोचवलं असेल व आपण निघून गेला."

"परंतु आता त्याचा पत्ता नाही. पत्रही म्हणे येत नाही."

"या जात का नाहीत धुंडायला? आणावा शोधून."

"बसतात चरखा फिरवीत."

"त्यांच्या मनाला काही वाटत कसं नाही?"

"वाटायचं काय? इथे काम ना धाम. भाऊ लाड करताहेत. काय कमी आहे?"

"एखाद्या वेळेस त्या फोटोसमोर खोटं रडतात. खरं प्रेम असतं तर गेल्या असत्या त्याच्या पाठोपाठ. नाहीतर जीव देत्या."

"त्या म्हाताऱ्या सासूसासऱ्यांचे मात्र हाल. खुशाल आपल्या माहेरी निघून आल्या."

"आणि इथे अशा राहणार किती दिवस? आपल्यालाही लाज वाटते. चार बायका विचारतात. काय सांगायचं त्यांना? मान खाली घालावी झालं!"

"एखाद्या आश्रमात कायमच्या का नाही जात?"

"व्हा म्हणावं जोगीण."

इतक्यात वडील भाऊ बाहेरून आला. त्यांची बोलणी थांबली.

"अंबू कुठे आहे?"

"त्या असतात वर. खाली कशाला येतील त्या? त्यांचा चरखा नि त्या." भाऊ वर गेला. तो बहिणीच्या डोळ्यांतून धारा गळत होत्या.

"अंबू!"

तिने उत्तर दिले नाही. तिने डोळे पुसले. ती गंभीर झाली.

"काय भाऊ?"

"तुला आनंदाची वार्ता घेऊन आलो आहे. बघ पत्र, तुझ्या नावाचं. त्यांचंच असेल बहुधा."

अंबूने पत्र हाती घेतले. ते अक्षर तिने ओळखले. तिची चर्या फुलली, डोळे हसले.

"होय भाऊ, त्यांचंच पत्र."

"बरं झालं. येतील आता तेही. पत्र आलं, पाठोपाठ तेही येतील. अंबू, अशी रडत नको जाऊ. मी जातो हं."

भाऊ निघून गेला. अंबूने ते पत्र कितीतरी वेळा हातांतच ठेवले. शेवटी तिने हलक्या हातांनी ते फोडले. जगन्नाथचे पत्र आले होते. जगन्नाथ लवकरच येणार होता. वर्ध्याचा आश्रम बंद झाल्याचे तेथील व्यवस्थापकांकडून त्याला कळले होते. मग त्याने घरी एरंडोलला विचारले होते, की इंदिरा कोठे आहे. ती माहेरी आहे असे कळल्यावरून त्याने इकडे पत्र लिहिले होते. ही सारी हकिकत त्या पत्रात होती. मध्यंतरी बरेच दिवस पत्र का लिहिता आले नाही त्याचीही हकिकत होती. अंबू पत्र वाचता वाचता मध्ये थांबे. जणू लवकर संपेल वाचून म्हणून का थांबे? पुरवून पुरवून का ती वाचीत होती?

ते पत्र म्हणजे आशा होती, नवजीवन होते, अमृत होते. भावजयांची बोलणी ती विसरून गेली. त्या साऱ्या हृदयाच्या जखमा भरून आल्या. ती आनंदाने ओसंडून गेली. तिने तो फोटो काढून घेतला व हृदयाशी धरला. "कठोरा, आली दया एकदाची," असे त्याला म्हणाली; परंतु पुन्हा म्हणाली "नाही हो, कठोर नाही हो तुम्ही. प्रेमळ आहात. गरिबांच्या दु:खाने दु:खी होणारे आहात. गमतीने मी कठोर म्हटलं हो. रागावू नका हो." तिने तो फोटो पुन्हा ठेवून दिला.

ती आपल्या सुताच्या गुंड्या मोजू लागली. भरपूर होत्या. आता लवकर एरंडोलला जाऊ व कासोद्याच्या खादी केंद्रातून विणून आणू. छान होईल धोतरजोडा. शर्टस्सुद्धा होतील. माझ्या हातच्या सुताचे कापड. त्यांना आवडेल. ते मला काय आणतील? तेही आणतील का त्यांच्या हातच्या सुताचे पातळ? परंतु त्यांना नसेल वेळ झाला आणि मध्येच तो तुरुंगवास! आम्हाला कळलेही नाही. सुखरूप येवोत

म्हणजे झाले. लिहितात की प्रकृती चांगली आहे; परंतु तुरुंगात राहून का चांगली राहिली असेल प्रकृती?

अंबू अशा विचारांत होती. एरंडोलला आता जावे असे तिने ठरविले. ती भावाजवळ त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी बोलली.

"कंटाळलीस वाटतं इथे?" भाऊ म्हणाला.

"अरे, ते आता येणार आहेत. घरीच जाऊ दे."

"घर म्हणजे ते वाटतं?"

"होय भाऊ. इथे दोन दिवस यावं. अक्षय घर तेच. तिथे माझी सत्ता, आणि तुला कुठे आहे फुरसत बोलायला? जाऊ दे. आणलीस माहेरी, पुष्कळ झालं."

"तुला काय देऊ अंबू?

"लोभ ठेव. अंबूची आठवण ठेव. आहे एक एरंडोलला बहीण, विसरू नकोस. शंभरदा जाता मुंबई-पुण्यास. यावं एखाद्या वेळेस बहिणीकडेही."

"खादी भांडारातील सुंदर पातळ तुझ्यासाठी मी आणून ठेवलं आहे. एकच होतं. घेऊन ठेवलं होतं. तुला दाखवू?"

"भाऊ, आता त्यांच्या हातच्या सुताचं पातळ मी नेसेन."

"भावाने प्रेमाने दिलेलंही नेसत जा. माझ्या हातच्या सुताचं नसलं तरी प्रेमाने दिलं आहे."

"बरं हो भाऊ. नेसेन हो."

आणि एके दिवशी अंबू निघाली. मोटारीत बसली.

"ये हो अंबू. रडत नको जाऊ. येतील ते आता लवकरच."

"हो येतील आता. उद्यापासून पुन्हा मी इंदिरा होईन. आतापर्यंत काही दिवस अंबू झाले होते. अंबू हाक मारायला कधी कधी येत जा. माझ्या नावानेच पत्र पाठवीत जा."

"तुझ्या नावाने कसं पाठवायचं?"

"बहीण का परकी आहे? मला वाचता येतं. पाठव माझ्या नावानेच. काही बिघडत नाही. म्हणजे पत्राच्या आत तरी अंबू वाचीन."

"बरं. पाठवीन हो पत्र."

मोटार गेली. तापीच्या पुलावरून गेली. दुतर्फा लावलेल्या आंब्याच्या नवीन झाडांमधून गेली. किती लवकर वाढली ती झाडे. दुनियेसाठी होती म्हणून का लवकर वाढली?

इंदिरा घरी आली. एरंडोलला आपल्या घरी आली. सासूसासऱ्यांना आनंद झाला. जगन्नाथच्या येण्याचे पत्र त्यांनाही आलेले होते. सासू आता इंदिरेला बोलत नसे. तिला प्रेमाने वागवा.

''इंदिरे, आता जरा नीट खा, पी. नाहीतर जगन्नाथ म्हणेल की माझी बायको वाळली. सासूने छळलं असेल. पोटभर खायला दिलं नसेल. जरा अंगाने नीट हो.''

''असं नाही हो ते म्हणणार.''

इंदिरेने गुणाचे घरही झाडून ठेवले. ती गुणाची खोलीही झाडून ठेवली. तेथे नीट बैठक घालून ठेवली. जगन्नाथने तिला ते घर नेहमी स्वच्छ ठेवायला सांगितले होते.

घराला नवीन रंग देण्यात आला. जगन्नाथच्या खोलीला सुंदर गुलाबी रंग देण्यात आला. खोली सुरेख दिसू लागली. जणू जगन्नाथची वाट पाहात ती नटूनथटून उभी होती.

आणि ते सूत विणायला गेले. विणून आले. ती खादीची धोतरे धुवून आणण्यात आली. किती शुभ्र दिसत होती ती! शर्टिंगही धुवून आणण्यात आले. जगन्नाथच्या एका जुन्या शर्टच्या मापाने इंदिरेने दोन शर्टस् शिवून आणविले. दोन टोप्या शिवून आणविल्या. दोन हातरुमाल शिवविले. तिच्या हातच्या सुताचे ते सारे होते आणि त्या रुमालांवर तिने जगन्नाथचे एका कोपऱ्यात नाव गुंफले.

केव्हा येईल जगन्नाथ? केव्हा त्याला या वस्त्रांनी नटवीन? केव्हा हा खादीचा मुकुट त्याच्या डोक्यावर ठेवीन, हा हातरुमाल त्याच्या हातात देईन? तिने त्या हातरुमालाला तेलाचा वास लावून ठेवला. जणू हृदयांतील प्रेम त्यात भरून ठेवले. इंदिरा अशी तयारी करीत होती आणि जगन्नाथ काय करीत होता?

✦✦

जगन्नाथ

जगन्नाथने दक्षिणेची यात्रा सुरू केली. संगीताचा अभ्यास कोठे होईल याची चौकशी करीत तो निघाला. तो कांचीवरम येथे गेला. तेथे एक प्रख्यात संगीत विद्यालय होते. त्यागराज या प्रसिद्ध संगीताचार्यांची परंपरा चालविणारे ते विद्यालय होते. त्यागराज म्हणजे दक्षिणेकडील तानसेन. त्यागराजांची कीर्ती तानसेनापेक्षाही अधिक आहे. तानसेन उत्कृष्ट गाणारा होता; परंतु त्यागराज उत्कृष्ट गीतेही रचीत. ते कवीही होते व गाणारेही होते. कवीची प्रतिभा व गायनाची कला या दोहोंचे मधुर मिश्रण त्यांच्या ठिकाणी झाले होते. त्यागराजांची गीते दक्षिणेकडे सर्वश्रुत आहेत.

जगन्नाथला तमीळ भाषा येत नव्हती. तो मोडके-तोडके हिंदी, संस्कृत, इंग्रजी या तिन्ही भाषांच्या सहाय्याने आपले काम भागवीत होता. एका खाणावळीत तो उतरला. खाणावळवाला इंग्रजी जाणणारा होता. तेथे सामान ठेवून जगन्नाथ त्या संगीत विद्यालयाचा पत्ता काढीत गेला.

विद्यालयाचे चालक तेथेच राहात असत. पशुपती त्यांचे नाव. जगन्नाथने त्यांच्याशी बोलणे सुरू केले; परंतु ते एकदम हिंदीत बोलू लागले. जगन्नाथला

आश्चर्य वाटले. जगन्नाथला हिंदी नीट बोलता येईना; परंतु पशुपती छान बोलत होते.

"तुम्हाला हिंदी येते?"

"मी हिंदी प्रचारिणी सभेचा सभासद आहे. मी सर्व परीक्षा दिल्या आहेत. माझ्या मुलीनेसुद्धा परीक्षा दिली आहे. तुम्हाला नाही येत हिंदी?"

"मला बोललेलं समजतं; परंतु नीट बोलता येत नाही. हिंदी वर्गात मी कधी गेलो नाही."

"हिंदुस्थानची यात्रा करू इच्छिणाऱ्याने हिंदी आत्मसात केली पाहिजे. आज राष्ट्र एक होऊ पाहात आहे. अशा वेळेस परस्परांची हृदयं एकजीव होण्यासाठी राष्ट्रभाषाही एक हवी."

"हिंदुस्थानची एकता अनुभवण्यासाठीच मी निघालो आहे. दक्षिणेकडचा आत्मा समजून घेण्यासाठीच आलो आहे. दक्षिणेकडचं संगीत शिकण्यासाठी आलो आहे. आपल्या संस्थेत मी शिकू इच्छितो."

"तुम्ही गायन शिकलेले आहांत का?"

"थोडाफार अभ्यास तिकडे महाराष्ट्रात झाला आहे."

"थोडं म्हणून दाखवता का?"

"आपली आज्ञा असेल तर म्हणतो."

पशुपतींच्या आज्ञेने जगन्नाथने एक पद म्हटले

घुंगटका पट खोल

तूंते राम मिलेगा।।घुंगटका०।।

हे गाणे त्याने म्हटले आणि पशुपतींची मुलगी कावेरीजवळ येऊन ऐकायला बसली. पशुपती प्रसन्न झाले.

"तुमची तर चांगलीच तयारी आहे," ते म्हणाले.

"बाबा, कसा गोड आहे यांचा आवाज!"

"तुम्ही उतरलात कुठे?"

"एका खाणावळीत ठेवलं आहे सामान."

"आमच्या इथे राहिलेत तरी चालेल. विद्यार्थी असे मधून-मधून इथे राहतात. पूर्वीची पद्धत आमच्याकडे अद्याप सुरू आहे. या सामान घेऊन. ही

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

माझी मुलगी कावेरी. ही स्त्रियांचा हिंदी वर्ग चालविते. हिंदीमध्ये ही चांगलं लिहितेही.''

''आमचं मराठीही त्यांना मग समजेल.''

इतक्यात कावेरीला कोणी बोलावले म्हणून ती उठून गेली.

''माझी ही आवडती मुलगी आहे. लहानपणीच तिचा पती वारला. बालविधवा आहे बिचारी! तिला पाहून हृदयाचं पाणी-पाणी होतं.''

''तुमच्याकडे, अद्याप बालविवाह आहे?''

''कावेरीचे आजोबा होते. तिच्यावर त्यांचं फार प्रेम. माझी ही पहिल्या बायकोची मुलगी. मी पुढे दुसरं लग्न केलं. माझे वडील कावेरीला जीव की प्राण करायचे. त्यांना तिचं वेड. त्यांच्याच आग्रहाने तिंचं बालपणी लग्न लागलं; परंतु तिचा पती कावेरी नदीत बुडून मेला. नाव उलटली, त्यामुळे मेला. कावेरी म्हणते माझ्या नावाने मी बुडाले. तिला मी पुष्कळवेळा म्हटले की, तू पुन्हा लग्न कर; परंतु ती नको म्हणते. ती दिवसभर कामात असते. हरिजनांची शाळा चालविते, हिंदी वर्ग चालविते. काही हिंदी पुस्तकांची तिने तमिळमध्ये भाषांतरं केली आहेत. तुमच्याजवळ मी तिचीच कथा सांगू लागलो; परंतु कोणीही आले की प्रथम याच गोष्टी ओठांवर येतात आणि ती सहज इथे येऊन बसली म्हणून बोललो. तुम्ही आणा सामान. राहा इथे. शिका दक्षिणी संगीत. तुम्हाला फार दिवस नकोत. नुसती थोडी पद्धत एकदा लक्षात आली म्हणजे झालं.''

जगन्नाथ पशुपतींच्या घरी राहावयास आला. त्याला एक खोली देण्यात आली. फार सुंदर खोली. त्या घराची ती सर्वांत वरची खोली होती. एकच खोली व समोर मोठी गच्ची. या गच्चीत कधी कधी गाणे होत असे. रात्रीच्या वेळी उन्हाळ्यांत वसंत ऋतूत गाणे होत असे. त्या गच्चीत उभे राहिले म्हणजे कांचीवरम शहराचा नयनमनोहर भाग दिसत असे.

जगन्नाथने त्या खोलीत आपले सामान लावले. गुणाचा फोटो भिंतीवर लावला. सारंगी वाजवणाऱ्या गुणाचा तो फोटो होता आणि इंदिरेचा फोटो त्याच्याजवळ होता का? नव्हता. तिचा फोटो अद्याप त्याने काढून घेतला नव्हता. त्या खोलीत तो बसला होता. कावेरी आली. ती हिंदीत बोलत होती, उभ्या-उभ्या बोलत होती. जगन्नाथही उभा राहिला.

''हा कोणाचा फोटो?''

''माझ्या मित्राचा. तो सारंगी सुंदर वाजवतो.''

''आणि तुम्ही सुंदर गाता. बाबांकडे किती तरी विद्यार्थी येऊन गेले. त्यांच्या वर्गात हल्लीही आहेत; परंतु असा गोड आवाज मी नाही ऐकला कधी.''

''परकं असतं ते कधी कधी गोड वाटतं. परदेशी माल लोकांना एकदम आवडला; परंतु आज स्वदेशी आवडत आहे. परदेशी वस्तू क्षणभर आवडते.''

''सौंदर्य हे देशी नाही, विदेशी नाही. ज्ञान देशी नाही, विदेशी नाही. कुठेही जा. सायंकाळचे सूर्यास्त तुम्हाला आवडतील. थोरांचे विचार कुठल्याही भाषेत असोत, ते आपणाला आवडतील. आवाजाची माधुरी कुठलीही असो, ती गोडच लागेल.''

''तुम्हाला हिंदी कसं छान बोलता येतं!''

''तुम्ही का नाही दिलीत परीक्षा?''

''नाही दिली खरी. जरूर वाटली नाही. आज वाटत आहे. आज लाज वाटत आहे. मराठी व हिंदी जवळच्या भाषा. संस्कृतपासूनच जन्मलेल्या. तुम्हाला शिकायला फारच जड; परंतु तुम्ही त्यात तरबेज झाल्यात आणि मला नीट बोलता येत नाही.''

''इथे शिका. परीक्षा द्या. तुम्ही का केवळ गाणारे होणार आहात? काय करणार पुढे?''

''काय करणार ते कुठे ठरलेलं आहे? काही तरी गरिबांसाठी करावं असं वाटतं.''

''गरिबांची संघटना करणार? समाजवादी होणार?''

''कदाचित होईनही. दयाराम भारतींच्यामुळे तसं थोडं वाटू लागलं आहे. मी सावकाराचा मुलगा आहे. गरिबांना आम्ही छळलं आहे. त्यांच्या जमिनी गिळून टाकल्या आहेत. त्या जमिनी त्यांना परत द्याव्यात असं वाटतं.''

''जमिनी परत देणं म्हणजे का समाजवाद?''

''मी समाजवादाचा अभ्यास केला नाही. कसणाऱ्याची जमीन हे तत्त्व योग्य आहे. असं मला वाटतं आणि समाजवाद शेतकऱ्यांच्या, लहान शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊ इच्छित नाही. लेनिन म्हणत असे, की सहकार्याने एकत्र शेती

केली तर अधिक फायदेशीर होते, ते त्यांना पटवून. ते शेतकरी आपण होऊन सामुदायिक शेतीत सामील होतील; परंतु त्यांच्या जमिनी सक्तीने कधीही काढून घेण्यात येणार नाहीत; परंतु जाऊ दे. माझा फार अभ्यास नाही.''

''तुमच्याकडे अभ्यास मंडळं नाहीत वाटतं?''

''उन्हाळ्यात अलीकडे-अलीकडे अशी अभ्यास मंडळं सुरू करू लागले आहेत.''

''आमच्याकडे सर्वत्र अशी अभ्यास मंडळं आहेत. समाजवाद झपाट्याने पसरत आहे. मलबार व आंध्र प्रांतांत जास्त आहेत. मलबार किनाऱ्यावर समाजवादच सुख देईल. फार मोठमोठे जमीनदार आहेत. तुम्ही 'मोपला' शब्द ऐकला असेल ना?''

''हो. मोपल्याचे बंड झाले होते.''

''बंड?''

''त्यांनी बंड केले ना? आणि हिंदूंवर अत्याचार केले. मराठीत एक आहे खरं पुस्तक.''

''अहो, ते स्वातंत्र्ययुद्ध होतं. गरिबांची श्रीमंतांविरुद्ध ती उठावणी होती. खोलपोट्यांची गोलपोट्यांबरोबरची लढाई होती. अकिंचनांची मालदारांबरोबर लढाई होती. शेल्या शंभर वर्षांत असे झगडे कितीदा तरी झाले. एक प्रकारची ती क्रांती होती. ते धर्मवेडेपण नव्हतं. श्रीमंत व जमीनदार सरकारच्या सहाय्याने या गरिबांवर उलटले. गरिबांच्या या आर्थिक झगड्यात ते सामील होत ना, तेव्हा काही थोड्या गरीब मुसलमानांनी संतापाच्या भरात धर्माच्या नावानेही थोडे अत्याचार केले. कारण जमीनदार पुष्कळसे हिंदू असत. मोपला गरीब आहेत. हिंदू धर्मातील गरीब लोकच ठिकठिकाणी मुसलमान झाले. हिंदूंनी उपेक्षिलेले, तुच्छ मानलेले, माणुसकीस पारखे केलेले लोक मुसलमान झाले. ते गरीब असत. मोपला गरीब आहेत. श्रीमंतांविरुद्ध ते उठले म्हणजे हिंदूंविरुद्ध उठले असं सहज मानलं जातं; परंतु तसं नाही. त्या मोपला वीरांनी, त्या क्रांतिकारकांनी धर्माच्या नावाने अत्याचार करणाऱ्यांची स्वत: कानउघाडणी केली. आपली चळवळ व लढाई कशासाठी आहे हे समजावून दिलं.

''एके दिवशी हा खरा इतिहास दुनियेला कळेल. १८७१ मध्ये पॅरिस शहरातील कामगारांनी क्रांती केली तशा प्रकारचा हा प्रयत्न होता. श्रमजीवींचा

सुखी होण्याचा तो प्रयत्न होता. ते धार्मिक बंड नव्हतं; परंतु आपल्यातील धर्माच्या नावाने बोंबा मारणाऱ्यांनी व प्रतिष्ठितांच्या वर्तमानपत्रांनी त्याला तसं विकृत स्वरूप दिलं. आर्यसमाजी लोक आले व कुठे हिंदूवर अत्याचार झाला त्यांचे फोटो दिले. या सर्व लोकांचा संताप येतो. वरवर पाहाणारे लोक हे मुळाशी जात नाहीत. खरी कारणं पाहात नाहीत. धर्माच्या नावाने काही अडाण्यांनी थोडे अत्याचार केलं; परंतु त्यांच्याच पुढाऱ्यांनी त्यांना दरडावलं. तशी पत्रकं काढली. तुम्ही तो सारा इतिहास गोळा करा. तुम्ही महाराष्ट्रात गेल्यावर खरा इतिहास लिहा. मी तुम्हांला माहिती मिळवून देईन. दक्षिणेकडच्या कला शिकायला आला आहात. दक्षिणेकडील हे करुण–वीर प्रसंग समजून घेऊन जा.''

''होय, समजून घेईन. दयाराम भारती म्हणत तुम्ही संगीत शिकता, गरिबांच्या जीवनांत संगीत आणा. त्यांच्या जीवनाच्या सर्व तारा तुटल्या आहेत, भोपळा फुटला आहे. जीवनात संगीत निर्मिल तोच खरा कलावान.''

''असे कलावान तुम्ही होणार आहोत का?''

''कुणी करील तर होईन.''

''कोण करणार?''

''मी तरी काय सांगू?''

''तुम्ही डोळे उघडे ठेवा म्हणजे आपोआप व्हाल. एखाद्या सावकाराने शेती परत करून प्रश्न थोडाच सुटणार आहे! ही समाजरचनाच बदलली पाहिजे. जमीनदारांची, स्वतः न कसणाऱ्यांची जमीन काढून घेतली पाहिजे. दहा एकर, पंचवीस एकर जमीन फार तर एकाजवळ ठेवावी. बाकी काढून घेऊन शेतकऱ्यांस द्यावी. ज्यांना जमीन नाही त्यांना द्यावी. सहकारी सामुदायिक शेती करण्याच्या अटीवर द्यावी. अशासाठी संघटना हवी. या गोष्टी करा, क्रांतीची गाणी गा, तिचा प्रचार करा.''

''मी व माझे मित्र असा प्रचार करीत होतो. मेळे करून गावोगाव गेलो, खेड्यापाड्यांतून गेलो, खूप परिणाम होई.''

''परंतु त्या मेळ्यांतून नुसती रडारड दाखविली असेल. अन्यायाविरुद्ध शेतकरी उभे राहून लाल झेंडा हाती घेऊन प्रतिकार करू लागत आहेत असं दाखवलंत का? इतर सारे देव भिरकावून हा संघटनेचा नवीन देव घ्या, असं सांगितलंत का?''

"नाही. ती दृष्टी तेव्हा नव्हती."

"ती घ्या. क्रांतिकारक व्हा. श्रीमंत तरुणांनी आधी क्रांतिकारक व्हावं, पूर्वजांची पापं धुण्यासाठी तरी व्हावं. प्रायश्चित म्हणून तरी त्यांनी या गोष्टी आता कराव्या."

इतक्यात वडिलांनी कावेरी, कावेरी म्हणून हाक मारली. ती गेली. जगन्नाथ चकित होऊन बसला. ही मुलगी की पेटती ज्वाला!

पिता संगीताची शाळा घालून बसला आहे व मुलीने जीवनातील संगीताचा वर्ग उघडला आहे. श्रमजींवींच्या जीवनांत संगीत कसे आणावे हे ही मुलगी शिकवू पाहत आहे. तिचे डोळे कसे विजेप्रमाणे चमकत, तोंड कसे सात्त्विक संतापाने पेटल्यासारखे वाटे.

त्या गच्चीत जगन्नाथ हिंडू लागला, विचारात मग्न झाला. सायंकाळ होत आली. गायनाचा वर्ग सुरू होणार होता. जगन्नाथ तेथे गेला. त्या दिवाणखाण्यात त्यागराजांचे भव्य तैलचित्र होते. जगन्नाथने त्यांना प्रणाम केला. इतर आलेल्या विद्यार्थ्यांसही त्याने प्रणाम केला. पशुपतींनी ओळख करून दिली. महाराष्ट्रीय, महाराष्ट्रीय असे ते कुजबूजू लागले. पुणे, पुणे असे एकमेकांस सांगू लागले. जगन्नाथने एक-दोन गाणी म्हटली सर्वांना ती आवडली. वर्ग संपला. जगन्नाथ वर गेला. आता रात्र होऊ लागली.

"झाला का संगीत वर्ग?" कावेरीने येऊन विचारले.

"हो झाला. तुम्ही कुठे गेला होता?"

"सायंकाळी हिंदीचा वर्ग घेते मुलींसाठी आणि आता रात्री हरिजन वस्तीत स्त्रियांना शिकवते. तुम्ही याल रात्रीच्या शाळेत?"

"मी कशाला?"

"भेट द्यायला, शेरा मारायला."

"मला काही समजणार नाही."

"तुम्ही 'वंदे मातरम्' म्हणा. त्यांना समजेल. देशात एक तरी गाणं जन्मलं आहे की जे सर्वत्र गेलं आहे, सर्वांच्या हृदयांना जे नाचवतं."

"आणि इन्किलाब जिन्दाबाद?"

"तेही मी त्यांना शिकवलं आहे; परंतु आज 'वंदे मातरम्' म्हणा. या हं. आपण जाऊ जेवल्यानंतर. आमच्याकडचं जेवण तुम्हांला आवडतं का?"

''जरा तिखट लागतं. तुमच्या येथे आंबट व तिखट फार.''

''लोक आता जरा आंबट व तिखट व्हायला हवेत. गुळगुळीत गोड गोड नकोत. अहो, दुधात किती गोड मुरवत टाका तरी दही होत नाही; परंतु आंबट दह्याचं नुसतं बोट पुरेसं होतं. खरं ना? तुमच्यासाठी कमी तिखटाचं करू.''

''मी खाणावळीतच जाईन.''

''का बरं?''

''तुमच्याकडे कसं जेवायचं?''

''तुम्ही पैसे द्या. मोफत नका जेवू.''

''पैसे देईनच; परंतु तुम्ही सारं प्रेमाने करता, त्याची किंमत का पैशाने देता येईल? माझ्यासाठी उगीच कष्ट!''

''असं नका बा मनात आणू. मद्रासकडचे लोक प्रेमळ आहेत, उदार आहेत, पाहुण्यांना घरच्यासारखं वागवतात, असं तुम्ही महाराष्ट्रात जाऊन सांगा. कितीतरी मद्रासी बंधू तुमच्या मुंबई-पुण्यास गेले आहेत, नागपूरपर्यंत गेले आहेत.''

''आमच्याकडे एक म्हण आहे. सांगू?''

''काय आहे म्हण?''

''गूळ तिथे माशी, व्हेकन्सी तिथे मद्रासी!''

''खरं आहे. आमच्याकडील शाळांतून एकदम संपूर्ण कारकून बाहेर पडतो. शाळेतच टायपिंग, शॉर्टहँड शिकवतात. मद्रासी टाइपिस्ट, स्टेनोग्राफर हिंदुस्थानभर पसरले. कारकुनी करावी तर मद्राशांनीच, ही कीर्ती आम्ही मिळविली. आमची राहणी कमी खर्चाची: थोडं ताक व भात. कमरेला लुंगी व झालं; परंतु यापुढे निराळे मद्रासी बाहेर पडतील हो. आमच्याकडचे पुष्कळ लोक तिकडे आहेत. तुम्ही एक आमच्याकडे आलात, तुम्हाला प्रेमाने वागवू दे. मद्रासी दिलदारी तुम्ही मग तिकडे कळवा. आमच्यावर मग कमी रागवाल, खरं ना?''

''काय करावं समजत नाही.''

''मी सांगते ते ऐका हो,'' असे म्हणून मंदमधुर हसत ती गेली.

थोड्या वेळाने जेवणे झाली. भाताला 'साधन' शब्द जगन्नाथला फार आवडला. आणि 'कोळंबो' म्हणजे आमटी. सिलोनमधील कोलंबो शहर या कोळंबोसाठी प्रसिद्ध की काय? ते त्याच्या मनात आले. जेवून तो वर गेला. त्याने कपडे केले.

“येता का?” कावेरीने विचारले.

“हो,” तो म्हणाला.

“ही लवंग घ्या,” ती म्हणाली.

“नको.”

“लवंगही नाही खात? ही स्वदेशी लवंग आहे. आमच्याकडे लवंगांचे मळे आहेत हो. कॉफी व लवंगा या आमच्या खास चिजा आहेत.”

“नारळ व तंबाखूही इकडे फार.”

“आणि तपकीर! मद्रासी तपकीर पंजाबपर्यंत पसरली आहे.”

“मीही विद्यार्थी असताना भोक्ता होतो. फार तिखट तपकीर. कडक. मी सोडून दिली आता.”

“मद्रास रडवतं सर्वांना.”

“हसवतंसुद्धा, आनंदवितसुद्धा.”

“घ्या ही लवंग. व्रत नाही ना?”

“माझं व्रत नाही. मी विडासुद्धा खातो.”

“तुम्हांला आवडतो? तुम्हाला जरूर नाही म्हणा!”

“का?”

“अहो, पुष्कळ लोक ओठ रंगविण्यासाठी विडा खातात. ओठ लाल दिसावे म्हणून विक्षिप्त लोक!”

“चला. नाहीतर गच्चीतच बोलत उभी राहू व रात्र संपून जाईल.”

“तरी तुम्हांला कंटाळा नाही येणार?”

“संगीताचा मला कंटाळा येत नाही. गाणारे झोपेवर विजय मिळवितात. रात्र म्हणजे त्यांचा ज़णू दिवस.”

दोघे गेली, हरिजनवस्तीत गेली. तेथे एक मोठे झाड होते. त्या झाडाखालीच ही रात्रीची शाळा भरे.

“या झाडाखालीच का शाळा?”

“हो. देवाची शाळा.”

“परंतु पावसात?”

“एक हरिजनाश्रम बांधला जात आहे. तिथे पुढे आम्ही जमत जाऊ.”

''कोण बांधतो आहे आश्रम?''

''बाबाच. माझ्या आग्रहाने बांधीत आहेत. माझ्या हिंदी वर्गाचं उत्पन्न मी त्यालाच देणार आहे.''

हळूहळू मुली आल्या, काही बायकाही आल्या, काही मुलेही येऊन बसली. जरा लांब काही पुरुषमंडळीही बसली. काही गोष्टी त्यांच्याही कानावरून जात. आज एक पाहुणा व निराळ्या वेषात आलेला पाहून त्यांना आश्चर्य वाटले.

''नीट बसा सारी रोजच्यासारखी,'' कावेरी म्हणाली.

एक मोठी बाई, एक मुलगी; अशी ती सारी बसली, मंडलाकार बसली.

''असं का बसवता?''

''मोठ्या बाया एकीकडे बसवल्या साऱ्या, तर त्यांना आपण वयाने मोठ्या असं वाटतं. जणू निराळ्या झालो, आपणास या मुलींप्रमाणे येणार नाही असं वाटतं; परंतु मुलींच्याजवळ असल्या म्हणजे त्याही जरा लहान होतो, हसतात.''

कावेरीने पाहुण्यांची ओळख करून दिली. 'ते 'वंदे मातरम्' म्हणणार आहेत;' तिने सांगितले. एकदम सारी उभी राहिली. दूर बसलेली उभे राहिले. कावेरी उभी राहिली. तिच्या शेजारी जगन्नाथ उभा राहिला. वंदे मातरम् गीत सुरू झाले. किती सुंदर आवाज, किती भावपूर्ण म्हणणे.

''वंदे''– ''मातरम्'' ''भारत माता की'' – ''जय'' असे जयघोष झाले.

''तुम्ही बसता का घरी जायचं? आज सुटी देते यांना.''

''शिकवा तुम्ही. मी पाहीन, ऐकेन. तमिळ शब्द ऐकेन. अंदाजाने शिकेन.''

''बसा तर या आसनावर.''

जगन्नाथ बसला. वर्ग सुरू झाला; परंतु आज वर्ग सुरू व्हायचा नव्हता. एकदम वादळ सुटले. जोराचा वारा. धूळ व कचरा डोळ्यांतून जाऊ लागला आणि आकाशही भरून आले. मेघांनी ओथंबले.

''पाऊस येईल. तुम्ही मग भिजाल,'' मुली म्हणाल्या.

''आज बंदच करू,'' कावेरी म्हणाली.

वर्गच बंद झाला. थोडेफार त्या बायांजवळ बोलून कावेरी निघाली. नंतर ते पुरुष उभे होते तेथे ती गेली.

''तुझा कसा रे आहे मुलगा?''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

''बरं वाटतं आता त्याच्या जिवाला.''

''आणि तुझ्या मुलाचं पत्र आलं रे?''

''पत्र आलं. संप संपला. पुन्हा कामावर जाऊ लागले.''

''बरं झालं.''

''पगारवाढ मिळाली थोडी.''

''थोडी तर थोडी. पुढे सारं स्वराज्य श्रमणाऱ्यांचं करू. भविष्य राज्य तुम्हारा मानो.''

''होईल तेव्हा खरं आई.''

''होईल. होईल. तुम्ही सारे भाई बना म्हणजे होईल.''

आणि आकाशात गडगडाट झाला.

''ऐकलात आवाज? काही चिन्ह नव्हतं; परंतु हालचाली होत होत्या. वारे हळूहळू वाहत होते आणि त्या लक्षात न येणाऱ्या हालचालींतून ही प्रचंड हालचाल सुरू झाली. गडगडाट व्हायला लागला. पाऊस येईल. केरकचरा वाहून जाईल. मोठा पूर आला पाहिजे जागचे न हलणारे गोटेही हलतात. दगडही पुढे जाता. तसं होईल. क्रांती होईल. हालचाली होत आहेत. आज दिसत नाहीत. पोटात आहेत, ओठांत आहेत. उद्या हातांत येतील आणि येईल मोठा पूर. सारा जुलूम वाहून जाईल. नवीन समाज येईल. मग नवीन शेती, नवीन पीक. सर्वांच्या सुखाचं पीक. खरं ना?''

''होय आई.''

''जा आता तुम्ही. भिजाल,'' मुली म्हणाल्या.

''भिजू दे. या पाहुण्यांना मद्रासी पावसात भिजू दे.''

''देवाघरचा पाऊस म्हणजे प्रेमाचा पाऊस,'' जगन्नाथ म्हणाला.

''परंतु हा फार झाला तर गारठवतो. झिमझिम बरी वाटते. थोडी तर गोडी.''

कावेरी व जगन्नाथ जाऊ लागली; परंतु पाऊस आलाच. दोघे शांतपणे जात होती. इतक्यात एक मुलगा पळत आला. फाटकी छत्री घेऊन आला.

''आई, ही घ्या छत्री.''

''नकोरे.''

“या पाहुण्यांना तरी द्या.”

आणि पाहुण्यांना छत्री मिळाली. कावेरी भिजतच चालली. आपण मात्र छत्रीतून जाणे त्याला बरे वाटले नाही. जगन्नाथनेही छत्री मिटली.

“हे काय, मिटता का?”

“मग तुम्ही घ्या ती.”

“अहो, दोघं भिजण्यात काय अर्थ? एकजण तरी कोरडे राहू. उघडा, घ्या डोक्यावर.”

“तुम्हीच घ्या.”

“वेडे आहात तुम्ही. थांबा मीच ती तुमच्यावर धरते. मराठ्यांनी राज्यं केली आहेत. तंजावरला शहाजीराजांचं केवढं वैभव होतं! आणि राजाराम महाराजही इकडे आले. संकटात आम्ही आधार देतो.”

“अनाथाच्या डोक्यावर छत्री धरता.”

जगन्नाथच्या डोक्यावर कावेरीने छत्री धरली होती.

“द्या आता मी धरतो.”

“आपण दोघे धरू म्हणजे झालं!”

आणि ती छत्री दोघांनी धरली; परंतु रक्षण कोणाचेच होत नव्हते.

“आपण दोघं भिजत आहोत,” जगन्नाथ म्हणाला.

“देवाघरचा प्रेमाचा पाऊस!” ती म्हणाली.

“परंतु गारठून जाऊ.” तो म्हणाला.

“भरपूर पांघरूण घ्या म्हणजे ऊब येईल.” आणि घर आले.

“भिजलीस ना?” पित्याने प्रेमळपणे विचारले.

“या छत्रीने थोडा सांभाळ केला,” ती म्हणाली.

जगन्नाथ वर आपल्या खोलीत गेला. त्याने कपडे काढले. दुसरे कपडे त्याने घातले. पाऊस आता चांगलाच पडू लागला. गच्चीच्या दारात तो उभा राहिला. शेवटी अंथरूणावर पडला. तो झोपी गेला.

जगन्नाथ हिंदीचा अभ्यास करू लागला. हिंदी मासिके वाचू लागला. त्याला अर्थात ते सारे सोपे जाई. हिंदीचे व्याकरण तो शिकला. त्याने चांगल्या रीतीने पास होण्याचे ठरविले. तो तेथील अभ्यास मंडळांनाही जाऊ लागला. कधी कधी

इंग्रजीत व्याख्याने असत. त्या दिवशी तो जाई. तो हिंदीतून स्वतःचे विचारही मांडी. त्याचे नवीन नवीन मित्र झाले.

''तुम्ही हिंदीच्या परीक्षेत पहिले या,'' कावेरी म्हणाली.

''तुमच्या लोकांना मग वाईट वाटेल, की एक महाराष्ट्रीय इथे आला व पहिला आला.''

''महाराष्ट्रीयांना सोपं जातं म्हणून आला पहिला. त्यात आश्चर्य कसलं? उलट पहिले न आलेत तर मात्र आश्चर्य वाटेल. पहिले नाही आलेत तर हसतील हो तुम्हांला, मग मला वाईट वाटेल.''

''मी खटपट करीन, अभ्यास करीन.''

''आणि हा विडा आज घेतलात नाही? तसाचा तसा ठेवलात?''

''विसरून गेलो.''

''नको का देऊ उद्यापासून?''

''खरंच मी विसरलो हो.''

''तुम्हांला आवडतो म्हणालात म्हणून देते. मी नाही कधी खात. मी एक लवंग खाते.''

जगन्नाथने विडा खाल्ला. त्याचा चेहरा लालसर झाला होता आणि आधीच लाल असलेले ओठ अधिकच लाल झाले.

''मी जाते. तुम्ही वाचा. पहिले या.''

जगन्नाथ वाची. हिंदी वाची. इतरही पुस्तके वाची. आपणास सर्वप्रकारचे ज्ञान हवे असे त्याला वाटू लागले.

संगीताचाही त्याचा अभ्यास सुरू होता.

''तुम्ही उजाडत फिरायला येत जाल? त्या टेकडीकडे आपण जात जाऊ पहाटे उठून.''

''जाऊ.''

आणि दोघे फिरायला जाऊ लागली. कावेरी पळत सुटे. जगन्नाथ मागे राही.

''तुम्हाला पळायला लाज वाटते वाटतं?'' तिने विचारले.

''मला पळण्याची सवय नाही,'' तो म्हणाला.

“गाणारे म्हणजे सुस्त. त्यांच्या हातवाऱ्यांची व तोंडाची गती मात्र पाहून घ्या. चार-चार तास ओरडतात; परंतु गळा असत नाही आणि हातांनी आळेपिळे देत असतात; परंतु हात थकत नाहीत.”

“मी कुठे हात नाचवतो गाताना?”

“तुम्ही हातवारे जोपर्यंत करीत नाही, तोपर्यंत शास्त्रीय गाणं तुम्हांला आलं असं कोणी म्हणणार नाही. पशुपक्ष्यांच्या सर्व आकृती आपल्या शरिराच्या करून दाखवल्या पाहिजेत. जणू सृष्टीतील सर्व प्राणिमात्रांचे आवाज एकत्र करून त्यांतून एक महान मधुर संगीत निर्मायचं असतं.”

“ही कसली झाडं? फार छान दिसतात.”

“यांना पुन्नाग म्हणतात. फुलं पाहा कशी नागासारखी आहेत.”

“झाडांवर कसे त्यांचे घोसच्या घोस आहेत. जणू कानांत दागिने घालूनच उभी आहेत झाडं. फान छान.”

“आणि ती शिरीषाची झाडं हो. पाहा कशी फुलं आहेत! देवाच्या मस्तकावरची जणू छत्री. किती सुकुमार फुल!”

“तुमच्याकडे फुलझाडं पुष्कळ.”

“महाराष्ट्रात नाहीत का?”

“आहेत; परंतु इतकी नाहीत. पुन्नाग तर नाहीतच. आमच्याकडे याला कोणी कॉर्क ट्री म्हणतात. विलायती झाड, बुचाचं झाड, असं म्हणता.”

“जे माहीत नाही ते विलायती. स्वतःच्या देशातील वस्तूंनाही आपण विलायती मानू लागलो. स्वतःच्या देशातील फुला-फळांना विदेशी मानू लागलो.”

“माणसंही जिथे एकमेकांना विदेशी मानतात तिथे फुला-फळांची गोष्ट काय? हा मद्रासी, हा महाराष्ट्रीय, हा बंगाली, हा बिहारी. आमच्याकडे गुजराथी, मराठी, कानडी सारे कलहप्रकार आहेत.”

“आणि आमच्याकडेही. आंध्र व तमिळी यांच्यांत कोण स्पर्धा! मागे पट्टाभी सीतारामांना ते केवळ आंध्रचे आहेत म्हणून तमिळी लोकांनी मते दिली नाही आणि आंध्र प्रांतातील पुष्कळ समाजवाद्यांनीही आयत्या वेळेस तत्त्वज्ञान बाजूस ठेवून आपल्या प्रांतातील अध्यक्ष होत आहे ना, द्या मत; म्हणून त्यांना दिली. केवळ तत्त्वाचे उपासक असे आपण कधी बरं होऊ? ही बाहेरची बंधनं कधी झुगारू?”

''खरंच कधी झुगारू? माणूस तेवढा एक असं कधी वाटेल?''

''समाजवाद येईल तेव्हा. हे आर्थिक झगडे आहेत. नोकऱ्यांचे झगडे; परंतु ज्या वेळेस नवसमाजरचना येईल, बेकारी जाईल, सर्वांना सारखा विकासास वाव मिळेल, मुलांना खायला काय द्यायचं हा फिकीर राहणार नाही, त्या वेळेस मनुष्य आत डोकावू लागेल; मग माणूस माणसाला ओळखील. केवळ नात्यागोत्याच्या ओळखी जाऊन माणुसकीची महान ओळख पटेल. माणसाने माणसाला ओळखण्याची खरी संस्कृती यावयास पाहिजे असेल तर समाजवादच हवा. तोपर्यंत संस्कृती नाही.''

''तुमच्याकडचे रस्ते किती लाल. सारी मातीच लाल. दगडही लाल. येताना वाटेत लहान लहान नद्या लागत; त्यांच्या रीत्या पात्रांतून लाल-लाल रेती व वाळू दिसे.''

''आमच्याकडे लाल झेंडा आहे, भूमातेला लाल झेंडा. वंदे मातरम्‌चा लाल झेंडा. तुम्हाला माहीत आहे का एक गोष्ट?''

''कोणती?''

''वंदे मातरम् लिहिणाऱ्या बंकिमचंद्रानीच हिंदुस्थानातील साम्यवादावरील पहिलं पुस्तक लिहिलं आहे. त्या पुस्तकाचं नाव 'साम्य.' वंदे मातरम् गीताचा अर्थ समजून घ्यायचा असेल तर साम्यवादी व्हायला हवं. ऋषी बंकिम तरी तसं म्हणतील. तोंडाने वंदे मातरम् म्हणून भ्रातरम्‌ला उपाशी ठेवणारे, त्याला अस्पृश्य मानणारे, यांना का त्या महान गीताचा अर्थ समजला?''

''महाराष्ट्रातही विष्णुबुवा ब्रह्मचारी म्हणून एक मोठे सुधारक व विचारवंत होऊन गेले. त्यांनीही १८७० च्या सुमारास एक प्रकारचा समाजवाद उद्घोषिता होता; परंतु महाराष्ट्रातील लोकांना त्यांचं नाव माहिती नाही.''

''बंकिमचंद्रांनी 'साम्य' पुस्तक लिहिलं ही गोष्ट तरी वंदे मातरम् म्हणणाऱ्यांपैकी कितीकांस माहीत असेल? जगन्नाथ, तुम्ही क्रांतिकारक व्हा. जुने क्रांतिकारक नव्हे, हिंदू-मुसलमान द्वेषातून ज्यांना राष्ट्रीयतेची दीक्षा मिळाली अशा त्या प्रतिगामी क्रांतिकारकांसारखे नका होऊ, नव क्रांतिकारक व्हा. समाजरचनेत क्रांती करणारे. मुल्ये बदलणारे. खालचं वर करणारे, वरचं खाली खेचणारे. पाताळात दडपलेल्याला

वर जाणणारे व तिसऱ्या मजल्यात ऐटीने राहाणाऱ्या बांडगुळास खाली आणणारे व्हा. असे व्हा. भूमातेचा लाल झेंडा उचला.'' असे म्हणून कावेरीने लाल धुळीचे बोट जगन्नाथच्या कपाळाला लावले.

''हे काय कावेरी?''

''तुमचं क्रांतीशी लग्न लावीत आहे?''

''माझं लग्न आधीच झालं आहे.''

''तुमचं लग्न झालं आहे?''

''हो.''

''खोटं सांगता.''

''खोटं कसं सांगू? आमच्याकडे लहानपणी लग्नं होतात.''

''ती धूळीत घाला लहानपणची लग्नं.''

''माझी इंदिरा वर्ध्याला महात्माजींच्या आश्रमात आहे.''

''चरखा कातीत असेल. आता कसचं तुमचं लग्न क्रांतीशी लागतं? तुमचं टकळीजवळ लग्न लागलं. देवीची इच्छा! चला लवकर. तुम्ही हळू चालता. घरी जायला उशीर होईल.''

वाटेत आता कोणी बोलले नाही. दोघे मुकी होती. मुकाट्याने घरी आली.

काही दिवस गेले. एके दिवशी कावेरी जगन्नाथच्या खोलीत आली.

''मागे तुमची पत्रं येत असतं. अलीकडे का बरं येत नाहीत?''

''मीच पाठवीत नाही आणि मी इथून जाणार आहे, या पत्त्यावर पत्र पाठवू नका असं कळविलं होतं.''

''खोटं, खोटंच!''

''खरंच जाणार होतो. इथे राहणं नको असं वाटत होतं.''

''का बरं?''

''कारण तू बोलत नव्हतीस, मौन धरलं होतंस.''

''काय बोलायचं नेहमी?''

''क्रांतीच्या गोष्टी.''

''आम्ही कसली क्रांती करणार!''

''तुम्ही तर मला स्फूर्ती देता.''

''तुम्हाला माझ्याबद्दल काही तरी वाटावं म्हणून मी मोठमोठ्या गप्पा मारीत असे. हल्ली विद्यार्थ्यांचा व विद्यार्थिनींचा हा स्वभावच आहे. क्रांतीची चर्चा करायची. ती चर्चा करता करता प्रेमं जडायची; मग संसार थाटायचे. नोकऱ्या करायच्या. एखादी क्रांती-क्रांती शब्द असलेली कादंबरी मग वाचायची व लिहायची. असं सर्वत्र आहे. मी त्यांतलीच एक. मी एक अबलाच आहे. स्त्रीच आहे. प्रेमासाठी तहानेलेली स्त्री. स्वतःचं प्रेम कोणाला तरी द्यावं व कोणाचं तरी आपणासं भरपूर मिळावं म्हणून तहानलेली स्त्री. आजपर्यंत माझं ते प्रेम मनातल्या मनात गुदमरत होतं. तुम्ही त्याला सजीव केलंत. वठत जाणाऱ्यास पल्लव फोडलेत; परंतु तुम्ही विवाहित आहांत. तुमची पत्रे येत जात.''

''परंतु आता ती बंद पडली.''

''आता नाही पाठवणार पत्रं?''

''कोणाला पाठवू?''

''तुम्ही फसवे आहात!''

''आजपर्यंत होतो. आता फसवणार नाही.''

''म्हणजे काय?''

''मी इंदिरेला लिहित असे; परंतु ती वंचना होती. माझं हृदय तुम्ही व्यापलं आहे. आता कोणाला पाठवू पत्र?''

''वेडे आहात तुम्ही. माझं का तुमच्यावर प्रेम आहे? मुळीच नाही. तुमची परीक्षा घेतली. नापास झालेत. तुम्ही चंचल आहात.''

असे म्हणून ती उठून गेली.

जगन्नाथ अशांत झाला. संगीतात त्याचे मन रमेना. तो विचार करीत बसे.

''आज तुमचा फोटो काढायचा आहे. एक जण मैत्रीण येणार आहे. या गच्चीत फोटो काढू.''

''माझा फोटो नको.''

''बसलं पाहिजे. तुमचा एकट्याचा काढायचा की आपला दोघांचा?''

''तू सांगशील तसं. तुझी इच्छा प्रमाण.''

''आज एकट्याचाच तुमचा काढू. पुढे केव्हा तरी दोघांचा काढू.''

आणि तिसरे प्रहरी एक मैत्रीण आली. छुप्पा कॅमेरा घेऊन जगन्नाथने कपडे केले.

‘‘जरा हसरं तोंड ठेवा. इतकं गंभीर नको.’’ कावेरी म्हणाली. पटकन फोटो काढून झाला. ती मैत्रीण गेली.

‘‘कावेरी, फोटो कशाला?’’

‘‘एखाद्या वेळेस पळून गेलेत तर? तर मग वर्तमानपत्रात तुमचा फोटो देईन व हा हृदयचोर पकडून देणाऱ्यास मागेल तितके पैसे बक्षीस अशी जाहिरात देईन. यासाठी हा फोटो.’’

‘‘परंतु मी जाणार नाही.’’

‘‘इथे का जन्मभर राहणार आहोत?’’

‘‘कावेरी आपण जाऊ.’’

‘‘कुठे जायचं?’’

‘‘जाऊ भिकारी होऊन. लहानपणापासून मला हेच डोहाळे होताहेत. भिकारी व्हावं. मी गुणाला म्हणत असे, की आपण भिकारी होऊन हिंदुस्थानवर हिंडू. गुणा सारंगी वाजवता व मी गायलो असतो; परंतु गुणाऐवजी तू आता चल; परंतु तुला सारंगी येत नाही.’’

‘‘सारंगी नसली तर नसली. पेटी चालेल. तुम्हाला पेटी येते. पेटीच वाजवा व गळ्यात अडकवा. मी तुमच्या खांद्यावर हात ठेवून उभी राहीन. कृष्णाजवळ जणू राधा.’’

‘‘खरंच जायचं का आपण? जाऊ? येशील?’’

‘‘बघू पुढे.’’

आणि हिंदी परीक्षा झाली. जगन्नाथ त्या परीक्षेला बसला आणि खरोखरच तो पहिला आला. कावेरीस आनंद झाला.

‘‘आलेत ना पहिले?’’

‘‘तुझा विद्यार्थी म्हणून आलो.’’

‘‘आणि त्या मुली नव्हत्या का माझ्या विद्यार्थिनी?’’

‘‘परंतु मी प्रेमाचा विद्यार्थी. जणू तू आपली सारी विद्या माझ्यात ओतलीस. माझ्या बोटांतून जणू तू लिहित होतीस.’’

‘‘बघू तुमची बोटं.’’

‘‘तुझ्याहून माझे हात गोरे आहेत.’’

''आम्ही मद्रासी श्याम वर्णाला सुंदर म्हणतो. गौर वर्णाला नाही.''

''मग मी तुला आवडत नसेन?''

''आणि मी तुम्हांला आवडत नसेन?''

''प्रेम कशामुळे जडतं? रंगाने? नाकडोळ्यांनी? बुद्धीने? कशाने जडतं?''

''ते सांगता नाही हो येत जगन्नाथ.''

वर्तमानपत्रात एके दिवशी एक बातमी आली. एक प्रसिद्ध मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून हरिजन सत्याग्रह करणार होते. शेकडो स्पृश्यही त्या सत्याग्रहात सामील होणार होते. स्पृश्य व अस्पृश्य जोडीजोडीने आत जाणार होते. एक अस्पृश्य व त्याच्याबरोबर स्पृश्य. दोघांनी एकदम आत घुसायचे.

''जगन्नाथ, तू होतोस का स्वयंसेवक?''

''तू पण येतेस?''

''आपणाला अटक होईल.''

''एका तुरुंगात आपण राहू.''

''परंतु अलग अलग ठेवतील.''

''परंतु तुरुंग तर एकच असेल.''

''चल जाऊ दोघं.''

दोघे जणं निघून गेली. त्या सत्याग्रहात सामील झाली. सरकार सत्याग्रहींना पकडीत होते. कावेरी व जगन्नाथ दोघांना अटक झाली. त्यांना शिक्षा झाली. कावेरीला दोन महिने शिक्षा झाली. जगन्नाथला चार महिने.

जगन्नाथ तुरुंगात होता. तुरुंग म्हणजे मानाची जागा, पूर्वीचे जीवन व भावी जीवन यांच्या विचारांची जागा. आपण दक्षिणेत कशाला आलो, ध्येय काय, उद्देश काय, कोठे वाहावत चाललो, इंदिरा रडत असेल, म्हातारे आईबाप रडत असतील, दयाराम भारती काय म्हणतील? मी घरी पत्र पाठवले नाही. इंदिरेला पाठवले नाही. मी कावेरीच्या प्रेमात अडकलो आणि हे असे चोरटे प्रेम! आम्हाला उजळ माथ्याने येईल का राहता? होऊ का आम्ही भिकारी? भिकारी होऊन फिरावे असे का मला वाटते? मला कर्माचा कंटाळा आहे का? जबाबदारी घ्यायला मी कचरत आहे का? क्रांतीचे काम आपल्या हातून होणार नाही म्हणून का मी भिकारी होऊ पाहतो? काही तरी करावेसे वाटते? काय आहे हे सारे? जसा सोडला पतंग. जात आहे कोठे तरी. ना दिशा ना ध्येय!

जगन्नाथला वाईट वाटे. एके दिवशी त्याने वर्ध्याच्या आश्रमाच्या व्यवस्थापकास पत्र लिहिले, ''मी तुरुंगात आहे. इंदिरेला कळवू नका; परंतु तिची खुशाली मला कळवा.'' असे त्याने लिहिले; परंतु उत्तर आले की आश्रम बंद आहे. त्या एरंडोलला गेल्या. त्यानंतर त्याने एरंडोलला पत्र पाठवले. उत्तर आले की इंदिरा माहेरात आहे. तुरुंगात त्याला आणखी पत्र मिळण्याचा अधिकार नव्हता. तो वाट पाहात बसला सुटण्याची.

कावेरी आधी सुटली. सुटल्यावर तिने जगन्नाथची भेट घेतली. जगन्नाथ भेटू इच्छित नव्हता; परंतु आयत्या वेळी तो भेटायला निघाला. कावेरीला भेटला. तिने त्याचा हात हातात घेतला.

''तुम्ही तुरुंगात आहात.''

''येईन लवकर बाहेर.''

''सत्याग्रह बंद झाला आहे. नाही तर मी पुन्हा केला असता.''

''तू आता घरी जा.''

''मी तुझ्या खोलीत बसेन. तुझ्या फोटोची पूजा करीन. त्याला हृदयाशी धरून ठेवीन. तुझी तहान फोटोवर भागवीन. किती दिवस रे फोटोवर तहान भागवू? कांजी पिऊन का अमृताचं समाधान मिळतं? जगन्नाथ लवकर ये व कावेरीला आपली कर.''

''तू आता जा.''

''का घालवतोस लवकर?''

''मला वाईट वाटतं म्हणून.''

''मी तुझी वाट पाहात आहे. ये हो लवकर.''

कावेरी निघून गेली. ती आता घरी राही. तिला बरे वाटत नसे. तिची हरिजनशाळा बंद पडली. तिचा हिंदी वर्ग थांबला. ती अंथरूणावर पडून राही. पांघरूणात ती जगन्नाथचा फोटो हृदयाशी धरी व रडे.

पशुपतींना वाईट वाटे. मुलीला काय होते त्यांना कळेना. मुलीच्या दुःखाने जणू ते दुःखी झाले आणि तेही आजारी पडले. पित्याच्या आजाराने कावेरीचे आजारपण पळाले.

ती उठली. पित्याची सेवा करू लागली.

‘‘कावेरी, तुला बरं नाही. तू पडून राहा.’’

‘‘तुम्ही आधी बरे व्हा. माझं दुखणं का तुम्ही घेतलंत?’’

‘‘एवढं कुठे माझं प्रेम थोर आहे कावेरी!’’

पशुपती बरे होण्याची चिन्हे दिसत ना. त्यांना न्यूमोनिया झाला. कावेरी रात्रंदिवस त्यांच्याजवळ होती. डॉक्टर येत-जात होते; परंतु एक दिवस पशुपतींचे प्राण निघून गेले.

अरेरे! ती संगीत शाळा ओस पडली. तो वाडा भयाण सुना-सुना झाला. जेथे रात्रंदिवस संगीत चाले, तेथे आता शोक भरून राहिला. एका क्षणात केवढी उलाथापालथ. सृष्टीत असे प्रकार होतात. भयंकर उत्पात होतात. दऱ्या आहेत, तेथे पर्वत आहेत. पर्वतांच्या जागी दऱ्या होतात. वाळवंटात समुद्र येतात व समुद्र आटून वाळवंटे शिल्लक राहतात. मानवी मनाचेही असेच आहे. क्षणात हास्य तर क्षणात विलाप. क्षणात पौर्णिमा तर क्षणात अवस. मानवी जीवनाचे असेच आहे. बुडबुडे. सारे बुडबुडे. मनुष्य काल होता आणि आज नाही अशी ही दुनिया आहे. दो दिन की दुनिया; परंतु मानवाची काय ऐट! किती अहंकार! किती कत्तली, मारामारी, लढाया? कशा बढाया, कशा दर्पोक्ती! किती वंचना व वल्गना! या विश्वाच्या पसाऱ्यात मानवजंतू म्हणजे एक हास्यास्पद वस्तू आहे झाले!

कावेरीला आता त्या घरात कोणते बंधन होते? तिची सावत्रआई, सावत्र भावंडे, सावत्रआईचे भाऊ, सारी व्यवस्था पाहायला आले. कावेरीला कोण विचारणार, कोण पुसणार? तिचा पदोपदी अपमान होऊ लागला. ती कावेरी बावरी झाली. जगन्नाथ कधी सुटतो याची ती वाट पाहात असली; परंतु जगन्नाथ येईल का येथे? येईल. मला भेटल्याशिवाय जाणार नाही. तिला आशा होती.

जगन्नाथ एके दिवशी सुटला. सुटल्यावर त्याने आधी घरी पत्र पाठविले. इंदिरेलाही पत्र पाठविले. मी लवकर येतो असे त्याने लिहिले. घरी जाणे हे पहिले कर्तव्य. बाकी मोहपाश तोडणे प्राप्त होते; परंतु कावेरीला भेटायला हवे. गुरूंचा आशीर्वाद घेऊन जाणे हेही कर्तव्य होते.

तो कांचीवरम् येथे आला. गुरुगृहही गेला. तो तेथे सारा दुःखद प्रकार. तो स्तंभित झाला. त्याला रडू आले. तो आपल्या खोलीत गेला. तेथे कावेरी आली. ती रडत होती.

"उगी रडू नको."

"मला आता कोण आहे? तुम्ही या कावेरीला कावेरी नदीत लोटा व घरी जा. तुमच्या सुंदर हातांनी या दुर्दैवी कावेरीचं जीवन पुसून टाका. मला कोण आहे? प्रेमहीन जगात का एकटी राहू?"

"मी आहे तुला."

"तुम्ही माझे नाही. तुम्ही दुसऱ्याचे आहात. जगन्नाथ, तू नाही हो माझा."

"आहे. मी आधी तुझा आहे; मग इंदिरेचा, मग सर्वांचा. आधी तुझा पहिला हक्क. तू दिसली नव्हतीस तोपर्यंत इतर येत होते माझा कब्जा घ्यायला; परंतु तू सहजपणे आलीस. राणीप्रमाणे आलीस. जणू शतजन्मांची माझी मालकीण. चल. कावेरी, आपण जाऊ."

"कुठे जायचं? कावेरी भिकारी आहे. बाबा आता नाहीत. मजजवळ काय आहे?"

"आपण भिकारी होऊन हिंडू. परस्परांचं प्रेम लुटू व भारतमातेची यात्रा करू. खरंच जाऊ. देवाची तशी इच्छा दिसते."

आणि एके दिवशी जगन्नाथ व कावेरी खरेच बाहेर पडली. यात्रेला निघाली. हातांत हात घेऊन बाहेर पडली. इकडे इंदिरा वाट पाहात होती. खोलीला गुलाबी रंग देऊन वाट पाहात होती. आईबाप आशेने वाट पाहात होते; परंतु कावेरी व जगन्नाथ प्रेमयात्रा करीत गाणी गात भिकारी होऊन हिंडत होती!

✦✦

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

इंदू

रामराव इंदूला व दुसऱ्या एका मुलीला सकाळी शिकवायला जात. ते संस्कृत शिकवीत, सोपे-सोपे संस्कृत श्लोक सांगत. गीता घेत. गणित व इंग्रजीही सांगत. इंदू प्रेमाने त्यांच्याजवळ शिके, रामरावही प्रेमाने शिकवीत.

शीघ्रवाचनाचे एक इंग्रजी कथा-पुस्तक होते. इंदूबरोबर रामराव ते वाचीत. एका लहान मुलाला त्याचे शत्रू दूर एका किल्ल्यात नेऊन ठेवतात: परंतु त्या मुलाचे पालन करणारा एक विश्वासू सरदार त्याला तेथून गुप्तपणे पळवतो. घोड्यावरून पळवतो. घोड्यावरील सामानांत त्याने त्या मुलाला लपविलेले असते. आता धोका नाही, असे पाहून तो सरदार त्या लहान मुलाला मोकळे करतो. आपल्या समोर त्याला घेऊन तो घोडा दौडवितो. आणी एके दिवशी ते आपल्या गावाजवळ येतात. त्यांचा उंच वाडा दुरून दिसतो. मुलगा आपले घर ओळखतो. "घर, घर, त आलं आपलं घर!"तो लहान मुलगा आनंदाने टाळ्या वाजवून म्हणतो. त्या सरदाराने त्याला धरून ठेवलेले असते म्हणून बरे. नाहीतर तो घोडयावरून पडला असता, घोड्यावरच नाचू लागला.

''होय हो बाळ. घर गोड घर! आलं तुझं घर,'' सरदार म्हणतो.

ते वर्णन वाचताना रामरावाचे डोळे भरून आले.

''तुम्ही रडतासे?'' इंदूने विचारले.

''का बरं हे पाणी आलं? तूच सांग,''ते म्हणाले.

''तुम्हाला का घरची आठवण झाली? तुमच्या एरंडोलच्या घरची आठवण झाली?''

''होय बाळ. ती आठवण कधी जात नाही. रोज माझ्या डोळ्यांसमोर एरंडोल असतं. ते पूर्वजांचं घर असतं. त्या शेकडो आठवणी असतात.''

''तुम्हालासुध्दा अजून ते घर आठवतं?''

''तुम्हाला म्हणजे?''

''या गोष्टीतील मुलगा लहान आहे. तुम्ही तर कितीतरी मोठे आहात, मोठ्यांनासुद्धा असं वाईट वाटतं?''

'' इंदू लहानापेक्षा मोठयांनाच अधिक वाईट वाटेल; कारण त्यांचा अधिक काळ त्या घरात गेलेला असतो. अधिक स्मृतिबंधनं असतात. गुणाला वाईट वाटेल त्यापेक्षा मला वाईट वाटेल. गुणा अजून वाढता आहे. तो जीवनातील नवीन संबंध अजून जोडू शकेल; परंतु आमचं वय झालं. आमच्या जीवनाचं झाड आता दुसरीकडे पोसणार नाही. तिथे ते मरेल.''

''तुम्ही एरंडोलला पुन्हा जा.''

''कसं जायचं? मान खाली घालून?''

''गुणा शिकून मोठा होईल. मग जा घरी.''

''देवाची इच्छा असेल तसं होईल.''

एके दिवशी सकाळी रामराव शिकवायला आले होते. इंदू घरात काही तरी आईजवळ मागत होती. रामराव आल्याचे तिला कळले.

''आई, त्यांना पण दे ना एक वडी, ती म्हणाली.

''दे नेऊन,'' आई म्हणाली.

इंदूनं श्रीखंडाच्या वड्या रामरावांना नेऊन दिल्या.

''मी येते हं.''असे म्हणून ती आत गेली. रामरावांनी तिथला एक कागद घेऊन त्यात त्या दोन वड्या गुंडाळून खिशात ठेवल्या. इंदू आली.

“तुम्ही खाल्लीत वडी?”

“ठेवली आहे.”

“खा ना.”

“आता नको; मग खाईन.”

“तुम्ही गुणाला नेणार असाल होय ना? परंतु गुणाला मी काल सायंकाळी दिल्या होत्या. त्याला तर आधी. त्या तुम्हीच खा. खा नाही तर मी शिकायला बसणार नाही.”

इतक्यात ती दुसरी मुलगी आली. रामरावांनी एक वडी त्या मुलीला दिली व एक स्वत: खाल्ली.

गुणाला अलीकडे वेळ होत नसे. तो पहाटे उठे. अभ्यास करू लागे. आठ वाजले म्हणजे विश्वासरावांच्या घरी जाई. तेथे सारा श्रीमंती प्रकार. विश्वासरावांचे मेहुणे गुणवंतराव म्हणजे सूर्यवंशी. उशिरा उठायचे. नंतर त्यांचे सारे आटोपायला किती तरी वेळ लागायचा. गुणाबरोबर पुस्तक घेऊन जात असे. तेथेही तो अभ्यास करीत बसे किंवा वर्तमानपत्र तेथे असले तर वाचीत बसे.

“सारखं तुमच्या हातात पुस्तक,” गुणवंतराव म्हणायचे.

“मला चांगल्या रीतीने पास व्हायचं आहे. वरती यायंच आहे. शिष्यवृत्ती वगैरे मिळाली तर बरं होईल.”

“संगीताची ज्याला आवड त्याचं अभ्यासात फार लक्ष सहसा नसतं.”

“माझं हल्ली संगीतापेक्षा अभ्यासातच जास्त लक्ष आहे.”

“तुम्ही खरे संगीताचे भोक्ते नाहीत.”

“मी विद्यार्थी आहे अजून.”

गुणवंतराव गप्पाच पुष्कळ मारायचे. गुणालाच वाजवा म्हणायचे. आपण स्वत: ऐकायचे.

“मी वाजवून तुम्हाला कसं येईल वाजवता?”गुणा म्हणे.

“खरं सांगू का; मला सारंगी आवडते. तुमची सारंगी ऐकावी एवढीच इच्छा; परंतु शिकण्याचं निमित्त केलं. म्हणजे रोज तुम्ही येत जाल.”

गुणाच्या डोळ्यांसमोर महत्त्वाकांक्षा आज उभी होती. कोणती महत्त्वाकांक्षा? आपले एरंडोलचे घर पुन्हा परत मिळवायची महत्त्वाकांक्षा. त्या घराचे काय झाले

असेल हे त्याला माहीत नव्हते. घराचा लिलाव झाला असेल असे त्याला वाटे; परंतु वाटेल ती किंमत देऊन परत घेऊ. मनात तो म्हणे. बाबांना पुन्हा पूर्वीच्या घरी नेईन त्यांचे अश्रू थांबवीन.

मनुष्य एखाद्या ध्येयाने वेडा झाला म्हणजे तो निराळा होतो. त्या ध्येयाच्या प्रकाशात सर्व व्यवहार मग सुरू होतात. त्याच्या जीवनात हेतुमयता येते. त्याच्या सर्व आचार-विचार-उच्चारांत एक प्रकारची सूत्रमयता येते. त्या ध्येयसूर्याभोवती साऱ्या अंतर्बाह्य क्रिया प्रदक्षिणा घालू लागतात, गुणाचे असेच झाले. आपल्या वडिलांना सुखी करणे हाच त्याच्या मनात एक विचार. देशबंधू दास त्याला आठवत. वडिलांनी दिवाळखोरीत नाव घातले, तरीही पुढे सावकारांचे सर्व सव्याज त्यांनी परत केले. आपण असेच करू. वॉरन हेस्टिंग्सची गोष्ट त्याला आठवे. वॉरन हेस्टिंग्सला सर्वांत मोठा आनंद वडिलोपार्जीत घर त्याने परत घेतले. त्या वेळेस झाला.

गुणा सायंकाळी इंदूकडे जाई. मनोहरपंतही बसत. एखाद्या वेळेस मनोहरपंत बाहेर जात.

''गुणा, मला नाही हो येणार सारंगी,'' ती म्हणाली.

''न यायला काय झालं? मला गणित येत नव्हती; परंतु हल्ली मी त्यात सर्व लक्ष घातलं, मला भराभरा येऊ लागलं आपली सर्व शक्ती ओतली पाहिजे. दयाराम भारती सांगायचे, की जे कराल त्यात सर्वस्व ओता. हाती जे घ्याल त्याचं वेड लागू दे. ते फार संतापत व म्हणत, 'आपल्या देशातील सारी कामं अर्धवट. काँग्रेसचे सभासद करण्याचं काम असलं तर करतील दहा-वीस, बसतील घरी. खादी खपविण्याचं असो. जातील दोन घरी होतील निराश. साक्षरता प्रसाराचं असो. देतील एखादं व्याख्यान, एखाद्या गांधी सप्ताहात झाडू मारतील. किसान संघटना असो, असतील तिच्या दोन मरतुकड्या शाखा. सेवा दलं घ्या. असतील पाच-दहा मुलं. अशाने का राष्ट्र तयार होतात? ते काम म्हणजे जीवन झालं पाहिजे. प्राणाला ज्याप्रमाणे श्वास, माशाला जसं पाणी, त्याप्रमाणे ते काम. ते ध्येय माणसाच झालं पाहिजे.' दयारामांचे ते शब्द मला फार आठवतात.''

''गुणा, तू कोणतं काम डोळ्यांसमोर ठेवलं आहेस?''

''ठेवलं आहे एक.''

''कोणतं?''

''पुन्हा एरंडोलला जाण्याचं.''

''इथे का तुला आनंद नाही वाटत? दुःख वाटतं?''

''बाबांना सारखं एरंडोल आठवतं.''

''आणि तुम्ही एरंडोलला गेलात तर तुम्हा सर्वांची आम्हाला आठवण येईल.''

''आठवण येऊन रडू येईल का?

''ते काय सांगू गुणा?''

''बरं. वाजव आता तू.''

''अशा गोष्टी बोलतच बसू आपण. तुझ्या त्या दयाराम भारतींच्या सांग आठवणी. सारंगी वाजवण्यापेक्षा तुझ्याजवळ बोलत बसायलाच मला आवडतं.''

''मी शिकवणीचे पैसे का फुकट घेऊ?''

''तू शिकवीतच आहेस मला. किती तरी शिकवीत आहेस. तू त्या दिवशी ती कोजागिरी पौर्णिमेची गोष्ट सांगितलीस व मला रात्रभर झोप आली नाही. गुणा मी तुला श्रीखंडाची वडी दिली. रामरांवाना दिली, आणखी कोणाला बरं दिली असेल?''

''कोणाला? मी काय सांगू?''

''आमच्या रामा गड्याला दिली.''

''खरंच?''

''हो. असं करायला मला कोणी शिकवलं? तूच ना? या शिकवण्याची किती किंमत? गुणा. तुझ्याजवळून मला अशाच गोष्टी शिकू दे. तुझ्यासारखी सारंगी वाजवायला मला नाही येणार; परंतु तुझ्यासारखी गरिबांविषयी प्रेम बाळगणारी मला होऊ दे.''

दर रविवारी मनोहरपंतांकडे किंवा विश्वासरावांकडे गाण्याची बैठक असे. तेथे गुणाला जावे लागे. तो लाजे, शरमे. अशा बैठकीतून वाजवणे त्याला आवडत नसे; परंतु आपल्या आश्रयदात्यांच्या मनाला दुखवू नये म्हणून तो त्या बैठकींना जाई. त्याला वाजवण्याचा आग्रह होई. तो संकोच करी; परंतु शेवटी सारंगी हाती

घेई. वाजवता-वाजवता तन्मय होई. त्याचे डोळे आपोआप मिटत. डोळे मिटून तो वाजवी. गुणाच्या तोंडावर त्या वेळेस एक प्रकारची सौम्य प्रभा पसरलेली दिसे. इंदू बघत राही.

''बाबा, डोळे मिटून हे कसं हो वाजवतात? मला डोळे उघडे ठेवूनही वाजवता येत नाही,'' ती म्हणे.

''खरं गाणं, खरं वाजवणं डोळे मिटूनच साधतं. डोळे मिटूनच आपण आपल्या हृदयाशी एकरूप होतो,'' पिता सांगे.

गुणा मॅट्रिकची परीक्षा पास झाला. सर्वांच्या विचाराने तो इंदूरच्या वैद्यकीय कॉलेजात दाखल झाला. तेथील अभ्यासक्रम संपून मग तो थोडे दिवस कलकत्त्यास जाणार होता. निसर्गोपचाराचा अभ्यास संपवून येणार होता.

''तुम्ही आता चार वर्षं इथेच राहणार?'' इंदू म्हणाली.

''हो. इथलाच अभ्यास. इथलाच डॉक्टर होईन; मग निसर्गोपचार पद्धतीही शिकून येईन.''

''मानसोपचार पद्धतीही आहे ना?''

''आहे. पुष्कळ पद्धती आहेत. इंदू, तू पुढे काय शिकणार?''

''काय शिकू?''

''काही तरी उपयुक्त विद्या शिक.''

''तुझ्यासारखी डॉक्टर होऊ?''

''तुला आवडतो का हा अभ्यास?''

''गुणाला आवडतो, मग मलाही आवडेल.''

''तू नर्सिंगचा कोर्स घे. सूतिकावर्गाचं शिक्षण घे.''

''आधी मॅट्रिक होऊ दे. मग पुढे बघेन.''

गुणा डॉक्टरीचा अभ्यास करू लागला. त्याला आता फारसा वेळ मिळत नसे. सकाळची गुणवंतरावांकडची शिकवणी त्याने सोडून दिली. त्याला नादारी मिळाली होती. तो काटकसरीने वागे.

तो साधा खादीचा शर्ट व खादीची पॅण्ट घालूनच वर्गात जात असे. इतर मुले त्याला हसत; परंतु तो लक्ष देत नसे.

''गुणा, तू नीटनेटका का नाही पोशाख करीत?'' इंदूने विचारले.

“या पोशाखात का मी वाईट दिसतो?”

“कोणत्याही पोशाखात तू मला चांगलाच दिसतोस.”

“मग?”

“विश्वासराव म्हणत होते, की काय दरिद्र्यासारखा राहतोस? डॉक्टर म्हणून कोण ओळखील?”

“इंदू. डॉक्टर का सुटाबुटावरून ओळखायचा असतो? डॉक्टर त्याच्या ज्ञानावरून ओळखला जाईल. नाही का?”

“परंतु तुला असं कोणी म्हटलं तर मला वाईट वाटतं. तुला नावं ठेवली तर मला राग येतो.”

“कोणी ठेवली नावं?”

“बाबासुद्धा एखाद्या वेळेस ठेवतात.”

“का बरं?”

“तू हरिजनवस्तीत झाडायला गेला होतास ते बाबांना नाही आवडलं. मी त्यांच्याजवळ भांडले. शेवटी ते म्हणाले तुम्ही नवीन मुलं काय काय कराल ते देवाला ठाऊक.”

“इंदू, तू माझी बाजू का घेतेस?”

“तू मला आवडतोस म्हणून?”

“मी तुला मारीत असे तरीही आवडतो?”

“तुझ्या थापट्या जणू ताल धरीत असत; परंतु आता नाही मारीत.”

“आता आपण मोठी नाही का झालो इंदू?”

“म्हणून तर मी भांडते.”

“इंदू, तुला मी आवडतो की मी जे करतो ते आवडतं?”

“तू आवडतोस म्हणून तू जे करतोस ते आवडतं.”

“हरिजनांची सेवा करायला तू नाही येणार?”

“तू बरोबर असलास तर येईन.”

“आणि समज मी नसलो बरोबर तर?”

“तरीही तुला आवडत असे म्हणून ते मी करीन.”

''इंदू, एखादं काम का दुसऱ्यासाठी म्हणून करायचं? ते काम सेवेचं आहे, पवित्र आहे, म्हणूनच आपण नको का करायला?''

''हळूहळू तसं मनुष्य शिकेल. तू दयाराम भारतींपासून शिकलास. तुझ्यापासून मी शिकेन.''

गुणा आता एकदम वाढला. त्याची उंची वाढली. अंगाने तो आता भरदार दिसू लागला. आपण एकदम मोठे झालो असे त्याला वाटू लागले. तो चांगला दिसे. कोणाच्याही डोळ्यांत भरण्यासारखा दिसे. एके दिवशी सायंकाळी गुणा जरा उशिरा इंदूकडे आला. इंदू वाट पाहत होती.

''उशीर झाला तुला?''

''एखाद्या वेळेस होतो उशीर.''

''पण मी वाट पाहत असते गुणा.''

''तुला नाही उद्योग.''

''मला एकच उद्योग. वाजवण्याचा उद्योग.''

''तरी अजून नीट वाजवता येत नाही.''

''या जन्मी ते शक्य नाही.''

''मला असे निराशेचे शब्द आवडत नाहीत.''

''गुणा, साऱ्या गोष्टी सर्वांना कशा येतील? तुझा मित्र जगन्नाथ गाणारा आहे. तुला येतं का गाता?''

''प्रयत्न केला असता तर गाणारा झालो असतो.''

''आवाजाची देणगी आहे गुणा.''

''माझा आवाज का वाईट आहे?''

''तुझं बोलणं गोड वाटतं. तुझं बोलणं म्हणजेच गाणं.''

''माझं बोलणं तुला आवडतं?''

''हो. कधीसुद्धा कंटाळा नाही येणार.''

''फार बोलत नाही म्हणून. सारखा बोलत बसलो तर कंटाळशील. म्हणून जरा उशिरा येतो. वाट बघशील. गोडी वाटेल. उत्कंठेत गोडी आहे. भुकेत गोडी आहे.''

‘‘गुणा, आज तूच वाजव सारंगी. बऱ्याच दिवसांत तू वाजवली नाहीस. आज पोटभर ऐकू दे, मनमोकळी.’’

गुणा सारंगी वाजवू लागला. इंदूची आईही येऊन ऐकत बसली. तिघे संगीतसागरात पोहत होती आणि मनोहरपंत बाहेरून आले व तेही बसले. गुणाने डोळे उघडले. त्याने सारंगी खाली ठेवली.

‘‘बाबा, तुम्ही कधी आलात?’’

‘‘गुणा, अरे चोर आले असते तर तुम्हांला कळलंही नसतं आणि इंदू. तू गुणालाच वाजवायला सांगत जा. तुला केव्हा येईल वाजवायला?’’

‘‘बाबा, त्यांचे हात मला द्या. एरवी नाही वाजवता येणार.’’

‘‘इंदू. शिक हो वाजवायला. संगीत म्हणजे सर्व संकटांतील सखा. संगीत म्हणजे आधार आहे. इंदू, आम्ही तुला किती दिवस पुरणार?’’

‘‘असं काय बाबा बोलता?’’

‘‘आज हेच विचार माझ्या मनात आले. त्या विचारांत मी फिरत फिरत किती दूर गेलो ते मला समजलं नाही.’’

‘‘मी जातो. आई वाट पाहत असेल.’’

‘‘गुणा, आज इथेच जेव ना,’’ इंदू म्हणाली.

‘‘परंतु आईने घरी करून ठेवलं असेल.’’

‘‘जाऊ दे ते फुकट. मी येईन सकाळी शिळं खायला.’’

‘‘राहा हो आज. तुला आई रागावणार आहे थोडीच! आता तुम्ही मोठी झालात मुलांनो. तुमच्यावर रागवायला आता संकोच होतो,’’ मनोहरपंत म्हणाले.

गुणा आज इंदूकडेच जेवायला राहिला. तिला खूप आनंद झाला. ती आज किती तरी जेवीत होती.

‘‘इंदू, आता पुरे हो पोळी,’’ आई म्हणाली.

‘‘आई, मला का उपाशी ठेवतेस?’’

‘‘मी आयत्या वेळी आलो म्हणून घोटाळा,’’ गुणा म्हणाला.

‘‘तसं नाही गुणा. ही रोज अर्धी पोळी खाते. आज तिच्या पोटात का राक्षस उठला आहे?’’

"इंदू, जेवल्यावर आमच्याकडे चल. म्हणजे उरलेलं पोट तिकडे भरेल. तू आलीस म्हणजे आई मला रागही भरणार नाही."

"आई, जाऊ का गुणाबरोबर?"

"जा, पण जास्त जेवू नको हो. आजारी का पडायचं आहे?"

"रोज म्हणतेस नीट जेवत तरी जा; आज म्हणतेस जेवू नको."

"इंदू, सारं प्रमाणात हवं."

"आज मला लागली भूक. यांचं गाणं ऐकलं म्हणजे भूक लागते. आतडी जणू ओढतात."

"इंदू, बंकिमचंद्र होते ना, ते म्हणत की ज्या दिवशी माझ्या कादंबरीतील अत्यंत उत्कृष्ट भाग मी लिहीत असे त्या दिवशी मी रोजच्यापेक्षा चौपट खात असे."

"तुमची सारंगी ऐकण्यात मी बंकिमचंद्र आहे एकूण."

जेवणे झाली. गुणा जायला निघाला.

"मी येऊ का गुणा?"

"नको आता. पुन्हा तुला पोचवायला मला यावं लागेल."

"मग ये. तेवढ्याने पाय दुखतील वाटतं तुझे?"

"बरं चल."

इंदू व गुणा दोघे निघून गेली. गुणाची आई वाटच पाहत होती.

"किती रे उशीर गुणा?" आई म्हणाली.

"सारखं वाजवीत बसला हा. शेवटी मी उठवलं तेव्हा आला."

"चल आता जेवायला. इंदू, तुझं झालं का जेवण?"

"जेवण झालं; परंतु पोट भरलं नाही."

"मग जेव इथे. घे पान."

"गुणाच्या आई, तुम्ही सारी बसा. मी वाढते. उरेल ते मग मी जेवीन."

"मग पुष्कळ आहे हो. बस गुणाबरोबरच."

"नाही. तुम्ही आधी बसा. आज मी तुम्हांला वाढीन. मला इच्छा झाली आहे."

“वाढू दे ग आई. वाढता येतं की नाही ते तरी कळेल.” आणि खरेच रामराव, गुणा, गुणाची आई जेवायला बसली आणि इंदू वाढू लागली.

गुणा रेंगाळत जेवीत होता.

“काय रे जेवत नाहीस तो?” आईने विचारले.

“भूक नाही आज.”

“इंदूला उरावं म्हणून काळजी की काय?”

“तसं नाही गं आई.”

“ती बसली नाही म्हणून त्याला वाईट वाटत असेल. इंदू, तू आता बस. आम्हाला काही नको,” रामराव म्हणाले.

रामराव व गुणाची आई उठली. गुणा जेवतच होता. इंदूही जेवत होती.

“गुणा, किती जेवतोस?”

“हा भात नकोसा झाला इंदू.”

“मला दे एकेक घास.”

“ये. तुझं ताट घेऊन ये.”

इंदू आपले ताट घेऊन आली. गुणा एकेक घास तिच्या हातात देऊ लागला, संपला भात.

“दे ना रे.”

“आता हा हात फक्त राहिला. भात संपला.”

“मग हात दे.”

“त्याची वेळ येईल तेव्हा देईन.”

“केव्हा येईल वेळ?”

“येईल. प्रत्येक गोष्टीची वेळ येत असते इंदू.”

इंदू व गुणा उठली. इंदू पाटपाणी उचलू लागली. गुणा तिला मदत करू लागला.

“अग, तू जणू सासुरवाशीणच झालीस!”

“नको का होऊ?” इंदू हसून म्हणाली.

“अगं चांगल्या श्रीमंतांच्या घरी पडशील. स्वयंपाक करावा लागणार नाही, वाढावं लागणार नाही.”

"मग या हातांचा काय उपयोग?"

"रुमाल भरावे, सारंगी वाजवावी."

"काही तरी आई तुम्ही बोलता. मला असं वाढायला आवडेल. स्वत:च्या हातांनी स्वयंपाक करायला आवडेल."

"आणि आई, मला इंदूच्या हातचं खायला आवडेल, तिच्या हातचं वाढलेलं आवडेलं."

"चल गुणा, मला पोचव."

"जा एकटी. शहरात राहणारी तू. अशी कशी भित्री?"

"एरंडोलात राहाणाऱ्यांच्या संगतीमुळे भित्री बनले."

"बरं चल."

इंदू व गुणा गेली.

"माझा हात धर गुणा."

"तू का लहान आहेस इंदू?"

"धर ना रे. नाही तर मीच तुझा धरते," असे म्हणून इंदूने गुणाचा हात हातात घेतला.

इंदूचे घर आले.

"जा आता गुणा. तुझ्या घरी जा."

"तुझं घर तेच माझं घर."

"तुझं घर एरंडोलला आहे."

"माझं घर तुझ्या हृदयात आहे."

"खोटं बोल. मी आपली जाते. तू जा एकटा."

"बायका अशाच फसव्या."

"मी आधीच सांगितलं होतं; मी तुला एकट्याला जावं लागेल."

"मी आधीच म्हटलं होतं, की मला एकट्याला परतावं लागेल."

दोघांना तेथे बोलत उभे राहावे असे वाटत होते. शेवटी गुणा माघारी गेला.

इंदू व गुणा यांचे परस्परांवर प्रेम होते. सर्वांच्या लक्षात ती गोष्ट आली होती.

इंदूची आई एके दिवशी म्हणाली,

"इंदू व गुणा यांचं लग्न तरी करून टाका."

“मी ठरवून ठेवलं आहे.”

“केव्हा?”

“त्याला आगगाडीत प्रथम पाहिला तेव्हा.”

“खरंच?”

“खरंच. आपली इंदू पुढे या ध्येयवादी तरुणाला द्यावी, आईबापांबरोबर वनवास पत्करणाऱ्यास द्यावी, त्यांच्यासाठी भिकारी होणाऱ्यास द्यावी असं त्या वेळेसच मला वाटलं. म्हणून मी त्याला बोलावलं. जणू त्या दिवसापासूनच मी त्याला घरजावई केलं आहे आणि इंदूने तो आला त्याच दिवशी त्याला माळ घातली आहे.”

✦✦

अनुदार आहे देव

इंदू अकस्मात आजारी पडली. तिला ताप म्हणून येऊ लागला; परंतु तो ताप निघेना. तो दोषी ताप नव्हता. तो कधी जास्त तर कधी कमी असे. एखाद्या वेळेस निघे; परंतु पुन्हा येई.

''गुणा, कर ना रे मला बरी,'' ती कंटाळून म्हणे.

''मला तुझं दुखणं घेता आलं असतं तर!''

''तू ते सहन केलं असतंस?''

''पुरुषच अधिक बलवान असतात.''

''परंतु बायका अधिक सहनशील असतात. मी या दुखण्यातून बरी नाही होणार.''

''होशील बरी. काही तरी मनाला लावून नको घेऊ.''

''कोणी म्हणतात क्षय होईल.''

''म्हणू देत.''

''तू नको माझ्याजवळ बसत जाऊ. क्षय स्पर्शजन्य आहे.''

''प्रेमसुद्धा स्पर्शजन्य आहे. म्हणून प्रेमापासून का आपण दूर राहतो?''

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

‘‘गुणा, तू माझ्याकडे नको येत जाऊ.’’

‘‘का पण?’’

‘‘मी अशी क्षयी. क्षयी माणसं कायमची बरी नाही हो होत.’’

‘‘परंतु तुला क्षय नाही. कितीदा सांगू?’’

‘‘इतर डॉक्टरांपेक्षा का तू मोठा?’’

‘‘हो. माझं मन सांगतं की तू बरी होशील.’’

‘‘आपल्या मनाप्रमाणे या जगात झालं असतं तर किती छान झालं असतं?’’

‘‘तू पडून राहा. मी जातो हं.’’

गुणा गेला. इंदूला क्षयाची भावना आहे असे खरोखरच काही डॉक्टरांचे म्हणणे पडले. वेळीच कोठे तरी चांगल्या हवेवर जावे असे सांगण्यात आले. मनोहरपंतांनी लोणावळ्याजवळ मळबली येथे जाण्याचे ठरविले. तेथे सारी व्यवस्था करण्यात आली. एके दिवशी मनोहरपंत रामरावास म्हणाले, ‘‘रामराव, तुम्ही या घरातच येऊन राहा आता. आम्हाला मळवलीस बरेच दिवस राहावं लागेल. उगीच तिकडे भाडं कशाला भरता? या घराचीही व्यवस्था राहील. जणू तुमचंच घर. नाही म्हणू नका.’’

‘‘तुमची इच्छा असेल तसं. तुमचे आमच्यावर अनंत उपकार आहेत. खरंच’’

‘‘उपकार नका म्हणू. मी उपकार म्हणून कधी वागलो नाही. तुमच्या गुणाविषयी काही तरी वाटलं. तुमच्या स्वाभिमानाविषयी कौतुक वाटलं. उपकार म्हणून नाही हो. तुम्ही आभार मानू नका. मनावर ओझं घालून घेऊ नका.’’

‘‘तुमच्यामुळे गुणाचं शिकणं झालं.’’

‘‘त्याच्या सारंगीमुळे झालं. त्याच्या गुणांमुळे झालं.’’

‘‘होईल आता डॉक्टर.’’

‘‘घरचा डॉक्टर.’’

इंदू व गुणा दोघांना वाईट वाटले.

‘‘गुणा, तू इकडे राहायला आलास म्हणजे माझ्या खोलीतच बसत-उठत जा. इथेच अभ्यास कर, इथेच झोप; परंतु ही आजाऱ्याची खाट, क्षयरोग्याची खाट आणि खोली. नको, गुणा नको, ही खोली मोकळीच राहू दे. या खोलीला नवीन

रंग दे हो. माझी ही एक उशी तुला ठेवू? परंतु तीसुद्धा माझ्या श्वासाने दूषित झालेली; परंतु माझ्या डोळ्यांतील पाण्याने ते जंतू मरून नसतील गेले? काय म्हणतं तुझं शास्त्र?''

''तू का रडत आहेस?''

''हो.''

''का?''

''मला क्षय होईल, मी मरेन म्हणून.''

''वेडी आहेस तू.''

''गुणा, मी मेले तर तू रडशील. तुला वाईट वाटेल म्हणून मला रडू येई. मी एकटी असते, तुझी ओळख नसती झाली तर मरणाचं एवढं वाईट नसतं वाटलं. तुझ्यासाठी वाईट वाटतं.''

''तू बरी होऊन येशील. मग क्षयरोग्यांसाठी आपण मोठं रुग्णालय काढू. तिथे निसर्गोपचारावर भर देऊ हो!''

''गुणा, तुझा हात बघू?'' गुणाने आपला हात तिच्या हाती दिला.

''हा माझा आहे हात.''

''आणि तुझा हात माझा.''

''क्षयरोगी मुलीचा हात? गुणा, मला नेहमी असंच अंथरुणावर पडून राहावं लागलं तर? कायमची अशी दुखणेकरीण झाले तर?''

''मी तुझी कायमची सेवा करीन. तुझ्याजवळ सारंगी वाजवीन. तुझ्या पडण्यापासूनही मला स्फूर्ती मिळेल. तू अंथरुणावर पडून असलीस तरी तू प्रेम देत राहाशील. तुझं गोड हसणं, गोड बोलणं, प्रेमळ डोळे, यांवर मी जगेन. तुझा हात हातात क्षणभर असा धरीन. मला सारं मग मिळेल.''

''गुणा, मी बरी होणार आहे. अंथरुणावर नाही हो पडून राहाणार. बरी होईन. तुझ्या सेवेत मदत करीन.''

''ये. बरी होऊन ये.''

मनोहरपंत, इंदू व इंदूची आई सारी निघून गेली. निरोप घेताना गुणा व इंदू यांचे डोळे भरून आले. गाडी निघून गेली, तरी इंदूचे डोळे खिडकीबाहेरच होते. गळत होते.

"इंदू, ये पडून राहा बाळ." पिता म्हणाला.

"बाबा, मला बरी करा हो. नाहीतर गुणा जन्मभर दु:खी राहील," ती कापऱ्या आवाजात म्हणाली. मनोहरपंत काही बोलले नाहीत. इंदूला त्यांनी झोपविले. तिच्या डोक्यावर थोपटीत बसले.

गुणा आता इंदूच्या घरीच राहायला आला. सारीच आली. तो इंदूच्याच खोलीत बसे. त्याने खाट उन्हात टाकली काही दिवस. खोलीला नवीन रंग देण्यात आला. स्वच्छ साधी खोली. तो खोलीत धूप जाळी. सुगंधी चंदन जाळी. जणू प्रेमदेवतेची पूजा करी. इंदूची उशी उशाला घेई. सुंदर वेल भरलेली उशी! वेलीवर पाखरू भरलेले होते. उडून जाऊ पाहणारे पाखरू. इंदू का अशीच माझ्या जीवनाच्या वेलीवर क्षणभर बसायला आलेली आहे? ती का उडून जाईल? क्षणभर वेलीला नाचवून व हलवून ती का निघून जाईल? तो त्या उशीवरील पाखराकडे बघत बसे व म्हणे, "हे पाखरू उडून नाही जाणार. हे कायमचं राहील."

गुणा परीक्षा पास झाला. तो आता डॉक्टर झाला.

"काही दिवस मळवलीस या. इंदूला बरं वाटेल. सारंगी वाजवा. हसा, बोला," असे मनोहरपंतांनी लिहिले.

एके दिवशी गुणा इंदूकडे जाण्यासाठी निघाला. तो सारंगी घेऊन निघाला. एरंडोलहून असाच सारंगी घेऊन तो निघाला होता. त्या वेळेस डोळ्यांसमोर निराशा होती. त्यावेळेस निराधार वाटत होते. आज जीवनात आशा होती आणि जीवनाचा चिर-आधार मिळण्याची निश्चितता होती. इंदूची प्रकृती सुधारत होती. वजन वाढत होते. त्याला बरे वाटत होते.

तो खानदेशातून आता जाणार होता. जळगावला उतरून एरंडोलला यावे का जाऊन असे त्याच्या मनात आले. जगन्नाथ काय करीत असेल! आपण त्याला पाच वर्षांत पत्र पाठवले नाही. किती कठोर आपण; परंतु बाबांसाठी सारे मित्रप्रेम मनात ठेवले. येऊ का जाऊन एरंडोलला? हळूच त्याच्या घरावरून जाईन. का आधी त्याच्या नावाने एक पत्र पाठवू? तो तेथे असला तर उत्तर देईल. असेच करावे. पाठवावे पत्र, बाबा आता रागावणार नाहीत. आता त्यांची मान खाली नाही. मी डॉक्टर झालो आहे. किती तरी विचार गुणाच्या मनात आले. सारे जुने जग डोळ्यांसमोर आले. त्यांचे खेळ, त्यांचे मेळे, दयाराम भारती, शेतकऱ्यांची

दैना, स्वातंत्र्याचा प्रश्न, आपण कार्य करायचे, केवळ का दवाखाना काढून बसायचे का चळवळीत पडावे; एक ना दोन, शेकडो विचारांची त्याच्या मनात गर्दी उडाली.

आणि जळगाव स्टेशन आले. स्टेशनवर खूप गर्दी होती. त्याच्या डब्यातही काही मंडळी शिरली.

''उठून बसता का जरा भाऊ?'' एकाने विचारले.

गुणा उठून बसला. आपल्या खानदेशातील मंडळी असा विचार त्याच्या मनात आला. किती तरी दिवसांनी खानदेशातील भाऊ शब्द त्याच्या कानांवर पडला होता. किती गोड वाटला तो शब्द त्याला. ते आलेले लोक जागा कशी तरी करून बसले. त्यांच्या गप्पा सुरूच होत्या.

''पंढरीशेटला म्हातारपणी मात्र फार दुःख. कुठे गेला मुलगा पत्ता नाही.''

''दोन-तीन वर्षं झाली. ती त्याची बायको सारखी रडत असते. म्हणे पोरगी एकदा खाते व राम राम म्हणत बसते. त्या दोघा म्हाताऱ्यांस पाहावत नाही ते.''

''तुरुंगात गेला होता; परंतु सुटलो असं एकदा त्याचं पत्र आलं होतं. त्यालाही झाले किती तरी दिवस. लवकर येतो म्हणून त्या पत्रात होतं; परंतु दोन वर्षं होऊन गेली. का पुन्हा तुरुंगात गेला? का सरकारने डांबून ठेवलं?''

''त्या दयाराम भारतींना नाही का अडकवून ठेवलं धुळे जेलमध्ये ठेवलं आहे अडकवून. वर्षांनूवर्षं आपले तुरुंगात. तपश्चर्याच ही.''

''किती कष्ट!''

''सारं जगासाठी. जगन्नाथ असाच गेला असेल. चळवळ्या होताच तो. गरिबांची बाजू घ्यायचा. भावाला म्हणायचा जाळून टाकीन जमा-खर्च तुझे. अहो रस्ते झाडायचा, खेड्यांतून हिंडायचा.''

''आणि त्या मित्रावर त्याचं फार प्रेम.''

''तो रामरावाचा मुलगा, गुणा. सारंगी वाजवणारा. त्यांचाही पत्ता नाही ना? कर्जाचे गांजले गेले.''

''त्यालाच जगन्नाथ शोधीत असेल. मित्राचं घर त्याने दुसऱ्या कोणाला घेऊ दिलं नाही. त्या घराची तो कशी व्यवस्था ठेवी! रोज ते घर झाडून ठेवीत असे. म्हणे की गुणा येईल. एखाद्या वेळेस रात्री गेला तसा रात्री येईल. घर स्वच्छ असावे

झाडलेले आणि जगन्नाथ गेला तरी त्याची पत्नी ते घर स्वच्छ ठेवते. खरी पतिव्रता आहे ती. सारखा ध्यास घेऊन बसली आहे.''

''देवाला येईल दया.''

''कधी येईल ती? देव निष्ठूर आहे, अनुदार आहे. शेतकऱ्यांची येते का त्याला दया? ज्यांची दया यायला हवी, त्यांचीच त्याला येत नाही.''

शेतकऱ्यांनी आपण होऊन उठावं, अन्यायाविरुद्ध उठावं असं देवाला वाटतं. आई का मुलाचा सारखा हात धरून चालवील? म्हणेल, तू चाल आता. पडलास तरी चालेल. आपले लोक दुबळे. अन्यायाची कोणाला चीडच येत नाही.''

''पाचोरे आलं वाटतं?''

''आता चाळीसगावला उतरून दुसऱ्या डब्यात पाहू जागा. इथे गाडी जरा जास्त थांबते.''

''झोप झाली बुवा.''

''घ्या बसल्या बसल्या डुलकी.''

अशी त्या मंडळींची बोलणी चालली होती. गुणा सर्व इंद्रियांचे कान करून ऐकत होता. कितीदा तरी आपण प्रश्न विचारावे असे त्याच्या मनात आले; परंतु त्याने संयम राखला. जगन्नाथची कितीतरी दिवसांनी त्याला हकिकत कळली. तो का माझ्या शोधार्थ हिंडत आहे? आणि त्याचे आईबाप दुःखी आहेत. इंदिरा रडत आहे. मी एकही पत्र त्याला लिहिले नाही. माझ्यामुळे सर्वांना दुःख. आईबापांपासून मुलगा दूर गेला. पत्नीचा पती दुरावला. कोठे असेल जगन्नाथ? तो का हिंदुस्थानभर भटकणार? आम्ही म्हणत असू, की आपण दोघे भिकारी होऊ व हिंदुस्थानभर भटकू. जगन्नाथ का खरोखरच भिकारी होऊन गेला? एकटाच गेला? माझ्या शोधार्थ गेला?

मनमाडला डब्यातील बरीच गर्दी कमी झाली. गुणा आता झोपला. इंदूची उशी घेऊन झोपला. जगन्नाथचा विचार करीत झोपला. तो कल्याणला जागा झाला. तेथे तो उतरला. नऊच्या सुमारास पुण्याकडे जाणारी गाडी आली; परंतु ती मळवलीस थांबणार नव्हती. तरी त्यातच तो बसला. लोण्यावळ्याहून टॅक्सी करून जाऊ. इंदूजवळ लवकर जाण्याची त्याला इच्छा होती. पैशांची काय पर्वा?

लोणावळ्यास उतरून एक टॅक्सी करून तो मळवलीस गेला. इंदू बाहेर हिंडत होती. मोटार थांबताच ती पुढे गेली तो गुणा दृष्टीस पडला.

''ये, गुणा ये.''

''स्वागताला उभीच आहेस!''

मोटार गेली. गुणा घरात आला. इंदू आनंदली. फुलली.

''आता मी बरी आहे की नाही सांग गुणा?''

''चांगलीच बरी झालीस.''

''दृष्ट पडेल हो तुझी.''

''माझी का दृष्ट पडेल?''

''दुसऱ्या कोणाची पडेल? दुसऱ्या कोणाची दृष्ट माझ्यावर पडत असली, तरी ती मला माहीत नसते; परंतु तू दृष्टी रोखलीस की, मला पटकन भान येतं. मी एक तुझीच दृष्टी जाणते. तुझेच डोळे ओळखते.''

गप्पागोष्टींत दिवस जाऊ लागले. एके दिवशी गुणा सारंगी वाजवीत होता.

''तुमच्या सारंगीबरोबर तुमचा मित्र गायला असता तर किती बरं झालं असतं! बोलवा हो तुमचा मित्र,'' मनोहरपंत एकदम म्हणाले.

''गुणा, खरंच बोलाव. पुरे झाला अज्ञातवास. आता पांडवांना प्रकट होऊ दे; मग आपण पद्मालयास जाऊ. तू तांबडी कमळं आणून माझी पूजा कर. मी मोराची पिसं गोळा करून तुझ्या डोक्यावर मोरमुकूट घालीन. छान दिसेल तुला.''

''मग तुझी मला दृष्ट बाधेल.''

''लिहा एरंडोलला पत्र. आजच जाऊ दे.'' मनोहरपंतांनी आग्रह धरला.

''इंदूला आणखी करमणूक होईल,'' आई म्हणाली.

आपला मित्र एरंडोलला नाही हे गुणाला माहीत होते; परंतु त्याने एक पत्र लिहिले. लांबलचक एक पत्र लिहिले. इंदिरेने ते वाचले तरी हरकत नाही. तिला ते पत्र वाचून आनंद होईल, अशा हेतूनेच त्याने ते लिहिले. ते पत्र गेले. काय उत्तर येते त्याची वाट पाहत बसला. आणि उत्तर आले.

प्रिय पतीच्या मित्रांस प्रणाम

तुमचे मित्र येथे नाहीत. किती दिवस झाले त्यांचे पत्र नाही. पत्ता कळत नाही. ते दक्षिणेकडे म्हणून गेले. मी काही दिवस आश्रमात होते, त्यांनीच मला

ठेवले; परंतु मी आश्रमात असताच ते निघून गेले. प्रथम त्यांचे पत्र येई. लवकर येतो असेही एकदा पत्र आले; परंतु त्या गोष्टीलाही दोन वर्षे झाली. कोठे तुरुंगात तर नाहीत? एकदा- तिकडे तुरुंगवास त्यांना झाला होता. हरिजनांबरोबर त्यांनी सत्याग्रह केला म्हणून. कोठे असतील बरे ते? त्यांचे आईबाप दु:ख करीत आहेत आणि माझी मन:स्थिती मी कशी लिहू?

तुमच्या का शोधासाठी ते गेले? तुमच्यासाठी त्यांना फार वाईट वाटे. तुमचे घर रोज झाडून ठेवीत आणि तुमच्या खोलीत रोज जाऊन बसत. तुमचे एक मोठे तैलचित्र तुमच्या खोलीत त्यांनी टांगले आहे. त्या चित्रासमोर बसत व गाणे गात. त्यांचे कधी पत्र येई त्यातही गुणाची खोली स्वच्छ ठेव, त्याचे घर झाडून ठेव, तो रात्री गेला, रात्री एखाद्या वेळेस येईल, घर स्वागतार्थ स्वच्छ असू दे, तुम्ही या. तुमचे घर आहे. तुमचेच कुलूप आहे. तुम्ही आलात म्हणजे ते येतील अशी मला आशा आहे. त्यांच्या हृदयाला कळेल. ते कोठे असले तरी त्यांना कळेल, की आपला मित्र आला. तुम्ही या. माझ्यासाठी तरी या. त्यांच्या वृद्ध मातापित्यांना धीर द्यायला तरी या. तुमच्या सर्व मित्रांस प्रणाम.

तुमच्या मित्राची पत्नी,

इंदिरा.

गुणाने ते पत्र वाचले. त्याचे डोळे भरून आले. जगन्नाथचे आपल्यावर किती प्रेम! सारे सारे त्याला आठवले. तो एकेक आठवणी इंदूला सांगू लागला.

"इंदू, मीं जाऊ का त्याला शोधायला?"

"कुठे जाणार तुम्ही? इंदिरा रडत आहे, इंदूही रडत बसावी अशी का तुमची इच्छा आहे? तुम्हा मित्रांचे होतील खेळ. आम्ही दोघी रडत बसू."

"मग काय करायचं?"

"आपण तुमच्या एरंडोलला जाऊ, म्हणजे तुमचा मित्र परत येईल."

"तुला इंदूर सोडून कसं येता येईल?"

"मुलीला माहेर सोडावं लागतं. आपली मुलगी आपणांस सोडून जाणार हे आईबापांस माहीत असतं."

"परंतु तुझ्या आईबापांनी निराळी व्यवस्था योजल्याप्रमाणे दिसत आहे. मी इंदूरलाच राहावं अशी त्यांची इच्छा आहे."

“परंतु तुमच्या वडिलांना सारखं एरंडोल, ते घर आठवतं. तुम्हालाही आठवणी येत असतील. तुमचा मित्र आज ना उद्या येईल. आपण एरंडोललाच पुढे जाऊ.”

“पुढे म्हणजे केव्हा? त्या माझ्या मित्राच्या पत्नीस काय उत्तर लिहू?”

“आम्ही एरंडोलला येऊ. जगन्नाथ परत येईल. आशेने राहा. असं लिहा.”

आणि गुणाने तसे पत्र लिहिले. गुणा येणार असे एरंडोलात झाले. गुणा येणार, मग जगन्नाथही येणार असे लोक म्हणत. जगन्नाथच्या वडिलांना धीर आला. आईला धीर आला. इंदिरेच्या आशेला पल्लव फुटले.

“आपण सारीच आता परत जाऊ इंदूरला,” मनोहरपंत म्हणाले.

“इथे आता पावसाळाही सुरू होईल,’ गुणा म्हणाला.

“आता मी बरी झाले. काहीसुद्धा होणार नाही आता. मी डोंगर चढेन, दरी खोरी उतरेन,” इंदू म्हणाली.

“कार्ल्याची लेणी पाहता पाहता दमलीस,” आई म्हणाली.

“गुणा येण्याच्या पूर्वीची ती गोष्ट. गुणा आल्यापासून बघ वजन किती वाढलं. मी राक्षसीण होईन की काय असं भय वाटू लागलं आहे.”

“राक्षसिणी का वाईट दिसतात? शूर्पणखा फार सुंदर होती,” गुणा हसून म्हणाला.

“राक्षसांतील ते सौंदर्य. ते राक्षसांना आवडेल,” इंदू म्हणाली.

शेवटी सारी इंदूरला परत आली. इंदूरचे घर पुन्हा गजबजले. रामराव, गुणा. त्याची आई पुन्हा दुसऱ्या एका ठिकाणी राहायला गेली.

“किती दिवस तुम्ही दूर राहणार?” इंदूने विचारले.

“आणखी काही दिवस. मी आता जाणार आहे कलकत्यास. एक वर्षांचा कोर्स आहे. तो शिकून येईन,” गुणा म्हणाला.

“लवकर या. नाहीतर मी पुन्हा आजारी पडेन हो! तुमची हवा जवळ असली म्हणजे मी बरी राहीन.”

“मला अलीकडे तूच्याऐवजी तुम्ही का म्हणतेस?”

“आई असं म्हणाली एक दिवस.”

“मला तूच म्हणत जा.”

‘‘बरं. म्हणेन हो. दोघंच फक्त असू तेव्हा म्हणेन. आईबाबांसमोर तुम्ही म्हणेन.’’

‘‘तुलाही मी तुम्ही म्हणू?’’

‘‘काही तरीच. पुरुषांचा मान मोठा हो!’’

‘‘आणि स्त्रियांवर पुरुषांचं फार प्रेम असतं हो. जिथे प्रेम असतं तिथे आपण एकेरी हाक मारतो.’’

‘‘म्हणजे स्त्रियांचं प्रेम पुरुषांवर नसतं वाटतं?’’

‘‘प्रेमापेक्षा भक्ती जास्त असेल.’’

‘‘गुणा, प्रेम थोर की भक्ती थोर?’’

‘‘दोन्ही एकरूपच आहेत.’’

गुणा कलकत्त्यास निघून गेला. तिकडे नीट अभ्यास करू लागला. महाराष्ट्र मंडळाने त्याची व्यवस्था लावून दिली. तेथील महाराष्ट्र मंडळात गुणा लोकप्रिय झाला. महाराष्ट्र मंडळाची स्वत:ची इमारती नव्हती. ती इमारत बांधावयाची होती. दरवर्षी वर्गणीरूपाने पैसे गोळा करून फंड साठवण्यात येत होता. महाराष्ट्र मंडळाच्या वतीने एक नाटक करण्यात येणार होते. एक बंगाली नाटक कंपनी त्या खेळाचे उत्पन्न महाराष्ट्र मंडळाच्या फंडासाठी देणार होती. त्या खेळात मधल्या वेळात गुणाचे सारंगीवादन ठेवण्यात आले.

थिएटर भरून गेले होते. तिकिटे खूप खपविण्यात आली होती. काही लोक केवळ सारंगी ऐकण्यासाठी आले होते. गुणाने सारंगी वाजविली. अर्धा तास वाजविली आणि बंद केली. लोक म्हणू लागले, सारंगीच सुरू ठेवा. पुन्हा पंधरा मिनिटे त्याने वाजविली. सारे नाटकगृह तन्मय झाले. टाळ्यांचा कडकडाट झाला. गुणाची कीर्ती पसरली.

एके दिवशी सायंकाळी महाराष्ट्र मंडळाच्या जागेत एक बंगाली गृहस्थ आले.

‘‘कोण पाहिजे आपणाला?’’

‘‘ते सारंगी वाजवणारे.’’

‘‘बसा. थोड्या वेळाने ते येतील.’’

क्षितिमोहन बाबू तेथे एका लोडाशी बसले. पेशवाई थाटाची तेथे बैठक होती. थोड्या वेळाने गुणा आला.

“आपण माझ्याकडे आला आहात?” त्याने विचारले.

“हो. तुम्हांला विचारायचं आहे.”

“काय?”

“तुम्ही माझ्या घरी येऊन सारंगी वाजवाल का? माझी मुलगी फार आजारी आहे. कदाचित तिला बरं वाटेल. काही रोग संगीताने बरे होतात. याल का? मी गरीब आहे. तरीही तुम्हाला काही देईन.”

“मला काही नको. मी येईन. आता येऊ?”

“हो. चला. आभारी आहे.”

“आभार कसले त्यात?”

गुणा क्षितिमोहन बाबूंबरोबर त्यांच्या बिऱ्हाडी गेला. कुमुदिनी अंथरुणावर पडलेली होती. मच्छरदाणीत होती. तळमळत होती.

“कुमुदिनी, ते आले आहेत हो सारंगी वाजवणारे!”

“बघू दे त्यांना. ही मच्छरदाणी वर करा.” मच्छरदाणी वर करण्यात आली. कुमुदिनीने पडल्या-पडल्या प्रणाम केला. गुणा गोंधळला.

“वाजवा. मी ऐकते,” ती हलक्या स्वरांत म्हणाली.

आणि गुणा सारंगी वाजवू लागला. चाळीतील मंडळी गॅलरीत जमली. ही गर्दी! परंतु गडबड नव्हती. ते संगीत शांत करणारे होते. दोन-तीन राग आळवून शेवटी भैरवी त्यानं आळविली.

कुमुदिनीच्या डोळ्यांतून टपटप पाणी गळू लागले.

“पुरे ना आता?” गुणाने विचारले.

“पुरे. येत जा एखाद्या वेळेस. मी बरी होईन. रोग कायमचा बरा होईल.”

“येईन हो. जातो मी.”

“थांबा, चहा घ्या.”

गुणा चहा घेत नसे; परंतु तो बोलला नाही. त्याने आज तेथे चहा घेतला. तो निघाला. क्षितिबाबू पोचवायला गेले.

एके दिवशी गुणा असाच तेथे गेला होता. क्षितिबाबू घरात नव्हते. कुमुदिनी अंथरुणावर होती. तिचा भाऊ अक्षय तेथे होता.

“या बसा,” तो म्हणाला.

''अक्षय, ही मच्छरदाणी वर कर,'' कुमुदिनी म्हणाली.

सारंगी वाजवून गुणा जाऊ लागला. कुमुदिनीने त्याला जवळ बोलाविले.

गुणा जवळ गेला. ती हलक्या आवाजात म्हणाली, ''तुमचा एक सुंदरसा फोटो मला आणून द्या. माझी इच्छा पुरी करा.''

एके दिवशी त्याने आपला एक फोटो काढून घेतला व कुमुदिनीस तो नेऊन दिला. तो फोटो कुमुदिनी आपल्या हृदयाशी धरी. कुमुदिनी बरी होईल असे वाटत होते; परंतु पुन्हा तिचे दुखणे वाढले.

''बाबा, सारंगीवाल्याला बोलवा. जा लवकर,'' ती म्हणाली.

क्षितिमोहन गेले. गुणाला घेऊन आले.

''वाजवा सारंगी. आज माझा रोग कायमचा बरा होईल अशा तऱ्हेची वाजवा सारंगी.''

गुणा सारंगी वाजवू लागला. कुमुदिनीने गुणाचा फोटो हृदयाशी धरून ठेवला होता. अक्षय जवळ होता. गॅलरीत गर्दी जमली. आजची सारंगी काही और होती. अनंत उत्कंठा तिच्या आवाजात होती.

''आता पुरे करा. कुमुदिनीला झोप लागली वाटतं?'' पिता म्हणाला.

अक्षय जवळ होता. त्याने ताईकडे पाहिले. त्याने खाली कान केले. तो ना श्वास ना वास. हे काय?''

''कुमुदिनी'' त्याने हाक मारली.

काही नाही. त्याने तिला हलविले. काही नाही. गुणा एकदम पुढे झाला. तो डॉक्टर होता. त्याने नाडी पाहिली. सारे थंड होते. कुमुदिनेचे दुखणे कायमचे बरे झाले. आत्मा मुक्त झाला. संगीताच्या सुरांवर बसून अनंत संगीताकडे निघून गेला.

कुमुदिनीच्या हृदयाशी तो फोटो होता. घट्ट धरून ठेवलेला. गुणाच्या डोळ्यांत पाणी आले. तो फोटो त्याने घेतला.

''माझ्याजवळ ही आठवण असू दे. हा फोटो माझा नाही. या फोटोने मला कुमुदिनीनचे स्मरण राहील.'' गुणाने फोटो जवळ घेतला. तो कुमुदिनीच्या प्रेतयात्रेस गेला. त्याला काय वाटले असेल?

एके दिवशी गुणा क्षितिमोहनांकडे गेला होता. भिंतीवर कुमुदिनीचा फोटो होता.

''संगीताची भोक्ती गेली,'' ते म्हणाले.

''संगीताने बरी होण्याऐवजी तिला मरण आलं.''

''परंतु कसं शांत समाधानी मरण.''

''कुमुदिनीचा तो फोटो मला द्या. त्या दिवशी राहिला. तो मागायला मी आलो आहे.''

''न्या. तुमचाच त्या फोटोवर हक्क आहे.''

क्षितिमोहनांनी तो फोटो दिला. त्यांना काही बोलवले नाही.

''जातो मी.''

''या.''

गुणा कुमुदिनीचा फोटो घेऊन आला. त्याने तो ट्रंकेत ठेवला. इंदूला हा फोटो पाहून मत्सर वाटेल का? ती रागावेल का? नाही. तिला मत्सर वाटणार नाही. ती या पवित्र फोटोची पूजा करील. या जगात किती दुःखे, किती ओढाताणी!

हे जग अपूर्ण आहे. या जगात गुंतागुंती फार. असा कसा तो देव? तो दयाळू आहे का हृदये कुसकरणारा आहे? का असे प्रेमबंधन तो लावतो? अनुदार कठोर देव कठोर देव! मानवी भावनांचे खेळ करणारा, मानवी आशा-आकांक्षांची फुले कुसकरून हसणारा सुलतानीदेव!

गुणाच्या मनावर त्या मरणाचा खोल ठसा उमटला. तो दिवाळीच्या सुटीत इंदूरला गेला नाही; परंतु मनोहरपंतांनी त्याला नाताळच्या सुटीत बोलावलेच. तो गेला. इंदूरला आला. सर्वांना आनंद झाला. इंदूच्या घरीच तो उतरला. जणू इंदूचाच तो झाला होता. तिच्यासाठी आला होता.

''बरी आहेस ना इंदू?''

''गुणा तू बरा आहेस ना? तू दूर होतास. एकटा होतास.''

''माझ्याजवळ तू होतीस. सारी होती. मनुष्य कुठेही गेला तरी तो एकटा नसतो.''

''दुसरं कोण होतं तिथे?''

''तू होतीस मनात.''

''म्हटलं आणखी कोण होतं?''

''जातो आता. घरी जातो. आईला भेटतो. तिला वाईट वाटेल. हे सामान घेऊनच तिकडे जातो. म्हणजे आताच आलो असं त्यांना वाटेल. तू रागावशील म्हणून आधी तुझ्याकडे आलो.'' आणि खरोखरच सारे सामान घेऊन गुणा आपल्या आईबापांच्या खोलीत गेला. त्यांना आनंद झाला. तो आईजवळ बसला होता. तो इंदू आली.

''कशाला गं आलीस?''

''तू आलास असं कळलं म्हणून.''

''जरा आईजवळ बसलो तो आली.''

''येण्याच्या आधी गुणा कळवलंस का नाही?''

''तू स्टेशनवर माळ घालायला येशील म्हणून.''

''माझ्या माळेची इतकी का भीती वाटते?''

''भीती नाही वाटत.''

''लाज वाटते?''

''लाजही नाही वाटत.''

''मग?''

''तिचं प्रदर्शन नसावं एवढंच वाटतं.''

''लोक तर मुद्दाम समारंभ करून माळ घालायला लावतात.''

''ती माळ समाजासाठी असते. खरी माळ आधीच पडलेली असते. तिला संमती समाजाची घ्यावयाची, तिला जणू पुरावा समाजाचा घ्यायचा. समजलीस? बरं बस आता. उभ्याने बोलून दमशील.''

''मी कलकत्त्याचा लांब प्रवास करून थोडीच आले आहे. गुणा, आज जेवायला आमच्याकडे ये. सारीच या नाही तर.''

''अग, आजच तो आला. येईल उद्या-बिद्या.''

''परंतु थोडा वेळ बसायला तर चल.''

''आंघोळ वगैरे करून येतो. कपडे मळले आहेत.''

''आमच्याकडे नळ मोठा येतो. तिकडेच चल. कपडे पण रामा धुवील.''

''रामा नको धुवायला.''

''मी धुवीन म्हणजे झालं. चल आता. काढू का ट्रंकेतून कपडे?''

‘‘काढ. ही घे किल्ली.’’ इंदूने ट्रंक उघडली. वर पुस्तके होती. वह्या होत्या. खाली कपडे होते आणि तो फोटो! कुणाचा तो फोटो? त्याच्याखाली कुमुदिनी असे लिहिले होते. तिने तो फोटो पण घेतला. त्या कपड्यांबरोबर हळूच लपवून घेतला.

‘‘चल गुणा.’’

‘‘तू जा पुढे. मी येतो.’’

इंदू गुणाचे कपडे घेऊन गेली. ती आपल्या खोलीत बसली. तिने एका हातात स्वतःचा फोटो घेतला व एका हातात कुमुदिनीचा. कुमुदिनीच माझ्याहून सुरेख दिसते असे ती मनात म्हणाली. ती ते दोन्ही फोटो हातात खेळवीत होती तो गुणा आला.

‘‘काय गं करतेस इंदू?’’

‘‘माझा फोटो पाहत आहे.’’

‘‘स्वतःचाच फोटो काय बघतेस?’’

‘‘मग कुणाचा बघू?’’

‘‘आणि दुसरा एक फोटो घेऊन आलीस तो कुठे आहे?’’

‘‘गुणा, कुणाचा रे तो?’’

‘‘तो तुला आवडला की नाही सांग.’’

‘‘माझ्या फोटोपेक्षा तो चांगला आहे; परंतु पुष्कळ वेळा फोटोत मनुष्य चांगला दिसतो, तसा तो असतोच असं नाही.’’

‘‘आणि पुष्कळ वेळा मनुष्य फोटोहून अधिक सुंदर दिसतो. फोटोत तितका चांगला येत नाही.’’

‘‘फोटो म्हणजे सत्य नव्हे.’’

‘‘बघू तो फोटो–कुमुदिनीचा फोटो.’’

‘‘मी नाही देणार तो, कशाला हवा तुला तो?’’

‘‘तुला तिची गोष्ट सांगायला.’’

‘‘सांग गोष्ट. खरं सांग हो.’’

‘‘आंघोळ करून घेतो व मग सांगतो. ती पवित्र गोष्ट आहे. पवित्र होऊन सांगावी.’’ असे म्हणून गुणा गेला. त्याने आंघोळ केली. तो कपड्यांना साबण लावीत असला.

“हे काय गुणा, मी धुवीन म्हणून सांगितलं ना? डॉक्टरांनी कपड्यांना साबण नाही लावायचा. जरा कुणाला तपासलं, की लगेच हातांना फक्त साबण लावायचा. डॉक्टरांची ऐट असते गुणा. ऊठ, ती गोष्ट सांग आधी.”

गुणाने इंदूला ती करुण कहाणी सांगितली.

“माझ्या ट्रंकेत जो माझा एक फोटो आहे तो हृदयाशी धरून कुमुदिनी देवाघरी गेली. संगीत मरण. ऐकता ऐकता मरण, हृदयात भावनांची पौर्णिमा फुलली असता मरण, शांत प्रसन्न मरण.” गुणा म्हणाला.

“हा पवित्र फोटो आहे. हा फोटो म्हणजे मूर्तिमंत भावना आहे,” असे म्हणून इंदूने तो मस्तकी धरला.

मनोहरपंत दिवाणखान्यात बसले होते. त्यांनी गुणाला हाक मारली.

“गुणा, इंदूचा व तुमचा विवाह व्हावा अशी माझी इच्छा आहे. तुमचं परस्परांवर प्रेम आहे, एवढ्यासाठी मी मुद्दाम तुम्हाला बोलावलं.”

“परंतु परीक्षा देऊन येऊ दे.”

“डॉक्टर झालेच आहात आणि कलकत्त्याचीही परीक्षा पास व्हाल; परंतु माझ्या मनात येत आहे की आताच तुमचं लग्न आटपून टाकावं. तुम्ही आता मोठी आहात. फार मोठं अवडंबर नको. वैदिक पद्धतीचं लग्न, चार मित्र येतील. आटपून घेऊ. लग्न करूनच आता कलकत्यास जा म्हणजे बरं.”

“तुमच्या इच्छेच्या विरुद्ध मी नाही.”

“तुमच्या वडिलांजवळ मी बोललो आहे. त्यांचीही ना नाही.”

“बरं तर.”

गुणा आपल्या घरी गेला.

“काय रे, मनोहरपंत काही बोलले का?”

“हो. लग्नाविषयी बोलले.”

“गुणा, तू भाग्याचा आहेस. अशी सुंदर गुणी मुलगी, श्रीमंताची मुलगी तुला मिळेल असं स्वप्नातही नव्हतं.”

“तुम्ही सारंगी शिकवलीत तिचं हे फळ.”

एके दिवशी गुणा व इंदू यांचा विवाह झाला.

गुणा परत कलकत्त्यास जावयास निघाला. इंदूने तयारी करून दिली. त्यांचा दोघांचा एकत्र काढलेला फोटो तिने त्याच्या ट्रंकेत ठेवला.

"कुमुदिनीचा फोटो हवा का?" तिने विचारले.

"तो तुझ्याजवळच असू दे," तो म्हणाला.

गुणा निघून गेला. इंदू आता गुणाच्या आईबापांकडे राहायला आली. त्यांच्या घरात काम करू लागली.

"इंदू, अग तिकडेच राहायला पाहिजे असं नाही काही," तिची आई म्हणाली.

"आई, आता त्यांच्याजवळच राहणं बरं."

"आपला रामा तिकडे येत जाईल. भांडी घाशीत जाईल, धुणी धूत जाईल."

"नको आई. मीच सारं करीन. त्यांना त्यात कमीपणा वाटेल. संकोच वाटेल. ते लाजवल्यासारखं होईल. तुम्ही गडी पाठवाल तर तो माझ्यासाठी असं होईल. आजपर्यंत नाही पाठवलात तो? आताच का पाठवणार?"

"आणि आजपर्यंत तू नव्हतीस त्यांच्याकडे गेलीस ती? आताच का गेलीस?"

"आधीही गेले असते; परंतु लोक हसले असते. तुमचे विधी व्हायला हवे होते ना? परंतु आधी रामाला पाठवला असता तरी अडचण नव्हती, त्यासाठी विधींची जरूर नव्हती."

"मला नाही हो समजत इंदू. आम्ही साधी संसारी माणसं, योग्य ते कर. आजारी पडू नकोस म्हणजे झालं. मागे आजारी होतीस. त्यातून वाचलीस. आता आजारी पडलीस तर फार वाईट. आता तू एकटी नाहीस. तुझ्यावर दुसऱ्याचा जीवही अवलंबून आहे. आमच्यासाठी नाही; पण गुणासाठी तरी जप. आमचं आता वय झालं; परंतु तुमचा संसार आता तर पुढे व्हायचा. येऊ दे हो रामाला. त्याला दोन रुपये अधिक देऊ."

"बरं हो आई."

राम काम करायला येई. इंदू आता स्वयंपाक करी. इतर काम करी. सासूसासऱ्यांस कृतकृत्य वाटे.

"इंदू, तू शिकलीसवरलेली. तू का सारं करायचं काम?"

"आई, शिकलेल्या मुलीने अधिकच मनापासून केलं पाहिजे काम. आनंद मानून केलं पाहिजे. अशिक्षिताला कामाचा बोजा वाटत असेल, तर सुशिक्षिताला त्यात आनंद वाटला पाहिजे. एके दिवशी घरी आई मला केर काढायला सांगत होती. मी नाही म्हणत होते. गुणा येत होता. त्याने ते ऐकलं. तो मला म्हणाला, 'जा आधी केर काढ. शिकलेल्या मुली कामाला कंटाळतात. हा डाग तुम्ही धुऊन काढला पाहिजे.' ते शब्द मी विसणार नाही."

"किती तुझं थोर मन."

"तुमच्या गुणाने केलं हो. त्याच्याजवळ सारंगी नीट वाजवायला नाही शिकले; परंतु नीट वागायला शिकले. लोकांच्या भावना ओळखायला शिकले. गुणाने जीवनाचं शिक्षण दिलं. जीवनाची सारंगी वाजवायला त्याने शिकवलं."

"कसं गोड बोलतेस तू."

"हे मी नाही बोलत आई."

"मग कोण बोलत आहे?"

"हृदयातील वेणू वाजवणारा, सारंगी वाजवणारा गुणा. तो माझ्या ओठांतून बोलत आहे हो."

इंदूच्या आईला अलीकडे जरा बरे वाटत नव्हते.

"इंदू, काही दिवस इकडेच राहा."

"होय हो आई!"

इंदू आईची सेवा करींत होती; परंतु एकदम अकस्मात दुखणे विकोपाला गेले आणि इंदूची आई देवाघरी गेली. इंदूचे सांत्वन गुणाची आई करीत होती; परंतु दैवाचा आघात अद्याप संपला नव्हता. इंदूच्या आईचे दहन करून मनोहरपंत घरी येऊन बसतात तोच त्यांच्या हृदयात कळ आली व तेही एकदम इंदूला सोडून गेले.

इंदूची मन:स्थिती कोण वर्णील? तिच्या शोकाला अंत नव्हता. एका दिवसात ती पोरकी झाली. वीस वर्षे आईबापांचे कृपाछत्र तिच्यावर होते. ते एकदम हिरावून नेण्यात आले. गुणाला रामरावांनी तार केली. गुणा स्तंभितच झाला. तो एकदम इंदूरलायावयास निघाला. शोकमूर्ती इंदूची मूर्ती डोळ्यांसमोर येऊन त्याला सारखे वाईट वाटत होते. मनोहरपंतांची व आपली गाठ कशी पडली. आपणास त्यांनी बोलाविले, कसे हे सारे योगायोग आणि लग्न आता लावूनच जा

कसे म्हणाले? त्यांना का पुढचे मरण दिसत होते? हे जीवनाचे कोडे म्हणजे काय आहे? कोणाला हे उलगडेल? हे मनाचे खेळ, ही मनाची बिनतारी यंत्रे, कधी यांचा उलगडा होईल? किती गुंतागुंतीचे जीवन. किती खोल गेलेली त्यांची मुळे, किती दूरवर पोचलेल्या शाखा!

विचाराने तो जवळजवळ वेडा होऊन इंदूरला आला. तो इंदूच्या घरी आला. हळूहळू जिन्याने वर आला. इंदू आपल्या खोलीत खाटेवर शून्य मनाने पडून होती. तिला जबरदस्त धक्का बसला होता. गुणा आला. सामान ठेवून तो इंदूच्या खोलीत गेला व तिच्याजवळ बसला. ती एकदम उठली व ''गेली हो आई गेली, बाबा गेले. एका दिवशीच गेली, एका दिवशी. अरेरे गुणा, एकदम रे कशी गेली?''

ती रडू लागली? गुणा काही बोलला नाही. तिने त्याच्या मांडीवर डोके ठेवले. ती मधूनमधून बोले व रडे. शेवटी ती शांत झाली.

''उगी हो इंदू.'' तो म्हणाला.

''मी आता तुझी झाले म्हणून का ती दोघं गेली? मी तुझ्याबरोबर एरंडोलला आले असते म्हणून का ती आधीच निघून गेली. आपला मार्ग मोकळा करून देऊन गेली?''

''इंदू, मरण का आपल्या हातचं आहे? बोलावणं आलं की जावं लागतं.''

''कुणाचं बोलावणं?''

''देवाचं.''

''कुठे आहे तो देव? असा कसा तो देव? त्याने मला एक आधार दिला नाही तो दोन आधार घेऊन गेला. असा कसा कंजूष देव, अनुदार देव?''

गुणाचे डोळे भरून आले. काय बोलणार तो?

✦✦

एरंडोलला घरी

रामराव, त्यांची पत्नी आता इंदूच्याच घरी राहत. इंदू अद्याप दुःखी-कष्टीच होती. गुणा दर आठवड्यास तिला पत्र पाठवी. पत्राची ती वाटत पाहत असे. ते तिचे टॉनिक होते. दुःखाला विसरवणारे ते औषध. गुणाचे पत्र म्हणजे गुणकारी अमृत.

''आई, आपण येथून सारी तुमच्या एरंडोलला जाऊ,'' इंदू म्हणाली.

''का बाळ?''

''इथे नको. इथे मला सारखी आईची व बाबांची आठवण येते. इथे नको. हे घर नको. दूर दूर जाऊ. तुमच्या एरंडोलला जाऊ.''

''गुणा आला म्हणजे ठरवा काय ते; परंतु हे मोठं शहर आहे. इथे धंदा चालेल. ओळखीही आहेत.''

''धंदा थोडाच गुणाला करायचा आहे? त्याला मोठं आरोग्यधाम काढायचं आहे.''

''आरोग्यधामाला पैसे लागतात इंदू.''

''हे घर आपण विकून टाकू. बाबा असतानाच एक शेटजी मागत होता.''

''पाहू पुढे. गुणा येऊ दे. आजच कशाला त्याचा विचार?''

गुणाला यावयास आता फार दिवस नव्हते. लवकरच तो येणार होता. इंदू त्याच्या येण्याची वाट पाहत होती. ती एखाद्या वेळेस ''आता येणार लवकर गुणा माझ्या घरी.' असे म्हणून टाळ्या वाजवी; परंतु एकदम आईची व बाबांची आठवण येऊन ती कावरीबावरी होई. सरतेशेवटी गुणा आला. निसर्गोपचार पद्धती शिकून आला. सर्वांना आनंद झाला; परंतु गुणाच्या मनात दु:ख होते. एके दिवशी तो एकटाच बसला होता. तो खिन्न होता. इंदू येऊन जवळ उभी होती तरी त्याला कळले नाही.

''गुणा!''

''कोण, इंदू?''

''असं खोटं हसू नकोस. किती खिन्न होतास तू? काय रे आहे दु:ख?''

''जगन्नाथची आठवण आली. त्याची पत्नी रडत असेल. त्याचे आईबाबा रडत असतील. तो माझ्या शोधासाठी बाहेर पडला. त्याला शोधायला मी नको का जायला?''

''कुठे जाणार तू गुणा? उगीच काय भटकायचं?''

''मग काय करू?''

''आपण एरंडोलला सारी जाऊ तू आला आहेस हे त्याला कळेल. जगन्नाथ येईल.''

''जायचं का एरंडोलला?''

''जाऊ.''

''बाबानांही बरं वाटेल; परंतु इंदू कसं जायचं? आज कसं जाता येईल? पैसे मिळवून मग जायला हवं. बाबा खाली मान घालून राहतील? त्यांना स्वाभिमानाने राहता आलं पाहिजे. सावकाराचं देण देऊ व मग राहायला जाऊ.''

''मी एक सांगू का?''

''काय?''

''हा वाडा विकून टाकावा. माझे हे दागदागिने सारे विकून टाका. बँकेतील पैसे आहेत. काही पॉलिसीचे पैसे येतील. कर्ज सहज फेडता येईल

आणि माझं म्हणणं असं की आता कर्ज का फेडा? तुमची शेतीवाडी गेली. तिचे लिलाव झाले. सावकारांनी हिश्शेवारीप्रमाणे पैसे घेतले. आता का द्यायचं कर्ज? तुमच्या इस्टेटीहून कर्ज का जास्त होतं? व्याजामुळे जास्त झालं. तुम्ही फसवलं असंही नाही. आता सावकारांची देणी देऊ नयेत. आपण येथून एरंडोलला जाऊ. रोकड करून जाऊ आणि तुम्ही मोठी संस्था काढा. आरोग्यधाम संस्था. मीही त्या संस्थेत काम करीन. आपण प्रयोग करू. निसर्गोपचार मानसोपचार नाना पध्दती अवलंबू. काढा त्या पद्मालयाजवळ सुंदर संस्था. गरिबांना मोफत ठेवू. सावकारांनी तरी पैसे कोठून आणले? गरिबांचेच ते सारे पैसे. गरिबांच्याच श्रमांतून धन निर्माण होत. सावकार व्याजाने धन वाढवतो. वाढवतो म्हणजे दुसऱ्यांना लुटून आणतो. गरीब घामाने धन निर्माण करतो. धान्य व वस्तू निर्मिती. असंच आपण करू या. तुमचं घर आहे. तुमच्या मित्राने ते जाऊ दिलं नाही. त्या घरी चला जाऊन राहू. आपण अशी सुंदर संस्था काढली तर कुणी नावं का ठेवील? म्हणू द्या. सावकारांनी बुडवून संस्था काढतात असं का म्हणतील? म्हणू द्या. सावकारांनी आमचं सर्व शेतभात, जमीनवाडी घेतली असं आपणही स्वच्छ सांगू.''

''इंदू, तू हे मनापासून सांगत आहेस? तुला गरिबीत राहायला आवडेल?''

''गुणा, सुख कशात आहे?''

''सुख शेवटी मनात आहे.''

''झालं तर. सुख दागिन्यांत नाही. सुख मनाच्या समाधानात आहे. आपणास ते समाधान अशी सेवा करून मिळेल आणि या घरात राहणंही माझ्या जिवावर येतं. इथे आईची व बाबांची आठवण येते. इथे नको वाटतं दुसरीकडे जाऊ. एरंडोलला जाऊ. वीस वर्षं आईबाबांच्या घरी नांदले.आता तुमच्या घरी. एरंडोलच्या घरी. तुमची खोली पाहीन, जिथे तुम्ही दोघे मित्र गात असा, बसत असा. तुमची अंजनी नदी पाहीन. चला खरंच चला.''

गुणाने इंदूचे घर विकले. ते घेण्यासाठी शेटजी टपलेलेच होते. त्रास पडला नाही. घरातील सामानसुमानही पुष्कळसे विकून टाकण्यात आले. इतर सामान रेल्वेने गुड्स करून पाठवण्यात आले. एके दिवशी इंदू व गुणा,

रामराव व त्यांची पत्नी सारी इंदूर सोडून निघाली. जळगावला उतरून स्पेशल मोटार करून रात्री ती सारी एरंडोलला आली. बरीच रात्र झालेली होती. त्या जुन्या वाड्याजवळ मोटार थांबली. पुन्हा ती किल्ली लावून कुलूप उघडण्यात आले. सहा वर्षांनी रामराव घरात परत शिरत होते. कंदील लावण्यात आला. मोटारीतील सामान क ाढण्यात आले. मोटार गेली.

शेजारची मंडळी जागी झाली. कोण आले म्हणून पाहावयास ती आली. तो वृध्द रामराव तेथे होते.

''रामराव?''

''आलो परत.''

''आणि हा गुणा वाटतं.''

''किती उंच झालास! बरं झालं. आलेत पुन्हा. तुझा मित्र आता येऊ दे. तुमच्या आठवणी सर्व गावाला येतात. तालुक्यातील, खेड्यापाड्यांतील शेतकरी तुमची आठवण करतात.''

लोक गेले. दार लावून मंडळी आत आली. घर स्वच्छ होते. सामान ठेवण्यात आले. आधी देवांना देवघरात नेऊन ठेवण्यात आले.

गुणा आपल्या खोलीत गेला. पाठोपाठ इंदूही होती. गुणाचे एक भव्य तैलचित्र तेथे होते. फारच सुंदर दिसत होता गुणा. बालपणाची कोवळीक त्या फोटोत होती.

''किती छान चित्र!'' इंदू म्हणाली.

''परंतु हा चित्र टांगणारा कुठे गेला? त्याच्या घरी उद्या हे तोंड कसं दाखवू? कुठे गेला जगन्नाथ?''

''येईल हो जगन्नाथ परत. नको वाईट वाटून घेऊ.''

सकाळी सर्व शहरभर वार्ता गेली. अनेक लोक भेटायला आले.

गुणा जगन्नाथच्या आईकडे गेला. तो पंढरीशेटच्या जगन्नाथच्या आईच्या पाया पडला. ''गुणा,बरा आहेस ना? कुठे रे इतकी वर्ष होतास? तू इथे असतास तर जगन्नाथ जाता ना! केव्हा येईल तो! एकदा त्याला पाहीन व डोळे मिटीन. त्याला भेटण्यासाठी फक्त हे प्राण उरले आहेत. आणि इंदिरा! काय तिची दशा! तिचीही करूणा देवाला येऊ नये का?''

''आई, येईल हो जगन्नाथ. मी आलो, आता तो येईल. त्याला मी शोधून आणीन.''

''येऊ दे, माझा जगन्नाथ येऊ दे. तुझ्या तोंडात साखर पडो! किती तुझ्यावर त्याचं प्रेम! त्या घरासाठी किती भांडला आणि ते रोज झाडून ठेवायचा. तुझी आठवण करून रडायचा. तुम्ही पुन्हा दोघे एकत्र कधी व्हाल? कधी तुम्हा दोघांना बरोबर पाहीन, बरोबर पुन्हा दूध प्यायला देईन, लाडू खायला देईन. किती तुमचं लहानपणी प्रेम! गुणा, भेटव रे जगन्नाथला! तुमचं प्रेम खरं असेल तर तो भेटेल. बघू या तुझ्या प्रेमाची शक्ती, आणू दे जगन्नाथला ओढून.''

''आई, इंदिरेची तपश्चर्या त्याला ओढून आणील. तिच्या ध्यासाहून. तिच्या जपाहून, तिच्या तपाहून कोण अधिक बलवंत?''

''गुणा इंदिराताईंच्या भेटीस गेला. जगन्नाथच्या खोलीत ती राम राम म्हणत सूत कातीत होती.

''इंदिराताई.''

''कोण?''

''मी गुणा.''

''बसा आणि तुमचे मित्र कुठे आहेत? एकटे हो कसे आलात?''

''मी आणीन हो त्याला. आणल्याशिवाय राहणार नाही. जगन्नाथ येईल, येईल.''

''मीही आशेने आहे की ते येतील. ती आशा नसती तर माझे प्राण अद्याप टिकले नसते.''

गुणा घरी गेला. त्याला काय करावे ते सुचेना. जगन्नाथच्या घरी जायला त्याला धीर होत नसे. इंदू इंदिरेकडे जाई; परंतु काय बोलणार? कर्तव्य म्हणून ती जाई व परत येई.

''इंदू.'' गुणाने हाक मारली.

''काय?''

''मी जाऊ का जगन्नाथला शोधायला!''

''परंतु कुठे शोधणार? एकटा नको. मीही येते बरोबर. मला सोडून नको जाऊ.''

''माझ्यावाचून राहा काही दिवस. इंदिरेबरोबर समदु:खी हो. म्हणजे तिच्याजवळ तुला बोलता येईल. तिचं समाधान करण्याचं धैर्य तुला येईल. मी नेहमी पत्र पाठवीन. येईन एकदा हिंडून. तो गाणं शिकायला जाणार होता. मी दक्षिणेकडील प्रमुख शहरं पाहून येतो.''

''गुणा, किती दिवसांत परत येशील? काही मर्यादा ठरव.''

''मित्र सापडल्याशिवाय परत कसा येऊ?''

''तू मलाही रडत ठेवणार?'

''इंदिरा रडत आहे. तूही रड.''

''गुणा, आईबाबा गेले आणि तू असं बोलतोस. कठीण हो आम्हा बायकांच जीवन. आम्हाला आधारच नसतो जगात.''

''इंदू, मग मी काय करू? नको का शोधायला जायला? त्यांचे आईबाबा, इंदिरा, ही दु:खी असता तुझ्याभोवती गोंडा घोळत बसू? हसत-खेळत बसू?''

''जा हो गुणा; माझ्याभोवती नको गोंडा घोळू. तू कर्तव्य करायला जा. मी रडणार नाही, मित्राच्या शोधाला तू जात आहेस, कर्तव्यासाठी मोह झुगारून जात आहेस; म्हणून मला तुझा अभिमान वाटेल. तू मला अधिकच प्रिय होशील. तू माझा अधिकच मौल्यवान दागिना आहेस असं मी मानीन. जा राजा जा.''

''आता खरी तू इंदू.''

''आणि आधी कोण होते?''

''आधी मोहमयी इंदू होतीस. आपणा सर्वांची दोन-दोन रूपं आहेत. कधी आपलं निर्मळ स्वरूप प्रकट होतं, तर कधी आपण मायापंकात बरबटलेले असतो. आपणा सर्वास नेहमी ग्रहणं आहेत. ती सुटतात, पुन्हा लागतात, चंद्रसूर्यांची ग्रहणं सुटावी म्हणून आपण दानं करतो. 'दे दान सुटे गिराण' म्हणून ओरडतो; परंतु आत्मसूर्याचं, आत्मचंद्राचं ग्रहण सुटावं म्हणून आपण दान करीत नाही. आसक्ती सोडीत नाही. इंदू.तू आज स्वत:चं निर्मळ स्वरूप दाखवलंस.''

''आणि मित्राच्या शोधार्थ जाणाऱ्या गुणाचंही दिव्य भव्य रूप पाहून मी कृतार्थ झाले.''

गुणा जगन्नाथच्या शोधासाठी बाहेर पडणार होता;परंतु एके दिवशी अकस्मात दयाराम भारती एरंडोलला आले, तुरुंगात त्यांची प्रकृती फारच बिघडली होती. त्यांना सोडून देण्यात आले. जगन्नाथच्या घरी ते आले; परंतु जगन्नाथ घरी नव्हता. ते गुणाकडे आले. गुणाने त्यांचे स्वागत केले.

दयाराम खूप अशक्त झाले होते. त्यांच्या अंगात तापही होता. गुणाने त्यांची नीट व्यवस्था ठेवली. त्याने त्यांची प्रकृती नीट तपासली. काही औषधे त्याने मागवून घेतली; परंतु गुण येईना. इंदू व गुणा सेवा करीत होती.

कधी कधी खेड्यांतील शेतकरी भेटीस येत. आठवड्याच्या बाजाराच्या दिवशी गुणाच्या घराला यात्रेचे स्वरूप येई. शेकडो लोक दयाराम भारतींचे दर्शन घेण्यास येत. प्रणाम करून जात. कधी कधी विद्यार्थी येत. त्यांच्या तोंडून दोन शब्द ऐकायला मिळावे म्हणून येत; परंतु दयाराम फारसे बोलत नसत, त्यांना बोलवत नसे, जणू दुसऱ्या जगात ते मनाने गेले होते. देह अद्याप पडला नव्हता.

''तुम्ही आम्हाला काही सांगा.'' इंदू म्हणाली.

''काय सांगू? गरिबांची स्थिती सुधारा. श्रमणाऱ्यांची स्थिती सुधारा.. आपलं फार पाप झालं. ज्या समाजातील गरीब, श्रमणारी जनता सुखी नाही. तो समाज केवळ पापमय आहे. जन्मभर तेच सांगत आलो. आता मरताना तेच सांगत आहे. हजारो लोकांची तोंडं तुम्हाला न बोलता सांगत नाहीत कां? इथे शेतकरी येतात. त्यांच्या अंगावर चिंध्या असतात. किती दु:खीकष्टी असतात. ते किती गरिबीने बोलत बसतात! वास्तविक साऱ्या जगाला पोसणारे ते. त्यांच्यामुळे सारं जग जगतं; परंतु त्यांची किती कष्टप्रद दशा! त्याच्या चिंध्या पाहून काही येतो का तुमच्या मनात विचार? त्याचं दैन्य पाहून दीनवाणेपणा पाहून येतं का चित्त गहिवरून? येते का चीड, येतो का संताप, वाटतं का अपरंपार दु:ख? काय मी सांगू? मुलं येतात, म्हणतात काही सांगा. मोठे येतात, म्हणतात काही सांगा. पुराण का सांगायचं आहे? मला एकच सांगायचं आहे की क्रांती करा. समाज रचना बदला, शेतकऱ्याला वाचविण्यासाठी मरा. त्याला पोटभर खायला उरेल, त्याच्या जीवनात आनंद राहील असं करा. काय सांगू आणखी?''

दयाराम थांबले. इंदू, गुणा इतर विद्यार्थी सारे शांत होते. सर्वांच्या तोंडावर गंभीर विचारांची छाया होती. दयाराम पुन्हा बोलू लागले.

''गुणा, तू क्षयरोग्यांसाठी दवाखाना काढणार आहेस. चांगली आहे गोष्ट; परंतु अरे, क्षयरोग का होतो? क्षयरोग खेड्यापाड्यांतूनही पसरला आहे. गरिबांना खायला नाही म्हणून क्षयरोग होत आहे व श्रीमंताना अधिक खायला आहे म्हणून क्षयरोग होत आहे. सर्वांना पुरेसं खायला करा म्हणजे क्षयरोग जाईल. गरिबांना जरुरीपेक्षा अधिक श्रम आहेत म्हणून क्षयरोग आहे. श्रीमंताना श्रमच नाहीत म्हणून क्षयरोग आहे. सर्वांना बेताचा श्रम द्या म्हणजे क्षयरोग जाईल. एक हॉस्पिटल काढून काय करणार? काहीच नाही त्यापेक्षा बरं आहे; परंतु येथील सारी राज्यपद्धती बदलली पाहिजे. समाजरचना बदलली पाहिजे. 'राजा कालस्य कारणम्।' राज्यपद्धतीवर परिस्थिती अवलंबून असते. समाजस्थिती सुधारायला पाहिजे असेल तर राज्यपद्धती सुधारा. गरिबांचा कैवार घेणाऱ्यांचं राज्य हवं. त्यासाठी त्यांची संघटना केली पाहिजे. तुम्ही बुद्धिमान तरुणांनी त्यांचं नेतृत्व स्वीकारलं पाहिजे. त्यांच्यात राजकीय जागृती केली पाहिजे. कुणी करायचं हे काम? धर्माधर्मांची भांडणं आहेत. जातीजातींची भांडणं आहेत. या सर्व क्षुद्र वृत्तींच्या संकुचित लोकांपासून जनतेला वाचवणं हे तुमचं काम आहे. क्रांतीचं काम हे पहिलं काम. ते नसेल झेपत तर मग हे दुय्यम काम करा.''

''तात्पुरते इलाज. एखादा दवाखाना, घ्या खादीचा धंदा, घ्या एरंडोली कागद; परंतु ही तात्पुरती मलमपट्टी आहे. खरा प्रश्न खोल आहे. ज्या वेळेस ग्रामोद्योग हिंदुस्थानात होते त्यावेळेस का दरिद्री लोक नव्हते? त्या वेळेस का अज्ञान नव्हतं? एकीकडे ताजमहाल बांधले जात होते, दक्षिणेतील प्रचंड मंदिरं बांधली जात होती; परंतु वेठीला धरून आणलेल्या श्रमजीवींना बळी देऊनच ही पाषाणमय सौंदर्य निर्मिली गेली असतील! यंत्रं आणा की ग्रामोद्योग आणा. श्रमणाऱ्यांची पिळवणूक दूर झाली पाहिजे, ही दृष्टी हवी. श्रमणाऱ्यांना भरपूर मिळेल अशी खबरदारी घेणारं सरकार पाहिजे. मी काय सांगू? तुम्ही तरुण आहात. करा संघटना, करा विचारा व आजूबाजूचं जग अधिक सुखी करण्यासाठी झटा. दुःख, अन्याय, विषमता, पिळवणूक कमी करा. हो गुणा,

जगन्नाथ, तुम्ही घ्या हाती क्रांतीचा झेंडा. इंदू, इंदिरा जाऊ दे शेतकऱ्यांच्या बायकांत. सर्वांना ज्ञान द्या, साक्षर करा, त्यांच्या जीवनांत शिरा.''

दयारामांना दम लागला. जणू ते शेवटचे बोलत होते. ते गप्प बसले. एकदा सर्वांकडे त्यांनी पाहिले. नंतर डोळे मिटून पडून राहिले. एक-दोन दिवस गेले आणि दयारामांनी देह सोडला. क्रांती, क्रांती करीत ते गेले. क्रांती म्हजणे त्यांचे रामनाम. क्रांती म्हणजे धर्म. क्रांती म्हणजे संस्कृतीचा, अखिल मानवी संस्कृतीचा मंगल आरंभ. त्या क्रांतीचे स्मरण करीत ते गेले. त्या क्रांतीसाठी पुन्हा जन्म असला तर ते येतील. पुन्हा पुन्हा येतील, हाडे झिजवतील, क्रांतीसाठी प्राण देतील.

''त्यांच्या स्मशानयात्रेस हजारो लोक जमले. खेड्यापाड्यांतून शेतकरी धावत आले. त्यांनी फुले उधळली. गुणाने दोन शब्द सांगितले.

''बंधूंना, दयारामांचं स्मरण म्हणजे गरिबांचं स्मरण. दुसरं मी काय सांगू? त्यांचं जीवन गरिबांच्या प्रश्नांशी एकरूप झालेलं होतं. दरिद्री नारायणाशी ते समरस झाले होते. तुरुंगात त्यांची प्रकृती ढासळली. ते निघून गेले; परंतु त्यांची स्फूर्ती आपणांत राहील. त्यांचा आत्मा आपल्याभोवती घिरट्या घालीत राहील. आपण काही करतो की नाही, गरिबांची बाजू घेऊन उठतो की नाही हे त्यांचा आत्मा पाहत राहील.''

दयाराम भारतींचे एकाएकी मरण! गुणाच्या मनाता तो एक मोठाच धक्का बसला. त्यांचे शब्द त्याला आठवत. आपण काय करावे ते त्याला कळेना.

''इंदू, माझं मन अस्वस्थ आहे. जगन्नाथलाही शोधावयाचं आहे. मी जाऊ का? तू प्रेमाने मनापासून जाऊ देशील तर जाईन.''

''जा हो; परंतु लवकर ये. पत्र पाठव. प्रकृतीस जप.''

एके दिवशी गुणा स्वत:च्या आईबाबांची व इंदूची परवानगी घेऊन, जगन्नाथच्या आईबाबांचा आशीर्वाद घेऊन व इंदिराताईची तपस्या व प्रेम बरोबर घेऊन निघाला. पुन्हा. एरंडोल त्याने सोडले. दु:खी-कष्टी मनाने सोडले. एकट्याने सोडले. इंदिरेबरोबर इंदूही दु:खी झाली. जगन्नाथच्या आईबाबांप्रमाणेच गुणाचे आईबाबाही दु:खी झाले. इंदू इंदिरेकडे जाई व

चरख्यावर कातीत असे. दोघी मैत्रिणी बनल्या. जगन्नाथची आठवण येऊन गुणा कसा गहिवरे, रडे ते इंदू सांगे. गुणाची आठवण येऊन जगन्नाथ कसा दुःखी होई, त्याच्या फोटोसमोर गाणे म्हणत कसा बसे ते इंदिरा सांगे.''

आणि खाली जगन्नाथच्या आईजवळ गुणाची आई बोलत बसे. ओटीवर पंढरीशेट व रामराव बसत.

''जगन्नाथला घेऊन गुणा येईल,'' रामराव म्हणत.

''मलाही तसंच वाटतं,'' पंढरीशेट म्हणत. दोघी माता तेच म्हणत. दोघी मैत्रिणी तेच म्हणत. सारे एरंडोल हीच आशा प्रकट करी. ही आशा का खोटी ठरेल? तर मग देवच खोटा ठरेल!

++

प्रेमयात्रा

कावेरी व जगन्नाथ हिंडत होती, प्रेममत्त होऊन हिंडत होती. जगन्नाथला तिने मद्रासी लुंगी नेसविली होती. इतका गोरा मद्रासी पाहून लोक आश्चर्याने बघत. रस्त्यांतून गाणी गात दोघे हिंडत. प्रेमाची गाणी, भक्तीची गाणी; देवाची गाणी, शांतीची गाणी, क्रांतीची गाणी. त्यांच्याभोवती गर्दी जमे. जगन्नाथच्या खांद्यावर हात ठेवून कावेरी उभी राही. तो गाऊ लागला म्हणजे तिची जणू समाधी लागे.

समोर एक चादर पसरलेली असे. गाणे संपले म्हणजे लोक तिच्यावर पै पैसा फेकीत. काही दिवस असे हिंडून पैसे थोडे जमले म्हणजे दोघे एखाद्या शहरातील पथिकाश्रमात उतरत. तेथे आनंदाने राहत. पैसे संपले, की पुन्हा फकीर बनून हिंडत.

त्यांनी अनेक क्षेत्रे पाहिली. अनेक पुरेपट्टणे पाहिली. दक्षिणेकडील प्रचंड पाषाणमय मंदिरे पाहून जगन्नाथ आश्चर्य करी.

''मानवी मनांना अशी मंदिरं बांधून काय मिळे? त्यांची मनं मोठी होती का? त्यांची मनं प्रेमळ होती का? विचार उंच होते का? दगडांत त्यांनी कला ओतली. किती ही कला! बारीक सारीक गोष्टींतही त्यांनी कलेची उधळपट्टी केली. दगडांतून फुलं त्यांनी फलवली; परंतु आसपासचा मानवी समाज फुललेला होता

का? मला काही समजत नाही. ज्यांना आत्म्यांत कला ओतता येत नाही, ते दगडांत ओतीत असावेत. ज्यांना मानवी मूर्तींना घरदार देता येत नाही, तो विचार ज्यांच्या हृदयांत येत नाही, ते राममंदिरं बांधीत असावेत. कावेरी, ही मंदिरं पाहून मला नाही आनंद वाटत. मला नाही प्रसन्न वाटत.''

''जगन्नाथ, त्या कलावंतांची मनं प्रसन्न नसतील तर ही कला त्यांना प्रकट करता आली असती का? त्यांच्या आत्म्यांत कला होती म्हणून त्यांनी पाषाणांतही ती प्रकट केली. आत्मा अभंग आहे. अभंग आत्म्याची कला अधिक काळ टिकणाऱ्या दगडांतून त्यांनी प्रकट केली. पाषाणांत त्यांनी छिनीने उपनिषदं लिहिली. ही मंदिरं म्हणजे वेन आहेत. या आत्म्याच्या वैभवाच्या खुणा आहेत. हिंदू मंदिरांचे कळस बारीक बारीक होत गगनाला जणू भेटू पाहत. मुसलमान बंधूंच्या मशिंदींना भव्य घुमट असतात. जगन्नाथ, यातील अर्थ आहे का तुला माहीत?''

''कोणता अर्थ?''

''अरे, हिंदू मंदिरांचा कळस म्हणजे सारा स्थूल पसारा सोडून उत्तरोत्तर मुक्त होत जाणारी, परमात्त्याला मिळू पाहणारी जणू पवित्र आत्मज्योत. ईश्वराकडे जायचं असेल तर हे बाह्य फापट-पसारे सोडून, यांतून आत्मा काढून घेऊन तो ईश्वराकडे वळवा; दृष्टी वरती लावा; सूर्याकडे लावा; परमज्योतीकडे लावा; असं तर जणू हा कळस सुचवीत आहे आणि मुसलमानांचा घुमट म्हणजे जणू आकाशाची प्रतिकृती. ईश्वराने विश्वव्यापक गोलघुमट मशीद उभारली आहे. हा आकाशाचा घुमट बघ. केवढी भव्य ही प्रभूची मशीद. त्या मशिदीची आठवण लहान मशिदीत ठेवायची. जणू प्रभूच्या आकाशाखाली उभे आहोत, सर्व पृथ्वीवरच्या बंधूंशी एकरूप होत आहोत अशी लहानशा मशिदीच्या घुमटाखालीही कल्पना करायची, भावना करायची, सुंदर कल्पना, जगन्नाथ, साऱ्या कला प्रतीकात्मक आहेत. मानवी संस्कृती प्रतीकात्मक आहे. आपल्या या लहानशा शरीरात आत्मा भरलेला आहे, त्याप्रमाणे आपण लहानशा वस्तुत, लहानशा चिन्हात अनंत अर्थ भरतो. जगन्नाथ, तमिळ भाषेतील तो तिरुस्तूरलचा कर्ता तुला माहीत आहे ना?''

''तिरुवल्लराय ना?''

''हो. त्याच्या कुलाची ख्याती आहे का तुला माहीत? थोड्या शब्दांत अपार अर्थ तो आणी. टीकाकार म्हणतात, 'मोहरी पोखरून तीत सिंधू भरावा असं

तिरुवल्लुराय करतो. साऱ्या प्रतीकांचं असंच आहे. लाल झेंडा. केवढा अर्थ त्यात आहे! जगातील श्रमजीवींचा अनंतकाळपासून चाललेला झगडा त्यात सामावलेला आहे. मागील बलिदान व पुढील उज्ज्वल भविष्य या लाल झेंड्यात समाविष्ट आहे.''

''कसं तू छान बोलतेस कावेरी? तू क्रांती करणारी आहेस. अशी भिकारीण काय बनलीस?''

''प्रेमाची शतजन्मांची तहान भागवून घेण्यासाठी. ही तहान भागली म्हणजे मग मी क्रांतीसाठी उठेन हो राजा,'' असे म्हणून ती जगन्नाथला हृदयाशी धरी.

एकदा दोघे श्रीरंगम्‌ला जात होती. गोष्टी चालल्या होत्या.

''जगन्नाथ, श्रीरंगम्‌मधील मूर्तीचे दर्शन घेण्याकरिता एकदा एक हरिजन संत वेडा झाला. तो रंगा रंगा करीत निघाला. सनातन्यांनी त्याला अडवलं. तो म्हणाला, ''देवाने मला बोलावलं आहे. जाऊ दे.'' ''देवाने बोलावलं असेल तर या आगीतून जा. शुद्ध होऊन जा. तू अपवित्र आहेस. पवित्र होऊन जा,'' सनातनी म्हणाले. त्याने आगीत उडी घेतली. असत उडी घेतली! लोक चकित झाले. अशी अग्निदिव्यानेही सनातनी जागे झाले नाहीत. हे जागे होणार तरी कधी? असे कसे हे सनातनी दगड. इरसाल दगड. हरिजनाला म्हणाले पवित्र होऊन जा आणि हे का सारे पवित्र? विषयभोगांत बरबटलेले किडे! हे भोगी किडे का पवित्र? जगन्नाथ, द्राविडी जनतेस खरा धर्म हरिजनसंतांनी शिकविला आहे. हरिजनांत जितके संत झाले तितके अहंकारी वरिष्ठ वर्गांत झाले नाहीत. परमेश्वर नम्रतेजवळ आहे, अहंकाराजवळ नाही.''

''श्रीरंग नाव मला आवडतं. मी कावेरी-रंग आहे, नाही? कावेरीच्या प्रेमाने रंगलेला. कावेरीचा देव.''

''कावेरीचा दास, कावेरीचा गुलाम.''

''देव बंदा गुलामच असतो. बळीच्या दारात तो उभा आहे.''

''जगन्नाथ,तू हल्ली सुखी आहेस?

''होय. सुखाच्या स्वर्गात मी आहे''

''आणि मी गेल्ये तर? तुला सोडून गेल्ये तर? मी मेल्ये तर?

''तर काय?''

"तूही मरशील? तुझे प्राण आपोआप गळून जातील?"

"मी काय सांगू कावेरी? तू मला प्रश्न नको विचारूस. प्रश्नांनी मी घाबरतो."

"नाही विचारत हो प्रश्न, तुझा प्रेमभंग मला लुटू दे. वाटतं तुला लहान करून डोळ्यांत ठेवून द्यावं. हृदय उघडून आत ठेवून द्यावं. माझ्या मुठीत राहशील तू?"

"तुझ्या मुठीत मी आहे."

"तसं नव्हे वेड्या. असा इतका लहान हो की जणू मोगऱ्यांच फूल, गुलाबाच फूल. जगन्नाथ, तुला असं होता आलं असतं तर किती मजा झाली असती! तू पुन्नागाचं फूल झाला असतास तर माझ्या कानात मी तुला घातलं असतं. तू गुलाब वा चाफा झाला असतास तर तुला माझ्या केसांत बांधून ठेवलं असतं. तुझा वास घेतला असता. या दोन बोटांत तुला पकडून ठेवलं असतं. लोकांना वाटेल फूल; परंतु ही तुझी मूर्ती आहे हे फक्त मला माहीत. नाही? तू हसला असतास, मी हंसले असते. जगन्नाथ, होतोस लहान?"

"होणार आहे लहान."

"खरंच?"

"तुला नाही माहीत? लहान होणार आहे. तुझ्या मांडीवर खेळणार आहे. तुझ्या हातांत मावणार आहे. तू मला नाचवशील, वर उडवशील, झेलशील, तुझ्यासाठी लहान होणार आहे. मग मला मारशील, रागावशील."

"आणि अगणित मुके घेईन."

"होणार आहे ना लहान?"

"पुष्कळ अवकाश आहे अजून."

"कावेरी, आपण किती दिवस भटकायचं?"

"कंटाळलास तू? भटकू. आणखी काही दिवस भटकू."

ती दोघे नीलगिरी पर्वतात गेली. किती सुंदर पर्वत. किती फुले. निळीनिळी दिसणारी शिखरे आणि मधूनमधून स्वस्छ पाण्याची तळी. हिरवी निळी झाक मारणारी तळी. कावेरी व जगन्नाथ हिंडत हिंडत एका टेकडीच्या जवळ गेली. तेथे एक सुंदर तळे होते. किती निर्मळ पाणी!

"जगन्नाथ, टाक उडी."

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

जगन्नाथने उडी टाकली. पद्मालयाची त्याला आठवण झाली.

''तूही टाक,'' तो म्हणाला.

तिनेही उडी घेतली. दोघे पाण्यात बुडून नाचू लागली. व खेळू लागली. कावेरी वर येई तर जगन्नाथ खाली असे; तो वर येई तर कावेरी पाण्याखाली असे. एकाच वेळी दोघांची डोकी पाण्यावर येईपर्यंत बुडाबुडी खेळायचे ठरले होते. शेवटी पाण्यात कावेरीचा हात जगन्नाथने पकडला व दोघे एकदम वर आली. जणू दोन कमलेच वर आली.

''पुरे आता,'' कावेरी म्हणाली.

''दमलीस ना?'' त्याने विचारले.

''मजजवळ ओझ आहे. तुझ्या प्रेमाचं गोड ओझं.'' ती म्हणाली. दोघे बाहेर आली. कावेरी उन्हात केस वाळवीत बसली होती. जगन्नाथ फुले गोळा करायला गेला. रानफुले. एकदम घाबरून तो आला.

''काय रे जगन्नाथ?''

''सर्प. काळा सर्प.''

''कुठे आहे?''

''गेला.''

''उचलून आणून माझ्या गळ्यात घालायचास. इंद्रनील मण्यांचा हार झाला असता. तुझं खरं प्रेम माझ्यावर असतं तर तो सर्प तुला हार वाटला असता. त्याची फणा म्हणजे सुंदर फूल वाटलं असतं. प्रेमाला सर्वत्र मंगलता दिसते. तुलसीदास सापाला दोरी करून चढला. साप त्याला चावला नाही.''

''कावेरी, माझ्या प्रेमाचा मला अलंकार नाही. आज तरी तुझ्यासाठी मी सारं सोडलं आहे इंदिरा सोडली आहे, ध्येय सोडलं आहे. सारं सोडलं आहे.''

''याची आठवण आहे तुला? याची आठवण येते ना? प्रेमाला दिलेल्या किमतीची आठवण येणं म्हणजे पस्तावणं.''

''कावेरी, दक्षिणेकडे हरिजनांत संत झाले; परंतु वरिष्ठ वर्गांत घटपटादी लटपटी करणारे आचार्य झाले. तू प्रश्न विचारतोस; परंतु प्रेमाला प्रश्न विचारता येत नाही. तुझंही मजवर प्रेम नाही.''

“परंतु संतांची नावं दुनियेला माहीत नाहीत. शंकराचार्यांचं नाव जगाला माहीत आहे. वेदांवर भाष्यं लिहिणारे सायणाचार्य व ते सर्वज्ञ माधवाचार्य यांची नावं दिगंत गेली आहेत. सायणाचार्य न होते तर वेदांचा अर्थ कोणाला लागता? या आचार्यांमुळे भारताची मान उंच आहे.”

“वेदांचा अर्थ नसता कळला म्हणून काय झालं असतं? हरिजनसंतांना का वेदांचा अर्थ माहीत होता? वेदांचा अर्थ माहीत असणारे भेदांना भजू लागले व वेदांचा अर्थ माहीत नसणारे अद्वैत अनुभवू लागले. तुमचे हे आचार्य, कोणाला आहेत त्यांची नावं माहीत? तुम्ही वरचे लोक उगीचच प्रौढी मिरवीत असता. कोट्यवधी लोकांना तुमच्या आचार्यांची आठवणसुद्धा नाही. आपल्या बिळात बसून तुम्ही स्वत:ची पाठ थोपटून येत असता. मला हसू येतं.”

इतक्यात तिकडून कोणी तरी त्या जंगलातील लोक आले. जगन्नाथ व कावेरी बसली होती. जणू स्वर्गातून खाली आलेले जोडपे. ते रानटी लोक आले व यांच्या पाया पडले. त्यांनी काही तरी विचारले. जगन्नाथला समजले नाही; परंतु कावेरीला समजले.

“हो, आम्ही या तळ्यात पोहलो,” ती म्हणाली.

“पवित्र पाणी, फार पवित्र पाणी. जो पवित्र असेल तोच यात तरतो. पापी या पाण्यात बुडतो. पापांचं ओझं त्याला बुडवतं. हे पाणी फार हलकं आहे. निर्मळ आहे. निळं निळं पाणी, कृष्णाच्या अंगासारखं, रामाच्या अंगासारखं. गायी-बैलांच्या डोळ्यांसारखं. या तळ्यातील पाणी कोठून आलं माहीत आहे का?”

“कुठून आलं? या टेकडीवरून ना? नीलगिरीच्या टेकडीवरून आलेलं निळं पाणी.”

“नाही नाही. हे पाणी गोमातांच्या डोळ्यांतील आहे.”

“गो-मातांच्या डोळ्यांतील?”

“हो. एकदा पृथ्वीवर फार अन्याय माजला होता. जिकडे तिकडे दु:ख, जिकडे तिकडे रडारड. गो-मातांना ते दु:ख पाहावेना. साऱ्या जगातील गो-माता इथे जमल्या व त्या रडल्या. त्यांच्या डोळ्यांतील पाण्याचं हे तळं बनलं. प्रेमळ गो-मातांच्या डोळ्यांतील करुणेचं पाणी. निळं निर्मळ पाणी. पुण्यवान पाणी. तुम्ही यात पोहलात. तुम्ही निर्मळ आहात. देवमाणसं आहात. जणू रामसीता आहात.”

"अरे, राम सावळा होता."

"आणि सीता गोरी होती."

"तुम्ही आज रंग बदलले असाल. राम गोरा झाला असेल. सीता सावळी झाली असेल. त्या वेळच्या काळ्या रावणाला दूर करायला काळा राम होता. आजच्या गोऱ्या रावणांना दूर करायला गोरा राम हवा."

"गोरे रावण?"

"कुठे आहेत?"

"इथेसुद्धा आहेत. हे चहाचे मळे त्यांचे आहेत. चहाच्या वासाने हवा भरली आहे. आम्हा गरिबांचे त्या मळ्यांतून हाल. आम्ही त्या गायींप्रमाणे रडतो."

"गायींनी शिंगं उगारून आता धावलं पाहिजे."

"ते श्रीराम, राजू कुठे गेले आई?"

"त्यांचा पत्ता नाही. त्यांना मारलं की ते मेले, कळत नाही."

"डोंगरात उभा राहून तो लढला. धनुष्यबाणाने रामाप्रमाणे लढला. पुष्कळ डोंगरांतील लोक त्याच्याबरोबर लढले. खरा वीर. आई, तुम्ही लढाल का त्या श्रीरामाप्रमाणे?"

"लढू, देश स्वतंत्र करू. हे मळे तुमच्या मालकीचे करू."

"तुम्ही देव आहात. सोडवा आम्हाला." असे म्हणून प्रणाम करून तो मनुष्य गेला. इतर सोबत्यांसह गेला.

"कावेरी, हे श्रीराम राजू कोण?"

"जगन्नाथ, हा नुकता पंधरा-वीस वर्षांपूर्वी झालेला महान स्वातंत्र्यवीर. त्याने इंग्रजांशी लढाई पुकारली. स्वातंत्र्य जाहीर केलं. धनुष्यबाणाने तो लढला. सहा महिने तो लढत होता. दऱ्याखोऱ्यांतून लढत होता. तुम्हाला त्याचं नावही माहीत नाही? दक्षिणेत त्याच्यावर शेकडो पोवाडे झाले आहेत, गाणी झाली आहेत. जगन्नाथ, तू का गोरा राम?"

"मी कसला राम?"

"तू रामच आहेस. वनवासी राम. पट्टाभिराम नाही हो. जगन्नाथ, मला वनवासी राम आवडतो. पट्टाभिराम नाही आवडत."

"मी वनवासीच राहीन."

"परंतु वनवासी राम व्रती होता."

"तो बघ सुंदर पक्षी, कावेरी, तो बघ."

"खरंच, किती छान! गेला, उडाला."

"आपण आता समुद्रकिनाऱ्याने हिंडू. मद्रासचा किनारा."

"उंच पर्वत पाहिलेस, प्रचंड मंदिरं पाहिलीस, आता समुद्राच्या अनंत लाटा बघ."

"आणि हिंडत हिंडत पूर्व समुद्राला हे प्रेमी जोडपे गेले. समुद्रकाठी लहान लहान गावे. गरीब गावे.

"किती दरिद्री ही गावं!"

"जगन्नाथ, एकेकाळी ही सुखी गावं होती. इंग्रजांनी ही भिकारी केली. मद्रासच्या पूर्व किनाऱ्यावर अपरंपार मीठ पिके व हे सारं मीठ बंगाल बिहारला जाई. बंगालला मीठ होत नाही; परंतु इंग्रज तिकडून मीठ आणून बंगालमध्ये विकू लागले. आमचा धंदा त्यांनी कायद्याने मारला. मद्रास किनारा दरिद्री झाला. या किनाऱ्यावर अपरंपार पीक आपोआप होई. लोक ते नेत; परंतु सरकारी अधिकारी येतात व हे मीठ मिसळतात, वाळूत मिळवतात. देवाने दिलेलं अन्न मातीत मिळवण्यासाठी सरकार नोकर ठेंवतं व त्यांना आपण पगार देतो. जगन्नाथ, या किनाऱ्यावरच्या लोकांना आज मीठ विकत घ्यावं लागतं; परंतु त्यांच्याजवळ दिडकी नसते; परंतु मिठाचा अंश तर पोटात जायला हवा. नाही तर शरीर सडेल. रोग होतील. मग हे लोक काय करीत, माहीत आहे?"

"काय करीत?"

"अंधाऱ्या रात्री सरकारी लोक आसपास नाहीत असं पाहून खाऱ्या जमिनी जिभेने चाटून येत."

"अरेरे, काय ही दशा!"

"तरी हिंदुस्थान शांत आहे. दुनियेत अशी शांती असेल का कुठे? सारं स्मशान, स्मशान या हिंदुस्थानचं झालं... जातीजातींत भांडणं लागली, धर्माधर्मांत भांडणं लागली, भाषाभाषांत भांडणं लागली, बेकारीचे व कारकुनीचे शिक्षण,

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

प्रांताप्रांतांतील सुशिक्षित भिकाऱ्यांत भांडणं लागली, धंदे गेले, व्यसनं बळावली. हिंदुस्थानचं स्वरूप, महान मंगल स्वरूप ते छिन्नभिन्न झालं. परकी सत्तेने काय हे केलं?''

''परंतु आपण करू दिलं म्हणून ना? पापाला आपण बळी का पडलो? त्यांना कशाला बोल? बोल आपल्या लोकांना, आपण भुललो, घटोत्कची मायेस भुललो.''

''जसा तू भूललास. मी तुझं वाटोळं केलं. तुला ध्येयहीन केलं. चारित्र्यहीन केलं. कुटुंबातील प्रियजनांपासून दूर आणून कुत्रा करून फिरवीत ठेवलं.''

''कावेरी, काय हे बोलतेस?''

''खरं नाही?''

''प्रेमाच्या राज्यात सारं पवित्र आहे.''

''प्रेम कर्तव्याचं असावं, मोहाचं नसावं.''

''प्रेमापाठीमागे जाणं हेही कर्तव्य नाही का?''

''जगन्नाथ, आता हिंडणं पुरे गड्या. मी थकून जाते. आपण कुठे तरी पाहू.''

''एक-दोन मोठ्या शहरांत हिंडून पैसे मिळवू. मग राहू.''

काही दिवसांनी ती दोघे मद्रास शहरात एका पथिकाश्रमात राहिली. कावेरीचे दिवस भरत आले होते. ती शांत पडून राही. जवळ जगन्नाथ बसे.

''जगन्नाथ, बाळंतपणात मी मेले तर?''

''असं नको बोलू. सारं चांगलं होईल. सुंदर बाळ जन्माला येईल.''

''ते गोरं असेल की काळं?''

''गोरं असेल.''

''महाराष्ट्रीय रंगाचं बाळ.'' ती डोळे मिटून पडून राही. जगन्नाथच्या मांडीवर हात ठेवून पडून राही. मध्येच हात वर करून त्याची मान खाली वाकवी व तोंडावर धरून ठेवी त्याचे तोंड.

''जगन्नाथ, फार दिवस आपण नाही हो राहाणार. तुझं हे गोड गोड तोंड फार दिवस नाही हो मी पाहणार. म्हणून हो ते धरून ठेवावंसं वाटतं. तुला हृदयात कोंडून ठेवावंसं वाटतं. कशाला तू दक्षिणेत आलास? मी हिंदीप्रचार करीत होते, हरिजन सेवा करीत होते, त्या अहंकारात होते, सेवेच्या व वैराग्याच्या अहंकारात होते. तू

आलास दक्षिण-दिग्विजय करायला, कावेरीला वेड लावायला, मला भिकारी बनवलंस, तू भिकारी झालास.''

जगन्नाथचे डोळे भरून आले.

''जगन्नाथ, रडू नकोस. तुला वाईट वाटलं नाही हो मी असं पुन्हा बोलणार. तू मला श्रीमंत केलंस. तु मला आईची पदवी देणार आहेस. मातृत्वाचा धन्य अनुभव देणार आहेस. नवप्रसूतीच्या वेदनांचा मोक्ष देणार आहेस. क्रांतीचं बाळ जन्माला येताना देशाला, समाजाला अशाच अनंत वेदना लागतात. लाखोंचं बलिदान, पवित्र वेदना. जगन्नाथ, तू माझं रिकामं जीवन काठोकाठ भरलंस. पूर्वी मी सारं करी. दिवस सारा कामाने भरलेला. लोकांना माझं जीवन सेवेने भरलेलं दिसे; परंतु ते रिकामं होतं, सुनं होतं. तू आलास व मळा बहरला. कावेरी आत कोरडी होती ती उचंबळली. जगन्नाथ, तू मला काय दिलंस? तू का विचार दिलेस? नाही. मीच तुला विचार देत असे. मी तुला हिंदी शिकवलं, तमिळ शिकवलं, मोपल्यांचा इतिहास सांगितला, क्रांतीचे विचार सांगितले. दक्षिणेतील कलांचा इतिहास सांगितला. दक्षिणेत लोकसत्ताक राज्यं कशी होती, प्राचीनकाळी निवडणुका कशा होत, नाणी पाडण्यापासूनचे हक्क पंचायतीस कसे असत, ठिकठिकाणी तळी, कालवे, पाटबंधारे; दक्षिण म्हणजे समृद्ध बगीचा कसा बनला होता, ते सारं तुला सांगितलं.

''तू मला काय दिलंस? तू प्रेम दिलंय. ज्या प्रेमातील अर्थाचा आत्मा शब्दांनी सांगता येणार नाही. तू तुरुंगात होतास. तुझं स्मरण होताच डोळे भरून येतं. तू घरी असताना, मी हिंदी शिकवायला चालले, हरिजन मुलांना शिकवायला चालले, की तू बरोबर नाहीस म्हणून रडू येई. तू जणू माझी पूर्णता. मी माझ्या जीवनात किती तरी पाणी आणून ओतीत होते; परंतु जीवनाचं भांडं भरत नव्हतं. तू आलास. तू पाहिलंस व माझं भांडं उसळून-ओसंडून वाहू लागलं. तूच ना ती पैठणची गोष्ट सांगत असायचास? लोक हजारो कावडी पाणी आणतात; परंतु हौद भरत नाही; परंतु देव एक कावड ओततो व हौद भरून जातो. माझ्या जीवनाच्या हौदात क्रांतीच्या विचारांच्या, हरिजनसेवेच्या, हिंदी भाषाप्रचाराच्या, सत्याग्रहाच्या शेकडो कावडी मी आणून ओतीत होते; परंतु हौद भरेना. जिवाचा मासा अनंत

पाणी मागत होता. मनाच्या देवमाशाला उचंबळणारा समुद्र पाहिजे होता आणि तो तू दिलास. जगन्नाथ, जीवनाला परिपूर्णता देणारं प्रेम तू मला दिलंस. तू आता गेलास तरी चालेल. हे जीवन आता आटणार नाही. नामदेवासाठी पाण्याने भरून वाहू लागणारी विहीर मारवाड्यात अद्याप वाहत आहे म्हणतात. नामदेव गेला तरी विहीर वाहते आहे.

''जगन्नाथ तू आता जा, इंदिरेकडे जा. तुला मी वाटेत थांबवलं, तुझी गंगा जरा अडवली. माझा घडा भरून घेतला. इंदिरेला सांग, की रागावू नको. इंदिरेचा जगन्नाथ मी भिकारी करून नाही पाठवीत. श्रीमंत करून पाठवीत आहे. हसवून, रडवून, भटकवून, नाचवून, चढवून, पाडवून पाठवीत आहे. जगन्नाथ, काय काय बोलू? तुझ्याजवळ अनंत बोलावंसं वाटतं; परंतु या ओठांनी हालचाल करून अनंत बोलता येत नाही. तुझे ओठ माझ्या ओठांशी आणून मुकेपणाने ते सारे तुझ्यात ओतते, ये.''

असे म्हणून तिने त्याला वाकवून जवळ घेतले. त्याच्या डोळ्यांतील अश्रू तिच्या अश्रूंत मिळाले. तिचा श्वास त्याच्या श्वासोच्छ्वासात मिसळला. तिने अनंत बोलणे, अनंत भावना व विचार मुकेपणाने त्याला सांगितले.

''सांगितलं ना सारं? कळलं ना सारं?''

जगन्नाथने तिचा हात कुरवाळला. तो त्याने हृदयापाशी धरला. आपल्या तोंडावरून फिरवला. तिने त्याचा हात घेतला व आपल्या मुखावरून फिरवला. डोळ्यांवरून, गालांवरून, नाकावरून फिरवला. केसांवरून फिरवला. जणू ती जीवन पुन्हा शांत करून घेत होती.

जगन्नाथ कावेरीचे लुगडे धुवी. तिचे कपडे धुवी. तिला चहा करून देई. काही खायला करून देई. ते डबा मागवीत; परंतु कावेरीला स्वतःच्या हातचे करून वाढण्यात त्याला आनंद असे.

''जगन्नाथ कसं चुरचुरीत लुगडं लागतं हाताला. तू छान धुतोस.''

''परंतु मला चुरचुरीत नाही आवडत. इंदिरा माझे कपडे धुवी, चुरचुरीत आणून देई; परंतु मी ते कुसकरून मऊ करीत असे व मग घालीत असे.''

'' तू इंदिरेला सांग, की कावेरीला चुरचुरीत वस्त्र आवडत असे.''

''मी तुला सोडून कुठे जाऊ?''

''इंदिरा तुला ओढून नेईल. तू तिचा समुद्र आहेस. माझा वाळूचा बंधारा किती दिवस तुला अडवणार? हा वाळूचा बंधारा, मिठाचा बंधारा समुद्रातच मिळून जाईल. समुद्र मग इंदिरेकडे हेलावून, उचंबळून भरती घेऊन जाईल. प्रेमाचा असा पाऊस पडत होता आणि त्या प्रेमाच्या पावसात बाळ वाढत होते. एके दिवशी एका प्रसूतिगृहात कावेरी प्रसूत झाली. मुलगा झाला. गोरागोरा मुलगा . जगन्नाथ जाई. कावेरीजवळ बसे. किती पावन दिसे ती शांत दिसे ती, तिचे स्मित आता उन्मादकारी नव्हते. ते अनंत अर्थाचे सूचक, शांत व मधुर वाटे. पाळण्यातील लहान बाळाला जगन्नाथ हलवी. त्याच्याकडे बघे.

''घे त्याला हातांत.''

''मला भय वाटतं. त्याला वाढू दे. तुझ्या दुधावर वाढू दे. मांडीवर वाढू दे. मग मी घेईन.''

''जगन्नाथ, नवीन कोवळ्या अंकुराची वाढ स्त्रियांनीच करावी. नवीन तुळशीचा माडा, नवीन फुलझाडं, नवीन दुर्वा स्त्रियांनीच वाढवाव्या. नवीन बाळाला हळुवार हातांनी त्यांनीच वाढवावं. स्त्रिया वाढवतील ते जगेल. तुमच्या साऱ्या चळवळी स्त्रियांना वाढवू दे, तरच त्या जगतील. हरिजनचळवळ स्त्रियांत जाऊ दे, काँग्रेस, किसान-कामगार चळवळ, साऱ्या चळवळी स्त्रियांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. स्त्रिया वाढवतील ते जगेल. बाकीचं मरेल. स्त्रियांचा हात म्हणजे अमृतहात.''

''तुझा तरी हात अमृतहात आहे. कावेरी, आपण बाळाला खांद्यावरून कडेवरून हिंदुस्थानभर नाचवू. हा बाळ म्हणजे जणू झेंडा, नव हिंदुस्थानचा झेंडा. आपण गाणी म्हणू. तो ऐकेल, हसेल. खरं ना? बाळाचं नाव काय ठेवायचं?''

''जगन्नाथनंदम.''

''अगडबंब नाव.''

''आमच्याकडे अशीच अगडबंब नावं असतात.''

''त्याचं नाव 'प्रेमानंदम' असं ठेवू.''

''जशी तुझी इच्छा.''

काही दिवसांनी कावेरी बाळाला घेऊन बिऱ्हाडी आली. जगन्नाथ सारे करी. स्वयंपाक करी. अंथरूण घाली, धुणी धुवी. लहान मुलाची हगोली-मुतोलीही तो धुवी.

“जगन्नाथ, तू सारं कसं हे करतोस? तुला राग कसा येत नाही?”

“मी प्रेमाच्या राज्यात आहे. सारं सध्या गोड आहे. कावेरी, तुम्ही बायका सारं काम करता. त्याचा अनुभव मी घेत आहे.”

“परंतु स्त्रियांच्या प्रसूतिवेदनांचा नाही हो अनुभव घेता येणार. बाकी सर्व अनुभव घेऊ शकाल; परंतु त्या वेदना, त्या मोक्षाच्या वेदना, नवनिर्मितीच्या वेदना, ते भाग्य वा दुर्भाग्य स्त्रियांचंच आहे.

“होय हो कावेरी.”

एके दिवशी रात्री पुन्हा जगन्नाथ व कावेरी यात्रेला निघाली. लहानगा प्रेमानंद हसत होता. एका गावात एक गोड गाणं जगन्नाथ म्हणत होता. माता प्रेमानंदाला घेऊन उभी होती. आजूबाजूच्या आयाबाया गाणे ऐकायला आल्या. ते तमिळ गाणे होते. त्याचा मराठी अर्थ केला तर पुढीलप्रमाणे होईल.-

कुणि बाळ पाहिला का माझा,
कुणि लाला पाहिला का माझा ।।धृ० ।।
तिन्ही सांजा या झाल्या, आल्या गाई अवघ्या गोठ्यात
गेली पाखरे घरट्यात ।। कुणि० ।।
दुडदुड धावे जिकडेतिकडे, अचपळ गडबड किती त्याची
मोहक मूर्ती गोदाची ।।कुणि० ।।
हाका तरी किती मारू, अंधार भरे बाहेर
बाळ कुठे सुख माहेर ।।कुणि० ।।
येरे येरे रे बाळा, हाका दारातून मारी
पाही दिशांना ती चारी ।।० ।।
हळुच येऊनी पाठीमागून, हळुच देइ ओ हाकेला
मातेच्या धरी ओच्याला ।।कुणि० ।।
हेलावुन ये हृदय आईचे, उचलून घेई बाळाला
चुंबी तयाच्या वदनाला ।।कुणि० ।।
घट्ट हृदयापाशी धरूनी, माय घरामधी जाऊनी
दृष्ट टाकिते काढूनी ।।कुणि० ।।
घट्ट धरोनी हृदयी बालक, माय घरामधी मग जाते

दृष्ट काढू नी ती म्हणते ।।कुणि० ।।
उदंड होवो आयुष्याचे, माझे हे तान्हे बाळ
प्रभु सांभाळिल सुकृपाळ ।। कुणि० ।।

आयाबाया म्हणत, ''भिकाऱ्या, पुन्हा म्हण रे गाणं.'' आणि हा गोड भिकारी ते गाणे पुन्हा म्हणे. कोणी मुली येत व म्हणत ''भिकाऱ्या, म्हण रे पुन्हा; आम्ही टिपून घेतो.'' आणि तो पुन्हा म्हणे. भिकाऱ्याच्या मुलाला कोणी अंगडी टोपडी देई. एका मातेने त्याला खुळखुळा आणून दिला.

''किती गोड आहे मुलगा,'' आयाबाया म्हणत.

''थंडीवाऱ्यात कसं होईल त्याचं?'' कोणी म्हणत.

''गरिबांच्या मुलांना नाही बाधत थंडीवारा. देव त्यांचा सांभाळ करतो. पाहा त्या मुलाचं बाळंसं. नाही तर ती मेनका आपल्या मुलाला किती बालामृतं पाजते; परंतु मूल अंग धरील तर शपथ.''

अशी बोलणी ऐकत जगन्नाथ व कावेरी गेली. गावाबाहेर नदीतीरी बसली. कावेरीने फुले आणली, पुन्नागाची फुले. त्या फुलांनी तिने मुलाला नटविले. किती सुंदर दिसे, लहानग्या प्रेमानंदाची चिमणी मूर्ती! साजिरी गोजिरी मूर्ती!

''जगन्नाथ, आमचा राष्ट्रीय कवी तुला माहीत आहे ना?''

''भारती ना? सुब्रह्मण्यं भारती.''

''हो. त्याने लहान मुलाला एका गाण्यात काय सांगितलं आहे, आहे माहीत?''

''काय सांगितलं आहे?''

''बाळ, दारात कावळा येईल, चिमणी येईल. तुझी करमणूक करायला येतील. त्यांना खडे नको मारु, त्यांना हाकलून नको देऊ, त्यांना दाणे टाक हो बाळ, भाकरीचा तुकडा टाक हो आणी मनी माऊ तुझ्या दुधाभोवती म्यांव म्यावं करीलं. तिला काठी नको मारू. तिला घाल हो दूध. आईजवळ हट्ट धर तिला दूध घालण्यासाठी आणि गायीचं वासरू हंबरेल. तू जाऊन त्याला थोपट. त्याच्यासारखा चपळ हो हो राजा आणि मोत्या तुला चाटायला येईल. त्याच्या तोंडात भाकरीचा तुकडा दे हो आणि दारी शेवंती फुलेल; मोगरा फुलेल; तुळस डोलेल. त्यांना तुझा लहान गडू घेऊन पाणी घाल हो. फुलपाखराला दुरून बघ. त्याचे पंख नको हो तोडू

प्राणी चतुर असतात, त्यांना दोऱ्याने नको हो बांधू. असं आहे ते गाणं. छान आहे नाही जगन्नाथ?''

''हो, खरंच छान आहे.''

''तू महाराष्ट्रात गेल्यावर महाराष्ट्रातील मुलांना ते शिकव. इंदिरेच्या पुढे होणाऱ्या मुलाबाळांस शिकव.''

''कावेरी, मी सदैव तुझ्याबरोबर आहे. तू माझा महाराष्ट्र, तू हिंदुस्थान, तू स्वर्ग, तू मोक्ष. का मला पुन्हा पुन्हा दुसऱ्या आठवणी करून देतेस?''

''जगन्नाथ, मन अनंत आहे. जीवनातील साऱ्या स्मृती तिथे असतात. त्या केव्हा जोर करून वर येतील व इतर स्मृतींना गुदमरवतील त्याचा नेम नाही. एक दिवस इंदिरा उसळून तुझ्या हृदयसागराच्या तळातून वर येईल व कावेरी व हा प्रेमानंद तळाला जाऊन बसतील.''

तेथे गवतावर बाळ झोपला होता. धरित्रीच्या कुशीत. हिरव्या गालिच्यावर.

''जगन्नाथ, शेवटी धरित्रीमातेची कूस सर्वांना सांभाळणारी. ती मातांची माता. जीवनात, या संसारात कंटाळून गेलेल्या जीवाला, दगदग व वणवण करून थकून गेलेल्या जीवाला धरित्रीमाताच शेवटी जवळ घेते. ती लहानांना जवळ घेते. मोठ्यांना जवळ घेते. मानवी मातेला मोठ्या मुलाला जवळ घेण्यात संकोच वाटतो; परंतु भूमाता सर्वांना, लहान-थोरांना, रावारंकांना, स्त्री-पुरुषांना, बालवृद्धांना, पापात्म्यांना, पुण्यात्म्यांना, सर्वांना जवळ घेते. तिची अनंत पाखर सर्वांवर आहे. तिची हिरवी शालजोडी सर्वांसाठी, तिची फुलं सर्वांसाठी, ती सर्वांना झोपविते, वारे वारा घालतात, पांखरं गाणी म्हणतात. साऱ्यांना ती विश्रांती देते.''

''किती छान दिसतो आहे प्रेमा? हिरव्या गवतावरचं जणू पांढरं फूल.''

''माझ्या कुशीतल्यापेक्षा तो भूमातेच्या कुशीतच छान दिसतो. नाही?''

''काय बोलतेस कावेरी?''

''काय म्हटलं मी?''

''मी नाही त्याचा उच्चार करीत.''

''प्रेमाच्या राज्यात सारं सुंदर व मंगल वाटत ना? जीवन-मरण दोन्ही लाटाच. दोन्हीही गोड.''

हिंडत हिंडत दोघे उत्तरेकडे चालली.

''कावेरी, आपण महाराष्ट्र व मद्रासच्या सीमेवर आलो. सोलापूर जिल्ह्यात आता आपण शिरू. वरच हिंडत आलो. मलबार किनारा राहिला.''

''मलबार राहिला हे बरं झालं. मलबारचं सृष्टीसौंदर्य पाहिलेस तर तू वेडा झाला असतास; पण तुझे पाय आपोआप महाराष्ट्राकडे वळले. आतील अनंत सुप्त मन तुला महाराष्ट्राकडे खेचीत आहे. जीवनातील गुप्त अंत:प्रवाह महाराष्ट्राकडे जात आहे. जगन्नाथ, महाराष्ट्रातील नद्या मद्रासकडे धावत आल्या; परंतु त्या मागे नाही वळल्या. कृष्णा, गोदावरींनी मद्रासला माळ घातली. तू मद्रासला माळ घालून परत कुठे चाललास? प्रवाह मागे कसा चालला? परंतु मनुष्य उगमाकडे जात असतो. पंचमहाभूतांतून आला. पंचमहाभूतांत जातो. ईश्वराकडून आला, ईश्वराकडे जातो. महाराष्टातील पुन्हा महाराष्ट्राकडे जातो. होय ना!''

''कावेरी, तुझं प्रेम म्हणजे माझा दिवा. ते नेत आहे तिकडे मी जात आहे.''

''जगन्नाथ, गिरीचा बालाजी बघावयाचा राहिलाच.''

''आता आमचं पंढरपूर पाहायला चल. आषाढी एकादशी जवळ येईल, वरून पाऊस पडत असतो, आकाशातून देवाचा पाऊस, खाली भक्तिप्रेमाचा पाऊस, वरती मेघांचा गडगडाट, खाली टाळ-मृदंगांचा उचंबळवणारा, निनादणारा नाद! चंद्रभागा दुथडी वाहत असते. नावा नाचत असतात, दिंडीला दिंडी लागलेली असते, चल पंढरपूरची मौज पाहू.

''सुखासाठी करिसी तळमळ
तरि तू पंढरीसी जाई एकवेळ''

असं महाराष्ट्रातील संत सांगतात, कावेरी, चलं, खरंच आपण जाऊ.''

''आणि गिरीच्या बालाजीला केव्हा जायचं? कसा सुंदर टेकडीवर उभा आहे. जणू चारांना एकत्र करीत आहे. चारी हातांनी चौघांना धरीत आहे.''

''गिरीचा बालाजी खूप श्रीमंत आहे. होय ना?''

''हो. इतका संपन्न देव क्वचितच असेल. हा देव सावकारी करतो. व्यापारी येथून व्यापारासाठी रकमा नेतात व परत करतात. कोर्टकचेरी लागत नाही. मुक्या देवाची सुखी सावकारी .''

''आणि पंढरपूरचा विठोबा असाच आहे. पंढरपूरचा विठोबा म्हणजे भोळ्या-भाबड्या शेतकऱ्यांची देवता. ती वाळूची ओबडधोबड कशी भक्कम मूर्ती आहे.

अशा त्या ओबडधोबड मूर्तीलाच संतांनी राजस, सुंदर, मदनाचा पुतळा म्हणून आळवलं. शेतकरीच सर्वांत सुंदर. सृष्टीला सुंदर करणारा, हिरवीगार करणारा, तो सुंदर नव्हे तर का सावकार सुंदर? पंढरपूरच्या विठोबाच्या डोक्यावर भलं मोठं पागोटं असतं. असा हा विठोबा आज शतकानुशतकं उभा आहे. श्रीशंकराचार्य आले व त्यांनी पांडुरंगाष्टक लिहिलं; परंतु कावेरी हे विठ्ठल दैवतही तुम्हीच दिलेलं असावं. त्याच्या कानांत मकरकुंडलं आहेत आणि माशाच्या आकाराची कुंडलं तुम्ही द्राविडीच कानांत घालता. महाराष्ट्राचं सर्वश्रेष्ठ दैवत तुम्ही आम्हांस दिलं आहे. चल, त्याला पाहायला. चल त्याला भेटायला. पांडुरंग हा विठोबा, म्हणजे महाराष्ट्राचा मुका अध्यक्ष. लाखो वारकरी येतात, नाचतात, जातात. या वारकऱ्यांच्या संस्थेचा अध्यक्ष कोण? हा विठोबा. किती वर्ष अध्यक्षत्व करीत आहे. चलं त्याला भेटायला. चलं पंढरीच्या यात्रेत जाऊ, नाचू''

''जगन्नाथ, जुन्या यात्रा सोडून आपण नवीन यात्रा कधी करू लागणार? आता सेवाग्रामला महात्माजींच्या यात्रेला जावं. तेथील पुनरुज्जीवन देणारे सारे उद्योग बघावेत तेथील स्फूर्ती घेऊन जावं; किंवा मुंबई ,कानपूर, वगैरे ठिकाणी जाऊन कामगार बंधूंच्या लाल संघटना बघाव्या किंवा बिहारमध्ये जावं. जयप्रकाशांची किसान संघटना बघावी. पंजाबात जावं व जालियनवाला बागेचं दर्शन घ्यावं, मुंबईच आझाद मैदान बघावं, नव्या काळात नवीन तीर्थक्षेत्रं नको का व्हायला?''

''कावेरी, पूर्वीची पुण्याई पूर्वीच्या तीर्थक्षेत्रांना पुरत आहे. श्रीरंगमला हरिजन संत नंदा आगीत उडी घेतो. पंढरपूला एक वेश्याकन्यका पांडुरंगाच्या चरणी लीन होते व तिचे प्राण निघून जातात. असे अनंत त्याग त्या त्या क्षेत्री ओतलेले आहेत. आपण नवीन कार्यक्षेत्रात असे त्याग ओतू तेव्हा नवीन तीर्थक्षेत्रं जन्मतील. पूर्वजांच्या त्यागाची परंपरा सतत चालली पाहिजे. पूर्वी पंढरपूरला त्यागाचा होम पेटला, आज सेवाग्रामच्या सभोवती पेटो. तो पेटत राहिला पाहिजे. राष्ट्राचं चारित्र्य नेहमी घडत राहिलं पाहिजे. ते बंद होता कामा नये. दारिद्र्य वा वैभव , दास्य वा स्वातंत्र्य; परंतु चारित्र्य फुलत राहिलचं पाहिजे.''

''आज भारतात चारित्र्य का फुलत नाही?''

''फुलत आहे. भारताचं तोंड ज्ञानविज्ञानाने, कलाविकासाने, पावित्र्याने, पराक्रमाने, विवेकवैराग्याने, सत्यअहिंसेने आजही फुलत आहे. स्त्रिया-मुलं लाठीमार

खात आहेत. कुणी हुतात्मे फाशी जात आहेत. कुणी प्रायोपवेशन करून प्राण अर्पित आहेत. कामगार गोळीबारांनी मरत आहेत. मोटारीसमोर पडून रक्ताचा सडा ओतीत आहेत. त्याग फुलत आहे.''

''परंतु जगन्नाथ आपण काय करीत आहोत?''

''आपणही घरदार सोडून प्रेमासाठी फकिरी पत्करून हिंडत आहोत. प्रेमाचा स्वर्ग रानावनांत, रस्त्यातील धुळीत, उपासमारीत , निर्माण करीत आहोत. कावेरी, त्याग का फक्त देशसेवेतच आहे? राजकीय क्षेत्रातच आहे? त्याग व चारित्र्य सर्वत्र घडत असतं. जीवनाच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीतून भलंबुरं चारित्र्य प्रकट होत असतं.''

''याला तू घे जरा. मी दमले.''

''आण. आपल्या प्रेमाचा प्रेमध्वज. त्याला खांद्याशी धरतो.''

हिंडत फिरत, भिक्षा मागत, गाणी गात खरेच दोघे पंढरपूरला आली. आषाढीचा सोहळा तेथे सुरू होणार होता. यात्रा जमत होती. चंद्रभागेस पूर आला होता. दिंड्या नाचत होत्या. भजनाची टाळी लागली होती. पंढरपूर दुमदुमले होते. त्या यात्रेत आमचेही यात्रेकरू मिसळले. गोड गाणी गात नाचू लागले.

✦✦

चंद्रभागेत पवित्र हो

आषाढी एकादशीचा दिवस. पंढरपूचा सोहळा कोण वर्णील? सारे वातावरण जसे निनादून गेले होते. जिकडे-तिकडे अभंग, जिकडे-तिकडे विठ्ठूच्या नामाचा गजर, सारे एकमेकांना क्षेमालिंगने देत होते, एकमेकांच्या पाया पडत होते, भेदभाव विसरून सारे एका भक्तिगंगेत डूंबत होते.

गर्दीतून जगन्नाथ व कावेरी यांनी दर्शन घेतले. लहान प्रेमानंद गुदमरला. फुल चुरगळले. कशीतरी हळूहळू ती बाहेर आली.

''किती गर्दी, किती धक्काबुक्की ,''जगन्नाथ म्हणाला.

''मला त्यात आनंद वाटत होता. हजारो रूपांनी नटलेला पांडुरंग जणू स्पर्श करीत होता. विराट भारताचा स्पर्श. जनता-जनार्दनाचा स्पर्श. सागराच्या सहस्र लाटा अंगावर खेळायला आल्या तर का करंट्याप्रमाणे दूर सरायचं? प्रेमा मात्र जरा गुदमरला.''

''झोपव त्याला मांडीवर. चल नाही तर आपण वाळवंटात जाऊ. चंद्रभागेच्या तीरी जाऊ.''

''चल जगन्नाथ.''

आणि तिघे गेली. आकाशात ढग जमा झाले. पाऊस येणार की काय?

चंद्र दिसत नव्हता. प्रेमा झोपला होता; परंतु एकाएकी कावेरीला उलटी झाली. भयंकर वांती, ती घाबरली, जगन्नाथने धरून ठेवले.

''काय गं कावेरी?''

''गळून गेले मी जगन्नाथ.''

''पड माझ्या मांडीवर. ठेव हो डोकं.''

तो थोपटीत होता, तो पुन्हा वांती, जगन्नाथ घाबरला. कॉलरा की काय? परंतु कुठे जायचे? या गर्दीत कुठे जायचे? आणि यांना येथे सोडून कसा जाऊ? यांना घेऊन तरी कसा जाऊ?

कावेरीला इतक्यात जुलाब झाला. जोराचा जुलाब. जगन्नाथने नीट पुसले. दुसरे एक वस्त्र त्याने तिला नेसविले, गुंडाळले; परंतु छे. पुन्हा जुलाब! पुन्हा वांती! कावेरी थकली, भागली, तिला बोलवेना, ती निश्चेष्ट पडली. इतक्यात बाळ जागे झाले.

''दे माझ्याजवळ. शेवटचे पाजते.''

''नको पाजू.''

''आण रे पाजते. तारायचं असेल तर देव तारील सर्वांना.''

आणि कावेरीने बाळाला घेतले. बाळ ओढीत होते स्तन. जणू शेवटचे पीत होता दूध! होते नव्हते तेवढे पीत होता; परंतु हे काय?

बाळ एकदम आईच्या अंगावर ओकला आणि बाळाला जुलाब झाला. एक, दोन मरणोन्मुख! मातेच्या अंगावर बाळ होते. जगन्नाथ वेडा झाला. काय करावे त्याला कळेना. त्याने आपले धोतर फाडले. बाळाचे अंग पुसले. कावेरीला त्याने दुसरे एक धोतर गुंडाळले.

बाळाला पुन्हा वांती झाली आणि ते बाळ !ते निष्प्राण झाले. आईजवळ निष्प्राण होऊन पडले.

''प्रेमा, प्रेमा,''तिने हाक मारली.

प्रेमाची हालचाल थांबली होती आणि तिला पुन्हा वांती झाली.

''जगन्नाथ, जाणार हो मी. बाळ गेला मीही जाते. पाप नको जगात. प्रेम जगात राहू दे, पाप जाऊ दे, तू राहा, तुला मी भुलवलं, तुला फसंवल. प्रेमपाशात

अडकवलं. इंदिरेला, तुझ्या आईबाबांना रडतं ठेवलं. मी कर्तव्य विसरून तुलाही कर्तव्याची भूल पाडली. मी हरिजनांची सेवा सोडून तुला मिठी मारीत बसले. माझी प्रेमाची तहान भागवीत बसले. पुरी झाली हो तहान राजा.या चंद्रभागेच्या तीरी पुरी झाली. माझी ती तहान संपली. आता क्रांतीची ज्वाळा पेटत आहे! परंतु हे शरीर गळत आहे. माझी क्रांतीची ज्वाळा तुझ्यात ठेवून मी जाते. माझी प्रेमज्वाळा शांत झाली. आता क्रांतीची ज्वाळा भडकू दे, लाल ज्वाळा. जगातील सारी घाण जळू दे, जगात शांती, आनंद समता आणल्यावरच ती शांत होऊ दे. तोपर्यंत नाही. इन्किलाब झिन्दाबाद!

''तिकडे विठोबांचा गजर होत आहे. इन्किलाबचा गजर व विठोबाचा गजर एकरूप आहेत. विठोबाचं नाम जीवनात क्रांती करतं. जीवनांत क्रांती करील तेच खरं नामोच्चारण. इन्किलाबची गर्जनाही क्रांतीसाठी आहे, अवघाची संसार सुखाचा करण्याचाच-तोही विश्वमंत्र आहे. तो मंत्र तुझ्यात ठेवून मी जाते. माझं बाळ गेलं, मी जाते. क्रांती तुझ्याजवळ ठेवून जाते, क्रांतीचा झेंडा हाती घे, ते लाखो भगवे झेंडे आपण पाहिले. त्याचा अर्थ ज्याला कळेल तो लाल झेंडा हाती घेईल. जगन्नाथ,जगन्नाथ, तू जग, जग हो. क्रांती करा. इंदिरा, तू, तुझे मित्र क्रांती करा. एक मागणं आहे तुझ्याजवळ, देशील ना?''

''कावेरी अद्याप काय द्यायचं राहिलं आहे? मी तुला न देता काय ठेवलं आहे?''

''जगन्नाथ, एक मागणं मागते. तू मला विसरून जा. बाळाला विसरून जा. हे एक स्वप्न समज.''

''स्वप्नंच अमर असतात. स्वप्नांतूनच जगाला सुंदरता मिळाली. कवींची स्वप्नं, कलावंताची स्वप्नं, महात्म्यांची स्वप्नं, या स्वप्नामुळेच मनुष्य मोठा आहे. मनुष्य स्वप्नं पाहू शकतो. कल्पना रंगवू शकतो; म्हणून तो मोठा कावेरी! तुझं-माझं जीवन म्हणजे महान स्वप्न, सत्यमय स्वप्न, ते कसं विसरू? तुझ्या बरोबर मलाही येऊ दे. मला का नाही होत अजून काही?''

तू राहा, बाळाचं. माझं आयुष्य देवाने तुला दिलं आहे. जगन्नाथ देव आपल्याला प्रेमाचा आशीर्वाद देत आहे. पांडुरंग आपल्या पदरात मला घेत

आहे. आपल्या प्रेमावर तो मोहित झाला जणू. का त्याला आपलं प्रेम पाहवलं नाही? काही असो. या भरलेल्या चंद्रभागेच्या तीरी, या जयजयकारात, या महान यात्रेत मी माझी यात्रा भरल्या हृदयाने पुरी करीत आहे. जीवन कृतार्थ झालं. तू फुलवलसं, फळास आणलत माझं जीवन. जगन्नाथ, गड्या प्रिया, प्राणा, कोणत्या नावाने तुला हाका मारू? भेटू दे तुला, शेवटची भेटू दे. घे मला जवळ-घे, घे!''

तिने जगन्नाथला मिठी मारली. सारे प्राण डोळ्यांत आणून तिने त्याला पाहिले, तेजस्वी डोळे-आणि ते मिटले. त्याच्या मांडीवर कावेरी पडली. एका मांडीवर प्रेमा. जगन्नाथ बसला होता. काय करील बिचारा! प्रथम अश्रूच येत नव्हते? काही वेळाने अश्रू आले आणि वरूनही मुसळधार पाऊस सुरू झाला. कडाड कडाड गर्जना झाली. तो गोळा आपल्या मस्तकावर पाडावा असे त्याला वाटले; परंतु नाही. त्याचे भाग्य नव्हते. पाऊस त्यांना स्नान घालीत होता. परंतु थोड्या वेळाने पाऊस थांबला. आकाशात चंद्र फुलला. जगन्नाथ जरा शांत झाला. त्याला शांत करायला का त्या पर्जन्यधारा धावत आल्या? देवाने का त्याच्यासाठी अश्रू ढाळले व पुन्हा आपला शांत मुखचंद्रमा त्याला दाखवला? तूही शांत हो. रडलास ना? आता शांत हो. असे का वरचा तो चंद्रमा सांगत होता? आणि जगन्नाथ गाणे म्हणू लागला. साश्रुकंप गाणे!

हे जीवन म्हणजे काय
कळेना हाय।।
घडिघडी म्हणुनिया हे भगवंता स्मरतो मी तव पाय।।हे०।।
या जगात नानापंथ दिसतात
कोळला मार्ग मी घेऊ हे तात
तू धावत ये मम देवा धरी हात
मी गरीब लेकरूं परम कृपेची प्रभूवर तूं मम माय।।हे०।।
मी उडावया प्रभू बघतो परि पडतो
मी तरावया प्रभू बघतो परि बुडतो
मी जागृत व्हावा बघतो परि निजतो

हा मानव जन्म प्रभुवर सारा हरहर वाया जाय।।हे०।।
मोही मी प्रभूजी पडतो फिरफिरू
घेईन मन्मना केव्हा जिंकोणी
मन्निश्चय राहील केव्हा दृढ टिकुनी
ही जिवा लागली हुरहूर संतत झालो अगतिक गाय।।हे०।।
आशेची जळुनी झाली राखुंडी
जीवनात आलो आता रडकुंडी
जाईन होऊन का मी पाखंडी
जो श्रद्धा आहे तीळभर तोवर धावत ये रघुराय।।हे०।।

जगन्नाथ धावा करीत होता. असत्यातून सत्याकडे नेणाऱ्याची, मृत्यूतून अमृतत्वाकडे नेणाऱ्याची, अंधारातून प्रकाशाकडे नेणाऱ्याची तो करुणा भाकीत होता. 'हे जीवन म्हणजे काय' हा चरण तो पुन्हा पुन्हा म्हणे. 'आशेची जळुनी झाली राखुंडी' हा चरण तो पुन्हा पुन्हा म्हणे.

''कावेरी, गेलीस. बाळ तूही गेलास. का रे मला सोडून गेलीत? मी का तुमचा नव्हतो? तुम्ही गेलीत. मला का ठेवलंत? मी पण टाकू का चंद्रभागेत उडी? काय करू?''

तो शेवटी उठला. त्याने प्रेमाच्या देहाचे कोमजलेले फूल चंद्रभागेच्या फेसाळ-पाण्यावर सोडले! त्याने कावेरीला उचलले आणि तिला हलक्या हातांनी त्याने चंद्रभागेत सोडून दिले. देहाच्या सर्व अस्थी गंगेत त्याने अर्पण केल्या आणि थरथरत त्या चंद्रभागेच्या तीरावर तो उभा होता. कावेरी व प्रेमा यांचे देह दिसतात का हे तो पाहात होता. त्याने डोळे मिटून घेतले.

तो हात जोडून उभा राहिला आणि पुन्हा...

''हे जीवन म्हणजे काय कळेना हाय''

असे गाणे म्हणू लागला. माझा मार्ग कोणता? मी जगू की मरू? कावेरीच्या पाठोपाठ जाऊ का मागे राहू? क्रांतीसाठी, इंदिरेसाठी राहू? कोणते कर्तव्य? कशात आहे प्रेम? कावेरी म्हणाली जग. तिच्या प्रेमाचा का तो आदेश होता? परंतु तिने मला जगण्यास सांगणे हा तिच्या प्रेमाचा मोठेपणा व मी तिच्यापाठोपाठ जाणे यात माझ्या प्रेमाचा मोठेपणा. काय करू मी? कोणता मार्ग?

'जो श्रद्धा आहे तीळभर तोवर धावत ये रघुराय' असे त्याने म्हटले.

आणि एकदम कोण तेथे धावून आले? कोणीतरी धावत आले. जगन्नाथ चमकला. तो उडी घेणार तो कोणीतरी त्याला धरले.

''कोण?''

''जगन्नाथ, जगन्नाथ!''

''गुणा, गुणा!''

दोघे मित्र परस्परांस भेटले. त्यांना बोलवेना. एकमेकांस सोडवेना.

''गुणा, मला जाऊ दे.''

''कुठे जातोस आता?''

''या चंद्रभागेत जाऊ दे.''

''जगन्नाथ, आम्हाला सोडून का जाऊ म्हणतोस? तू का आम्हा सर्वांना कंटाळलास? इंदिराताई रात्रंदिवस रडत आहे. हातांनी सूत काढते. डोळ्यांतून टिपं काढते. मुखाने देवाचे नाम. तुझ्यासाठी ती सती प्राण कंठी धरून आहे. तुझे आईबाबा सारखी वाट पाहात आहेत. जगन्नाथ, चल राजा. माझा पांडुरंग मला भेटला. माझं दैवत मला भेटलं. माझी यात्रा कृतार्थ झाली. तुला शोधायला मी निघालो होतो. मला शोधून तू कंटाळलास व निराश झालास, होय ना? चल परत. आपण खूप काम करू. क्रांतीचा झेंडा हाती घेऊ. शेतकऱ्यांचे संसार, त्या भोळ्या भाबड्या श्रमजीवींचे संसार सुखी करू. त्यांना विठ्ठलाचे झुंजार वीर करू. क्रांतीचे वीर. चल. या चंद्रभागेत निराशा सोड आणि चल.''

''गुणा, या चंद्रभागेत मी काय काय तरी सोडलं तुला आहे का माहीत? ते सांगेन तर तूही मला चंद्रभागेत जायला परवानगी देशील. तू आपल्या हाताने मला लोटशील. माझ्यासारख्याचा तुला स्पर्श झाला म्हणून तुला वाईट वाटेल. गुणा, हा जगन्नाथ दोषी आहे, अनंत पापांचा स्वामी आहे. सांगू तुला सारं, सारं सांगू?''

''सांग. तुझा हृदयसिंधू रिकामा कर.''

आणि जगन्नाथने सारा इतिहास सांगितला. रोमांचकारी इतिहास. शेवटी जगन्नाथला बोलवेना. तो भावनावेग आवरून म्हणाला, ''गुणा, ती पाहा कावेरी,

तो बघ प्रेमा. जाऊ दे हो मला. आता मरण्यातच राम आहे, कृतार्थता आहे. जगण्यात अर्थ नाही. मी खरोखरच भिकारी झालो. आत्मा गमावून बसलेला भिकारी. पावित्र्य व चारित्र्य यांची संपत्ती गमावून बसलेला भिकारी. शेतकऱ्यांची शेती मी परत करीन; परंतु माझी निर्मळतेची, निष्पापतेची शेती, पवित्र्याची, चारित्र्याची शेती मी परत करीन; परंतु माझी निर्मळतेची, निष्पापतेची शेती, पावित्र्याची, चारित्र्याची शेती गेली हो कायमची वाहून. ती कोण परत देणार? मी कायमचा दिवाळखोर बनलो. सोन्यासारख्या मानवी शरीरात येऊन शेणाचे दिवे लावले. अरेरे! गुणा, जाऊ दे मला. तूच तुझ्या कोमल मधुर हातांनी लोट. सारंगी वाजवणाऱ्या हातांनी माझ्या जीवनाचं भेसूर संगीत कायमचं संपवून टाक. उठ, लोट मला.''

''मी इंदिरेच्या पायांवर तुला लोटीन. चल. तिच्या डोळ्यांतील चंद्रभागेत तुला लोटीन. ती तुला पवित्र करील. ती तुझी पावित्र्याची शेती परत देईल. पुन्हा फुलवील. दुप्पट जोराने फुलवील. चल. जगन्नाथ चल. नको अंत पाहू.''

''गुणा, इंदिरेला हे काळं तोंड कसं दाखवू? हा वंचना करणारा हात तिच्या हातांत पुन्हा कसा देऊ?''

''जगन्नाथ, चल हो. तुझं ते जीवन विसरण्याइतकं जर आमचं मोठं नसेल तर त्या प्रेमात काय अर्थ? तेच खरं प्रेम जे कोटी अपराधही पोटात घालतं. सतीच्या डोळ्यांतील एक अश्रू पापांचे पर्वत विरघळवून टाकायला समर्थ आहे. एक पावित्र्याचा स्फुल्लिंग पापाचा खंडोगणती केरकचरा जाळून टाकायला पुरे आहे. चल, राजा चल.''

जगन्नाथचा हात धरून गुणा निघाला.

''थांब गुणा. बाळाची तिथे आंगडी आहेत. कावेरीची एक चोळी आहे. तिथे असेल. चल ती घेऊ. ती स्वच्छ होती. तिथे असतील, चल. इतरही कपडे तिथे आहेत. ते चंद्रभागेत सोडून देऊ.''

''चंद्रभागेत नको.''

''मग का तिथेच ठेवायचे?''

''ते जाळू.''

''तू डॉक्टर झालास वाटतं?''

''हो. डॉक्टर झालो आणि तुझा रोग बरा करायला आलो.''

ते गलिच्छ कपडे त्यांनी गोळा करून घेतले आणि चोळी व आंगडे गुणाच्या खिशात जगन्नाथने ठेवले. बाकी कपडे त्यांनी जाळले. यात्रा कमी होऊ लागली. सर्वत्रच कॉलरा पसरला. शेकडो लोक मरू लागले.

जगन्नाथ व गुणा आगगाडीत होते.

''कुठे आहे ती चोळी? ते आंगडं?'' जगन्नाथने विचारले.

''ही घे.'' गुणाने काढून दिली.

जगन्नाथने ती रुमालात गुंडाळून हृदयापाशी धरली व पांघरूण घेऊन ती झोपी गेला. प्रेमळ मित्र जागा राहून तेथे बसला होता.

✦✦

शेवटी सारे गोड होते

आगगाडीत जगन्नाथ हसला नाही, बोललाही नाही. अद्याप तो भूतकालीन स्वप्नात होता. त्या स्वप्नाचा आवेग कमी झाला नव्हता. मध्येच त्याच्या डोळ्यांत पाणी येई. शून्य दृष्टीने तो खिडकीतून बाहेर पाहात होता.

''गुणा, हृदय कसं ओथंबून आलं आहे! किती स्मृती, किती प्रसंग! आणि कालची ती काळरात्र. जीवनाच्या इतक्या जवळ का मृत्यू असतो? आनंदाच्या इतक्या जवळ का दुःख असतं? भीमेच्या तीरावर, चंद्रभागेच्या तीरावर किती आनंदाने आम्ही बसलो होतो आणि एका घटकेत सारा खेळ खल्लास! सारे दिवे मालवले गेले! सारं शून्य झालं. दुःख जणू छायेप्रमाणे सुखाच्या मागोमाग असतं.''

''जगन्नाथ, हे जीवन म्हणजे खिचडी आहे. हे जीवन सुख-दुःखांचं मिश्रण आहे. तिथे दिव्याखाली अंधार असतो. प्रकाशाशेजारी सदैव छाया असते. फळात कीड असते, चंदनाला विळखा घालून साप बसलेला असतो. हास्य व अश्रू शेजारीशेजारी आहेत. दुःखाचेही अश्रू व सुखाचेही अश्रू. याचा अर्थ मला इतकाच वाटतो, की सुख काय, दुःख काय- शेवटी एकरूप आहे. जीवन काय, मरण

काय– शेवटी एकरूपच आहे सारं. सर्वांचं शेवटी एक महान सत्यात रूपांतर होत असेल. जीवनाला दिवस व रात्र दोहो मिळून शोभा आहे.''

''आता चाळीसगाव येईल. आपण तिथेच उतरायचं का?''

''सरळ जळगावला जाऊ. रात्रीच्या गाडीने घरी जाऊ.''

''धुळ्याला गेलो तर? दयाराम भारतींना भेटू. त्यांना किती दिवसांत मी पत्र लिहिलं नाही. ते असतील का तरी तिथे? तुला आहे का काही माहिती?''

''जगन्नाथ, दयाराम देवाघरी गेले.''

''आणि मीच एकटा कपाळकरंटा कसा राहिलो?''

''क्रांती करण्यासाठी. दयारामांनी मरता मरता आदेश दिला, की क्रांतीसाठी जगा, झिजा, मरा. तू व मी या क्रांतीत शिरू. विराट जागतिक क्रांती. आपण आपला तालुका संघटित करू. तुला शेतकरी देव मानतात, त्यांचा पुढारी हो, मी त्यांच्या शारीरिक रोगांवर इन्जेक्शनं देईन, तू त्यांच्या निराश मनांस इन्जेक्शनं दे, आपण त्यांना उठवू, इंदू व इंदिरा यांच्यात जातील. साक्षरतेचे स्त्रियांचे वर्ग जागोजाग काढतील, त्या दोघी स्त्रियांतही चैतन्य ओततील, शेतकऱ्यांच्या आयाबायाही झुंजार होऊ देत.''

''कावेरी असंच म्हणे. स्त्रियांत चळवळ न्या, असं ती म्हणे आणि क्रांतीची ज्वाला पेटवा, तुम्ही जगा असं सांगत ती निघून गेली. करू. आपण क्रांती करू. सारं रान उठवू. सारी घाण जाळू. जुलुमाची, अन्यायाची, वतनदारीची घाण! पिळवणुकीची घाण! शिलगवू महान अग्नी व सारी खोटी व भ्रामक विषमता भस्म करू. सर्वांच्या विकासास वाव मिळो. सर्वांच्या गुणांना प्रकट व्हायला संधी. गुणा, परंतु मी गळून गेलो आहे. जणू हतबल झालो आहे.''

''इंदिरा तुला नवचैतन्य देईल. स्त्री म्हणजे पुरुषाची शक्ती. ती तुझी वाट पाहात असेल.''

''स्त्रिया त्यागमूर्ती आहेत.''

''खरंच, त्यागमूर्ती आहेत. मीही एक अशी त्यागमूर्ती कलकत्त्यास पाहिली. कुमुदिनी तिचं नाव! माझी सारंगी ऐकता ऐकता तिचे प्राण उडून गेले. जगन्नाथ, असे प्रसंग जीवनातील अनंततेचं दर्शन घडवतात; जीवन किती गहन, गंभीर, खोल खोल आहे ते अशा प्रसंगी दिसून येतं.''

''तिचं का तुझ्यावर प्रेम होतं.''

''मला काय माहीत? ती आजारी होती. तिचा बाप मला सारंगी वाजवायला बोलवी. म्हणे कुमुदिनीला सारंगी ऐकून बरं वाटतं. तिला जरा झोप लागते. एकदा तिने माझा एक फोटो मागितला. मी दिला. तो फोटो जवळ धरूनच ती देवाघरी गेली. माझी सारंगी ऐकता ऐकता अनंत निद्रेत मिळून गेली. चिरनिद्रा!''

''आणि कुमुदिनी बरी झाली असती तर?''

''तर काय?''

''तर तिने तुला का नाचवलं असतं? मी कावेरीचा वेडा तसा तू कुमुदिनीचा वेडा झाला असतास?''

''काय झालं असतं मला काय माहीत? देवाने आधीच पडदा पाडला. शोकांत नाटक होऊ दिलं नाही.''

''दयाराम माझी आठवण काढतो का?''

''हो. काढीत. म्हणत येईल हो तो. इंदिरेला मरता मरता आश्वासन देत म्हणाले येईल हो जगन्नाथ; परंतु त्याला खरोखर जगाचा नाथ होऊ दे. दीनानाथ होऊ दे.''

इंदू घरी वाट पाहात होती. इंदिरा वाट पाहात होती आणि आज इंदू इंदिरेकडे गेली होती. इंदिरेचे मन आज फारच निराश झाले होते. सूत दोन दिवसांपासून सारखे तुटत होते. नाही नाही ते तिच्या मनात येई. ती घाबरली होती.

''इंदू, परवापासून सूतसारखं तुटत आहे. असं कधी होत नसे. डोळे मिटूनही मी सूत काढते, कसं सरळ सुंदर येतं, परवापासून हे असं होतं. कालपासून जरा कमी होत आहे. का गं असं होतं?''

''बघू, मी जरा काढते.''

आणि इंदू इंदिरेच्या चरख्यावर कातीत बसली. धागा अखंड येऊ लागला. तुट नाही काही नाही.

''छान येऊ लागला धागा,'' इंदू म्हणाली.

''बघू काढते,'' असे म्हणून इंदिरा पुन्हा सूत काढू लागली. नीट येऊ लागले. सुरेख सुंदर सूत.

''तू माझं सूत सांधलंस. तुटण्याचं थांबवलंस.''

''आणि माझा गुणाही तुमची ताटातूट थांबवील. तुमची जीवनं पुन्हा सांधतील. गंगा-यमुना एकत्र येतील.''

''कधी येतील, कधी येतील?''

''येतील, लवकरच येतील. सूत तुटायचं थांबलं. ते लवकरच येतील.''

जगन्नाथची आई वर आली.

''मुलींनो, पडा हो आता. नका चिंता करू. येतील हो दोघे. तुम्हा दोघींना सुखी पाहून मगच मी डोळे मिटीन.''

''आई, झोप येते कुठे? बसलो आहोत बोलत. थोड्या वेळाने पडू.'' इंदू म्हणाली.

'आई, सूत आता तूटत नाही. इंदूने जादू केली.''

''गुणाही अशीच जादू करील. ताटातूट दूर करील.'' म्हातारी आता खाली गेली. रात्र बरीच झाली होती.

एरंडोल रोड स्टेशनवर गाडी आली. दोघे मित्र खाली उतरले. त्यांच्याजवळ समांन फारसे नव्हते.

''गुणा, आपण चालत जाऊ. शेकडो गोष्टी बोलत जाऊ. सहा वर्षांचं बोलून घेऊ. सहा वर्षांतील रामायण तुला सांगेन. अरण्यकांड सांगेन, सुंदरकांड सांगेन.''

''आणि मीही माझं भारत भागवत तुला सांगेन?'' गुणा म्हणाला.

''मग जायचं ना चालतच? चल,'' जगन्नाथ म्हणाला.

''पण जगन्नाथ, तू गळून ना गेला आहेस?'' गुणाने प्रेमाने विचारले.

''अरे, हिंडण्याची या पायांना सवय आहे आणि आता उत्साह वाटत आहे. एरंडोलचा वारा अंगाला लागला, मनाला हुरूप आला. चांदणं आहे.''

''हे पावसाळी चांदणं. क्षणात चांदणं, क्षणात अंधार.''

''त्यातच मौज आहे असं तू म्हणालास ना?''

शेवटी दोघे मित्र पायी निघाले. त्यांचे पाय जणू हिंडण्यासाठीच जन्मलेले होते.

चार कोस एरंडोल होते. दोन तासांचा रस्ता होता. मध्येच जगन्नाथ पळू लागे. गुणाही पळे.

''दमशील हो जगन्नाथ.''

“नाही रे. आता मला जणू पंख फुटत आहेत.”

एरंडोल जवळ आले. म्युनिसिपालटीचे दिवे लुकलुकत होते.

“गुणा, रात्री मी तुझ्याकडेच झोपेन.”

“नको. इंदिराताई जाग्या असतील. एक क्षण म्हणजे त्यांना युग वाटत आहे. त्यांच्या पायांवर तुझं मोटळं ठेवून मी घरी निघून जाईन.”

“जशी तुझी इच्छा.”

दोघे आता गावात शिरले. एक कुत्रे भुंकत आले; परंतु ते ताबडतोब भुंकायचे थांबले. जगन्नाथची छाती धडधडत होती.

“गुणा, मी पडेन. माझा हात धर, हात धर.”

गुणाने मित्राचा हात धरला. ती बोटे थरथरत होती. घाम सुटत होता. भावनांचा प्रचंड भोवरा हृदयात फिरत होता.

जगन्नाथ घर आले. चरख्याचे गुंगूं येत होते कानांवर.

“जागी हो इंदिरा,” जगन्नाथ म्हणाला.

“ती नेहमीच जागी असते,” गुणा बोलला.

दारावर त्यांनी थाप मारली.

“आई, आई!” गुणाने हाक मारली.

म्हातारी दिवा घेऊन आली.

“कोण रे?” तिने विचारले.

“आम्ही आलो. जगन्नाथ व मी,” गुणा म्हणाला. म्हातारीने दार उघडले. दिव्याच्या उजेडात तिने मुलाला पाहिले. तिने दिवा खाली ठेवला. तिने त्याला पोटाशी धरले. कौशल्येला वनवासानंतर राम भेटला. पंढरीशेटही उठले. जगन्नाथ त्यांच्या पाया पडला. त्यांनी पाठीवरून, डोक्यावरून हात फिरविला.

“बाळ, आधी आता वर जा. ती सारखी रडत आहे. जा तिला भेट.”

दोघे मित्र वर गेले. जगन्नाथच्या खोलीत दोघी मैत्रिणी बसल्या होत्या.

“कधी येईल, कधी येईल
जीवनाचा राजा माझा जगन्नाथ कधी येईल”

असे गाणे, असे ते चरण इंदिरा म्हणत होती.

“येईल येईल, धीर धर सखी;

तुझा नाथ सुखी येईल, येईल,''
असे इंदू म्हणत होती.''
आणि दोघे दारात उभे राहिले.
''इंदिराताई,'' गुणाने हाक मारली.
दोघी चमकल्या. एकदम उभ्या राहिल्या.
जगन्नाथ गहिवरला. गुणासमोर गुडघे टेकून तो म्हणाला, ''गुणा, माझ्या मित्रा, तुझ्यामुळेच माझी व इंदिरेची भेट झाली.''
''इंदिराताई, चुकलेला जगन्नाथ मी शोधून आणला आहे. त्याला तुमच्या स्वाधीन करीत आहे. सांभाळा आता त्याला. जगन्नाथ आपण नंतर बोलू. इंदू, चल आपण जाऊ.''
असे म्हणून गुणाने जगन्नाथला इंदिरेच्या स्वाधीन केले. तो नि इंदू जिना उतरून निघून गेले.
इंदिरा खाली बसली. जगन्नाथचे डोके मांडीवर घेऊन बसली. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. तिचेही डोळे स्रवत होते. ती पतीला जणू स्नान घालीत होती. त्याला शुद्ध करून घेत होती.
''इंदिरे, मी पापी आहे. मला मरू दे. तोंड वर करून तुझ्याकडे बघवतही नाही. मांडीवर खाली तोंड करूनच मरू दे, मरू दे.''
''शांत व्हा हो. पत्नीला पती कधी पापी नाही दिसत. आईला मूल कधी अमंगल नाही दिसत. पडा हो.''
''इंदिरे, मी मोहात पडलो. तुला विसरलो. अरेरे! माझ्या मनातील वेदना कशा सहन करू?''
''माझ्या मांडीवर झोपा. साऱ्या जखमा भरून येतील. वेदना थांबतील. नका हो रडू. नको आता डोळ्यांत पाणी. जगात कोणी नाही मोहात पडत? सारे पडतात, पुन्हा वर चढतात. तुम्ही कसेही असा, तुम्ही माझे आहात. मला गोड आहात. माझे होतेत म्हणून ना पुन्हा माझ्याकडे आलेत? खरं की नाही?''
''तुझ्याजवळ शुद्ध व्हायला आलो. चंद्रभागेत उडी टाकून शुद्ध होणार होतो; परंतु तीही जणू मला शुद्ध न करती. तिलाही का मी काळाकुट्ट दिसलो

असतो? तुझ्या डोळ्यांतील चंद्रभागेजवळ आलो. इंदिरे, मला शुद्ध कर, मला शुद्ध कर.'' जगन्नाथला अश्रू आवरेनात.

''शांत हो. जगन्नाथ, नको रे रडू. मी तुझ्याबरोबर असते तर असं काही झालं नसतं. माझीच चूक आता नाही हो कधीही माझं हे धन डोळ्यांआड होऊ देणार. छायेप्रमाणे मी तुझ्या पाठीशी राहीन. झोप हो जगन्नाथ.''

''तू झोपव. मला थोपट. गाणं म्हण.''

''म्हणू गाणं? म्हणते हं.''

असे म्हणून इंदिरा गाणे म्हणू लागली. हाताने थोपटीत होती. पतीचे तप्त मस्तक अमृतहाताने थोपटीत होती. गाणे म्हणत होती.

नाही पडला नाही रडला असा नाही कोणी
पडुनी रडूनी सकळही जाती जीव वरती चढुनी।।
पडले सुरवर पडले मुनिवर गिळि सकला मोह
अनुतापे परी पावन होती भरून नयन-डोह।।
वाइट भारी वाटून घ्या ना पडणेही पूत
पडल्याविण ना चढला कोणी हे प्रभूचे सूत्र।।
देवाघरची शेती पिकवी नयनांतील पाणी
हृदयामधली शेती पिकवी नयनांतीत पाणी।।
सौंदर्याचे मांगल्याचे विपुल पिके पीक
जरि नयनांतिल अश्रुजलाचा होइल अभिषेक।।
मांडीवरती झोप सख्या तू मागिल ते जावो
भूत मरोनि भविष्य आता उज्ज्वल नव येवो।।
जीवन सुंदर करू हे अपुले होई न निराश
आहे हृदयी प्रभूचा अपुल्या सकलांच्या वास।।
होऊ अंती पावन सारी काय असे घाई
खाली खाली नदी जाई परि सिंधु जवळ येई।।
अंवस जरी ये जवळजवळ जरि अंधार घोर
तरि ना भय ती जवळ येतसे बीजचंद्रकोर।।
सकळही जाऊ अंती प्रभूच्या चरणांशी खास

जीवन होइल सुंदर सखया होई न निराश।।
हे मन्नाथा त्रिजगन्नाथ प्रभू सर्वा पाळी
सकल जगाची तया काळजी चिंता तू टाळी।।
वादळ येते परि ते जाते नभ निर्मळ होई
शांत चंद्रमा पुन्हा अंबरी मिरवत तो राही।।
हृदयाकाशामधले वादळ शांत तेवि होई
सत्त्वाची सौंदर्याची ज्योत्स्ना पसरून मग राही।।
घनदाट धुके अधिमधि येऊन दिनमणिला लपवी
पटल मिटून प्रकटे पुनरपि अखिल मही सुखवी।।
मोह धुके हे विरते तेवि ज्ञानमित्र येई
प्रेमाचे शुभकिरण पसरूनी पावनता देई।।
दु:ख असे हे सान्त तसेची मोह सर्व सान्त
एके दिवशी मोह गड्या हे मरतिल निभ्रान्त।।
रडुनी रडुनी उपनिषदे ती नाथ शिकू गाया
रडुनी रडुनी, आपण जिंकू नाथ मोहमाया।।
झोप सख्या तू शांत नसो ती चिंता चित्तात
उठो, उदइक प्रभू मम होऊन शांत हृदकांत।।
ग्रहणापासून मुक्त जाहल्या चंद्रामस साजो
प्राणसख्याला माझ्या पाहून पापताप जावो।।
देवा, माझा ठेवा आता हा न कधी न्यावा
आम्हा दोघांचा प्रभू आता जनम सफळ व्हावा।।"

इंदिरा न संपणारे गाणे म्हणत होती. हृदयनाथ जगन्नाथ शांत झोपला होता. त्रस्त जिवाला विश्रांती मिळत होती.

आता सर्वत्र आनंद होता. इंदूच्या घरी व इंदिरेच्या घरी लोक येत जात होते. मित्र येत होते. खेड्यापाड्यांतील शेतकरी येत होते. आनंद उचंबळला होता. पुढील कार्याचे बेत ठरत होते, योजना होत होत्या.

आणि एके दिवशी इंदिरा व इंदू, जगन्नाथ व गुणा पद्मालयाला गेली. वनभोजनास गेली. दोघे मित्र पाण्यात पोहले. लाल कमळे त्यांनी तोडून आणली

व इंदू-इंदिरेला दिली. फराळ करून सारी दाट जंगलात हिंडत गेली, गुणा व जगन्नाथ बोलण्यात रंगले होते; भावी कार्याचे विचार, संघटनेचे, क्रांतीचे विचार; सेवाधामाचे, आरोग्यधामाचे विचार! परंतु इंदू व इंदिरा कोठे आहेत?

''इंदू रे?'' जगन्नाथने विचारले.

''आणि इंदिराताई?'' गुणाने विचारले.

कोठे गेल्या दोघी?

''आता जाऊ त्यांना शोधायला. त्यांच्यासाठी आपण रडू,'' जगन्नाथ म्हणाला. तो तिकडून इंदिरा व इंदू दोघी आल्या.

''कुठे गेल्या होत्यात?''

''आमच्या योजना ठरवीत गेलो होतो,'' इंदू म्हणाली.

''आमची कामं करायला गेलो होतो.'' इंदिरा म्हणाली.

''कसली कामं?'' गुणाने विचारले.

''मी माळ गुंफायला गेले होते,'' इंदू म्हणाली.

''मी मोरांची पिसं जमवून हा मुकुट करीत होते,'' इंदिरा म्हणाली.

''बसा या दगडावर दोघे. गुणा हा हार तुझ्या गळ्यात घालते. ही वनमाळा तुला शोभेल,'' इंदू म्हणाली.

''आणि जगन्नाथ, तुला हा मोर-मुकुट शोभेल,'' इंदिरा म्हणाली.

ते दोघे मित्र देवांच्या मूर्तींसारखे शोभत होते.

''गुणा आता सारंगी वाजव,'' इंदू म्हणाली.

''जगन्नाथ तू गा,''

इंदिरेने प्रार्थिले आणि त्या वनात संगीत सुरू झाले. स्वर्गीय संगीत. बराच वेळ सारी स्वर्गसुखात होती. स्मृतिसागरावर, भावना-लहरींवर सारी नाचत होती.

''पुरे आता संगीत.''

''आता अंधार पडू लागेल.''

''सारंगी ऐकून साप येतील.''

''गाणं ऐकून हरणं येतील.''

''इंदू, तू भित्री आहेस. पुरुष बरोबर आहेत; मग भीती कशाला?'' इंदिरा म्हणाली.

“तुमच्यासारख्या स्त्रिया बरोबर असतील तर पुरुषांना भय नाही,” जगन्नाथ म्हणाला.

“भय एका पावित्र्याला नाही. पावित्र्य सांभाळतं, पावित्र्य तारतं. पावित्र्यासमोर वाघ क्रूरता विसरतो, सर्प दुष्टता विसरतो. वाघाची गाय होते, सापाचा हार होतो. पावित्र्यासमोर पापाचं पुण्य होतं, अंधाराचा प्रकाश होतो. पावित्र्य, पावित्र्य हा जीवनाचा अभंग. कायदा, शाश्वत कायदा. याचा भंग झाला तर सारं भंगेल, हा अभंग ठेवू तर जीवन रंगेल, पावित्र्य म्हणजेच परमेश्वर. असं हे पावित्र्य ज्याच्याजवळ आहे तो खरा बळी, महाबळी. मग ती स्त्री असो, पुरुष असो वा मूल असो,” गुणा म्हणाला.

“काळ्या पार्श्वभूमीवर पांढरा रंग अधिकच खुलतो. पतनानंतरच चढणं, अध:पातनंतरचा उद्धार, उन्हानंतरचा पाऊस! त्यात एक अनुपम सौंदर्य असतं. काळ्या भूतकाळाच्या यमुनेच्या तीरावर भविष्याचा नयनमनोहर आरसपानी ताजमहाल अधिकच शोभून दिसेल नाही?” जगन्नाथ म्हणाला.

“हो जगन्नाथ. अश्रूंतून निर्माण झालेली इमारत अधिकच सुंदर दिसणार. ताजमहालही हृदयाच्या अश्रूंतून जन्मलेला आहे,” गुणा म्हणाला.

मंदिरातील घंटा घणघण घणघण वाजू लागली.

“ती देवाची घंटा आपणांस साथ देत आहे,” इंदू म्हणाली.

“देवाची आरती, मंगल आरती सुरू होणार असेल. चला जाऊ,” इंदिरा म्हणाली.

“आता तो मुकुट काढ जगन्नाथ,” गुणा म्हणाला.

“इंदिरेला वाईट वाटेल म्हणून काढला नाही. आणि तुझा हार रे?”

“इंदू रागावेल म्हणून मीही काढला नाही.”

“जगन्नाथ, आण तो मुकुट. मी तो जपून ठेवीन. पुन्हा वनात येऊ तेव्हा तुला घालीन. किती छान दिसतो तुला.”

“आता पुन्हा वनात कशाला जायचं? आता जीवनात रमू, काम करू,” गुणा म्हणाला.

“जीवन हे वनच आहे,” इंदू म्हणाली.

“हो, जीवन म्हणजे कुंजवन आहे. तिथे मुरली आहे, कृष्ण आहे.” इंदिरा म्हणाली.

''तिथे कालिये आहेत, अघासुर, बकासुर आहेत. वणवे आहेत; सर्प, वाघ आहेत; काटेकुटे आहेत; खाचखळगे आहेत,'' जगन्नाथ म्हणाला.

''परंतु काट्यांची फुलं होतील, वणवे विझतील, साप निर्विष होतील. शेवटी सारं सुंदर होईल. शेवटी सारं गोड होईल,'' गुणा म्हणाला.

''खरंच. शेवटी सारं गोड होईल. अश्रूंची फुलं होतील, माणिक मोती होतील. दुःखातून सुखांचे अंकुर बाहेर येतील, सारं गोड, शेवटी सारं गोड!'' इंदिरा म्हणाली.

आणि तिकडे घंटा घणघण घणघण वाजत होती. मंगलमूर्तीची पंचारती होत होती. ही चारी जणे तेथे जाऊन उभी राहिली. इंदिरा व जगन्नाथ, इंदू व गुणा भक्तिभावाने उभी होती. मंगलमूर्तीसमोर विघ्ननाशकासमोर, सुखकर्त्या दुःखहर्त्यासमोर निरहंकारपणे उभी होती. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू गळत होते. मंदिरातील अणुरेणू एकच गोष्ट मुकेपणाने सांगत होता व घंटा गर्जून सांगत होती की, 'शेवटी सारे गोड होईल.'

✦✦✦

साने गुरुजी लिखित अनमोल ग्रंथसंपदा

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुध्द अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे 'साने गुरुजी!' मातृभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्यसमरात त्यांनी स्वत:ला झोकून दिले आणि अखेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सुखासाठी झटत राहिले. समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, एकता निर्माण व्हावी, शेतकरी-कामकरी वर्गाचे दैन्य-दारिद्र्य दूर व्हावे व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतूने ते सर्वत्र जनजागृती करत राहिले. लहान मुले, स्त्रिया, तरुण, दीन-दलित यांना स्वत्त्वाची जाणीव व्हावी व उत्तमोत्तम विचारांची देणगी मिळावी यासाठी अत्यंत संस्कारक्षम असे साहित्य त्यांनी निर्माण केले.

आज साने गुरुजींसारखे उदात्त व्यक्तिमत्त्व आपल्यामध्ये नसले तरीही त्यांचा हा साहित्यरूपी अनमोल ठेवा आपल्याकडे आहे. अत्यंत सोप्या भाषेतील या बोधप्रद कथा, वैचारिक लेख, इतर भाषांमधील महान लेखकांचे अनुवादित साहित्य घरोघरी पोहोचावे या हेतूने साने गुरुजींची सर्व पुस्तके एकूण ५१ खंडामध्ये आम्ही आपणासमोर सादर करीत आहोत. महाराष्ट्रातील प्रत्येक घर गुरुजींच्या विचारांनी पावन व्हावे, हीच एकमेव इच्छा !

गोड शेवट

₹ 260

200024

e mail : riyapublications@gmail.com

रिया पब्लिकेशन्स